तामिलनाडू के समान केरल भी बुध्द भूमि थी ऐसा निष्पन्न हुआ है। केरल का पहिला बौध्द राजा जयसिंह पेरुमल था। तिसरी शताब्दी मे बाणपेरुमल व तिसरा बौध्द राजा विक्रमादित्य वरगुणना यह था। मुशकवंशम ग्रंथ से पता चलता है की, केरल मे अनेक विहार तथा बौध्द मंदिर होते थे । राजा वरगुणनने केवल दक्षिण भारत मे ही नही बल्की उत्तरभारत मे भी धम्म प्रसार किया है । कर्नाटक राज्य के सांस्कृतिक जीवन विकास मे बौध्द धम्म का बडा योगदान रहा है। कर्नाटक मे सम्राट अशोका द्वारे बनाये हुअे सतग लघु शिलालेख मिले है। यह रायचूर, चित्रदुर्ग, गुलबर्गा इन जिलो मे मिले है। वनवासी के भूतपाल नामक व्यापारी ने जम्बुद्विप मे सुंदर कार्ला लेणी बनवाई थी। मौर्य के उपरांत सातवाहन और बाद मे गंगा एवंम कदम्बा इन्होने केरल मे राज्य किया था। इसीकाल मे अनेक विहार थे ऐसे ऐतिहासिक तथ्य मिलने लगे है। (मोरे २००६ पृ. ३८)

मध्यभारत मे बौध्द धम्म (महाराष्ट्र):

मध्यभारत मे बौध्द धम्म का अस्तित्व बुध्द के कालसेही मालूम पडता है। यहा भिक्खू पूर्ण आये थे। थेरगाथा, सुत्तनिपात तथ सुत्तपीटक से यह पता चलता है की, बुध्द कालसेही महाराष्ट्र मे धम्म का प्रवेश हुआ। सुप्पारक का भिक्खू पुण्ण (पूर्ण) भगवंत से दीक्षीत होकर सोपारा मे आये थे। इसीदिन्नाने कोंकण मे धम्म प्रसार किया। नादेड के नजदीक बावरी ब्राम्हण ने जब बुध्द के सोला शिष्य आये तब दीक्षा ली। भारत मे कुल १२०० बौध्द लेणी तथा गुफाये है।

Scanned with CamScanner

इनमेसे अकेले महाराष्ट्र मे ८०० लेणीया मिलती है। इसवीसन पुर्व दुसरी शताब्दी से लेकर सातवी शताब्दीतक यह काम चलता रहा। इन बौध्द गुफाये महाराष्ट्र मे भाजे, कार्ले, बेडसा, कोंडाणे, शेलारवाडी, कान्हेरी, नागोठाणे, कोल्डीवते, कुडा, महाड, कोल, दाभोळ, नादसूर, चिपळून, जुन्नर, नाशिक, अजिंठा, एलोरा विदर्भ मे भद्रावती इस जगह पर्वती इलाखोमे मिलती है।

महाराष्ट्र मे बौध्द धम्म करीब करीब एक हजार साल तक उर्जिता अवस्था मे रहा है। सातवाहन के कुछराजा क्षरहत राजे, कर्दमक तथा वाकाटक का एक मंत्री महोदय ने दान देने का संदर्भ मिलता है। फिर भी बहुत लेणीया, व्यापारी, उपासक, उपासिका, कारगीर एवंम सर्वसामान्य प्रजा ने दान करके बनवाई है। विसवी शताब्दी मे एकबार फीर बाबासाहब डॉ. भिमराव आंबेडकरने नागपूर मे दीक्षा भूमि मे ५००००० लोगो को दीक्षा दिलाकर धम्मचक्र का प्रवर्तन किया। (सोनवणे शिवाजी जुलै २०१२, पृ.२८–३६)

महाराष्ट्र के समान गुजरात मे भी बुध्द धम्म की परंपरा प्राचीन मालूम होती है। भगवान बुध्द के कालमेही बुध्द का धम्म गुजरात मे गया होगा ऐसा दावा इतिहासतज्ञ करते है। थेरगाथा एवंम थेरीगाथा मे भरुकच्छने (भरुच व कच्छ) इन जगह का उल्लेख मिलता है। गुजरात के पार्श्वभूमि पर आधारीत अनेक जातक कथाये मिलती है। उनमे से कुछ सुरभडग जातक (५२२), इंद्रिय जातक (४१३), भरुजातक (२१३), सुप्परक जातक (४६३), संसादी जातक (३७०) इ. जातक कथाये मिलती है। श्रीलंका पर राज करनेवाले राजा विजयसिंह भी गुजरात के थे। भगवान बुध्द के एक शिष्य महाकच्चायन ने अवन्ती देश के उज्जैन से आजूबाजू लगत के प्रदेशमे धम्म का प्रसार तथा प्रचार भी किया। साबरकंठा उत्खनन के देवरी मोरी मे बुध्द की अस्थिया मिली है। इसीतरह जूनागढ, तलाजा, साना, खम्बालीया, ढाक, केडीओ डुंगर, रानपूर, गुंताली, कडेश्वरी, भूज, देवनीमोरी यहा २७० ते ४७० के शताब्दीकी लेणीया एवंम स्तूप प्राप्त हुअे। भगवान बुध्द के अस्थिया का कलश बडोदा विश्वविद्यालय के आर्किओलाजी विभाग मे रखा गया है। गुजरात मे मैत्रक राजाओने (४७०–७८९) विशेष करके बुध्द धम्म को मदद दी। चौथा प्राचीन बौध्द विश्वविद्यालय वलभी की स्थापना गुजरात मे की यहा १०० विहार तथा ६००० भिक्खू रहते थे। हयू–एन–त्संग ने ६४८ मे समस्त गुजरात मे भ्रमण किया था। (मोरे २००६ पृ.४२–४३)

उत्तर पूर्व भारत यह भी प्राचीन कालमे बौध्द भूमि थी। सम्राट अशोका के कलिंग (ओरिसा) यहा धौलगिरी व जौगड शिलालेख मिले है। इस पर उल्लेख मिलता है की, नागार्जून ने राजा गुंजा को दुसरी शताब्दी मे दीक्षीत किया था। भगवान बुध्द के दाढ का एक दात श्रीलंका मे और एक ओरिसा मे रखा गया है। यहा के बहुतांश लोक बौध्द ही थे। भौमि, भौमकार राजाओने आठवी शताब्दी के मध्य मे बुध्द धम्मको बडी मदद की थी। ओरिसामे सभी जगह बौध्द स्तूप, विहार, चैत्य एवंम स्तंभ मिले है। सिंहप्रस्थ उत्खनन मे १० फुट उँचाई की भूमिस्पर्श मुद्रावली बुध्द मुर्ती भी मिली है। इसके अलावा बुध्द की १०० (एक सौ) मुर्तिया इसमे अवलोकीतेश्वर, तारा, पण्डारा, भामकी, लोचना तथा वज्रेश्वरी की थी। इस मूर्ती पर से अनुमान लगता है की यहा विशेष करके महायानी बुध्द धम्म था। इसके साथ साथ यहा मिट्टीके बर्तन, सिंहकी मुर्तिया, सिक्के तथा सांस्कृतिक प्रतिक भी मिले है। इसे यह अनुमान लगता है की यहा बुध्द का धम्म ६००–८०० सालो तक था।

स्वतंत्रता के बाद मे धवलगीरी यहा बौध्द भूमि घोषित कर दिया गया और १९७२ मे यहा भव्य स्तूप बनवाया गया इसे धवलगीरी चैत्य स्तूप कहा जाता है। आज भी यह स्तूप बहुत प्रसिध्द तथा पवित्र भी माना जाता है।

औरिसा के साथ साथ आसाम, पश्चिम बंगला तथा बिहार के पाल राजाओने बुध्द के धम्म को बढावा दिया है। पश्चिम बंगाल तथा बिहार मे गोपाल का पुत्र धर्मपाल ७७० मे राज गद्दीपर आया। उन्होने पिताश्री का मार्ग अपनाया। उन्होने विक्रमशिला विश्वविद्यालय की स्थापना की। इस विश्वविद्यालयसे अनेक विद्वान बौध्द भिक्खू कल्याण गुप्त, सुंदरव्युह, सागरमेघ, प्रभाकर पूर्णवर्धन तयार हुये। (मोरे २००६ पृ.३८–४८)

Scanned with CamScanner

उत्तर की सिमामे काश्मिर, लडाख, लेह राज्य भी बौध्द की थी। काश्मिर मे मेघवाहन राजाओ ने बुध्द धम्मका प्रचार तथा प्रसार किया। उन्होने अनेक विहार का निर्माण किया। अमृता भवन विहार अपने पत्नी के स्मश्ती मे बनवाया और आगितायू नदीको अर्पण (दान) किया। लडाख मे सम्राट अशोक के ही काल मे बुध्द धम्म पहूच गया था। उन्होने काश्मिर और गांधार देश मे भिक्खू माध्यंतिक को भेजा था। चिनी प्रवासी फा–ही–यान यहा इ. स. ४०० आसपास आये थे। उस समय यहा एक हजार से भी ज्यादा हीनयानी लडाखी बौध्द भिक्खू एवं श्रामणेर हुआ करते थे। १८३४ मे डोग्रा राजा गुलाब सिंह का सेनापती झोरावर ने लडाख व बाल्टीक पर कब्जा किया। (मोरे २००६ पृ.५०) यहा के बौध्दो ने सदैव बाहय आक्रमणकारी योसे देशवासी को बचाने मे सहायता की थी। बौध्दोका यह राष्ट्रप्रेम देखकर लोगोमे इनके लिए और श्रध्दा और आदर की भावना बढी। मई १९५० मे यहा सारिपुत्र और महामोग्गलान की अस्थिया लदाख मे लोगो के दर्शन के लिए रखी गयी थी और वह यहा देड महिना रखी। यही के लोगो पर तिबेटी बौध्द धम्म का बडा प्रभाव दिखता है। यहा थुबा (बुध्द), जाम्या (मंजुश्री), चतराझिक (अवलोकीतेश्वर)। मैत्रेय, गोल्मा (तारा) पदमपाणी तथा वज्रपाणी इनकी पुजा की जाती है। यहा महायान, तंत्रयान के अनुयायी थे। यहा प्रमुख लामाको कुशोक कहते है। यहा के लोग गरीब है फिर भी वह अत्यंत खुश, आनंदी, उत्साहप्रिय तथा चरित्र्यसंपन्न है। (मोरे २००६ पृ. ५०)

इन महत्वपूर्ण तथ्य तथा ऐतिहासिक संदर्भ से पता चलता है की, बौध्द धम्म यहा का एक प्रमुख धर्म था यह शांती, मैत्री, अहिंसा व मुल्य रखने के कारण सभी का (सार्वजनिक) धर्म बना था। आदर्श समाजं व्यवस्था की स्थापना इसी धर्म के कारण हुअी थी।

परिकल्पना के परिक्षण:

भगवान बुध्द ने तीन बार धम्म चक्र को प्रवर्तीत किया इस विधान का जिक्र मोरे के ग्रंथ मे मिलता है। इस विधान की सत्यता जॉच करने हेतू अलग अलग संदर्भ देखे गये। भल्लीक, तपस्सू बुध्द को मिलते है। बुध्द ने गृधकुट पर्वत पर निवास किया धम्म देसना की उच्चस्तरीय शिक्षा भी दी, और धान्यकटक मे भी थे। लेकीन वहा धम्मचक्र का संदर्भ नही मिलता क्योकी उसवक्त संघ का निर्माण हुआ था। डॉ. आंबेडकर के भी ग्रंथ मे पंचवर्गिय भिक्खूओके आषाढ मास मे दिया प्रवचन को प्रथम धम्मचक्र प्रवर्तन तथा बुध्द के बाद मे अशोका ने किया हुआ द्वितीय ऐतिहासिक प्रर्वचन और बीसवी शताब्दी मे बाबासाहेब डॉ. भिमराव आंबेडकर द्वारा किया गया नागपूर दीक्षा भूमि का १९५६ का तशतिय धम्मचक्र प्रवर्तन माना जाता है। धर्मानंद कोसंबी भी पंचवर्गिय भिक्खूका पहिला धम्मचक्र प्रवर्तन मानते है।

बुध्द के धम्म को खास राजाश्रय नही मिला

बुध्द के समय राजा बिंबीसार, प्रसेनजीत, अनाथपिंडक जैसे लोगोने खुले हात दान किया जगह दी, विहार बनवाये। बुध्द के बाद अजातशत्रू, काला अशोक से लेकर हर राज्य के बौध्द तथा ब्राम्हण राजाओने मदत की है। स्तूप बनवाये, साहित्य तथा बौध्द संस्कशती का निर्माण किया। इसे यह अनुमान मिलता है की, बौध्द धंम्म को राजा क्षत्रिय, ब्राम्हण से लेकर सभी वर्ण, अवर्ण, शुद्र इनका साथ मिला है। राजाश्रय के साथ–साथ लोगोकी भूमिका सकारात्मक रही और हजारो सालतक एक आदर्श सार्वजनिक धर्म के रुप मे बुध्द धम्म जिवीत रहा। स्वामी विवेकानंद अपने आत्मचरित्र मे लिखते है (पृष्ठ १६) 'बौध्द धम्म प्रकाशमान सुवर्ण युग था' उसके ऱ्हास के साथ भारत मे तमयूग का निर्माण हुआ।

प्रमुख शोध तथा निष्कर्ष:

१. बुध्द मे धम्म की एक स्वतंत्र खोज है। इसकी शिक्षा सिध्दार्थ को संबोधी (बुध्दत्व) प्राप्त होने के बाद मे दी गयी। यह किसी भी पूर्व धर्म की उपशाखा या समान धर्म नही है। यह जीवन जीने का अध्यात्मिक रुपसे व्यावहारिक पथ है।

२. बुध्द के काल मे ही यह धम्म पूरे भारत वर्ष मे पहुच चुका था।

३. बुध्द काल से लेकर बौध्द धम्म अस्तित्व मे रहने तक लोकजीवन सामान्य, साधा, चारित्र्य संपन्न,

Scanned with CamScanner

दान धर्मवाल्या रहा है। बहुत सारी लेणी—गुफाये उपासक, उपासिका, प्रजा तथा कारागीर के दानसे बनी।

४. सभी काल मे सभी स्थल के बहुतांश राजाओने बुध्द के धम्म का सम्मान किया है और राजाश्रय भी दिया, प्रचारक रहे।

५. बौध्द धम्म का तत्वज्ञान पुराने धर्म विरोधी था। वह विषमतावादी व्यवस्था पर पहिला आक्रमण था। लोकहित के लिऐ पूर्ण समर्पित था।

६. प्रज्ञापूर्ण शिक्ष वैज्ञानिक मानवतावादी मूल्य, साथी शिक्षा, मैत्री, अहिंसा सत्य आचरण तथा समान संधी और समानता, न्याय बंधुता का तत्वज्ञान होने के कारण सभी लोक आचरण करने लगे.

७. यह धम्म भारत तथा विदेश मे भी १२० से १५०० साल तक संकट मे भी जीवीत रहा। हिंदू मोगल आक्रमण के बाद भी स्वयंशक्ती सत्यता होने के कारण जीवीत रहा आज संपूर्ण विश्व मे इसका प्रसार हो रहा।

८. बुध्द का संघ लोकशाही मुलका उगम स्थान है। वही लोकशाही राज्यव्यवस्था को भी प्रेरणा रही है।

९. भारत मे हीन यान थेर—थेरी—गाथा इन्हे महत्व है दुसरी संगिती के बाद महायान संप्रदाय का निर्माण हुआ।

१०. बौध्द धम्म कला, संस्कृती, तत्वज्ञान, शिक्षा का एक अमोघ स्त्रोत रहा है। स्थापत्य कला बुध्द भिक्खू की खोज है। राजाओने विहार बनवाये वही विहार आज हिंदूओने अपने मंदीर के रुप मे लाये है। उस समय भी यहा प्राचीन काल से लेकर आज भी बौध्द जगत का लोकजीवन, कलागुण, साहित्य तथा चरित्र से संपन्न रहा है।

११. आज भारत मे हिंदू धर्म की बडी वाहवा होती है। बुध्द को अवतार कहा जाता है। बुध्द को लोग जानते नही यह एक वैदिक तथा हिंदूओकी कुटनिती रही है। अभी दुनिया के सामने हिंदूओका खोखलापन सामने आने लगा है।

१२. इसलिए इतिहास का सच होना आवश्यक है। इतिहास तज्ञ ने संशोधन करके लिखना चाहिये। नया इतिहास लिखना चाहिये। उससे धम्म का प्रसार होने मे मदद मिलेगी।

१३. बुध्द ही शांती के महादूत थे और लोककल्याणकारी धम्मके निर्माता प्रथम विज्ञानपर निष्ठता रखनेवाले और पाखंडका विरोध करनेवाले महान क्रांतीकारक और राजाओके महान मार्गदर्शक और लोक गुरु थे।

१४. दक्षिण भारत जहा हिंदू, वैदिक धर्म की भूमि मानी जाती है वह भी बौध्द की भूमि थी यह नया निष्कर्ष सामने आने लगा है।

१५. हिंदूओने वही विहार अपने नाम करवाकर मंदिर के रुप मेब डे तिर्थक्षेत्र बनवाये है।


संदर्भ ग्रंथ:

- आंबेडकर, बी. आर. (२००६). भगवान बुध्द और उनका धम्म. धम्मचक्र सुवर्ण वर्ष प्रवर्तन दिन आवृत्ती, केळझर:(महाराष्ट्र) सद्धम्म साहित्य प्रकाशन.
- भदन्त आनंद कौसल्यायन (अनु.) (१९९३, २०००). बुध्द और उनका धम्म. नागपूर: समता सैनिक दल प्रदीप ललितकाबाई गायकवाड.
- मोरे, मा. श. (२००६). जगातील बुध्द धम्माचा इतिहास. औरंगाबाद:कौशल्य प्रकाशन.
- डोंगरे, कृष्णकांत क. (२०१४). भारतीय इतिहासाचे साक्षीदार. नागपूर:बहुजन साहित्य प्रसार d æ %BSPK).
- कोसंबी, धर्मानंद (१९२३). धर्मानंद कोसंबी यांचे बौध्द धर्मावरील चार निबंध, बुध्द आणि धर्म आणि संघ. पुणे : रघुवंशी प्रकाशन.
- देशभ्रतार, धम्मपाल (२५ आक्टोबर २०१२). बुध्दत्व सत्ता मंथन (तक्षशिला से नालंदा व सिरपूर से नागपूर) (मृधंण्ड पुरातात्विक व ऐतिहासिक अंतर्ग्रथन). धम्मकुटी रायपूर:धर्मदर्शन साहित्य प्रकाशन.
- सोनवणे, शिवाजी (जुलै २०१२). सोपारा—बौध्द संस्कृतीचे केंद्र. पुणे : उषा वाघ सुगावा प्रकाशन.

❑❑❑

PRINCIPAL I/c.
Dr. Ambedkar College of Social Work
UGC Approved Sr.No.43053

Scanned with CamScanner



Scanned with CamScanner

MAH/MUL/ 03051/2012 ISSN :2319 9318

आंतरविद्याशाखीय बहुभाषिक संशोधन पत्रिका

विद्यावार्ता

UGC Approved Jr.No.62759

Oct. To Dec. 2017
Issue-20, Vol-16

Editor
Dr. Bapu g. Gholap
(M.A.Mar.& Pol.Sci.,B.Ed.Ph.D.NET.)

वियेविना मति गेली, मतीविना नीति गेली
नीतिविना गति गेली, गतिविना वित्त गेले
वित्तविना शूद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले

-महात्मा ज्योतीराव फुले

❖ विद्यावार्ता या आंतरविद्याशाखीय बहूभाषिक त्रैमासिकात व्यक्त झालेल्या मतांशी मालक, प्रकाशक, मुद्रक, संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायक्षेत्र:बीड

"Printed by: **Harshwardhan Publication Pvt.Ltd.** Published by **Ghodke Archana Rajendra** & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor **Dr. Gholap Bapu Ganpat.**

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205
Harshwardhan Publication Pvt.Ltd.
At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed
Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295
harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com
All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

Scanned with CamScanner

Index

1) DIGITAL INFORMATION RESOURCE MANAGEMENT.....
Dr. Ravi Kumar Chegoni, Ramannapet-Yadadri || 10

2) A STUDY OF ATTITUDE OF TEACHERS TOWARDS THE USE OF ICT IN .....
Dr Kausar Parveen, Mehwish Siddiqui, Chinhat Lucknow || 14

3) USE OF LIBRARY RESOURCES AND SERVICES BY OSMANIA UNIVERSITY .....
Munagapati Dhana Laxmi, Hyderabad, India || 18

4) Evolution of Mobile Communication Networks-1G to 5G as well as .....
Varun Jain, Ludhiana || 23

5) A Study of Causes and Effects of Absentee among the Scheduled Tribes (ST) Students in.....
Dr. Raghunath Mahajan, Dhule || 29

6) Psychic Education: Educating the True Being
Dr. Rakhi, Dr. NidhiGulati, Lucknow. || 35

7) Role of Women in Livestock Sector in India
Lalita Dattatray Jagtap || 38

8)Ethono-medicinal plants of Mahur Taluka, Nanded District, Maharashtra, India.
Vijigiri Dinesh, Raut Himalaya , Mahur, Dist: Nanded || 41

9) "Socio-Ecoxomic Status of Agricultural Women's in Drought Hit Area of Jalna District"
Mr. Sirsat Dnyaneshwar Tukaram., Aurangabad. || 44

10) Name of the paper: The Constitutional and Legal provisions for women in India.....
Dr.N R Shah, Rajkot. || 47

11) Awareness of Prevention and Eradication of Human Sacrifice and Other Inhuman Evil .....
Dr. Pranay R. Malviya, Amravati ||50

12)A Study on Financial Performance of Synbiotics Ltd Company.
Dalpat B Mali, Vallabh Vidyanagar || 53

13) CONTRIBUTION OF WOMEN IN INDIAN ECONOMY
Dr. Sou. Patil Parvati Bhagwan, Hupri, Kolhapur || 56

www.vidyawarta.com/03 — http://www.printingarea.blogspot.com

Scanned with CamScanner

14) E-RESOURCES COLLECTION DEVELOPMENT IN ENGINEERING & TECHNICAL .....
Bollipelli. krishanaveni || 59

15) To be develop Instructional material for teaching Biology method of Teaching by B.Ed. trainee.
Dr.(smt.) Gulrukh Hameed Khan, Jabalpur (M.P.) || 64

16) CONTRIBUTION OF WOMEN IN INDUSTRY
Dr. Bhagwan Shankar Patil, Sangli || 66

17) "Socio-Economic Status of Agricultural Women's in Drought Hit Area of Jalna District"
Dr. A. I. Khan, Adv. Patekar G.U., Aurangabad. || 70

18) Communication Network – How safe is our Data?
Varun Jain, Ludhiana. || 73

19) Emerging trends in Pakistan sponsored terrorism in India
Dr.shailendra Deolankar, Amravati || 77

20) A Study of Effect of Cooperative Learning Strategy on Adjustment and Attitudes.....
Dr. Bhagyashree Kailasrao Athwale, Nashik. || 80

21) Effect of Calcium Carbonate on the Growth of Azotobacter Species .....
Daiwshala C. Kamthane, Purna, Dist.Parbhani || 87

22) Patent Rights and judicial view in India
Dr.Jetling Yellosa, Dichpally, Nizamabad Telangana || 90

23) USE OF LIBRARY RESOURCES AND SERVICES BY OSMANIA UNIVERSITY .....
Munagapati Dhana Laxmi, Hyderabad, India || 93

24) Constructive Dialogue: Dramatic form of Ernest Hemingway's Short Stories
R. M. Patil, Amravati. || 98

25) वेश्या व्यवसाय करणाऱ्या स्त्रियांच्या कारण मिमांसा
डॉ. सुनिता डी. भोईकर, वर्धा || 102

26) भारताच्या शैक्षणिक सुधारणांमधील लॉर्ड मेकॉलेच्या भूमिकेचे ऐतिहासिक अध्ययन
डॉ. नितीन पांडुरंगराव बावळे, परभणी. सचिन गुंडीराम डेंगळे, नांदेड. || 107

www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com

Scanned with CamScanner

27) जंगलसाल्याग्राफ आणि शेलवरी
डॉ. कैलाश आर. भांडारकर, गडचिरोली || 109

28) वस्त्र आणि रेशा कर लवयरा – लेखन, कार्यनिर्मिती आणि लेखा परिक्षण
प्रा. डॉ. एम. बी.कदम,उमरखेड जि.यवतमाळ || 114

29)उच्च माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांची भावनिक बुध्दीमत्ता आणि अभिरूची यांचा अभ्यास.
डॉ.विजयकुमार भैय्याजी खंडाते, ब्रम्हपुरी || 118

30)बकाची चुडीत कजे : एक चिंतनीय बाब
प्रा. एम. के. नन्नावरे , प्रा. डॉ. संतोष एन. ताडे, अकोट || 120

31)मराठी साहित्यातील स्त्रीमुक्तीविषयक दलित लेखिकांचे योगदान
प्रा.डॉ. रेखा नारायण वाघ, वाळूज, ता.गंगापूर, जि. औरंगाबाद || 122

32) गुजराती भाषा साहित्य के लोकगीतों में निरूपित गुजराती समाज और संस्कृति :
भावनाबेन धीरजलाल छांटबार, सावली, जिला, वडोदरा, गुजरात || 126

33)विश्व भाषा के रूप में हिंदी का वर्तमान स्वरूप
डॉ.साताप्पा लहू चव्हाण,अहमदनगर || 132

34)निजी शिक्षा महाविद्यालयों में कार्यरत अध्यापक शिक्षकों में कार्य संतुष्टि का अध्ययन
डॉ. सुजाता अतुल शर्मा, रायपुर, डॉ.श्रीमती स्वाती जाजू, बिलासपुर || 136

35) अध्यापक शिक्षा में सम्प्रेषण कौशल के माध्यम से सुधार
शहादत हुसैन, डॉ. अनुप कुमर, चितौड़गढ़ || 138

36)सूरज पाना है : एक समीक्षात्मक अध्ययन
डॉ. संगीता जगताप, चिखलदरा, जिला अमरावती,महाराष्ट्र ||142

37) 'कठपुतली' नाटक – इक अध्ययन
डॉ. सुरेश शर्मा, अखनूर, जम्मू–कश्मीर || 145

38) आधुनिक संदर्भ : कबीर की प्रासंगिकता
कदम शरद शंषराव, नांदेड || 148

39) आचार्य क्षेमेन्द्र का व्यक्तित्व एवं स्थिति काल
डॉ. रामप्रकाश शर्मा, बिन्दु देवी, चुरू (राज.) || 152

http://www.printingarea.blogspot.com
www.vidyawarta.com/03

Scanned with CamScanner

40) मुल्हेर के रासलीला पर्दों में निहित संगीत शास्त्र
डॉ. मेघना अजय अष्टपुत्रे बरोडा. || 154

41) 'मुग्धकुन्तलम्' में प्रकृति चित्रण
प्रा. विनोदकुमार पी. चौधरी, आणंद, गुजरात || 158

42) भारत में जाति प्रथा और डॉ. भीमराव अम्बेडकर (एक समाजशास्त्रीय विश्लेषण)
डॉ. राकेश प्रताप शाही, कुशीनगर (उ.प्र.) || 160

43) LIS Courses Through Distance Mode in India: a study
NutanDeshmukh, Nagpur || 167

44) The Ecological and Social Concerns in the Short Story 'Arjun' by...
Mr. Dileep Pandit Sapkale,Dist. Jalgaon || 169

45) Right to Shelter: Myth or Reality
Poonam Prakash Sonawane, Aurangabad || 174

46) तणावमुक्त जीवनासाठी भ्रामरी प्राणायामाचे महत्व
प्रा. डॉ. बी. एम. सावरकर, जि. यवतमाळ || 177

47) मध्यप्रदेश में लिंगानुपात पर लाड़ली लक्ष्मी योजना का प्रभाव
डॉ. रश्मि जैन, इन्दौर || 179

www.vidyawarta.com/03 = http://www.printingarea.blogspot.com

PRINCIPAL I/c.
Dr. Ambedkar College of
Social Work, Wardha

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205
हर्षवर्धन पब्लिकेशन प्रा.लि.
मु.पो.लिंबागणेश, ता.जि.बीड पिन : ४३११२६ (महाराष्ट्र)
harshwardhanpubli@gamil.com, vaidyawarta@gmail.com
सर्व प्रकारच्या शैक्षणिक व संदर्भ ग्रंथाचे प्रकाशक आणि वितरक

Scanned with CamScanner

MAH MUL/03051/2012
ISSN: 2319 9318
UGC Approved Jr.No.62759
Vidyawarta®
Oct. To Dec. 2017
Issue-20, Vol-16
0102

25

वेश्या व्यवसाय करणाऱ्या स्त्रियांच्या कारण मिमांसा

डॉ. सुनिता डी. भोईकर
सहायक प्राध्यापक
डॉ. आंबेडकर कॉलेज ऑफ सोशल वर्क, वर्धा

****

निळ्या आणि सोनेरी आकाशात काळे ढग असतात त्याचप्रमाणे स्त्री जीवनाच्या पवित्रतेला कलंकच नाही तर संपूर्ण मानव जातीमध्ये पसरलेले असलेले काही अपमानास्पद प्रकार आजही होत असताना दिसतात. देह व्यवसाय त्यामधील एक प्रकार आहे. सामान्यपणे समाजामध्ये पुरुषाला अधिक मानुण उच्च स्थान दिले गेले आहे. किंग्सले डेविस यांनी देहवृत्तीच्या आधारे अधिनता व प्रधानता मानली आहे. देह म्हणजे पुरुष जातीद्वारे स्त्री जातीवर अत्याचार व शरीर विक्रय हा व्यवसाय करण्यासाठी तयार आर्थिक, सामाजिक, नैतिक आणि सांस्कृतिक तणाव यांचा अपरिहार्य बाब मानण्यात येते. देह म्हणजे मुर्तीमद दुर्देव, देह जीवन म्हणे नरकवास. देह व्यवसायाला संसाराचा पुरातन धंदा समजुन वर्णन करण्यात येते. याचा अर्थ असा की पुरुषांचे स्त्रीयांवर हजारो वर्षांपासून केलेले अत्याचार, गरिबी व उपासमारीपासून सोडवणूक करण्यासाठी शहराकडे धाव घेणाऱ्या लोकांच्या झोपड्यवस्त्या असतात. त्यांच्या वस्त्या अनेक असांस्कृतिक, असामाजिक आणि आरोग्याचे जीवन असते. अशा वस्त्यात राहणारे लोक पशुप्रमाणे जीवन जगणारे आणि त्यातच कुमार अवस्थेमध्ये बालकांच्या अज्ञानतेमुळे पुरुषाच्या वासनाची शिकार होत असतात. देह व्यवसायात सलग्न असलेल्या मुली शहरात पैसे कमावून आपल्या घरी जातात. गावातील लोकासमोर त्यांचा परिचय हा असतो की, त्या शहरात नोकरी करतात, गावात त्यांच्यासाठी रोजगार मिळण्याचे साधनांचा अभाव, लग्न करण्यासाठी अपयांत पैसा परंतु मुलगी आपले कुटुंबीयांची जबाबदारी पूर्ण करीत आहे. आर्थिक समस्येचा प्रश्न फारच त्रासदायक आहे.

भारतात देह व्यवसायाची संख्या लाखोंपेक्षाही जास्त आहे. या संख्येत अशाचेच नाव दाखल करण्यात आले आहे ज्यांचे नाव नगरपालिका, नगर निगम, पोलीस व दुसरे संबंधीत विभागातील रजिस्टरमध्ये नाव नोंद आहे. ज्याप्रमाणे भटकत असणारे भटके इकडे तिकडे आपल्याला जागा मिळावी म्हणुन प्रयत्न करीत असतात त्याचप्रमाणे दर्यानच स्थिती देहव्यवसायाची आहे. व्यक्ती आणि सामाजिक विघटनातून ज्या अनेक समस्यांना भारतीय समाजाला तोंड द्यावे लागते त्यातील एक प्रमुख समस्या म्हणजे देह व्यवसाय वृत्ती समस्या होय. ही समस्या मानवी समाजात चालत आलेली आहे. तिचे पूर्णत: उच्चाटन करणे कोणत्याही समाजाला अद्यापी शक्य झाले नाही. भटक्या जीवनाच्या अवस्थेनंतर जेव्हा मानवी समाज एकाच ठिकाणी वसाहती करुन राहू लागला तेव्हा स्त्री पुरुषामधील लैंगिक संबंधावर काही बंधने घालणे त्याला इष्ट वाटू लागले. वैवाहिक संबंध प्रस्थापित करण्याबाबत काही महत्वाच्या रुढी व नियम अस्तित्वात आले. कुटुंबपध्दतीचे संस्थाकरण झाल्याने स्त्री-पुरुषांच्या व लैंगिक संबंधावर विविध प्रकारची बंधने घालून देखील कोणत्याही समाजात देह व्यवसायाला आळा घालू शकला नाही. स्त्री पुरुषामधील लैंगिक संबंधाबाबतच्या विपरितनात्मक वर्तणातुनच देह व्यवसायाची समस्या निर्माण होते.

आजच्या औद्योगिक समाजातील देह व्यवसायाची समस्या ही प्रामुख्याने शहरी समस्या आहे. प्रत्येक नगर व महानगराच्या कोणत्यातरी एका भागात पेशाच्या मोबदल्यात कोणत्याही पुरुषांशी लैंगिक संबंध प्रस्थापित करण्यास तयार असलेल्या स्त्रियांच्या वसाहतीनेच अत्यवर्यीन मुलीलाही यात खेचण्यात येते. विवाह बाह्य लैंगिक संबंधामुळे विवाहाच्या नैतिकतेचा भंग होतो असे मानण्यात येते. परंतु अतिशय कुरुप किंवा व्यंग असणाऱ्या व्यक्तींचा लैंगिक संबंधाबाबतची इच्छा विवाहाच्या माध्यमातून पूर्ण होऊ शकत नाही अशा व्यक्ती लैंगिक संबंधाबाबतच्या समाज मान्यतेचा भंग करतात आणि नवीन माध्यमाचा उदय होतो. नगर किंवा महानगरामधील वेशांची वस्ती असणाऱ्या भागाला रेड अलर्ट एरिया असे काही वर्षापूर्वी संबोधल्या जात होते. या भागात जाणे त्या भागातील रस्त्यावर उघडपणे रेंगाळले हे अयोग्य मानले जात होते. किंवहुना कुटुंब शेजारी समुदाय आदीचे व्यक्तीच्या वर्तनावर दडपण असल्यामुळे त्या भागात उघडपणे धाडस करण्याची हिम्मत सर्वसाधारण व्यक्तीत नव्हती. आज या परिस्थितीत बराच बदल झाला आहे. याचा अर्थ देहव्यवसायाची समाप्ती झाली आहे असा होत नाही.

सध्याच्या परिस्थितीत देहव्यवसायाची समस्या पुर्वीपेक्षा अधिक गंभीर आहे व तिव्र स्वरुपाची झाली आहे. कारण अशांची वस्ती असणारा मोहल्ला सोडून हॉटेल, क्लब, ब्युटी पार्लर यासारख्या अनेक ठिकाणी छुप्या मार्गाने देहव्यवसायाना विस्तार झाला आहे. देहव्यवसायवृत्तीच्या वेश्या ह्यांचे दलाल, वेश्या आणि वेश्यागामी व्यक्ती एड्स सारख्या भयंकर रोगाचे बळी ठरत आहेत. देहव्यवसायाची

PRINCIPAL I/c.
Dr. Ambedkar College of Social Work, Wardha
Scanned with CamScanner

समस्या केवळ भारतीय समाजातच आहे असे देखील मानता येत नाही. व्यापारीक मनोरंजनात्मक लैंगिक संबंधाबाबतच्या विचलनात्मक वर्तनाची देह व्यवसाय समस्या नसणारा एखादा समाज अपवाद म्हणून देखील दाखविता येत नाही. एड्स यासारख्या भयंकर रोगाच्या प्रादुर्भावामुळे देहव्यवसाय वृत्तीच्या समस्येचे गांभीर्य काहीही नव्हते एवढे आज वाढले आहे. देह व्यवसाय ही एक गंभीर सामाजिक समस्या आहे. जी प्रत्येक समाजामध्ये पुरातन काळापासून चालत आलेली आहे. काही अन्य प्रकारच्या स्त्रिया आपल्या जीवनामध्ये तेच नशीब आहे असे समजून त्या देह व्यवसाय करतात. मानवाचे शरीर हा खेळण्याचे सामानासारखे त्याचा उपयोग करुन घेतात आणि त्याची सौदाबाजी करतात. देह व्यवसायवृत्ती एकविशिष्ट कारणाने समाप्त करण्याचे प्रयत्न विफल होत आहे. देहव्यवसायापासून वैयक्तिक, पारीवारिक विघटन, सामाजिक विघटन अश्या अनेक समस्या निर्माण होत आहे.

वेश्याव्यवसायाचा अर्थ :

पैसे घेऊन स्त्री अनेक पुरुषांशी लैंगिक संबंध प्रस्थापित करते. त्यामध्ये प्रेमाचा अभाव असतो. अशा प्रकारचा अवैध लैंगिक संबंध ठेवणे म्हणजे वेश्या व्यवसाय होय. म्हणजेच स्त्री आपले शरीर पैसे किंवा वस्तू घेऊन समागमासाठी भाड्याने देण्याचा धंदा करीत असते. यामध्ये स्त्री एकापेक्षा अनेक पुरुषांबरोबर समागम करीत असते. एकमेकांवर प्रेम करणाऱ्या प्रेमिकांनी अवैध लैंगिक संबंध स्थापन केले तरी त्यास वेश्याव्यवसाय म्हटल्या जात नाही. कारण असे लैंगिक संबंध प्रेम आणि स्नेहातून निर्माण होतात. येथे पैशांचे महत्व नसते. परंतु वेश्याव्यवसायामध्ये मात्र पैसा महत्वाचा असतो आणि स्नेह, प्रेम यांचा अभाव असतो. वेश्याव्यवसायाच्या संदर्भात काही अभ्यासकांनी व्याख्या दिलेल्या आहेत त्या व्याख्यांवरुन वेश्याव्यवसायाचा अर्थ अधिक स्पष्ट होतो.

इलिएट आणि मेरिल : वेश्याव्यवसाय हा एक प्रकारचा अवैध लैंगिक संबंध आहे की जो पैशाच्या प्राप्तीसाठी अनेक व्यक्तींबरोबर ठेवला जातो. त्यांच्यामध्ये भावनात्मक उदासीनता असते.

जी. आर. स्काट : एक व्यक्ती (पुरुष किंवा स्त्री) जर कोणत्या प्रकारच्या उत्पन्नार्करिता (आर्थिक आणि अन्य कोणत्याही प्रकारच्या) किंवा कोणत्याही प्रकारच्या व्यक्तिगत समाधानासाठी पूर्ण वेळ किंवा अर्धवेळ कार्करिता व्यवसायाच्या रुपात अनेक व्यक्ती सोबत, मग ती व्यक्ती समलिंगी किंवा विरुद्धलिंगी असेल, सामान्य किंवा असामान्य लैंगिक संबंध स्थापित करण्यामध्ये व्यस्त असेल तरी त्या वेश्या म्हटल्या जाते.

क्लीनर्ड : वेश्याव्यवसाय हा एक भेदरहित आणि पैशाकरिता करण्यात येणारा लैंगिक संबंध आहे. ज्यामध्ये भावनात्मक उदासीनता असते.

ओगबर्नशेवरलाल शीवास्तव : साधारणतः वेश्यावृत्तीचे तात्पर्य पैशासाठी शरीर विकणे आहे. वेश्यावृत्ती एक प्रकारचा व्यवसाय आहे. ज्यामध्ये स्त्री आपल्या उपार्जनकेरीता आपले मांसल सौंदर्य विकते.

वेश्याव्यवसायाची कारणे :

वेश्याव्यवसायाला कोणतेही एक कारण जबाबदार नसून त्यासाठी अनेक कारणे जबाबदार आहेत. अनेक कारणांचा तो परिणाम आहे. भौतिक परिस्थिती, संस्कृती, धर्म अशी अनेक कारणे वेश्याव्यवसायाला जबाबदार आहे. खालील काही कारणे ढोबळ मानाने वेश्या व्यवसायाला जबाबदार म्हणून सांगता येतील.

१) शरीरसुख : शरीरसुख किंवा लैंगिक इच्छेची तृप्ती प्रत्येक व्यक्तीलाच हवी असते. स्त्री असो किंवा पुरुष विशिष्ट वयात आल्यानंतर लैंगिक इच्छा प्रज्वलित होते व जेव्हा ही इच्छा समाजमान्य मार्गाने पूर्ण होत नाही तेव्हा समाजबाह्य मार्गाने भागविण्याचा प्रयत्न होतो. पुरुषप्रधान संस्कृतीने वेश्या व्यवसायाला जन्म दिला आहे असेही काही विद्वानांचे म्हणणे आहे. अविवाहित पुरुष, विधूरपुरुष तसेच विवाहित पुरुषही आपल्या वासनेची पूर्ती या वृत्तीतून करतात. त्यांच्या गरजेची पूर्ती करण्यासाठी आपोआपच स्त्रियांचा एक वर्गही तयार होतो. कारण त्यातून त्यांना कमाई होवू लागते. म्हणतात ना गरज ही संशोधनाची जननी आहे. मागणी वाढू लागली की त्या मागणीला कुठुनतरी पुरवठा होऊ लागतो. जेव्हा हा पुरवठा अमान्य मार्गाने होऊ लागतो तेव्हा त्याला अर्थशास्त्रज्ञ काळाबाजार म्हणते.

२) विविधतेची इच्छा : बऱ्याच पुरुषांची मनोदशा एखाद्या भ्रमराप्रमाणे असते. अशी स्थिती केवळ पुरुषांचीच असते असे म्हणणे मात्र एकेरी स्वरुपाचे व धाडसाचे होईल. एकाच स्त्रीमध्ये बरेच जनांचे मन रमत नाही. त्यांना नवनवीन स्त्रिया हव्याहव्याशा वाटतात. यातूनच वेश्यावृत्तीला खतपाणी मिळू लागले व वेश्याव्यवसाय फोफावला आहे. स्त्रियाही याला अपवाद नाहीत.

३) घटस्फोट : बरेचदा विवाह होवूनही पुरुषाला स्त्रीपासून जर सुख मिळत नसेल तर यातून पती-पत्नीमध्ये बेबनाव, कटकट, संघर्ष होऊ लागतो व त्याचे पर्यवसान शेवटी घटस्फोटात होते. अशा स्थितीत आपली लैंगिक गरज पुरुष बाहेर पैसा खर्च करुन भागवू लागता. तर कधीकधी स्त्री पतीने सोडून दिल्यामुळे निराधार होतो. अशा दशेत ती सुध्दा आपली आर्थिक व लैंगिक गरज पूर्ण करण्यासाठी ह्या व्यवसायाकडे आकर्षिली जाते.

४) विवाहाचे वय वाढणे : बऱ्याच आर्थिक, सामाजिक, कौटुंबिक कारणामुळे मुला-मुलींचे विवाह वेळेवर होत नाहीत. अशी तरुण मंडळी आपली लैंगिक गरज इतर ठिकाणी भागवू लागतात किंवा ते त्याच्या शोधात असतात. कामेच्छा ही एक नैसर्गिक वृत्ती

Scanned with CamScanner

आहे. तेंका तो वाइट आहे असं मात्र आपणाला म्हणता येत नाही. सध्याच्या काळात नोकरीमुळे, शिक्षणामुळे मुला-मुलींना विलंबाचा वाढत आहे. तरुण पुरुष वेश्यांकडे आकर्षित जातात. वेश्यांनाही बरेच ग्राहक मिळतात. म्हणून नवीन मुलींची त्यात भर पडते व हा व्यवसाय जोरात चालू राहतो.

५) गरिबी : गरिबी, दारिद्र्य हा एक अभिशापच म्हणाया लागेल. यातून इतर समस्या निर्माण होतात. व्यक्तीच्या व देशाच्या विकासातील गरिबी ही सर्वांत मोठी अडचण आहे. उदाहरणार्थ, हाल अपेष्टा जेव्हा सहन होत नाहीत तेव्हा माणूस माणुसकीला बाजूला ठेवतो. चोर, डाकू, वेश्या याला गरिबी बऱ्याच प्रमाणात कारणीभूत आहे. जन्मत: कुणी चोर नसतो, डाकू नसतो किंवा वेश्या नसते. परिस्थितो अशी स्थिती निर्माण करते की आपल्या गरिबीला कंटाळून बऱ्याच स्त्रिया या मार्गाचा अवलंब करतात. वेश्या व्यवसायात गरीब व खालच्या स्तरातील स्त्रियाच अधिक दिसून येतात. काही जमातीत तर परंपरागत व्यवसाय म्हणूनही हा व्यवसाय स्वीकारतात.

६) वैवाहिक बंधनात राहण्याची इच्छा नसणे : आज बऱ्याच तरुण-तरुणीत विवाहविना राहण्याची प्रवृत्ती वाढत आहे. भारताबाहेर अशी प्रवृत्ती विशेषकरुन आढळते. गरिबी हीच स्त्रिला देह विक्रय करण्यास भाग पाडते हे म्हणणे या ठिकाणी खोटे वाटू लागते. सो. सरोजिनी शारंगपाणी या लेखिकेने आपल्या त्यांच्या या पुस्तकात या विषयाचा चांगलाच उहापोह केला आहे. हल्ली स्त्रिया सरंस अर्थाजन करु लागल्या आहेत. दिवसभर नोकरी करुन किंवा उद्योग करुन कंटाळलेल्या स्त्रिया केवळ विरंगुळा म्हणून कोणालाही आपल्या सहवासाचा लाभ देऊ लागल्या आहेत. त्यात वेश्याव्यवसाय करुन पैसा मिळविण्याचा हेतू नसतो. पॅरिस, व्हिएन्ना वगैरे कित्येक शहरातून श्रीमंत स्त्रियांचे ग्राहक भरपूर असल्याने पुरुष वेश्यांचा धंदा जोरात असतो. यावरुन स्त्रियांच्या अध:पतनाला पुरुषच जबाबदार असतो असे बेधडक विधान करता येणार नाही.

७) जोर जबरदस्ती : बरेचदा मुलींना हा व्यवसाय करण्यास समाजातील काही समाजकंटक भाग पाडतात. लहान मुलींना पळवून नेणे, त्यांच्यावर बलात्कार करुन त्यांना भ्रष्ट करणे, नग्न चित्रे घेऊन ब्लॅकमेल करणे, जिवे मारण्याची धमकी देणे वगैरे प्रकार करुन तिला शरीर विक्रय करावयास भाग पाडतात. मुलींना पळवून नेऊन विकणे, तिला वेश्या बनविणे असे प्रकार आपणही नेहमीच वर्तमानपत्रातूनही वाचत असतो. एकदा मार्ग चुकला की समाजही त्यांना स्वीकारत नाही व शेवटी नाईलाज म्हणून व पोट भरण्यासाठी अशा मुली हा व्यवसाय स्वीकारतात.

८) कुमारी माता : भारतासारख्या देशात लग्नाच्या आधीक जगतात. स्त्रियांच्या बाबतीत तर यावावत अतिशय कड नियम आहेत. अशा देशात जर एखादी मुलगी विवाहपूर्व आपले कौम गमावून बसली असेल, माता झाली असेल तर समाज तिला स्वीकार नाही. अशा मुली एकदम निराधार होतात. समाजीकडे टिकेची झोड उठते. तो मागरुन जाते अशा स्थितीचा फायदा घेणारेही असतात. कुंटणखाना चालविणाऱ्या स्त्रिया, सभ्यस्थ अशा स्त्रियांना आश्रय देतात सहानुभूती दाखवितात. शेवटी आपल्या चरितार्थ चालविण्यासाठी तें देहविक्रय करु लागते. इंग्लंडमध्ये अविवाहित मातांच्या बाबतीत मुलां पितृत्व आमक्याकडे जाते हे सिध्द झाल्याय मुलाच्या पालनपोषणाचा भ पित्यावर टाकता येतो. आपल्याकडेही अशी व्यवस्था हवी.

९) भौतिक आकर्षण : केवळ शरीरसुख किंवा गरिबी हेच वेश्यावृत्तीला जबाबदार नाही तर भौतिक आकर्षणही याला तितकेच जबाबदार आहे. ज्या समाजात स्वैराचार आहे त्याठिकाणी ही समस्या नसेल असे वाटणे स्वाभाविक आहे. पण हे खरोखर नाही. अमेरिकेत लहान मुलांपासून सर्वांमध्ये स्वैराचार माजलेला आहे. पण तरीही वेश्या व्यवसायाची तेवढीच भरभराट आहे. याला कारण भौतिक आकर्षण व त्यासाठी पैसा, इतराप्रमाणे आपणालाही राहता आले पाहिजे, शानशोक करता आला पाहिजे, फॅशन वगैरेच्या परिपूर्तीसाठी गरीब घरातील तसेच मध्यम वर्गातील मुली चोरुनलपून आपले शरीर विकतात. यामध्ये विवाहित स्त्रियाही असतात. काही शहरांमध्ये चांगल्या वस्तीत पोलिसांनी धाडी टाकून हे उघडकीसही आणले आहे. शिवाय हॉटेल्स, लॉज याठिकाणीही चोरुनलपून हा व्यवसाय चालतो. मागे नागपूर, चंद्रपूर इत्यादी ठिकाणी पोलिसांनी धाडी टाकून अशा मुलींना पकडले आहे. हे वर्तमानपत्रात प्रकाशीतही झाले आहे. उघडकीस न आलेल्या प्रकारांविषयी आपण कल्पना करु शकतो.

१०) मिळकतीचा सोपा मार्ग : कमी परिश्रमात खूप पैसा असा हा व्यवसाय बऱ्याच मुलींना आकर्षित करतो. दिवसभर परिश्रम करुनही जेवढा पैसा मिळत नाही त्यापेक्षा कितीतरी जास्त पैसा देहविक्रयातून मिळतो. एकदा लज्जा बाजूला सारली की अशा स्त्रिया अशा व्यवसायाला स्वत:च चिकटून राहतात म्हणूनही हा व्यवसाय चालतो.

११) वाईट सोबत : मित्रमंडळी आपल्या जीवनावर बराच प्रभाव टाकू शकतात. वर्गामित्र, समवयस्क गट विशेष महत्त्वाचे असतात. बऱ्याच गोष्टी मुले-मुली आपल्या मित्रांकडून शिकत असतात. शरीरविक्रय करणाऱ्या मुली आपल्या सहवासातील इतर मुलींना ही बिघडवतात, वाममार्गाला लावतात. त्यांना भौतिक झगमगाट दाखवून या व्यवसायाला बळी पाडतात. बरेचदा आपल्या जुन्या ग्राहकासाठी नवीन मुली म्हणूनही अशा स्त्रिया नवीन मुलींना यात गोवतात. यासाठी

Scanned with CamScanner

लागला. आपल्या ग्राहकांकडून पैसाही भरपूर मिळतो. या मुली शाळा सर्वसाधारणपणे प्रवेश घेऊन इतर मुलींना यामध्ये ओढण्याचा प्रयत्न करतात. शहरांमधून कॉल गर्ल नावाचा प्रकार उदयास येऊ लागला आहे.

१२) भग्न कुटुंबे : आई-वडिलांचा संबंध विच्छेद, घटस्फोट, पतित्याग किंवा दोघांपैकी मृत्यू किंवा एकाचा मृत्यू इत्यादी कारणांमुळे कुटुंबे विघटीत होतात. अशा कुटुंबातील मुले-मुली उपेक्षीत पडतात. मातृप्रेम व पितृछाया यापासून वंचित होतात. त्यांची कुचंबना होते. कुणाचा नियंत्रण राहत नाही. अशा कुटुंबातील मुले-मुली चटकन वाम मार्गाला बळी पडतात. काही बालगुन्हेगार अशाच कुटुंबातून असल्याचे आढळून आले आहे.

१३) पुरुषांवर सूड उगविण्याची भावना : कित्येक स्त्रिया पुरुषी अहंकाराला, अत्याचाराला बळी पडतात. पतीशी चांगले वागूनही पती मात्र प्रामाणिकपणे वागला नाही किंवा मारहाण करतो अशा त्रासाला कंटाळून व पुरुषांवर सूड घेण्याने बदला घेण्याच्या भावनेनेही स्त्रिया हा व्यवसाय सुद्धासुद्धा करु लागतात परंतु यांचे प्रमाण कमी आहे.

१४) अज्ञान व प्रसिध्दीची इच्छा : शहरामध्ये भ्रष्टाचारी लोकांचा समूह असतो. इतरांना फसवून आपला स्वार्थ साधणे हा त्यांचा व्यवसाय असतो. असे लोक भोळ्याभाबड्या मुलींना फसवितात. त्यांना मोठमोठी आमिषे दाखवतात. स्वप्नांच्या दुनियेत घेऊन जातात. अनेक प्रलोभने देतात. याला बळी पडून मुली आपले सर्वस्व गमावून बसतात. कित्येक मुली आपल्या गावाहून शहराकडे यासाठी पळाल्यात किंवा पळविल्या गेल्या की त्यांना कुणीतरी फूस लावलेली असते. सिनेमामध्ये काम देईन, हिरोईन बनविते वगैरे. प्रसिध्दीसाठी अशा मुली आपले सर्वस्व देतात व फसतात. नंतर त्यांचे डोळे उघडतात तोपर्यंत उशीर झालेला असतो. पाणी डोक्यावरुन गेलेले असते. कपाळावर हात मारुन शेवटी अशा मुली हॉटेल्स, नृत्यगृहे, उपहारगृहे, लॉजेस वगैरेचा आश्रय घेतात तर कुणी राजरोसपणे देहविक्रय करु लागतात.

१५) विधवा विवाहावर निर्बंध : आपल्याकडे बालविवाहाची प्रथा होती व काही प्रमाणात आजही आहे. त्यातच विधवेला पुनर्विवाह करता येत नाही असा समाजाचा दंडक होता. आजही विधवेचा पुनर्विवाह फारसा होत असलेला दिसून येत नाही. एन तारुण्यात पती निधन पावला तर त्या स्त्रीला पुनर्विवाह करता येत नाही. परंतु कामेच्छेसमोर मोठ-मोठे ऋषी-मुनी हारले त्या ठिकाणी सामान्यांचे काय.' आपली असह्य होणारी कामवासना अशा स्त्रिया परपुरुषाकडून भागवितात. पुढे पाप उघडकीस आल्यावर समाज बहिष्कृत करतो व तिला वेश्या व्यवसायाचा मार्ग स्वीकारावा लागतो. तर्थील लोक तिला आश्रय देतात. दुसरी गोष्ट म्हणजे पतीनिधनानंतर अशा स्त्रिया स्वतंत्र दृष्टीने अनाथ बनतात. त्यांच्या दुःखमय जीवनाला सुरुवात होत असतांच त्यांच्या आपल्या उदरनिर्वाह करण्यासाठी आपला देहविक्रय करु लागतात. दुसरा विवाह करता येत नाही. त्यामुळे सामाजिक व आर्थिक तसेच भावनिक गरज भागविता येत नाही. तेव्हा वरीलप्रमाणे व्यवसायामुळे वरील दोन्ही प्रकारची पूर्ती होत. म्हणून तो व्यवसाय त्या स्वीकारतात. आजही काशीसारख्या धार्मिक ठिकाणी कित्येक हिंदू विधवा स्त्रिया आपला देहविक्रय करुन निर्वाह करीत आहेत ही अत्यंत खेदाची बाब आहे.

१६) मानसिक विकृती : काही स्त्रिया मानसिक विकृतीमुळे आपल्या लैंगिक सबंधावर नियंत्रण ठेवू शकत नाहीत. म्हणून डॉ. रोचेच्या मते कमी बुध्दी आणि मानसिक विकृती सोच दोन प्रमुख मानसशास्त्रीय कारणे वेश्याव्यवसाय पल्लवण्यास पुरेशी आहेत. साधारणत: स्त्रिया ह्या भावूक असतात. पुरुष आपल्या शब्दजालण्यात त्यांना अडकवून फसवितो. इलिस्ट आणि मेरोल यांनी आपल्या सामाजिक विघटन या पुस्तकात असे स्पष्ट केले आहे की सामान्यत: वेश्या ह्या कमी मानसिक क्षमता असणाऱ्या स्त्रिया असतात. स्त्रियांच्या विशिष्ट स्वभावाचा वेश्याव्यवसायाशी घनिष्ठ संबंध आहे. लैंगिकच अप्रसन्न राहणाऱ्या स्त्रिया जीवनात निराश झालेल्या स्वाभावलचन क्षमतेची कमतरता असणाऱ्या, प्रेम व स्नेह न मिळालेल्या, चिडचिडा स्वभाव, कुरुप पती इत्यादीमुळे स्त्रिया वेश्या व्यवसायाला बळी पडतात.

१७) धार्मिक व परंपरागत कारणे : वेश्या व्यवसाय निर्माण करण्याचे व त्याला खतपाणी घालण्याचे काम धार्मिक विश्वासानेही केले आहे. यातूनच देवदासी, मुरळी वगैरे वेश्याचे प्रकार बाहेर पडले. भारतात हा प्रकार विशेषकरुन आढळून येतो. देवीला मुली वाहणे या प्रणालीतून ही प्रथा अस्तित्वात आली. आजही हजारो मुली देवदासी होतात. अशा मुलींना विवाह करता येत नाही. अविवाहित राहून देवाची सेवा करणे हाच यांचा जीवनक्रम असतो. महाराष्ट्रातील कलावंतीन असाच प्रकार म्हणता येईल. अशा देवदासींचा देवळातील पुजारी, गावचा पाटील, सावकार, जमीनदार वगैरे लोकांनी आपली वासना तृप्तीसाठी आपर करावयास सुरुवात झाली. देवदासींचे हेच कार्य आहे असेही सांगण्यात येऊ लागले व राजरोसपणे वेश्या व्यवसाय चालत असे. अशाप्रकारचे अंधश्रध्दा या व्यवसायाला चालना देतात.

१८) सामाजिक सुरक्षा : काही सामाजिक प्रथामुळेही या व्यवसायाला प्रोत्साहन मिळाले आहे. उदा. उत्तर प्रदेशातील नाईकांची प्रथा, मलबारची यशूही, बंगालची कुलीन व्यवस्था इत्यादी अशा समस्यांना जन्म देतात. त्यामुळे इच्छा नसूनही मुलींना वेश्यावृत्ती स्वीकारावी लागते. काही आदिवासींमध्ये तर हे उपजीविकेचे प्रमुख साधन आहे. घरातील पुरुषवर्ग आपल्या स्त्रियांकडून हा व्यवसाय करवितात. त्यांना यात फारसे वावगे काही वाटत नाही. उलट परंपरेचे पालन करण्याचे भाग्यच वाटते.

Scanned with CamScanner

१९) स्त्रियांची निम्न स्थिती : केवळ भारतात नव्हे तर जगाच्या इतरही भागात स्त्रीचे स्थान पुरुषांपेक्षा गौणच मानल्या गेले आहे. आजही परिस्थिती म्हणावी तेवढी सुधारलेली नाही. आजही स्त्रिला पुरुषांच्या मनोरंजनाचे साधन म्हणून पाहतले जाते. ती पुरुषांची सेविका आहे, दासी आहे यापेक्षा कुठल्याच आजही तीचे पाहलेल्या नाहीत. तिच्या भावनांची कदर केल्या गेली नाही. आजही स्त्रियांची चोरून लपून विक्री होत आहे. मध्यप्रदेशातील बरवतमध्ये स्त्रियांची मोठ्या प्रमाणात विक्री होत असल्याचे वर्तमानपत्रात प्रसिध्दही झाले आहे. कुटुंबसुध्दा चालविणारे दलाल, मालक या मुलींना विकत घेतात व धंद्याला लावतात. यावर आळा घालणे आवश्यक आहे.

२०) अतृप्ती : ज्याप्रमाणे पुरुषाला स्त्री पासून कामतृप्ती मिळत नाही म्हणून तो परस्त्री गामी किंवा वेश्यागामी बनतो तसेच स्त्री सुध्दा जेव्हा एका पुरुषापासून किंवा पतिपासून तृप्त होत नाही तेव्हा ती अनेक पुरुषांना आपल्या सहवासाचा लाभ देऊ लागते. यातून तृप्ती व पैसा दोन्ही तिला प्राप्त होतात. तेराव्या शतकातील योक्कासियोंचा एक स्त्रीनायिका जेव्हा सात पुरुषांपासूनही तृप्त होत नसेल तर ब्रेटमच्या वेश्र महिलांच्या वासनेच्या भट्टीत कोण होरपळणार नाही?

२१) शासनाचा सहभाग : प्राचीनकाळी राजाचा खजीना वाढविण्यासाठी इतर राजांना खुष करण्यासाठी, राजकीय मनोरंजनासाठी, ऐषोआराम इत्यादी कारणासाठी स्वत: सरकार वेश्यांना दरबारी ठेवीत असे. प्राचीन युनानची राजधानी एथेन्समध्ये सरकारी स्तरावर वेश्या बाळगल्या जात असत. सरकारला त्यांच्यापासून बराच कर मिळत असे. युनानच्या प्रसिद्ध कामदेवी मंदिरात वार्षिकोत्सवात वेश्या आपले संपूर्ण उत्पन्न मंदिरात चढावित असत. आज परिस्थिती बदलली आहे.

२२) बहुपत्नीविवाह प्रथा : बहुपत्नीविवाह पध्दतीमुळे स्त्री-पुरुषांचे व्यस्त प्रमाण होते. जे श्रीमंत असत ते एकाधिक बायका बाळगत त्यामुळे गरीब लोकांना स्त्रीयांना राहण्याची पाळी आली असावी म्हणून आपली इच्छा हे बाहेर पूर्ण करीत असावे. शिवाय एक पुरुष अनेक स्त्रियांना पूर्णांपणे संतुष्ट करु शकत नाही. अतृप्त स्त्रिया आपली भूक लपून छपून बाहेर भागवीत असतील व त्यातूनच वेश्यावृत्तीला खतपाणी मिळत जाते अशी शंका मनात निर्माण होते.

२३) कन्याहत्या : कन्याहत्तेची प्रथा केवळ भारतातच नव्हती तर इतर देशांमध्येही ही प्रथा होती व काही प्रमाणात आजही सर्वत्र आहे. त्यामुळे स्त्री-पुरुष प्रमाणात असमानता निर्माण होते. यातून कन्यामूल्य निर्माण होते व ते वाढत जाते. ते देवू न शकणारे विवाह करु शकत नाही. तेव्हा वासनेची पूर्ती व्हावी करीत असतील. वहुपत्नी विवाहाच्या अनेक कारणांपैकी हेही एक कारण आहे. तेव्हा कन्याहत्त्याच्या प्रथेने अप्रत्यक्ष का होईना वेश्याव्यवसायाला चालना दिली असावी.

संदर्भग्रंथ सूची

१. आगलावे, प्रदीप (२००३). भारतीय स[illegible] आणि समस्या. नागपूर : श्री. साईनाथ [illegible]

२. चाऊल लहुजं (२००५). यौन दासि[illegible] बाजार. नई दिल्ली : वाणी प्रकाशन.

३. भाजार कर, पु. ल. (१९९७). समाजशास्त्रीय सिद्धा[illegible] नागपूर : विद्या प्रकाशन.

४. गुप्त, हनुमान प्रसाद (२००४). नारी उत्पीड़न एवं जागरुकता. इलाहाबाद : हींगरा एंड कंपनी.

५. जोशी, गोपा (२००६). भारत में स्त्री असमानता. नई दिल्ली : हिंदी माध्यम कार्यान्वयन निदेशालय.

६. कृष्ण, मोहन श्रीमाली (२००५). धर्मसमाज और संस्कृति. दिल्ली : ग्रंथ शिल्पी.

७. कांचळे, उत्तम (अनु.) दिवसे किशोर (२००८). देवदासी मराठी में अनुवाद. मेरठ : संवाद प्रकाशन.

८. लवानिया, एम. एम. भारतीय महिला ओंका समाजशास्त्र. जयपुर : रिसर्च पब्लिकेशन्स.

९. महाराज धर्मवीर, महाजन कमलेश (२००७). भारतीय समाज मुद्दे एवं समस्याएँ. दिल्ली : विवेक प्रकाशन.

१०. नेमिशराय, मोहनदास (२००४). आज बाजार बंद है. नई दिल्ली : वाणी प्रकाशन.

११. नसरीन, तस्लीमा (२००७). औरत के हक में. नई दिल्ली : वाणी प्रकाशन.

१२. पचोरी, सुधीश (२०००). स्त्री देह के विमर्श. दिल्ली : आत्माराम एंड संस.


१३. विजयश्री, प्रियदर्शिनी (२०१०). देवदासी या धार्मिक वेश्या? एक पुनर्विचार. नई दिल्ली : वाणी प्रकाशन.

१४. झा, विजयकुमार (२०१०). देवदासी या धार्मिक वेश्या? एक पुनर्विचार. नई दिल्ली : वाणी प्रकाशन.

❖❖❖

PRINCIPAL I/c.
Dr. Ambedkar College of Social Work, Wardha

Scanned with CamScanner



Scanned with CamScanner

ISSN: 2394 5303 | Impact Factor 5.011(IIJIF) | Printing Area™ International Research Journal | April 2018 Issue-40, Vol-06 | 01

33 39

UGC Approved Jr.No.43053

आंतरराष्ट्रीय बहुभाषिक शोध पत्रिका

प्रिंटिंग एरिया

Printing Area International Interdisciplinary Research Journal in Marathi, Hindi & English Languages

April 2018, Issue-40, Vol-06

Editor
Dr. Bapu g. Gholap
(M.A.Mar.& Pol.Sci.,B.Ed.Ph.D.NET.)

Co-Editor
Dr. Ravindranath Kewat
(M.A. Ph.D.)



PRINCIPAL I/c.
Dr. Ambedkar College o
Social Work, Wardha

"Printed by: Harshwardhan Publication Pvt.Ltd. Published by Ghodke Archana Rajendra & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor Dr. Gholap Bapu Ganpat.

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205

Harshwardhan Publication Pvt.Ltd.
At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed
Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295
harshwardhanpubl@gmail.com, vidyawarta@gmail.com
All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

Scanned with CamScanner

34

Printing Area

Editorial Board & Advisory Committee

1) Dr. Vikas Sudam Padalkar (Japan)
2) M.Saleem, Sialkot (Pakistan)
3) Dr. Momin Mujtaba (Saudi Arebia)
4) N.Nagendrakumar (Sri Lanka)
5) Dr. Wankhede Umakant (Maharashtra)
6) Dr. Basantani Vinita (Pune)
7) Dr. Upadhya Bharat (Sangali)
8) Jubraj Khamari (Orissa)
9) Krupa Sophia Livingston (Tamilnadu)
10) Dr. Wagh Anand (Aurangabad)
11) Dr. Ambhore Shankar (Jalna)
12) Dr. Ashish Kumar (Delhi)
13) Prof.Surwade Yogesh (Satara)
14) Dr. Patil Deepak (Dhule)
15) Dr. Singh Rajeshkumar (Lucknow)
16) Tadvi Ajij (Jalgaon)
17) Dr.Patwari Vidya (Jalna)
18) Dr.Varma Anju (Gangatok)
19) Dr.Padwal Promod (Waranasi)
20) Dr.Lokhande Nilendra (Mumbai)
21) Dr.Narendra Pathak (Lucknow)
22) Dr.Bhairulal Yadav (West Bangal)
23) Dr.M.M.Joshi, (Nainital)
24) Dr.Sushma Yadav (Delhi)
25) Dr.Seema Sharma (Indor)
26) Dr. Choudhari N.D. (Kada)
27) Dr. Yallawad Rajkumar (Parli v.)
28) Dr. Yerande V. L.(Nilanga)
29) Dr. Awasthi Sudarshan (Parli v.)
30) Dr Watankar Jayshree
31) Dr. Saini Abhilasha
32) Dr. Prema Chopde (Nagpur)
33) Dr. Vidya Gulbhile (M.S.)
34) Dr. Kewat Ravindra (Chandrapur)
35)Dr. Pandey Piyush (Delhi)
36) Dr. Suresh Babu (Hydarabad)
37) Dr. Patel Brijesh (Gujrat)
38) Dr. Trivedi Sunil (Gujrat)
39) Dr. Sarda Priti (Hydarabad)
40) Dr. Nema Deepak (M.P.)
41) Dr. Shukla Neeraj (U.P.)
42) Dr. Namdev Madumati (M.P.)
43) Dr. Kachare S.V. (Parli-v)
44) Dr. Singh Komal (Lucknow)
45) Dr. Pawar Vijay (Mumbai)
46) Dr. Chaudhari Ramakant (Ja









Govt. of India,
Trade Marks Registry
Regd. No. 3418002

Note : The Views expressed in the published articles,Research Papers etc. are their writers own. 'Printing Area' dose not take any libility regarding appoval/disapproval by any university, institute,academic body and others. The agreement of the Editor, Editorial Board or Publicaton is not necessary. Disputes, If any shall be decided by the court at Beed (Maharashtra, India)

http://www.printingarea.blogspot.com

Scanned with CamScanner

राजा पंचायत राज प्रतिनिधी संम्मेलन जमशेदपूर येथे आयोजीत करण्यात आले.

अशा पध्दतीच्या उपरोक्त सर्व योजना ह्या १९५२ पासून ते २०१६ पर्यंत शासकिय केंद्र तथा राज्य शासनाच्या माध्यमातून सुरु करण्यात आलया होण्या व त्यांची अंमलबजावणी मधून संपूर्ण भारत व महाराष्ट्र राज्यामध्ये ग्रामीण विकासासाठी स्वच्छता व पेयजल हे उपक्रम मोठ्या प्रमाणात राबविण्यात आले. व गरजेप्रमाणे योजनेमध्ये बदली, निधीमध्ये वाढ व योजनेच्या नावात बदलही करण्यात आले आहे.

संशोधन निष्कर्ष :

भारत स्वातंत्र्य झाल्यानंतर स्वतंत्र भारतामध्ये आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी पंचवार्षिक योजनांची निर्मिती करण्यात आली.त्याअंतर्गत. वेगवेगळ्या घटकांना गरजेनूसार महत्त्व देवून शासनानी योजना बनविल्या ज्या कि, ग्रामिण आणि शहरी भागासाठी त्यांच्या समस्या सोडविण्यासाठी तयार करण्यात आल्या.परंतू कालानूरुप सर्व योजनांचा उपयोग हा सर्व स्तरापर्यंत पोहोचावा तसा पोहोंचला नाही. ग्रामीण भागातल्या समस्या ह्या मुख्यत: आरोग्य, शिक्षण, स्वच्छता, पिण्याचे शुध्द पाणी आणि इतर भौतिक सेवा-सुविधा त्या प्रमाणात न मिळाल्यामुळे ग्रामिण भाग हा शहरी भागाच्या विकासापेक्षा मागेच राहिला. समृध्द भारत बनविण्यासाठी ७० % लोकसंख्या असलेला ग्रामिण समुदाय विकसित करणे आवश्यक आहे. त्यासंबधित स्वातंत्र्यानंतर पासून ते आतापर्यंत शासनाने वेगवेगळ्या योजनेच्या माध्यमातून गाव तथा शहर स्वच्छ करण्यावर व लोकांच्या प्राथमिक गरजा पूर्ण करण्यासाठी वेगवेगळ्या गरजा समाजात रुजविण्याचे कार्य केले आहे.

संदर्भ सुची :

१) डॉ. आगलावे प्रदिप (२०११), ग्रामिण-व-नागरी समाजशास्त्र, साईनाथ प्रकाशन नागपूर.

२) गुंजाळ विष्णू रामदास (२०१२), पंचायतराज (ग्रामिण विकास आणि मरपंच), अथर्व पब्लिकेशन-जळगाव.

३) ढगे एस.के. (२०११), संशोधन पध्दती, के.एस.पब्लिकेशन्स पुणे.

४) प्रेरणा (२०११), यशस्वीनी सामाजिक अभियान

५) प्रमोद नलावडे (एप्रिल २०१२), ग्रामोन्नती विशेष लेख, लोकराज्य मासिक

६) महेश शिंदे (२०१६), सामाजिक, आर्थिक व मानव विकासाच्या शासकिय योजना, ज्ञानदिप अकॅडमी प्रकाशन पुणे, पृष्ठ क्र. १५५, १५६, १५७, १५८.

25

विवाहपुर्व आणि विवाह पश्चात्य समुपदेशन

प्रा. डॉ. विजयता विटनकर

डॉ. आंबेडकर कॉलेज ऑफ सोशल वर्क, वर्धा

****

विवाहपुर्व समुपदेशन :

विवाह हे दोन जीवांचे एकत्रीकरण असते असे म्हटले जाते परंतु विवाह हा केवळ दोन जीवांचे एकत्रीकरण नसुन दोन कुटुंबाचे आणि त्या कुटुंबा संबधीत इतरही नाते संबधाचे एकत्रिकरण असते. लग्नानंतर अशा अनेक बारीक सारीक कुरबुरी कुटुंबात घडतात की ज्यातुन दांपत्याना सहज वाटते की, लग्नापुर्वी ही गोष्ट मला माहीत असती तर लग्नचा केले नसते, अथवा घटस्फोटासाठी जेव्हा ही दांपत्य समुनदेशाकडे येतात तेव्हा त्यानांही सहज वाटते की लग्नापुर्वी हे समुनदेशनाकरिता आले असते तर हे लग्न वाचविता आले असते. म्हणुनच आज विवाह पुर्व समुपदेशनाची नितांत आवश्यकता आहे. परंतु आपल्याकडे याबाबत फारसे गांभीर्यने विचार करताना दिसत नाही. त्यातल्या त्यात ग्रामीण भागातील परिस्थिती अधिकच उदासिन आहे. बऱ्याचदा केवळ जात, कुळ, मामेकुळ, आर्थिक स्थिती, मुलीचा रंग, शिक्षण, मान–पान, अत्यंत महत्वाचे म्हणजे दोघांची कुंडली, त्या जुळल्या म्हणजे झाल. हया गोष्टी बघुन वडीलमंडळीव्दारे लग्न ठरविले जाते. बऱ्याचदा हा निर्णय मुलांकडील होकारावरच ठरला जातो. मुलीकडील निर्णय दुय्यम असतो परंतु सर्वात महत्वाचे म्हणजे ज्यांना आयुष्यभर सोबत राहायचे आहे त्या भावी पती–पत्नीला आपली आवड –निवड सांगण्याचा फारसा वावच नसतो. खरतर दोघांच्या कुंडलीतल्या गुणाबरोबर त्याचे स्वभाव जुळणे देखिल तितकेच महत्वाचे आहे शिवाय कुंडली इतकीच दोघाची

Scanned with CamScanner

आरोग्यात्मक स्थिती तपासणे आवश्यक आहे, नाहीतर नात्याचा ही घुसमट आयुष्यभर दोघानाही आनंदी जिवन जगू देत नाही.

ग्रामीण क्षेत्रातील महिलांची आणि मुलीची स्थिती तर अधिकच दयनिय आहे. माझ्या महाविद्यालयात प्रामुख्याने ग्रामीण भागातील मुली शिकावयास येतात, एक–दोन वर्ष शिक्षण घेतल्यानंतर अचानक एक–दोन मुली आपल्या लग्नाची पत्रिका मला आणुन देतात आणि काही प्रश्न विचारण्याआधीच सांगतात की, मॅडम मी घरातील मोठी मुलगी आहे आणखी घरातील लहान बहिणीचे लग्न, भावाचे शिक्षण पूर्ण व्हायचे आहे म्हणुन घरच्यानी घाई केली घरची परिस्थिती बघुन मी हो म्हटल. तसेही तिच्या हो–नाही म्हणण्यानी काहीच बदलणार नसते हे मला तिच्या डोळयातील भावामध्ये कळते पण उगाच ती त्याला लपवण्याचा प्रयत्न करते, लग्न म्हणजे काय हे कळण्या आधीच ती लग्नाच्या जबाबदारीत अडकली जाते हया निमित्याने मला आवर्जुन ग्रामीण क्षेत्रातील पालकानां सांगावयाचे आहे की तुम्ही असे करु नका मुलाबरोबर मुलीनांपण शिक्षण घेऊ दया तिलाही तिच्या पायावर उभे होऊ दया तिच्या पंखाना बळ दया कधाचित तीच उद्या तुमचा खंभीर आधार होईल.

आजही आपल्या समाजात विवाहपुर्व समुपदेशना ची फारशी गरजच भासत नाही, हयाला अनेक घटक जबाबदार आहेत बऱ्याचदा हे समुपदेशन अनौपचारी करित्या कुटुंबातुनच केले जाते. कधी आजी– आजोबा, आई–वडील, भाऊ – बहीण, मित्र–मैत्रिणी तर कधी ताई, वहिणी इ. सदस्याकडुन ते केले जाते परंतु प्रत्येकच नात्याच्या स्वत:च्या अघ्या काही मर्यादा आहेत आणि प्रत्येकाचे हया नात्या बद्दलच्या अपेक्षा आणि ज्ञान मर्यादित आणि व्यक्तीपरत्वे भिन्न आहे त्यामुळे विवाहाविषयक सर्वच बाजुची सांगोपाग चर्चा, ज्ञान आणि समुपदेशन कुटुंबातुन होईलच असे नाही, त्यामुळे अशा प्रकारचे समुपदेशन घडवुन आणण्यासाठी व्यावसायिक समुपदेशक एखाद्या रोग प्रतिबंधक लसीप्रमाणे असते, ज्यात एखादा आजार अथवा रोग होऊ नये म्हणुन आपण ती लस रोग होण्याआधीच घेतो त्यामुळे १०० टक्के तो आजार होणारच नाही याची शाश्वती व्यक्तीला प्राप्त होत असते. विवाहपूर्व समुपदेशन सुध्दा एखाद्या रोग प्रतिबंधक लसीप्रमाणेच काम करते कारण विवाहानंतर उद्भवणाऱ्या संभाव्य समस्या, त्यातील आपली भूमिका, वास्तविक स्थिती हया सर्वच बाबतची पूर्वकल्पना विवाहपूर्व समुपदेशनात भावी पती–पत्नी आणि आवश्यक तेथे त्याच्या कौटुंबिक सदस्यांना दिली जाते. ज्यातुन १०० टक्के विवाह विषयक समस्या सुटु शकत नसल्या तरी हया समस्याची तिव्रता मात्र नक्कीच १०० टक्के कमी करता येते तसेच साधारणत: उद्भवणाऱ्या अनेक समस्याची कल्पना आधीच प्राप्त होत असल्यामुळे तशी आधीच मनाची तयारी अथवा हया समस्या उद्भवूच नये म्हणून प्रयत्न करता येतात.

ज्याप्रमाणे एखाद्या परीक्षेत यशस्वी व्हायचे असेल तर आपण त्या परीक्षेकरिता आवश्यक असणारा अभ्यासक्रम, पाठपुस्तक, संभाव्य प्रश्नाची तयारी त्यासंदर्भात करतो, आपली तयारी जितकी चांगली तितकी त्या परीक्षेत यशाची खात्री अधिक असते त्याप्रमाणे विवाहाच्या सुखद बंधनात अडकण्यापूर्वी त्या संदर्भातील सर्व ज्ञान प्राप्त करुन घेतले तर वैवाहिक जिवनात मिळणारे सुख आणि समाधान जास्त असते हयात तिळमात्र शंका नाही म्हणुनही विवाहपूर्व समुपदेशनाला अतिशय महत्व आहे.

आज विवाहईच्छुक तरुण–तरुणीच्या लग्न आणि जोडीदाराबाबतच्या कल्पना बदलत आहेत. आर्थिक दृष्टया आत्मनिर्भर आणि स्वच्छंद झालेल्या हया पिढीला जोडीदार निवडीचे आणि संसाराचेही स्वातंत्र हवे आहे, हयामध्येच प्रेमविवाहातुन झटपट लग्न करुन त्याच त्वरेने घटस्फोट घेणाऱ्याचेही प्रमाण वाढत आहे.

विवाहपुर्व समुपदेशनाच्या माध्यमातुन वधु–वराना भावी संसाराच्या विचारांना एक दिशा दिली जाते तसेच लग्नापुर्वी कोणकोणत्या गोष्टीवर आवर्जुन बोलले पाहीजे हे देखिल कळते तर विवाहीनंतर उद्भवणाऱ्या अनेक प्रश्नाचे ते प्रतिबंधात्मक निवारणही ठरु शकते. आज आसपास घडणाऱ्या घटस्फोटाच्या अनेक बातम्या आपल्या कानावर येतात, हया घटना आपल्या दरवाज्यावर येऊन ठाकल्या तरी विवाहपूर्व

Scanned with CamScanner

समुपदेशनाला येणाऱ्याची संख्या नगण्यच आहे. एकुणच समुपदेशकाच्याबाबत बरेच गैरसमज आपल्याकडे आहे घरातील वडीलधारी मंडळी जे ठरवतील ते योग्यच किंबहुना समुपदेशक काय वेगळे सांगणार अशीच विचारधारा प्रामुख्याने आढळते.

परंतु आता काळ बदलेला आहे, बदलत्या काळाची पाऊल ओळखुन आपण देखिल विवाहपूर्व समुपदेशनाची गरज ओळखली पाहीजे, प्रेमविवाह असो अथवा आई–वडीलांव्दारे ठरवुन केलेला विवाह असो जो पर्यंत पती–पत्नी २४ तास एकत्र रहायला सुरुवात करत नाही तोपर्यंत ऐकमेकाच्या स्वभावाचा अंदाज येणे तसे कठीणच, आज मुला–मुलीचे विवाहाचे वय वाढले आहे, साधारणपणे लग्न होईपर्यंत मुलीचे वय २५ ते ३० आणि मुलाचे वय ३० ते ३२ पर्यंत झालेले असते, त्यामुळे बऱ्याचदा त्याची मते पक्की झालेली असतात, स्वभावातील लवचिकता त्यामानाने कमी झालेली असते तर स्वत:ची मी पणाची भावना प्रखर झाली असते. त्यामुळे इतराच्या मताचां, भावनाचा विचार करण्यापेक्षा स्वत:चा 'मी' पणा जपण्याचांच जास्त प्रयत्न केला जातो सुरुवातीला वाद आणि वादातुन भांडणे आणि पुढे ही भांडणे विकोपाला जाऊन घटस्फोटापंर्यत पोहचतात, हया दांपत्याची घटस्फोट घेण्यामागील कारणे जाणुन घेण्याचा प्रयत्न केला तर दोघांनाही घटस्फोट घेण्यामागील मुख्य कारण सांगता देखिल येत नाही ही आजची स्थिती आहे.

तसेच नोकरी निमित्य कामांच्या वाढलेल्या वेळामुळे एकमेकांना वेळ देता न येणे, दोघानीही नोकरी करणे, दोघांच्या जीवनशैलीत असलेला फरक, भावी आयुष्यात अपत्य होण्याबाबत, त्याच्या जबाबदारी याबाबत अनेक कारणांवर विवाहपुर्वीच समुपदेशनाच्या माध्यमातुन चर्चा करण्यात येतात, ऐकमेकाची मते जाणुन घेता येतात तर दुसऱ्या बाजुला आपली स्वत:ची मते तपासता येतात. लग्नापूर्वी एकमेकामधील मनमोकळा आणि प्रामाणिक संवाद हे नाते मजबुत करायला खुप उपयोगी पडतो. लग्नापूर्वी संवादाच्या माध्यमातुन आपली स्वप्न, आकांक्षा एकमेकांना सांगितल्या गेली पाहीजे समुपदेशकाकडुन त्यावर योग्य सल्ला मसलतही घेतली पाहीजे. अतिशय किरकोळ प्रश्न वाटत असला तरी आपल्या प्रायव्हसी बाबत, तसेच कौटुंबिक जबाबदाऱ्याबाबत, आर्थिक स्थितीबाबत, परस्परांशी बोलेले पाहीजे. तर केवळच प्रेमापोटी आईवडीलांची मुलाच्या संसारातील मध्यस्थी हळूहळू मोठया वादाचा विषय बनायला लागतो त्यामुळे ही अनावश्यक मध्यस्थी टाळण्याबाबत परस्परांशी संवाद साधला पाहीजे सर्वच बाबतीत असणारा खुलेपणा नात्यातील बंध घट्ट करायला विवाहपूर्व समुपदेशनाची भूमिका आजची वर्तमान गरज झाली आहे.

विवाह जुळण्यापुर्वी पालकानीही आपल्या मुला–मुलीनां ऐकमेकाशी संवाद साधण्याची मुभा द्यावी जेणेकरुण ते आपले मत मांडु शकतील, तर विवाह करण्यापुर्वी मुला–मुलीनी देखील ही बाब लक्षात ठेवावी की, केवळ वरवरच्या आकर्षणाना न भुलता ऐकमेकाच्या गुण, दोष, मर्यादा, छंद, आवडी–निवडी, धारणा, जीवनमूल्य, अपेक्षा इ. बाबीवर सविस्तर चर्चा करुन आपल्या आयुष्याचा भावी जोडीदार निवडावा.

विवाह ही जीवनातील अत्यंत सुखद आणि आनंददायक बाब आहे ती अधिक आनंददायी आणि निरोगी बनवण्याकरिता पती–पत्नी दोघामध्ये आपुलकी, जिव्हाळा आणि सर्वात महत्वाचे म्हणजे एकमेकाविषयी आदर आणि विश्वास असायला पाहीजे, त्यामुळे त्याचे भावी जीवन सुखकर आणि आनंददायी होऊ शकते, विवाहपूर्व समुपदेशनामुळे भावी आयुष्यात विवाहपश्चात येणारे अनेक छोटे– मोठे अनावश्यक धोके सहज टाळता येतात जे एक समृध्द जीवन जगण्यासाठी अत्यंत आवश्यक आहे.

विवाहपश्चात्य समुपदेशन :

विवाहपश्चात समुपदेशन विवाहपूर्व समुपदेशना इतकेच महत्वाचे आहे कुटुंबात येणारी नववधु सर्वांकरिता एक कुतुहलाचा विषय असतो, ती कशी असेल? तिचा स्वभाव कसा असेल? सांभाळेल ना ती घरातील सर्वानां ? घेईल ना कुटुंबतील सर्वाची काळजी ? करेल ना घरातील सर्व रितीरिवाज ? असे एक ना हजार प्रश्न घरातील वडीलधारी मंडळीच्याच मनात नव्हे तर इतरही सदस्याच्या डोक्यात घोंघावत असतात. हयातुन एक बाब सहज लक्षात येते, ती म्हणजे घरातील प्रत्येकाच्याच मनात येणाऱ्या नववधुविषयी

Scanned with CamScanner

अपेक्षाचे डोंगर आणि हया सर्व अपेक्षामध्ये जर ती पूर्ण नाही उतरू शकली तर रोजच वादाचे नव–नवीन विषय.

तर दुसरीकडे हिच्या मनातही विचाराचे काहुर माजलेले असते, कसे असतील माझ्या कुटुंबातील सर्व सदस्य, मला समजुन तर घेतील ना? देतील ना माझ्या व्यक्ती स्वातंत्र्याला थोडी मोकळीक? असेल का माझा आदर माझ्या कुटुंबात? सासु–सासरे कसे असतील? घेईल ना मला समजुन? पुढे शिकु देईल का मला? नोकरी करू देतील का? नवरा कसा असेल? असे एक ना अनेक प्रश्न तिच्याही मनात पिंगा घालत असतात हया सर्व प्रश्नांचे ओझे घेऊन ही नवविवाहीत आपल्या कुटंबात प्रवेश करत असते.

पती–पत्नीचे नाते हे नैसर्गिक नाते नाही हे निवडलेले नाते आहे आणि निवडलेले नाते टिकवणे एक कला आहे, प्रत्येक दांपत्याला आपले वैवाहिक जीवन सुखी आणि समाधानी करण्याकरिता ही कला आत्मसात करणे आवश्यक आहे,

वैवाहिक नाते संबधात सर्वात मोठी चुक होते ती म्हणजे आपल्या जोडीदाराने आपल्यासारखेच सर्व बाबतीत असावे असे वाटणे हे कधीच शक्य नसते कारण आपल्या जोडीदाराचे दिसणे, विचार, मूल्य, आवडी–निवडी अगदीच आपल्या सारख्या असतीलच कश्या, तसेच लग्नानंतर ती बदलेल किंवा त्यला आपण आपल्यासारखे बनवु असा अतिरिक्त आशावादच खर तर वादाचा विषय बनतो कारण पुढे ती बदलत नाही आणि तोही बदलत नाही., पुढे पुढे आपल्या जोडीदाराला बदलविण्याचा अट्टहास दोघा मधील दुराव्याचे मुख्य कारण बनते. आपला जोडीदार हा आदर्श जोडीदार असावा असे प्रत्येक दांपत्याला वाटत असते, आदर्श जोडीदार बनण्याचा किंवा मिळविण्याचा परिपूर्ण असा कोणताही मार्ग नाही, आदर्शवाद हा केवळ कथा, कादबंऱ्या, सिनेमा अथवा नाटकातच आढळतो त्यामुळे वास्तविक जीवनात तो मिळविण्याचा अट्टाहास करु नये.

पती–पत्नी बनण्यापूर्वी दोघानीही निष्ठावंत आणि प्रेमळ मित्र–मैत्रिण असणे आवश्यक असते. समजुतदारपणा, विश्वास, सहानुभुती, निष्ठा, प्रांजळपणा, परस्परची त्रुटी स्वीकारणे आणि परस्पराच्या व्यक्तिगत भिन्नतेचा स्विकार करणे तसेच सर्वात महत्वाचे म्हणजे परपस्पराना आदर करणे हया सर्व बाबी वैवाहिक जीवन सुखी करण्याकरिता अत्यंत महत्वाच्या आहे. त्यानप्रमाणे वैवाहिक जीवनात निकोप लैगिंक संबध असणे देखिल तितकेच महत्वाचे आहे, पती–पत्नीचे नाते मुळात समाज बांधणीसाठी निर्मिलेले नाते असल्यामुळे कामजीवन हा त्यातील अत्यंत महत्वाचा पाया आहे आणि त्याकरिता कामजीवनात जोडीदाराला समजुन घेणे त्याला अथवा तिला काय हवे–नको हे लक्षात घेऊन वागणे गरजेचे असते. कामजीवनाला नाकारुन अथवा त्याकडे दुर्लक्ष करुन नात्यामधील दुरावा आपण अधिकच वाढवत असतो पिवाय जबदस्तीने अथवा जुलमी काम संबंध हा सुध्दा जोडीदारावर केलेला एक प्रकारचा अत्याचारच असतो म्हणुन सुदृढ वैवाहिक जीवनासाठी दोघानीही कामजिवनाला योग्य महत्व देणे आवश्यक आहे तसेच हया संदर्भात आवश्यकता भासल्यास योग्य तज्ञाचा सल्ला घेणे देखिल तेवढेच महत्वाचे आहे हयाबाबत संपूर्ण मार्गदर्शन विवाह पश्चात समुपदेशनात करण्यात येते.

सध्याच्या पिढीवर प्रसार माध्यमाचा खुप मोठया प्रमाणात परिणाम झाल्याचे दिसुन येतो, कामजीवनावर आधारीत जाहीराती, टॉनिकच्या नावाखाली विकली जाणारी औषधे, स्प्रे, मलम, टॅबलेट्स इ. गोष्टीचा अनावश्यक वापर करुन जोडीदाराला बळजबरी केल्याची अनेक उदाहरणे आहेत त्यामुळेही दोघामध्ये विकोपाचा वाद होतो, बऱ्याचदा ही कारणे इतरानां सांगता देखिल येत नाही तसेच सतत होणाऱ्या वादामुळे जोडीदाराबाबत घृणा, तिरस्कार आणि, द्वेष वाटायला लागतो, वाद हे संवादाचे भ्रष्ट रुप आहे, वादाने एखाद्यावेळी परिस्थिती जिंकता येईल परंतु त्यामुळे दोघामध्ये काही अंशी दुरावा निर्माण होतो आणि हा दुरावा सतत वाढल्यास त्याचे पर्यावसन घटस्फोटात व्हायला वेळ लागत नाही. घटस्फोट म्हणजे वैवाहिक नातेसंबध कायदेशिररित्या संपुष्टात आणणे, त्याचे शारीरिक, मानसिक, भावनिक आणि आर्थिक स्वरुपाचे फार दुरगामी परिणाम केवळ व्यक्तिवरच नाही तर

Scanned with CamScanner

त्याच्या अपत्यावर आणि संपूर्ण कुटुंबावर पडत असतात, प्रत्येकच लग्न करताना ते निरंतर टिकावे म्हणुन केले जाते त्याची परिणिती घटस्फोटात व्हावी म्हणुन नाही. एखाद्याचा घटस्फोट ही इतरांना अचानक घडणारी धक्कादायक घटना वाटत असली तरी ती अचानक घडलेली घटना नाही ज्या गोष्टीकडे लक्ष द्यायला पाहीजे त्याकडे जाणिवपूर्वक बऱ्याच काळापर्यंत दुर्लक्ष केले जाते, जोडीदाराला नको इतके गृहीत धरले जाते याचीच परिणीती हळुहळु घटस्फोटात होते. पती–पत्नी दोघानीही सदैव परस्पराच्या भावनिक आणि तार्कीक विचाराचे भान ठेवायला पाहीजे बऱ्याचदा भावनाचा हा उद्रेक, मानसिक कुचबंना केवळ समुपदेशकापुढे पती–पत्नी व्दारे व्यक्त केली जाते त्यावेळी त्यातुन योग्य पर्याय अथवा मार्ग शोधले जातात त्यामुळे नात्याचा गोडवा टिकविण्यासाठी विवाहपश्चात समुपदेशन अत्यंत आवश्यक आहे.

आज बरीचशी दांपत्य कामजीवनातील श्रृंगार विसरुन विकृतीला बळी पडण्याचे प्रमाण वाढत आहे, यशस्वी लैंगिक सहजीवन हे केवळ शारीरिक संबधा एवढे क्षणिक नाही योग्य शारीरिक संबध हे यशस्वी सहजीवनाचे एक अंग आहे ते अधिक यशस्वी कण्याकरिता एकमेकाबद्दल आत्मीयता, प्रेम, काळजी, सामाजिक भान असणे आवश्यक आहे नाहीतर बरीचशी विवाह आजही केवळ आपल्या अपत्यासाठी टिकवले जातात केवळ त्यांची फरफट होऊ नये म्हणुन पुढे ओढली जातात हया ओढाताणीचा घरातील सर्वावरच परिणाम होतो विशेषत: मुलाच्या शैक्षणिक आणि व्यक्तिगत विकासावर त्यातुन पुढे पुन्हा सामाजिक समस्या निर्माण होतात शेवटी यशस्वी वैवाहिक जीवनासाठी पती–पत्नी दोघांमध्य विश्वास, आपुलकी, परस्परानां समजुन घेण्याची मानसिकता आणि सर्वात महत्वाचे म्हणजे परस्परविषयी आदर आवश्यक आहे, त्यामुळे विवाहपूर्व समुपदेशन आणि विवाह पश्चात समुपदेशन आज काळाची गरज आहे, ही गरज लक्षात घेउन विवाहपूर्व प्रत्येकच विवाहइच्छुक तरुणं–तरुर्णीनी आणि विवाहपश्चात्य दांपत्यातीनी व्यावसायिक समुपदेशकाच्या माध्यमातुन समुपदेशन घेतले पाहीजे.

संदर्भ सुची :

निंबाळकर, के. पी. (२०११) मानसप्रज्ञा. वर्धा : सायकोस्कॅन.

गोस्वामी, सुबुध्दि (२००३). महिला एवं बाल विकास. जयपुर : पोइस्टर पब्लिशर्स.

गोयल, आभा (२०१५). किशोरावस्था समस्याएँ एव समाधान. जयपुर.

फरकाडे, त्रिवेणी. विवाह आणि कौंटुबिक संबंध. नागपुर : विद्या प्रकाशन.

प्रभु, विठ्ठल (२००३). निरामय कामजिवन. मुंबई : मॅजेस्टिक प्रकाशन.

प्रश्न युवकांचे उत्तरे आमची, आरोग्य सेवा संचालनालय, १९९८, पूणे

Guidance and counseling, Indira madhukar, 2000,Delhi


www.mastersincounseling.com

www.askmile.com/marriage/counseling

https://www.desiringgod.org

❑❑❑

Scanned with CamScanner



Scanned with CamScanner

14) Depiction of Violence in Sleeping on Jupiterby Anuradha Roy
Dr. Uddhav Jane, Dist-Wasim ||73

15) A STUDY ON ROLE OF SEBI AWARENESS AND PERCEPTION: WITH SPECIAL ...
Rakesh bhoi ,Vallabh vidyanagar ||76

16) A study of Social Anxiety of Pupil Teachers in relation to Self-Esteem.
Chandrashekher Ashok Chakradeo, Chembur ||80

17) Mental Health Study of the Student Teachers on the basis of Religion
Gyanprakash Arya & Dr. (Mrs.) Indira S. Shukla, Mumbai ||87

18) Physicochemical behavior of Chemically treated agrowaste pineapple ...
Alok Ranjan Pradhan, Mayurbhanj, Odisha ||92

19) "संत ज्ञानेश्वरादी भावंडांच्या जीवन चरित्राचा वेध घेणारी कादंबरी : मुंगी उडाली आकाशी"
प्रा.यशवंत आश्रुबा हाके जि.जालना. ||97

20) बास्केटबॉल खेळाडूंच्या कौशल्यांवर प्राणायामाचा होणारा परिणाम : एक ...
प्रा. सुरेश जयराम फराकटे, कोल्हापूर ||103

21) अनुसूचित जमातीमध्ये बिगर अनुसूचित जमातीची घुसखोरी आणि राजकारण
प्रा. गणेश बंडूजी माघाडे , जि. यवतमाळ ||107

22) पचनसंस्थेच्या व्याधींवर आहार नियोजन: एक अध्ययन
डॉ.किरण वसंतअप्पा मोगरकर,जि. बुलडाणा ||109

23) महाराष्ट्रातील प्रादेशिक असमतोल
प्रा.सौ.संगिता भालचंद्र काटकर , पुणे. ||112

24) माहिती तंत्रज्ञान आणि ग्रामीण विकास
प्रा. डॉ. कृष्णा शंकर शहाणे, नाशिक ||116

25) मराठीतील २००० नंतरची दलित कविता
प्रा.डॉ.लक्ष्मण मोहनराव सोळंके जि. अमरावती ||118

26) आपत्ती व्यवस्थापन काळाची गरज
प्रा. डॉ. विजयता एम. विटनकर , वर्धा ||123

www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com

PRINCIPAL I/c.
Dr. Ambedkar College of
Social Work, Wardha

Scanned with CamScanner

त्यामुळे मराठी साहित्य व कवितेला समृध्दता व सकसता प्राप्त होते.

संदर्भ:

१) दलित साहित्य : एक आकलन – बाळकृष्ण कवठेकर पृ.क्र.२१

२) जागतिकीकरण व मराठी कविता – संपा : उत्तम कांबळे पृ. क्र. १

३) दलित साहित्याचा इतिहास – डॉ. प्रा.म. सु.पगारे पृ.क्र.७८

४) आता माणसाचा शोध सुरू आहे – डॉ. सुदेश वर्धे पृ. क्र. २५

५) नंतर आलेले लोक –अरूण काळे .

६) संध्यारंग– संध्या रंगारी पृ. क्र. १२४

७) सुर्यफुल आणि काळोख – सुदाम सोनुले पृ. क्रं. ४०

८) अस्तादर्श – विशेषांक २०१५ पृ. क्रं. ५८ .

९) पत्ता बदलत जाणारा गनिम – उत्तम अंभोरे पृ.क्रं. ६७.

□□□

26

आपत्ती व्यवस्थापन काळाची गरज

प्रा. डॉ. विजयता एम. विटनकर
डॉ. आंबेडकर कॉलेज ऑफ सोशल वर्क, वर्धा

****

मानवनिर्मित आणि निसर्गनिर्मित असे आपत्तीचे दोन प्रकार आहेत. विशेषत: हवामानातील बदलामुळे नैसर्गिक आपत्ती आकस्मिकपणे उद्‌भवते त्यामुळे अशा नैसर्गिक आपत्तीत जीवित आणि वित्तहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. आपण दैनंदिन व्यवहारातही बघतो की जर एखाद्या वाहनाला खुप मोठा अपघात झाला किंवा एखादी व्यक्ती अपघातात जखमी झाली तर त्याच्या उपचारासाठी, त्यांचे प्राण वाचविण्यासाठी समाजातील अनेक लोक धावपळ करतात. एकंदरीत सांगावयाचे झाल्यास मानवी संवेदनामुळेच ही सकारात्मक कृती घडते. तसेच यामध्ये प्रशासनाद्वारे सुध्दा योग्य ती दखल घेतली जाते. म्हणून आपत्ती व्यवस्थापन आणि लोकांचा सहभाग यामध्ये जवळचे नाते आहे.

भुकंप, महापुर, चक्रीवादळ, अतिवृष्टी ह्या सर्व घटना नैसर्गिक आपत्तीमध्येच मोडणाऱ्या आहेत. अशा आपत्तीमध्ये होणारी जीवित आणि वित्तहानी टाळण्यासाठी महाराष्ट्र आपत्ती जोखीम व्यवस्थापनाअंतर्गत विभागीय आणि जिल्हास्तरीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची स्थापना करण्यात आली आहे. इतकेच नव्हे तर केंद्रशासनाने २००५ मध्ये आपत्ती व्यवस्थापन कायदा पारीत केला. याचा मुळ उद्देश नैसर्गिक आपत्तीमध्ये होणारे नुकसान टाळणे व सर्वांना सुरक्षितता प्रदान करणे. हा कार्यक्रम प्रशासकीय यंत्रणेकडून राबविला जात असला तरी देखिल संकटकालीन परिस्थितीचा मुकाबला करण्यासाठी लोकसहभागही तितकाच महत्त्वाचा आहे.

आपत्ती व्यवस्थापनामध्ये स्थानिक पातळी ही देखिल महत्त्वाची आहे. त्यामुळे विविध गट स्थापन करणे, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्या वतीने जिल्हास्तरावर जिल्हा आपत्ती आराखडा तयार करणे, तो अद्ययावत करणे, विविध कार्यशाळा आयोजित करणे तसेच रंगित तालिम इ. उपक्रम जिल्हा पातळीवरील कार्यक्रमात राबविण्यात येतात. तालुका स्तरावरही अशाच प्रकारचे कार्यक्रम घेण्यात येतात. गावात आपत्ती व्यवस्थापन समिती आदी

Scanned with CamScanner

सदस्यांचे प्रशिक्षण, कार्यालयीन कर्मचारी, स्वयंसेवी संस्थांचे कर्मचारी यांचे प्रशिक्षण तसेच लोकसहभाग वाढविण्यासाठी पथनाट्य, भित्तीपत्रक, जाहीरात फलक, पोस्टर्स स्पर्धा आदि कार्यक्रमाद्वारे जागृती करण्यात येते.

स्थानिक पातळीवरील आपत्ती व्यवस्थापनाची गरज :

गावात येणारे महापुर वा अन्य नैसर्गिक संकटाचा मुकाबला करण्यासाठी सुरुवातीला गावकऱ्यांस हिमतीने सज्ज रहावे लागते. नागरिकांचे मनोबल वाढविण्यासाठी स्थानिक पातळीवर व्यवस्थापनाची गरज निर्माण होते. दरवर्षी सातत्याने येणाऱ्या आपत्तींना तोंड देण्यासाठी अज्ञान तसेच माहितीचा अभाव यामुळे होणारी हानी टाळण्यासाठी कमीत कमी जीवित आणि वित्त हानी होईल याची खात्री करण्यासाठी आपत्तीला सहज बळी पडणाऱ्या वर्गाचे रक्षण करण्यासाठी आपत्तीनंतर दैनंदिन जीवन उध्वस्त होऊ नये याची तयारी करावी लागते.

आपत्ती काळात तसेच आपत्तीनंतर विशेषत: अल्पवयीन बालके, वृध्द महिला तसेच अपंग ह्यांनी कमीत कमी त्रास होईल याची खातर जमा करण्यासाठी तसेच आपत्तीकाळात पाणी पुरवठा, जनावरांचा चारा, खानपान व्यवस्था, वैद्यकीय सेवा, ओषध सामग्री, सांडपाण्याची व्यवस्था इ. सुरळीत चालतील याची खात्री करण्यासाठी स्थानिक पातळीवर व्यवस्थापन करणे गरजेचे आहे. त्याकरिता तितकाच उत्स्फुर्त लोकसहभाग मिळणेही आवश्यक आहे.

स्थानिक पातळीवर आपत्ती व्यवस्थापन का व कशासाठी ?

दरवर्षी सातत्याने येणाऱ्या आपत्तीचा सामना करण्याच्या पुर्वतयारीसाठी

आपत्तीनंतर दैनंदिन जीवन उध्वस्त होऊ नये म्हणून तयारी करण्यासाठी

अकस्मात येणाऱ्या आपत्तींना तोंड देण्यासाठी

अज्ञान तसेच माहितीचा अभाव यामुळे होणारी हानी टाळण्यासाठी

आपत्ती काळात तसेच आपत्तीनंतर विशेषत: अपेक्षित माता, अल्पवयीन बालके, वृध्द तसेच अपंग यांनी कमीत कमी त्रास होईल याची खातरजमा करण्यासाठी

कमीत कमी जीवित व वित्तहानी होईल याची खात्री करण्यासाठी

आपत्तीला सहज बळी पडणाऱ्या वर्गाचे रक्षण करण्यासाठी

आपत्तीकाळात पाणीपुरवठा, जनावरांचा चारा, खानपान व्यवस्था, वैद्यकीय सेवा, औषध सामुग्री, सांपडपाण्याची व्यवस्था इ. सुरळीत चालतील याची खात्री करण्यासाठी

विभाग स्तरावरुन करण्यात येत असलेल्या उपाययोजना

१. विभागीय स्तरावर नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात येते.

२. याचप्रमाणे जिल्हा व तालुका स्तरावर नियंत्रण कक्ष स्थापन करण्याच्या सुचना देण्यात आल्या आहेत या नियंत्रण कक्षाची सेवा २४ तास उपलब्ध राहणार आहे.

३. निर्माण होणाऱ्या संभाव्य परिस्थितीला हाताळण्यासाठी प्रशासनाला सज्ज राहावे लागेल.

४. याशिवाय पुरपरिस्थितीमुळे साथीच्या रोगांना नियंत्रित ठेवण्यासाठी आरोग्य यंत्रणा, विद्युत पुरवठा सुरळित ठेवण्यासाठी महावितरण कंपनी, दुरध्वनी सेवा सुव्यवस्थित ठेवण्यासाठी, दुरसंचार विभाग, रस्त्याने वाहतुकीचा संपर्क असावा यासाठीही सार्वजनिक बांधकाम विभाग, राज्य परिवहन महामंडळ, पाटबंधारे विभाग व इतर संबंधित विभागांना आवश्यक सुचना देण्यात आल्या आहेत.

आपातकालीन परिस्थितीत प्रशासकीय यंत्रणेसोबतच शालेय, महाविद्यालयीन विद्यार्थी, होमगार्डस, पोलीस प्रशासन, स्वयंसेवी संस्था, सामाजिक कार्यकर्ते आदिंचा प्रामुख्याने सहभाग अपेक्षित आहे. तसेच आपातकालीन परिस्थितीमध्ये ग्रामस्थांनी देखील पुढाकार घेऊन सुरक्षा व्यवस्थेला सहकार्य करण्याची गरज आहे.

आपत्तीव्यवस्थापन व लोकसहभाग :

कोणतीही आपत्ती झाली तरी तात्काळ तिथे राहणारे लोकच एकमेकांच्या मदतीसाठी लगेच धाऊन येतात. त्यासाठी त्यांना प्रशिक्षण देणे, जागृत करणे आवश्यक आहे. तसेच त्याबद्दलची माहिती कार्यालयात असणे आवश्यक असते.

सर्वप्रथम संघाची स्थापना करणे आवश्यक आहे.

समाजस्तरावर प्रशिक्षणाचे व पुर्व तयारीचे आयोजन करणे.

कुटुंबात पुर्वतयारी करणे, अफवांवर नियंत्रण ठेवुन समाजात शांतता व सुव्यवस्था राखणे.

प्रथमोपचार, उपलब्ध मदत, वृध्द, महिला, मुले, अपंग व्यक्ती यांना मदत अन्न-धान्य वाटप इ. कार्यात प्रामाणिकपणा आणि सुत्रबध्दता राहिल याबद्दल जागृत करणे

हे कार्य योग्यरित्या पार पाडण्यासाठी

धोके व जोखीम यांचे मूल्यमापन होणे आवश्यक आहे.

शोध व बचाव साहित्य गावपातळीपर्यंत असावे.

शालेय आपत्ती व्यवस्थापन महत्वाचे आहे.

मोठ्या प्रमाणात जनजागृती होणे आवश्यक आहे.

आज खर तर आपत्ती व्यवस्थापन ही काळाची गरज आहे. भुकंप, पुर किंवा अन्य कुठल्याही नैसर्गिक आपत्तीनंतर झालेल्या जीवित आणि वित्त हानीच्या अंदाजानुसार शहरातील / गावातील / खेड्यातील नागरिकांचे पुनर्वसन करताना शासनातील संबंधित खात्यांना

Scanned with CamScanner

असंख्य आडी-अडचणींना तोंड द्यावे लागते. परंतु स्थानिक स्वरूपात या मदत कार्यात लोकांचा सहभाग मिळाला तर मात्र हे मदतकार्य पार पाडता येते.

पुरामध्ये किंवा भूकंपात इमारत पडल्याने किंवा पुराच्या पाण्यात घरातील अतिमहत्त्वाचे दस्तऐवज गहाळ झाल्याने त्यांचे तसेच इमारतीतील जागेच्या हक्काबाबतचे पुरावेच नष्ट झाल्याने भविष्यात निर्माण झालेल्या समस्यांची कशी सोडवणूक होईल, राहत असलेल्या इमारतीचे बांधकाम कोण करेल, घरातील कर्ता व्यक्ती दगावल्यास त्या कुटुंबाचे काय होईल या सर्वांचे उत्तर शोधायचे म्हटल्यास सध्या अस्तित्वात असणारे कायदे आणि माहिती पत्रिका / शासन सक्षम आहे काय ह्यांचा देखील विचार करणे आजच्या स्थितीत अति महत्त्वाचे आहे.

सेंडाई फ्रेमवर्क :

जपानच्या सेंडाई शहरामध्ये आपत्ती जोखिम निवारणातील झालेल्या तिसऱ्या संयुक्त राष्ट्राच्या जागतिक संमेलनात सन २०१५ ते २०३० या कालावधीसाठी आपत्ती व्यवस्थापनाबाबत सेंडाई आराखड्यात आपत्ती निवारणासाठी कॉर्पोरेट सामाजिक बांधिलकी निधीचा (CSR) वापर करण्यास भारताने मान्यता दिली आहे.

. सेंडाई आराखडा २०१५-३० :

हा आराखडा म्हणजे १५ वर्षांसाठी आंतर शासकीय अबंधनकारक करार आहे. आपत्ती जोखीम कमी करण्यातील मुख्य जबाबदारी राष्ट्रीय शासनाचे असल्याचे गृहीत करुन स्थानिक शासन आणि खाजगी क्षेत्रानी याबाबत आपले योगदान देण्याचे आव्हान करण्यात आलेले आहे.

आराखड्यातील महत्त्वाचे मुद्दे (सात लक्ष्ये) पुढील प्रमाणे आहे

१. २०२० पर्यंत जास्तीत जास्त देशांनी आपत्ती जोखीम निवारण्याची रणनिती तयार करणे.

२. २०२० पर्यंत सर्वांपर्यंत बहुधोका पुर्वसुचना प्रणालीद्वारे धोक्याची सुचना देण्याचे प्रमाण लक्षणियरित्या वाढविणे.

३. २०३० पर्यंत आपत्तीमुळे होणाऱ्या मृत्युचे प्रमाण लक्षणीयरित्या कमी करणे. (सरासरी प्रति एक लाख व्यक्तीपैकी आपत्तीमुळे होणाऱ्या मृत्युंची संख्या जागतिक आपत्ती मृत्युदर २००५-२०१५ च्या तुलनेत कमी करणे.

४. आपत्तीग्रस्त लोकांची संख्या सन २०३० पर्यंत कमी करणे.

५. आपत्तीमुळे होणाऱ्या वित्तहानीचे प्रमाण सन २०३० पर्यंत कमी करणे.

६. अतिमहत्त्वाच्या पायाभूत सुविधांचे आपत्तीमुळे होणारे नुकसान व आपत्तीमुळे मूलभूत सेवांमध्ये पडणाऱ्या खंड यांचे प्रमाण २०३० पर्यंत लक्षणीयरित्या कमी करणे याशाठी या सेवा सुविधांची क्षमता, संबंधन व शाश्वतता निर्माती करणे.

७. विकसनशील देशांना या आराखड्याच्या राष्ट्रीय अंमलबजावणीमध्ये शाश्वत सहाय्य देण्यासाठी आंतरराष्ट्रीय सहकार्यामध्ये सन २०३० पर्यंत लक्षणीय वाढ करणे.

जगात नैसर्गिक संकटाची जास्त शक्यता असणाऱ्या देशामध्ये भारताचा समावेश होतो. महापूर, दुष्काळ, दरड कोसळणे, भूकंप, वादळ, अशा संकटाचा धोका १२० कोटी लोकांच्या डोक्यावर कायम असतो. देशातील काही भाग तर नैसर्गिक आपत्तीच्या बाबतीत फारच संवेदनशील आहेत. अशा नैसर्गिक संकटाचा सामना करण्यासाठी राष्ट्रीय पातळीवर २००५ मध्ये आपत्ती व्यवस्थापन विभाग सुरु करण्यात आला पण आपल्या देशातील आपत्ती व्यवस्थापन अत्यंत खराब असल्याचा ठपका विभागासंबंधित 'कॅगच्या' अहवालात ठेवण्यात आले. कॅगच्या अहवालानुसार या विभागाकडे योग्य सूचना नसतात. त्यावर योग्य अंमलबजावणी आणि नियंत्रणाची कमतरता असते. स्पष्ट शब्दात सांगायचे म्हणजे नैसर्गिक आपत्तीचा सामना करण्यात हा विभाग अयशस्वी ठरला आहे.

आपयशाची कारणे शोधताना अहवालात सांगण्यात आले की, सावेबध्द व्यवस्था असताना देखील माहितीच्या देवाणघेवाणीची कमतरता हे मुख्य कारण आहे. याच कारणामुळे संकटाचे पुर्व संकेत मिळत नाही. त्यामुळे मदत आणि बचावकार्याचे काम वेळेत सुरु होत नाही त्यामुळे धोक्याचे प्रमाण वाढते.

१ सप्टेंबर १९२३ रोजी जपानच्या केटो प्रांतात भीषण भुकंप आला यात लाव्हारस जमिनीवर आल्याने लागलेल्या आगीने थैमान माजवले होते. यात एक लाखापेक्षा जास्त लोकांचा मृत्यु झाला तर संपूर्ण भाग बेचीराख झाला. या संकटातुन सावरत सरकारने तेथे अग्निप्रतिबंधक लाकुड आणि विटांचा वापर करीत घर आणि इमारत बांधल्या. मोटरवे बांधण्यात आले तर सबवे सिस्टिम सुधारण्यात आली. १९९५ मध्ये या शहराची तुलना न्युयार्क आणि लंडनसोबत होऊ लागली. १९९५ मध्ये कोबे भागात आलेल्या भुकंपातुनही जपान सावरला. त्यांनी भुकंपाची अचुक माहिती देणारी यंत्रणा तयार केली. १९५२ मध्ये जपानने त्सुनामी इशारा प्रणालीत ३०० सेक्टर आणि ८० ॲव्यारिक सेन्सर लावले. हे सेन्सर २४ तास समुद्रात होणाऱ्या घडामोडींची माहिती घेतात. त्सुनामीपासून वाचण्यासाठी किनारपट्टीवर शहरांसाठी वेगळे नियोजन करण्यात आले. सर्वात जास्त त्सुनामी येणाऱ्या पुर्व किनारपट्टीवर शेकडो भुकंप आणि त्सुनामी प्रतिबंधक

Scanned with CamScanner

घरे तयार करण्यात आली आहे तर काही शहरात त्सुनामी भिंती आणि फ्लडगेट तयार करण्यात आले आहेत. १९८१ मध्ये जपानने भुकंपाची तिव्रता पाहता इमारती बांधण्यासाठी नवी मार्गदर्शक नियमावली लागू करीत २००० इमातीचे पुनर्मूल्यांकन केले आहे. आपत्ती व्यवस्थापन आणि त्याबाबत सर्वसामान्यांना प्रशिक्षण ही काळाची गरज बनली आहे कारण आपत्तीनंतर तातडीने स्थानिक लोक एकमेकांची मदत तर करुच शकतात तसेच मानसिक आघातातून लवकर बाहेर पडुन बाहेरील मदत येईपर्यंत स्वत:सह इतर लोकांनाही सावरण्याचे कामही आपत्तीग्रस्तांनाच करावे लागते म्हणून आपत्ती व्यवस्थापनाचे प्रशिक्षण त्यांचे जुजबी ज्ञान प्रत्येकच नागरिकाला असणे अत्यंत आवश्यक आहे. कारण कुठलीही आपत्ती सांगून येत नाही. येणाऱ्या संकटाचा सामना करण्याची पुर्वतयारी म्हणजेच व्यवस्थापन होय त्यामुळे आपत्ती व्यवस्थापनालाही तितकेच महत्व आहे.

सदर्भ ग्रंथसूची :

गुलारी, राकेश (२०१४). प्राकृतिक आपदा एवं प्रबन्धन. जयपूर : प्रियंका पब्लिशिंग हाऊस.

चौधरी ए. पी., चौधरी अर्चना (२०११). संपूर्ण पर्यावरणशास्त्र. जळगाव : प्रशांत पब्लिकेशन.

पुर परिस्थिती आपत्ती व्यवस्थापन कार्यक्रम, मदत व पुनर्वसन विभाग महाराष्ट्र शासन

आपत्ती व्यवस्थापन कशासाठी, जिल्हाधिकारी कार्यालय मार्गदर्शन पुस्तिका, मदत व पुनर्वसन विभाग महाराष्ट्र शासन

https://divyamarathi.bhaskar.com

https://mr.m.wikipedia.org>wiki>

mr.vikaspedia.in>socialawareness

□□□



PRINCIPAL I/c.
Dr. Ambedkar College of
Social Work, Wardha

27

ध्वनी परिवर्तन : एक चिंतन

डॉ. नागनाथ लक्ष्मण आवळे
जि. बिदर , (कर्नाटक)

ध्वनी परिवर्तन : ध्वनी परिवर्तनाचा अभ्यास करताना ध्वनी परिवर्तन म्हणजे काय याचा विचार करणे महत्त्वाचा ठरते. भाषा ही नित्य परिवर्तनशील असत. भाषामध्ये परिवर्तन होते म्हणजे तिच्या अंतरगात व बहिरंगात बदल होतो. अर्थातील बदल म्हणजे अंतरगातील, तर बहिरंगात बदल म्हणजे ध्वनीतील बदल होय. एका विशिष्ट काळी एका विशिष्ट प्रदेशात बोलल्या जाणाऱ्या एका विशिष्ट समाजाच्या भाषेतील ध्वनी कालांतराने बदलतात. ध्वनीत होणाऱ्या या बदलाच्या प्रक्रियेस ध्वनिपरिवर्तन असे म्हणतात.

ध्वनीमध्ये होणारे, परिवर्तन अत्यंत हळूहळू असे होत असते. ते नकळतपणे होत असते असे होणारे परिवर्तन निरपवाद व सर्वव्यापी असते, ते जगातील सर्व भाषांमध्ये होते. ध्वनिपरिवर्तन हे प्रवाही असतेय कारण प्रत्येक पिढिमध्ये ध्वनिपरिवर्तन होत असते. जसजसा काळ बदलतो तसतसे भाषेतील ध्वनी बदलत जातात.

भाषेमध्ये होणारे परिवर्तन हे केवळ ध्वनी किंवा शब्दांपुरतेच मर्यादित नसून ते भाषेच्या रचनेमध्येही होते. म्हणूनच 'लीळाचरित्राची' भाषाशैली व 'गजानन विजय' ची भाषा भाषा शैली यात फरक आहे. भाषे मध्ये होणारे परिवर्तन हे ध्वनी उच्चारणात होत असते. मुखातील कंठ, तालू, दंत, जिव्हा, मूर्धन, फुफुसे यांचा ध्वनीच्या उच्चारणात संबंध असतो, तर अर्थाच्या बाबतीत मेंदूचा संबंध असतो. मुखोद्रियामध्ये तोडा जरी बदल झाला तरी ध्वनीमध्ये परिवर्तन होते. या परिवर्तनालाच उच्चारप्रक्रिया किंवा स्वरप्रक्रिया असेही म्हटले जाते.

ध्वनी परिवर्तनाची कारणे

मुख यंत्ररचनेची भिन्नता रू प्रत्येक व्यक्ती ध्वनीयंत्र व

Scanned with CamScanner

Impact Factor - 6.556 ISSN : 2278-9308

Sanshodhan Samiksha

Humanities, Social Sciences, Commerce,
Education, Law and Language

Peer-Reviewed & Refreed Indexed

Multidisciplinary International Research Journal

Special Issue - March -2018



Chief Editor - Prof. Virag S. Gawande
Editor - Dr. Sanjay J. Kothari
Editor - Dr. Dinesh W.Nichit

- Published By -

Aadhar Social Research & Development Training Institute, Amravati, MS.

Dr. Ambedkar College of Social Work Wardha

PRINCIPAL I/c.
Dr. Ambedkar College of
Social Work, Wardha

Scanned with CamScanner

Impact Factor Value : 6.555 I S S N- 2278-9308

Sanshodhan Samiksha

Humanities,Social Sciences,Commerce, Education, and language& Law Monthly
Peer Reviewed International Research Journal
Special Issue

March - 2018

Chief Editor
Prof.Virag S.Gawande

Editor
Dr.Sanjay j. Kothari
Social Sciences

Editor
Dr. Dinesh W.Nichit
Commerce

Published By
Aadhar Publication – Amravati
(M.S.) India 444604

PRINCIPAL I/c.
Dr. Ambedkar College of
Social Work, Wardha

Scanned with CamScanner

Impact Factor – 6.556

ISSN : 2278-9308

Sanshodhan Samiksha

Humanities, Social Sciences, Commerce,
Education, Law and Language

Peer-Reviewed & Refreed Indexed

Multidisciplinary International Research Journal

Special Issue - March -2018





☐ Chief Editor - Prof. Virag S. Gawande
☐ Editor - Dr. Sanjay J. Kothari
☐ Editor - Dr. Dinesh W.Nichit

- Published By -

Aadhar Social Research & Development Training Institute, Amravati, MS.

Scanned with CamScanner

INDEX

	Author	Title of Research Paper	Pg.No.
1	Prof. V. K. Utture	impact of emotional intelligence on knowledge management	1
2	Prin. (Dr.) V. A. Patil	Vengurla and Dutch connection	9
3	Prof. Vasant V. Thakare	A Studay of significant changes in the current trends of kabbadi game	12
4	*Prof. Dr. G. L. Pedhiwal.*	Rats Menace or opportunity for the WTO?	16
5	Prof. Sangita Suryawanshi	Social Empowerment of Women in India	24
6	Prof. Dr. V.V. Kulkarni.	Women Empowerment in Rural-an important program for the benefit of the Society.	28
7	प्रा. डॉ. एच. डी. आकोटकार	कीर्तनसंस्था : एक दृष्टीक्षेप	31
8	प्रा. डॉ. बालासाहेब नारायणराव कुलकर्णी	स्वतंत्रतापूर्व हिन्दी काव्य में 'मातृ-रुप' में नारी	37
9	डॉ. सुनील अभिमान अवचार	दलित स्व-कथनाचा आविष्कार : एक शोध	41
10	प्रा. एन. एल. वाल्हे	भारतीय हिंदी साहित्य में स्त्रीयों का योगदान	55
11	प्रा. जयश्रीला बसवंत मनोहर	भारतीय राजकीय क्षेत्र में महिलाओंका स्थान	57
12	डॉ. ज्योती परब	स्त्रीयांची कविता : एक शोध	60
13	*डॉ. विजय हिरालाल उभाळे*	महात्मा गांधी आणि स्वातंत्र्योत्तर भारत	64
14	प्रा.सौ. चारुता पद्मनाभ गोखले	शंकराचार्यांचा अद्वैत सिध्दान्त आणि संत ज्ञानदेवांचा अमृतानुभव	69
15	डॉ. गिरीश नारायणराव सपाटे	अलक्षित संत कवींच्या व्यथा आणि वेदना	77
16	Dr. Anil P. Mude,	An Analysis of Agriculture Sector In Indian Economy	81
17	*Dr. Kamlakar K. Askar*	*Joothan*: A Saga of a Dalit Viewed from Fourth World Perspective	87
18	Surajprasad s. Shukla	An ecocritical study of 'place' in john steinbeck's californian novels	91

PRINCIPAL I/c.
Dr. Ambedkar College of
Social Work, Wardha

Scanned with CamScanner

19	Dr.P B Kharche	Impact Of Demonetisation On Rural India	9.
20	Dr. Manjusha M Jagtap	Problems Of Small Scale Women Entrepreneurs In Rural Area	9
21	Dr. Chandrahas A. Dixit	Urban Poor living in India	1(
22	डॉ. अजय कुळकर्णी	'यश–अपयश' या आत्मचरित्राची भाषावैशिष्ट्ये	1
23	Dr. Amit Pande	The Impact of Industrial Waste on Human Resources -In Butibori Industrial Area	1
24	Dr. B. S. Kavhar	Teaching Language – From Traditional Grammar to Functionalism	1
25	प्रा. दिपक मगरदे	सर्वसाधारण कुटूंबावर वाढत्या महागाईचा होणारा परिणाम	1
26	प्रा.डॉ.संध्या गो चर्जन	राष्ट्रसंत तुकडोजी महाराज आणि समाजोन्नती	
27	प्रा. मोहन बाबुराव चव्हाण	मराठा- ऐक्येच्छू सभा : कृष्णराव केळूसकर	
28	प्रा.डॉ. अरविंद म. पुनवटकर	डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे धर्मांतर : एक विश्लेषण	

Scanned with CamScanner

ISSN-2278-9308

सर्वसाधारण कुटूंबावर वाढत्या महागाईचा होणारा परिणाम

प्रा. दिपक मगरदे
डॉ. आंबेडकर कॉलेज ऑफ सोशल वर्क, वर्धा
मो. नं. ९४२१७१७१८४

विषयाची ओळख

महागाईचा अर्थ आहे- जीवनावश्यक वस्तुंच्या किंमतीमध्ये सतत होणारी वाढ. अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण, आरोग्य आणि मनोरंजन या मानवाच्या आवश्यक गरजा आहेत. जर सामान्य मानसाच्या गरजांची पूर्तता अगदी सहजपणे होत असेल तर महागाईचा प्रश्नच उभा राहत नाही. परंतु विविध कारणांमुळे बाजारातील वस्तुंच्या किंमती वाढत जातात. जेव्हा या किंमती सामान्य मानसांच्या हाताबाहेर वाढू लागतात. तेव्हा त्या परिस्थितीला गेल्या काही वर्षापासून महागाईचे नाव दिले जाते. गेल्या काही वर्षापासून महागाईने लोकांचे जगणे मुश्किल केले आहे. दुष्काळ, महापूर, बर्फवृष्टी यासारख्या नैसर्गिक संकटांमुळे शेतीचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होते. त्यामुळे अन्नधान्याची कमतरता होते. बाजारामध्ये तांदूळ, कडधान्ये, फळे, भाजीपाला यांच्या किंमती वाढू लागतात. उत्पादनाची विक्री वाढल्यावर उत्पादीत वस्तुंच्या किंमती वाढू लागतात. कोळसा, पेट्रोल, डिझेल इत्यादी वस्तुंच्या किंमती वाढल्याने महागाई वाढते. युद्ध, हरताळ, दंगे यांच्या कारणानेही बाजारामध्ये वस्तुंचा पुरवठा पाहिजे त्या प्रमाणात होत नाही. आणि वस्तुंच्या किंमती वाढू लागतात. जेव्हा वाढत्या लोकसंख्येला आवश्यक असणाऱ्या वस्तुंचे उत्पादन होत नाही. तेव्हा महागाई वाढू लागते. भ्रष्टाचार, साठवणूक या कारणांनी सुद्धा वस्तुंच्या किंमतीमध्ये वाढ होते. अत्यावश्यक वस्तुंच्या किंमती वाढल्याने सामान्य जनतेसाठी आपला उदरनिर्वाह करणे कठीण होऊन जाते. मध्यम वर्गातील समस्या अधिकच वाढतात. जीव तोडून काम करूनही गरीब जनतेला पोटभर अन्न मिळत नाही. गरीब घरातील मुला-मुलींना आपले शिक्षण अर्ध्यावरच सोडावे लागते. सामान्य घरातील मुलांना योग्य पोषण आहार न मिळाल्याने त्यांचा योग्य विकास होत नाही. लग्नाचे वय झालेल्या मुलींचे लग्न वेळेवर होत नाही. मध्यम वर्गातील लोक कर्जाच्या ओझ्याखाली पार दबून जातात. आज सगळयाच वस्तुंच्या किंमती अगदी गगणाला भिडलेल्या आहेत. एखाद्या वस्तुची किंमत वाढली की ती कमी होण्याचे नावच नाही ! बाजारातील अन्नधान्य, भाजीपाला, फळफळावळ वगैरे जीवनावश्यक वस्तुंच्या किंमतीत दिवसेंदिवस भरमसाठ वाढ होत आहे. त्यामुळे सर्वच स्तरातील लोकांची आर्थिक कुचंबना झाली आहे. वाढत्या महागाईमुळे सर्वच अस्वस्थ झाले आहेत.

अन्न, वस्त्र, निवारा या माणसाच्या मुलभूत गरजा आहेत. पण वाढत्या किंमतींमुळे या मुलभूत गरजांची पूर्तता होणे दिवसेंदिवस कठीण झाले आहे. वर्तमानपत्रात कुपोषणाच्या बातम्या येतात. गरीबीमुळे स्वत:चे व कुटूंबाचे दोन वेळेचे पोट सुद्धा भरू न शकल्याने आत्महत्या करणाऱ्या पती-पत्नीच्या कहान्या वाचतांना मन गलबलून जाते. लोकसंख्या वाढली आहे, त्या प्रमाणात रोजगार, धंदा न वाढल्याने बेकारीचे प्रमाण एकसारखे वाढत आहे. महागाई रोखण्यासाठी सरकारला धारेवर धरले जाते. वेगवेगळे मोर्चे काढत या वाढत्या महागाईवर नियंत्रण ठेवण्याचे प्रयत्नही चालूच आहेत. जीवनोपयोगी वस्तुंच्या गगणाला भिडणाऱ्या किंमती वाजवीपेक्षा जास्त वाढूनही यासाठी प्रयत्न केले जात असले तरी त्याचे अपेक्षीत प्रमाणात परिणाम दुर्दैवाने दिसत नाही.

व्याख्या

1) "गरीब जनतेच्या जीवनावश्यक वस्तु ह्या न मिळणाऱ्या प्रयत्नाला महागाई असे म्हणतात."

PRINCIPAL I/c.
Dr. Ambedkar College of
Social Work, Wardha
Scanned with CamScanner

2) "दैनंदिन जीवनात लागणाऱ्या जीवनावश्यक वस्तुस बाजवीपेक्षा जास्त किंमत लावण्यात येत असल्यास अशा शास्त्रशुद्ध परिभाषेला महागाई असे म्हणतात."

3) "रोजच्या व्यवहारात लागणाऱ्या वस्तु च्या किंमती वाढत असल्याम वाढती महागाई असे म्हणतात."

वाढती महागाई ही गरीब जनतेवर येणारे सगळ्यात मोठे संकट आहे. सर्वसाधारण व श्रीमंत व्यक्ती आजच्या महागाईस दोन वेळ पोट भरण्याम सक्षम आहेत. परंतु देशात सगळ्यात मोठी गरीब जनता आहे. या महागाईवर गरीबांचे जगणे सुद्धा मुश्किल होऊन जाईल. त्यामुळे या देशाला वाचविण्यासाठी शासनाला महागाईवर आळा घालणे गरजेचे आहे.

अध्ययन विषयाचे उद्देश

1) वाढत्या महागाईमुळे कौटूंबिक व सामाजिक स्थितीवर झालेल्या परिणामांचे अध्ययन करणे.
2) सर्वसामान्य जनतेला उपलब्ध असलेल्या रोजगाराच्या संधी व उपजिविकेच्या साधनांचे अध्ययन करणे.
3) वाढत्या महागाईमुळे सर्वसामान्य जनतेच्या आर्थिक स्थितीवर व जीवनमानावर होणाऱ्या परिणामांचे अध्ययन करणे.

अध्ययन विषयाचे गृहितकृत्य

1) वाढत्या महागाईच्या तुलनेत होणाऱ्या उत्पन्नाचे प्रमाण कमी आहे.
2) वाढत्या महागाईमुळे जीवनमानाचा दर्जा निम्न स्वरूपाचा आहे.

अध्ययन क्षेत्र

प्रस्तुत अध्ययनाचे एकक हे सावंगी मेघे येथील असल्याने अध्ययनाचे क्षेत्र सावंगी मेघे ता.+जि. वर्धा हे आहे.

अध्ययन विश्व

अध्ययन विश्वामध्ये अध्ययन क्षेत्रातील दारिद्र्यरेषेखालील जीवन जगणाऱ्या कुटूंबातील सर्व विवाहीत महिलांचा समावेश आहे.

अध्ययन पद्धती

सदर अध्ययन हे गुणात्मक व संख्यात्मक पद्धतीचे आहे. सदर अध्ययनाकरीता वर्णनात्मक संशोधन आराखड्याचा उपयोग केलेला आहे. गैरसंभाव्यता नमुना निवड पद्धतीचा उपयोग करून सोयीस्कर नमुना निवड पद्धतीने 30 उत्तरदात्यांची निवड केलेली आहे. तथ्य संकलनामध्ये मुलाखत अनुसूची व निरीक्षण तंत्राचा उपयोग केलेला आहे. तसेच जुने संशोधन साहित्य, ग्रंथसाहित्य, संकेतस्थळ इत्यादी साहित्यांचा उपयोग केलेला आहे. अध्ययन विश्वामध्ये दारिद्र्य रेषेखाली जीवन जगणाऱ्या सावंगी गावांतील सर्व विवाहित महिलांचा समावेश होता. नमुन्याचा आकार 30 एककांचा आहे.

विषयाची निवड

वाढती महागाई असा एक शब्द आहे की, एका व्यक्तीला नाही तर पूर्ण समाजाला त्याचा दुष्परिणाम भोगावा लागतो. वाढती महागाई ही सर्व समाजावर आलेले आर्थिक संकट समजले जाते. प्रत्येक वस्तुची किंमत ही दिवसेंदिवस वाढत आहे. त्यामुळे कुठेतरी यावर नियंत्रण आनणे महत्वाचे आहे. दैनंदिन वापराच्या वस्तूंच्या किंमती महाग होत चालल्याने त्याचा परिणाम सर्वसाधारण कुटूंबावर होत आहे. गरीब जनतेच्या जीवनावश्यक वस्तु अन्न, वस्त्र, निवारा आहेत. पण वाढत्या महागाईमुळे त्याही पूर्ण करणे अशक्य होत आहे. कुटूंबाची उपजीविका भागवितांना महागाईची झळ ही सर्वात जास्त कुटूंबातील गृहीणींवर बसत असते. कारण दैनंदिन जीवनातील बऱ्याच

Scanned with CamScanner

ISSN-2278-9308

गोष्टी तिलाच पार पाडव्या लागतात. संशोधनकर्ता सुद्धा कुटूंबात राहत असून त्यांच्याही कुटूंबाला वाढत्या महागाईची झळ बसत आहे. त्यामुळेच अशा गरीब कुटूंबातील लोकांच्या सामाजिक आणि आर्थिक स्थितीवर महागाईमुळे कोणते परिणाम होतात, ही जाणून घेण्याची जिज्ञासा व आवड संशोधनकर्त्यामध्ये निर्माण झाली. त्याच आवडीतून या विषयावर अध्ययन करुन पर्यायी उपाययोजनात्मक कार्य करण्याच्या हेतूने सदर अध्ययन कार्य करण्यात आले.

तक्ता क्र. 1


होणाऱ्या उत्पन्नात गरजा पूर्ण होण्याविषयी

गरजांची पूर्तता	वारंवारीता	शेकडा प्रमाण
पूर्णपणे	06	20.00%
अंशत:	09	30.00%
नाही	15	50.00%
एकुण	30	100.00%

यावरुन असे स्पष्ट होते की, होणाऱ्या उत्पन्नात जास्तीत जास्त (50%) लोकांच्या गरजा पूर्ण होत नाही.

गरजा पूर्ण होत नसल्याचे कारण

गरजा पूर्ण होत नसल्याचे कारण सांगणारे 23.33% आहे. कमविणारे व्यक्ती कमी हे गरजा पूर्ण होत नसल्याचे कारण सांगणारे 06.67% आहे. घरखर्चात वाढ हे गरजा पूर्ण होत नसल्याचे कारण सांगणारे 11.67% आहे. उत्पन्नाच्या साधनांचा अभाव हे गरजा पूर्ण होत नसल्याचे कारण सांगणारे 05.00% आहे. वाढती महागाई हे गरजा पूर्ण होत नसल्याचे कारण सांगणारे 53.33% आहे.



Scanned with CamScanner

तक्ता क्र. 2

वाढत्या महागाईमुळे राहणीमानावर झालेला परिणाम

परिणाम	वारंवारीता	शेकडा प्रमाण
राहणीमानाचा दर्जा घसरला	12	40.00%
गरजांची अपूर्तता	05	16.67%
उपजिविकेच्या साधनांची जुळवाजुळव	03	10.00%
आवश्यक वस्तूंचा अभाव	10	33.33%
एकुण	30	100.00%

ठळक निष्कर्ष

1) दारिद्र्यात जीवन जगणाऱ्या कुटूंबांची संख्या जास्त असून गरजांची पूर्तता होत नाही.
2) वाढत्या महागाईमुळे कुटूंबाचा राहणीमानाचा दर्जा खालावलेला आहे.
3) रोजगाराचा अभाव व वाढती महागाई यामुळेगरीब कुटूंबांच्या उपजिविकेची समस्या निर्माण होते.
4) वाढत्या महागाईमुळे आर्थिक समस्या निर्माण झाल्यामुळे कुटूंबात चिंतेचे प्रमाण वाढले.


उपाययोजनात्मक सूचना

1) दारिद्र्य रेषेखाली जीवन जगणाऱ्या लोकांकरीता स्वस्त धान्य दुकानातून किमान गरजा पूर्ण होतील अशा जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा करण्यात यावा.
2) शासनाच्या स्तरावर दारिद्र्य रेषेखाली लोकांसाठी रोजगार निर्मिती करुन अशा लोकांना प्राधान्य देण्यात यावे.
3) दारिद्र्य रेषेखालील जीवन जगणाऱ्या लोकांसाठी विविध लघुउद्योग, हस्तउद्योग करण्यासाठी सुलभरित्या प्राप्त होईल अशी भांडवल उपलब्ध करुन द्यावे.
4) वाढत्या महागाईचा आढावा घेवून शासनाच्या वतीने जीवनावश्यक वस्तूंच्या किंमतीवर नियंत्रण ठेवून त्यांचे दर कमी करण्यात यावे.
5) वाढत्या महागाईवर आळा बसण्यासाठी स्वदेशी वस्तू निर्मितीला चालना देण्यात यावी.

संदर्भ ग्रंथ सूची

1) आगलावे प्रदिप (2002) "सामाजिक संशोधन पद्धती" श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर
2) वालक्रिष्ण, पी., "भारतातील किंमत आणि महागाई" ऑक्सफोर्ड युनिवर्सीटी, दिल्ली.
3) घाटोळे रा. ना. (2000) "ग्रामीण समाजशास्त्र व सामुदायिक विकास" मंगेश प्रकाशन, नागपूर.
4) खडसे, भा. की., (1998), "आजच्या सामाजिक समस्या", मंगेश प्रकाशन, नागपूर.
5) रिसमॅन जॉर्ज, (1996), "भांडवलशाही अर्थशास्त्र", ओटावा जेमसन बुक्स.
6) सुरेश मेश्राम, "प्रात्याक्षिक सामाजिक संशोधन" यश प्रकाशन 92 वनराई नगर, मानेवाडा (पूर्व), नागपूर-34
7) डॉ. सुधीर बोधनकर, "सामाजिक संशोधन पद्धती" श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर

Scanned with CamScanner



Scanned with CamScanner

MAH MUL/03051/2012 UGC Approved Jr.No.62759 | Vidyawarta® | Jan. to March 2018 | Issue-21, Vol-01
ISSN: 2319 9318

28) भारतातील शेतकरीआत्महत्या एक गंभीर समस्या
Dr. Vasant Namario Patange ..... || 12

29) स्पर्धा परीक्षामध्ये व्याकरणाचे महत्व
प्रा. डॉ. कालिदास गुडदे , पालम जि. परभणी ..... || 12

30) जैन दर्शनाचा विश्वव्यापक तात्विक दृष्टीकोन
प्रा.डॉ.सखाराम यशवंतराव गोरे, जि.नांदेड ..... || 12

31) कनिष्ठ महाविद्यालयातील इयत्ता ११ वी च्या विद्यार्थ्यांचा स्वसंकल्पना ताण व वैफल्य यांच्यातील .....
डॉ. शोभा महारु चौधरी, धुळे. ..... || 13

32) स्वच्छ भारत मोहिमेचा वाटचाल
डॉ. एन. यु. देशमुख , वाशिम ..... || 13

33) महाविद्यालयातील प्राध्यापकांमधील नॅक विषयी असलेल्या अभिवृत्तीचा तुलनात्मक अभ्यास.
डॉ. सुनील परशुराम पाटील, धुळे ..... || 142

34) ललित कला और संस्कृति पर विज्ञान और प्रौद्योगिकी का प्रभाव
डॉ. अश्विनीकुमार सिंह, बड़ौदा, गुजरात ..... || 144

35) स्कूली बच्चों (बालक वर्ग)में मोबाइल फोन का प्रयोग : एक .....
डॉ. सुधीर कुमार श्रीवास्तव, रूद्रपुर, देवरिया उ.प्र. ..... || 143

36) बुद्धकालीन गणिकाओं का संक्षिप्त अध्ययन
शिखा पाठक, लखनऊ ..... || 157

37) दलित चेतना और डॉ. आंबेडकर
डॉ. बळीराम संभाजी भुक्तरे, उदगीर, जिला. लातुर ..... || 159

38) शिक्षक प्रशिक्षणार्थियों की अधिगम उपलब्धि पर व्याख्यान विधि के प्रभाव .....
रूबी चौहान, प्रो. बी.सी. दूबे, मेरठ ..... || 162

39) बाल श्रम और मानवाधिकार
प्रा. दिपक एस, मगरदे, वर्धा ..... || 165

40) पाडर दा संस्कृतिक अध्ययन
सोनिका जसरोटिया, जम्मू ..... || 168

www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com
2019.07.05 10:15
Scanned by CamScanner
Scanned with CamScanner

बाल श्रम और मानवाधिकार

प्रा, दिपक एस. पगारे
डॉ, आंबेडकर कॉलेज ऑफ सोशल वर्क, नागपुर

मानवाधिकार मनुष्य की गरिमा व उसके विकास और उत्कर्ष के लिये प्राप्त एक अधिकार है जो हर मनुष्य के लिए जरूरी है जिससे वह अपना शारीरिक मानसिक आर्थिक सामाजिक विकास कर सके। इसलिए मानवाधिकार जियो और जीने दो की सकल्पना से ओतप्रोत है ! इस संकल्पना की जरूरत तब पडी जब हर मनुष्य की गरिमा में खासा अन्तर दिखने लगा ! मानवाधिकार को अनिवार्य में इसलिए माना गया कि कोई भी किसी की स्वतंत्रता को छिने नही बल्कि सभी एक दुसरे की स्वतंत्रता को बनाये रखे ! पहले विश्व युध्द और दुसरे विश्व युध्द की उठापटक के पश्चात सन १९४५ में संयुक्त राष्ट्र संघ का गठन हुआ ! १० दिसम्बर १९४८ को संयुक्त राष्ट्र संघ की महासभा में मानवाधिकार की सार्वभौम घोषणा प्रस्तुत की गयी सभी देशों से अपील की गयी कि वे मानवाधिकार कानुन को सही तरीके से लागु करने की दिशा में अग्रेसर होंगे ! लेकिन ऐसा हो नहीं पाया कानुन तो बना दिया लेकिन उसे अमल में नहीं लाया गया ! आज समाज में हर जगह समस्याएं व्याप्त है ! मनुष्य होने की गरिमा केवल कुछ तबके तक ही सीमित है !

बालश्रम आज मानवाधिकार को चुनौती दे रहा है ! सरेआम बच्चों की मंडी लगाई जाती है जहां इनकी खुशियां गिरवी रखी जाती है ! आज के बच्चे देश का भविष्य है यह केवल कागजो तक ही सीमित है ! हकीकत से इसका कोई वास्ता नही है !

बालश्रम से अभिप्राय

बाल श्रम दो शब्दों से मिलकर बना है पहला बाल और दुसरा श्रमिक ! बाल से अभिप्राय उम

Scanned with CamScanner

बालक से है जो अभी अपने माता–पिता पर आश्रित है और जिसके पालन पोषण का दायित्व उसके माता–पिता का है और जिसकी आयु १८ वर्ष या उससे कम है ! श्रमिक उसे कहा जाता है जो आर्थिक उद्देश्य हेतु शारीरीक या मानसिक श्रम करके धन अर्जित करता है ! श्रमिकों के अन्तर्गत ये स्त्री और पुरूष आते है जो व्यस्क होते है ! लेकिन सच्चाई इससे इतर है ! यह हमारे समाज की विडम्बना है कि बच्चों को पढने–लिखने की आयु में कठोर परिश्रम करना पडता है ! जिससे वे शिक्षा से वंचित रह जाते है और अस्वस्थ जीवन जीने तथा शारीरीक विकृती के साथ जीने के लिये विवश होते है !

बाल श्रमिकों का उदय

बालश्रम प्राचीन काल में उत्पन्न सामाजिक विषमताओं का परिणाम है जो दिन प्रतिदिन और भी विकराल होता जा रहा है ! औद्योगीकरण और शहरीकरण ने बाल श्रमिकों के घाव को भरने की जगह और अधिक गहरे कर दिये है! औद्योगिकरण ने बन्धुआश्रम को पुनः प्रारम्भ कर दिया है! वर्तमान समय में आर्थिक तंगी की वजह से माता–पिता भी अपने बच्चो को बन्धुआ बना रहे है!

आज के बच्चे ही देश के भविष्य निर्माता है! उनके कंधो पर देश का भविष्य है पं जवाहर लाल नेहरू बच्चे हमारे भविष्य है, बच्चे कल के तकदीर है, बच्चे हमारी नींव है इस तरह के कई जुमले हमें सुनने को मिलते है! लेकिन इन जुमलो का हकीकत से कोई लेना–देना नही है! यह अत्यंत भयानक तथ्य है कि दुनिया में २४६ मिलीयन बच्चों को सामान्य जीवन नसीब नहीं होता! अंतर्राष्ट्रीय श्रम संगठन के अनुसार ये बच्चे कठिन खतरनाक व शोषणकारी स्थितियों में कारखानों उद्योगों व कृषि क्षेत्र मे कार्य करने के लिए अभिशप्त है ! यूनीसेफ के अनुसार भारत मे ५ से १४ वर्ष आयु वर्ग के १० करोड बच्चे स्कुल नहीं जाते तथा देश मे लगभग १० करोड बाल श्रमिक है! एक अनुमान के अनुसार लगभग ३१४७०० बच्चे मुंबई, कलकत्ता, चेन्नई, कानपुर, बंगलौर तथा हैदाराबाद की सडकों पर जीवनयापन कर रहे है!

राष्ट्रीय [illegible]

के अनुसार प्रतिवर्ष लगभग ४५००० बच्चे गायब होते है! इनमें से कुछ तो वापस मिल जाते है और कुछ का पता ही नही चल पाता कि वे कहां है सोचने वाली बात तो है कि आखिर बच्चे इतने असुरक्षीत क्यों है बात ये है कि आखिर बच्चे इतने असुरक्षीत क्यों है क्यों बच्चों को यौन प्रताडना व शारीरीक या मानसिक प्रताडना का शिकार बनाना इतना आसान होता है यौन शोषण से जुडे आकडे और भी चौंकाने वाले है! भारत में ५ लाख बच्चे वेश्यावृत्ती में संलग्न है! बच्चों के उपर हो रहे इन अत्याचारों के कारणों पर चिंतन करना बहुत आवश्यक है! आज की भागती–दौडती जिंदगी में संयुक्त परिवारों का विघटन माता–पिता की अति व्यस्तता बच्चों का अधिक समय तक अकेले रहना बच्चों की शोषण के प्रति अनभिज्ञता आदि ने भी बच्चों पर हो रहे अपराधों में वृध्दी की है! इसके अलावा कम उम्र में ही पढाई का अधिक बोझ अभिभावकों व शिक्षकों की महत्वकांक्षाएं आदि मिल कर बच्चे का बचपन छीन रहे है! कई बार इन तरह की प्रताडना झेलने वाले बच्चे मादक द्रव्यों का सेवन करने लगते है! अवसाद व मानसिक विकारों के शिकार इन बच्चों को लोग आसानी से गलत मार्ग पर ले जाते है और ये शोषण का शिकार हो जाते है!

आज सबसे महत्वपुर्ण काम बच्चो की हिफाजत करना है! संयुक्त राष्ट्र संघ ने बच्चो के कई मौलिक अधिकारों का निर्धारण किया है! साथ ही समय–समय पर अनेक अधिवेशनों में इनके राजनीतीक सामाजीक आर्थिक सांस्कृतीक अधिकारों पर पुनर्विचार किया है!

भारत मे भी संविधान ने सरकार को बच्चो के लिए अलग से कानून बनाने का अधिकार दिया है! अनुच्छेद २१ में ६ से १४ वर्ष के बच्चो को निःशुल्क व अनिवार्य शिक्षा का अधिकार है! अनुच्छेद २३ बच्चों के क्रय–विक्रय व उनके द्वारा अनैतिक कार्य करने पर रोक लगाना है! अनुच्छेद २४ के अंतर्गत १४ वर्ष से कम आयु के किसी बच्चे को कारखानों आदि में नियोजन का प्रतिरोध करता है! अनुच्छेद ३९ के अंतर्गत बच्चों को स्वतंत्र व गरिमामय वातावरण में स्वस्थ विकास का अवसर तथा [illegible]

Scanned with CamScanner

के बाद से ही बाल अधिकारों के संरक्षण हेतु प्रयास किए जाते रहे हैं जिनमें वर्तमान समय में बाल श्रम अधिनियम व राष्ट्रीय बाल अधिकार संरक्षण आयोग का गठन प्रमुख है!

बाल श्रमिकों की समस्या

भारत कृषी प्रधान देश है यहाँ की समस्याओं को यहाँ के ही परिदृष्य के द्वारा ही समाप्त या कम किया जा सकता है! अन्य देश की नकल के द्वारा नहीं! हर देश की अपनी संस्कृती है जो उसको बनाये रखने मे सहयोग करती है! भारत गाँव मे बसता है उसकी आधे से अधिक जनसंख्या गाँव में निवास करती है इसलिए उन समस्त सुविधाओं को गाँव मे पहुँचाना होगा जो शहर में है! वैश्वीकरण औद्योगीकरण और शहरीकरण के चकाचौंध भरे वातावरण ने कृषी करने वाले और गरीब लोगो के लिये और अधिक परेशानियाँ खडी कर दी है! शहर के वातावरण में वे न्युनतम वश्तो पर काम करने के लिये मजबुर होते है जिससें वे और अधिक गरीब होते जाते है! वे स्वयं तो शिक्षीत नही है और आर्थिक तंगी में बच्चो को भी शिक्षीत नहीं कर पाते बल्की वे बाल श्रमिकों की संख्या वृध्दी में सहयोग करते है! कम आमदनी के कारण न वे स्वच्छ वातावरण में निवास करते है न शिक्षीत हो पाते है और नही स्वस्थ नागरीक बन पाते है! आंकडे बताते हैं कि १९६१ की जनगणना में बाल श्रमिकों की संख्या १४५ करोड थी और ये आकडे निरन्तर बढते ही चले गये! विश्व स्वास्थ संगठन की २०१० की रिपोर्ट में ये आकडे ६ करोड हो गये है! विश्व स्वास्थ संगठन का मानना है कि विश्व का हर चौथा बच्चा बाल श्रमिक है! बाल श्रम के कारण बच्चों का बचपन छिन गया है उनके स्वास्थ पर प्रतिकूल असर पडा है! जिससे उनका शारीरीक मानसिक विकास नहीं हो पाता और वे उचित पोषण शिक्षा मनोरंजन खेलकुद प्यार और दुलार से वंचीत रह जाते है!

बल श्रमिकों की समस्याओं के सुधार के उपाय

यू तो इस समस्या के उपाय उंट के मुहँ मे जीरा के समान है जो कि संयुक्त राष्ट्र संघ या अन्य संस्थाओं भारत के संविधान या पंचवार्षीय योजनाओं के द्वारा किये गये है! मानवाधिकार सभी को समान मानकर सभी के अधिकारों की रक्षा की बात करता है इसलीए उनके समान स्वतंत्रता विकास स्वतंत्र और शोषण के विरूध्द आवाज की बात करते है अतः आपनी प्रत्येक पंचवार्षीय योजना के द्वारा इस समस्या को दूर करने की कोशीश कर रहा है इसीके तहत ७ भी २० सूत्रीय कार्यक्रम के द्वारा इसका हल करने की कोशीश की थी! इस समस्या के निदान के लिए मानवाधिकार की सम्पूर्ण रूप से क्रियान्वित किया जाये तो शायद ये सम्भव हो कि इससे कुछ निदान पाया जा सके!

बल श्रमिकों से सम्बन्धित कानून और संवैधानिक जिनसे बाल श्रमिकों के जीवन में सुधार आ सके वे है! सन १८८८,१८९१,१९११ का फैक्ट्री अधिनियम सन १९०१ और १९२३ का खदान अधिनियम सन १९२६ का बाल श्रम उन्मूलन तथा निरसन अधिनियम इसके साथ-साथ मौलिक अधिकार और नीती निर्देशक तत्व भी है!

१४ वर्ष से कम आयु के बच्चों को बालश्रम की श्रेणी में रखा गया है! इसीलिए बालश्रम को अपराध की श्रेणी में रखा गया है! भारतीय संविधान के अनुच्छेद २४,२१ क) ३९ च) ४५,३९,ए आदि मे स्पष्ट उल्लेख है कि १४ वर्ष से कम उम्र के बच्चों को किसी भी कारखाने कुटीर उद्योग आदि मे काम करने पर प्रतिबंध है जिससें कि बच्चों के स्वास्थ शिक्षा एवं विकास पर कुप्रभाव पडे एवं हर हाल में बच्चो के स्वास्थ शिक्षा विकास एवं कल्याण पर सरकारें को ध्यान केन्द्रित रखना चाहीए! लेकिन धरातल पर ऐसा कुछ भी नही है!

यूनीसेंफ से लेकर भारत सरकार व प्रदेश सरकारों से लेकर कई गैर सरकारी संगठनों ने बाल अधिकारों की सुरक्षा हेतु कई उपाय कर रखे है! भारतीय न्यायालयों ने भी अनेक निर्देश दिए है परंतु इन सभी उपायों को पर्याप्त नहीं कहा जा सकता! बाल अधिकारों के संरक्षण व उनके प्रति होनेवाले शोषण को रोकने के लिए सबसे पहले तो बच्चों को जागरूक बनाना होगा! उसके लिए सामाजिक व शैक्षणिक स्तर पर उन्हे प्रशिक्षण देना होगा! बच्चो को यौन दुर्व्यवहार के प्रति सचेत करने के लिए माता-पिता व स्कूलों द्वारा यौन शिक्षा जरूरी है! बाल अपराधो पर नजर रखने के लिए अलग थानों की व्यवस्था होनी

Scanned with CamScanner

...ए: उसके अलावा हम सभी को अभिभावक पडोसी रिश्तेदार व सबसे उपर एक इंसान के रूप में बच्चों की सुरक्षा के प्रति सदैव जागरूक रहना होगा तभी हम देश के भविष्य का वर्तमान बना पाएँगे!

संदर्भ सूची

१. भारत का संविधान एक परिचय संविधान ,डी डी बसु

२. मनवाधिकार और मानव, डॉ करूणाशंकर मिश्र

३. भारत में मानवाधिकार सत्यनारायन साबत राधाकृष्ण प्रकाशन नई दिल्ली

4. International Human Rights Society and the Schools

5. Council of Europe The Teaching of Human Rights

□□□







PRINCIPAL I/c.
Dr. Ambedkar College of Social Work

40


पाडर दा संस्कृतिक

सोनिका जसरोटि
शोधछात्रा,
डोगरी विभाग, जम्मू विश्ववि

पाडर जम्मू—कश्मीर राज्य ऐ। जेह्दे दक्खन च हिमाचल प्र उत्तर च लेह—लद्दाख आदि। पाड असेंगी जम्मू सूबे दे पत्तनीटाप, डोडा आदि लाके थमां होइयै जाना पौंदा जिला कृितवाड़ दा लाका ऐ।

पाडर दा लाका भौगोलिक थमां हिमाचल दी सरहद तक उच्च घिरे दा ऐ। एह् पूरा लाका चंद्रभागा ऐ। एह् सारा लाका दुर्गम प्हाडिब़यें कन्नै घिरे दा ऐ। एह् पूरा लाका पत ढके दा रौंह्दा ऐ। इस लाके च देअ पाए जंदे न। इ'नें प्हाड़े दी ऊंचाई कोला १८००० फुट तक ऐ। इस र कोला पद्धरा ते खुल्ला लाका अठोत ते इस ग्रांड दे सारे घर लागै—लागै न सारे लाके दा मुख्य पेशा खेती ऐ ते

2021.07.05 10:12
Scanned with CamScanner



Scanned with CamScanner

MAH MUL/03051/2012 UGC Approved Jr.No.62759 | Vidyawarta® | Oct. To Dec. 2017 | Issue-20, Vol-15 | 06
ISSN: 2319 9318

Index

1) Malevolence Against Women : And Social Legislation
Dr. Santosh Kumar Chand, Santkabirnagar (U.P) || 10

2) Breaking the Barriers: Revisiting Tehmina Durrani's My...
Naseem Chowdhary, Jammu || 13

4)Gita: Scientific Vision Towards life
Dr. Hemant Sudhakar Dalal,Dhule. || 18

4) A STUDY OF INTERNET ADDICTION AND WELL-BEING ...
Dr. Smita Jaiswal,Manjari Kureel,Jhansi || 19

5) IMPACT OF HOME ENVIRONMENT ON TEACHER FREEZING ...
Dr. Mrs.Kiran Bala Patel & kiran Bataw,Bilaspur,CG || 25

6) Effect of father'S LITERACY on physical fitness of their son
Dr. Bhimjibhai N. Patel , Dist- Sabarkantha. || 28

7) Khandavi Culture in Arun Kolatkar's "Sarpa Satra"
Dr. Vishwanath Motiram Patil, Dist: - Dhule (M.S.) || 32

8) Problems and affecting factors in Learning ...
Dr. Prakash B. Bhange,Dist . Parbhani || 35

9) MAHATMA GANDHI - A LITERARY AND SPIRITUAL MENTOR
S.M.Shafi Bhat & ZAHIED RAHMAN GANIE || 39

10) Application of Graph Theory in Transport Networks
Sanjay Kumar Bisen & Dr. Brajendra Tiwari ,Bhopal (M.P.) || 43

11) Love Psyche in Rabindranath Tagore's 'Chitra'
Dr. Hemant Sudhakar Dalal, Dhule. || 46

12) AN ANALYTICAL STUDY ON LISTING DAY PERFORMANCE ...
NARENDRASINH B. RAJ,ANAND || 48

13) Class character of farmers movement in Maharashtra
Mr. Pravin Chavan & Dr.S.P.Takle, Dist.Jalna || 51

www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com/

Scanned with CamScanner

14) Study of Job Satisfaction and Life satisfaction of Higher S...
Ragini Singh,Katni || 57

15) Wordsworth's Genius:It's Evaluation
Archana P. Tiwari ,Daryapur || 61

16) IN TELANGANA STATE THE ROLE OF NGO'S ...
BHATTU SRIHARI,OSMANIA UNIVERSITY || 63

17) The theory of behaviourism and its application in tea...
Dr Dilip Kumar Jha,Dist-Lakhimpur, Assam || 70

18) महिला व पुरूष पोलीसांमधील कार्य समाधान : एक समाजशास्त्रीय ...
दिपक राघोजी दामोदर , वाशिम || 75

19) १९४२ च्या चळवळीतील सातारच्या प्रतिसरकारचे कार्य
प्रा.डॉ. बोडखे संजीव सुखलाल,जि.सातारा, || 80

20) मानवाच्या प्रथमावस्थेत नद्यांचे योगदान विशेष संदर्भ महाराष्ट्र
प्रविण चव्हाण, जि.औरंगाबाद. || 84

21) मानसिक स्वास्थ्याचे 'योग' दान
डॉ प्रा. मिनाक्षी न. कुबडे,वर्धा. || 86

22) पारोळा तालुक्यातील प्राथमिक शिक्षकांच्या शैक्षणिक गुणवत्तेचा अभ्यास
डॉ. वंदना एस. पाटील,डॉ. ईश्वर एस. पाटील, जि. जळगांव || 89

23) जागतिकीकरणातील शेतकऱ्याच्या समस्या आणि भारतीय शेती
प्रा. डॉ. ए. टी. शिंदे, नांदेड || 93

24) अहिराणी लोकगीतांचे भाषाविशेष
प्रा.डॉ.सौ. शोभा मधुकर देवरे,शिरपूर जि. धुळे || 98

25) ग्वालियर जिले में बालिकाओं के उत्थान में शिक्षा के अधिकार ...
डिम्पल मौर्य,ग्वालियर (म.प्र.) || 101

26) राही मासूम रजा और फिल्मी दुनियां
मो. असरफ अली खान,तेलंगाना || 106

www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com

Scanned with CamScanner

21

मानसिक स्वास्थ्याचे 'योग' दान

डॉ प्रा. मिनाक्षी न. कुबडे,
डॉ. आंबेडकर कॉलेज सोशल वर्क, वर्धा.

कुठलयाही देशाची ताकद, मजबूती ही त्या देशातील लोकांच्या संपूर्ण स्वास्थ्यावर निर्भर करते. लोकांच्या आरोग्याचे भविष्य हे एका मोठया प्रमाणात या तत्त्वावर निर्भर करते. आरोग्यास प्रोत्साहन करण्याकरिता सुधारण्याकरीता, सांभाळण्याकरिता खूप योजना केल्या जातात. आरोग्य हा मानवाचा मुलभूत अधिकार आहे. त्याकडे लक्ष देणे हे तेवढेच महत्वाचे आहे. मानसिक स्वास्थ हे ग्रामीण, शहरी, नौकरीधंदा, घरकाम, करण्याऱ्या स्त्री, पुरूष, तरूण, लहानमुले यासर्वाकरिता आवश्यक आहे. शब्दकोषा मध्ये स्वास्थ्य याचा अर्थ रोग, आजारापासून मुक्ती, स्वस्थ शरीरा मध्ये स्वस्थ मनाच्या अवस्था किंवा याप्रमाणे सुद्धा व्याख्या करता येते. ''शरीर आणि मन आपापले कार्य निर्विघ्नपणे पूर्ण करतात.'' पूर्वी स्वास्थ्य म्हणजे शारीरिक सुरक्षा व निरोगी असण्याच्या अवस्थेला मानत असत. पण या विषयावर अधिक गहन संशोधनाव्दारे असे लक्षात आले की स्वास्थ्य ही अवस्था फार व्यापक आहे. संपूर्ण स्वास्थ्य याचा अर्थ मनुष्याने आपले जीवन उत्तम प्रकारे जगण्याकरिता बनविलेले आहे.[1]

स्वास्थ्य ही मानसिक व शारीरिक योग्यता आहे जी की विविध प्रकारचे होणारे परीवर्तन तसेच कुठल्याही परीस्थितीत समायोजन करण्याचे सामर्थ्य ठेवते आणि ज्याचा उपयोग मनाला व शरीराला ताकद देऊन अधिक सशक्त बनविते. यामुळे मानसिक व शारीरिक थकव्याचा सामना करण्यास व क्षमता विकसित करण्याकरिता केला जातो. स्वास्थ्य यासेच वेळा सजीव इंद्रिया संबंधी नसा, पेशी संबंधी तसेच भावनात्मकतेच्या विकासाचा खरा परिणाम होय.[2]

'स्वास्थ्य' म्हणजे केवळ व्याधी वा प्रतीच्या तक्रारीचा अभाव असणे म्हणजे आरोग्य नव्हे तर व्यक्तिची संपूर्णरित्या शारीरिक, मानसिक, बौद्धिक, सामाजिक तसेच आध्यात्मिक सुस्थिती असणे म्हणजे स्वास्थ्य होय.

स्वास्थ्य ही मनुष्याची सर्वात मोठी संपत्ती होय. ज्याचे आरोग्य चांगले आहे त्याच्या कडून ही अपेक्षा केली जाते को त्याने आपल्या आरोग्याची नीट काळजी घेणे हे महत्त्वाचे आहे. या उद्देश पूर्ती करिता त्याला हे ज्ञात करणे गरजेचे आहे की निरोगी स्वास्थ्या करिता त्याने कसे जगावयास हवे. स्वास्थ्य याचा अर्थ म्हणजे केवळ रोगमुक्त राहणे एवढया पुरता सिमीत नसून तो आरोग्यपूर्ण जगण्याचा एक सार्थक गुण होय. तंदुरूस्त राहील्याने आपण आपले कार्य कुठलाही आळस न करता तत्परतेने करतो आणि त्या कामातून आपल्याला आनंद प्राप्त होतो. आज आरोग्याचे निरीक्षण केल्यास सर्वात जास्त मनाचे आरोग्य असंतुलित झालेले दिसून येते. प्रत्येकजण ताण – तणाव, दबावा, निराशा, दुःख, न मिळवता मनाला समजून आपले विचार व आचारा बदलण्यासाठी मनाच्या अंतरंगावर लक्ष देणे आज अतिशय आवश्यक आहे.

स्त्रीयांच्या असुरक्षिततेचा विचार करता देशात फक्त स्त्रियाच असुरक्षित आहे अस नाही. देशभरात सुरक्षेअभावी कित्येक पुरुषांनाही आपले प्राण गमवावे लागत आहे याकडे दुर्लक्ष करुन चालणार नाही. एका घटनेत रस्त्याने चालणाऱ्या एकादया स्त्रीच्या गळयातील दागीणा बाईकवरील एका चोराने हुसकावला आणि दुसऱ्या घटनेत एका पुरुषाने एका स्त्रीवर बलात्कार केला या दोन्ही घटनात स्त्रीवर अन्याय करणारा पुरुषच असला तरी बलात्काराच्या घटनेत बलात्कार करणारा पुरुष आहे आणि चोरीच्या घटनेत चोरी करणारी एक प्रवृती आहे. या दोन्ही घटना एकाच तराजुत नाही तोलता येणार हे येथे लक्षात घ्यायला हवे. स्त्रियांवर होणाऱ्या कोंट्रूबिक अत्याचाराला जेवढे पुरुष जबाबदार आहे तेवढेच स्त्रीयाही जबाबदार आहे कारण कायदयाच्या भाषेत सांगायचे झाले तर अन्याय करणारा इतकाच अन्याय सहन करणारा गुन्हेगार असतो.

बलात्कार हा एकमेव गुन्हा आहे जो फक्त पुरुषांकडुन स्त्रीयांच्या बाबतीत केला जातो. या गुन्हासाठी आपल्या देशात दिली जाणारी शिक्षा ही त्यामानाने कठोरातील कठोरच आहे. असे असतांना ही आपल्या देशात बलात्काराचे प्रमाण दिवसेंदिवस वाढतच आहे याचाच अर्थ असा होतो की बलात्कारासारखा गुन्हा करणाऱ्याला आता कायदयाच्या आणि शिक्षेचे भय उरलेले नाही हे तर अधिकच भयंकर आहे.

स्त्रियांचा पोषाख , वाढता चंगळवाद , वाढती आधुनिकता बलात्कारासारख्या घटना घडण्याला कारणीभुत आहे असे वरवर जरी वाटत असले तरी त्यात तथ्य नाही. पुरुषांची बदलती मानसिकता यासर्व घटनांच्या मुळाशी आहे पुरुष हा स्त्रीपेक्षा श्रेष्ठच आहे ही मानसिकता आपल्या देशातील पुरुष आजही सोडायला तयार नाही आणि हजारो वर्षापुर्वी पासुनची पुरुषांची गुलामगीरी पुर्णपणे नाकारायला आपल्या देशातील स्त्रीयाही तयार नाही. जी प्रसारमाध्यमे स्त्रियांवर अन्याय - अत्याचार झाला की रान पेटवितात. ती प्रसारमाध्यमे नकळत स्त्रियांच्या पुरुषांप्रती गुलामगीरीला काही अंशी खतपाणी घालतात हे सत्य नाकारता येणार नाही.देशभरात स्त्रियांवरील वाढत्या अत्याचारासाठी सरसकट सर्व पुरुषांना आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करणे योग्य होणार नाही कारण स्त्रियांच्या सुरक्षिततेसाठी , त्यांच्यावर होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी त्यांच्यावर अत्याचार करणाऱ्या अत्याचाऱ्यांचा नाश करण्यासाठी लाखो पुरुषांनी आपले प्राण संकटात टाकले आहे हे विसरुन चालणार नाही. स्त्रीयांवर अत्याचार करणारा एक पुरुष असतांनाही आपले संरक्षण करण्याची जबाबदारी दुसऱ्या पुरुषानेच घ्यायला हवी अशी अपेक्षा स्त्रीयांनी करणे तेही स्त्री - पुरुष समानतेच्या काळात योग्य नाही. आता आपल्या देशातील प्रत्येक स्त्रीने स्वतःच्या रक्षणाची

Scanned with CamScanner

जबाबदारी स्वतःच घ्यायला हवी , देशातील प्रत्येक स्त्रीने स्व संरक्षणासाठी सज्ज असायला हव. आपल्या देशात हजारो वर्षांत स्त्रीची जी प्रतीमा तयार झालेली आहे ती आता बदलायला हवी. पुरुषांसारखाच आपल्या डोळयातील अश्रुंवर ताबा मिळवायला हवा. आपल्या देशातील स्त्रीयांवरील अत्याचार रोखण्यासाठी आपल्या देशातील पुरुषांची मानसिकता बदलायला हवी. नग्नता , अश्लीलता ही प्रत्यक्षात नसते, ते पाहणाऱ्याच्या नजरेत असते. त्यामुळे पुरुषांनी प्रथम स्त्रीयांकडे पहाण्याच्या आपल्या दृष्टीत आणि दृष्टीकोनात बदल करायला हवा. आज स्त्रीया प्रत्येक बाबतीत , प्रत्येक क्षेत्रात पुरुषांच्या खांदयाला खांदा लावुन चालत असतांना जी कामे खास स्त्रीयांची म्हणुन समजली जातात ती सर्वच्या सर्व कामे करण्याची मानसिक तयारी आज आपल्या देशातील किती पुरुषांची असते. आजही आपल्या देशातील सुशिक्षित महिलांना नवरा आपल्या पेक्षा जास्त शिकलेला आणि जास्त कमवणारा हवा असतो ही मानसिकता काही अंशी स्त्रियांनीही बदलवायला हवी. पुरुषांनाही धुनीभांडी करतांना आता लाज वाटुन चालणार नाही त्यासाठीची मानसिक तयारी आज पुरुषांनी करायलाच हवी. पुरुषार्थ वगैरे गोष्टी काळाच्या ओघात कधीच मागे पडले आहे. आता आपल्या देशातील पुरुषांना संस्कृती आणि संस्कार याच गाठोडं फारकाळ वाहता येणार नाही आणि वाहायचच असल तर त्या गाठोडयात आणखीन भर घालावी लागेल. स्त्रीया एकवेळ पुरुषांची बरोबरी करु ही शकतील पुरुष कधीच करु शकणार नाही कारण पुरुषांना जन्माला घालणाऱ्या स्त्रिला मात्र तो कधीच जन्माला घालु शकणार नाही . देशभरात स्त्रियांवर होणाऱ्या अत्याचाराला आळा घालायचा असेल तर भारतीय पुरुषांच्या मानसिकतेचा नव्याने अभ्यास करुन त्यांची पुरुषी मानसिकता बदलण्यासाठी प्रयत्न व्हायला हवे आहे.

महिलांवरील अत्याचाराचा प्रश्न केवळ भारतापुरता मर्यादीत नाही. खरे म्हणजे हा महिलांच्या हक्कांचा प्रश्न नसुन मानवी हक्कांचा प्रश्न आहे. जर महिलांना सुरक्षित वाटत नसेल तर संपुर्ण समाजाचीच उलथा पालथ होते आणि त्यामुळे पुरुष आणि स्त्रिया दोघांनी उठुन अन्यायाविरुध्द झगडुन योग्य मार्ग शोधला पाहिजे. मानवी मुल्यांचे जतन करुन महिलांवरील अत्याचार रोखण्यासाठी आपण जागतीक स्तरावर एकत्र येवुन आवाज उठवला पाहिजे.

भारतीय परंपरेत महिला आणि पुरूष दोघांनाही जीवनाच्या सर्व स्तरांवर सारखाच मान दिला जातो याचेचे प्रतिक म्हणजे अर्धनारी नटेश्वराचे रुप , ज्यात देव अर्ध नराच्या रुपात आणि अर्ध नारीच्या रुपात दाखवलेला आहे. त्यातुन हे सांगायचे असते की सृष्टीची निर्मिती तिचे पालन यात त्या दोघांचा समान सहभाग असतो आपल्या शरीरातील पेशी ही आई आणि वडील दोघांच्या गुण सुत्रांपासुन बनलेल्या असतात. प्रत्येकामध्ये दोन्ही शक्ती सम प्रमाणात असतात. यीन आणि यांग मध्ये हीच संकल्पना मांडलेली आहे. चांगल्या आणि प्रगतीशील समाजासाठी प्रत्येकामधील हे संतुलन असणे गरजेचे आहे आपण महिलांचा आदर करायला हवा आणि त्यांच्या पदाचा मान राखायला हवा.

आपल्याला हे लक्षात घ्यायला हवे की चिंता आणि आक्रमकतेने उपाय सापडणार नाही . आपल्याला शांत डोक्याने आणि सुस्पष्ट विचाराने काम करुन हे ठरवायला हवे की आपल्याला कशाच्या विरोधात लढायचे आहे आणि कसे ? जेव्हा आपण शांत डोक्याने आणि सुस्पष्ट विचार करुन पावले उचलु तेव्हाच दिर्घकालीन उपाय सापडेल. आध्यात्मिक ज्ञान आणि साधना यामुळे आपल्याला मन शांत ठेवायला मदत होईल. समाजात मानवी मुल्ये टिकविण्यसाठी जीवन व्यतीत केलेल्या महान गुरुवर्यांच्या शिकवणीमुळे आपल्याला फायदा होऊ शकतो. सर्वांमध्ये कारुण्याची भावना जागवली पाहिजे. यासाठी ध्यान,

Scanned with CamScanner

व्यायाम, आणि इतर आध्यात्मिक साधना करण्याने फायदा होतो. त्यामुळे आपल्यात साठलेला ताण निघुन जातो आणि मन शांतेतवाणे होते आणि आपण योग्य निर्णय घेऊ शकतो.

महिलांवरच्या अत्याचाराच्या रोगाचा परिणाम जगभरातील समाजावर होतो. अशा घटनांबद्दल लोकांमध्ये जागरुकता निर्माण करण्याची महत्वाची भूमिका प्रसारमाध्यमांची असते त्यांच्यामुळे मार्ग निघण्याच्या दृष्टीने चर्चा सुरु होऊ शकते. बरेचदा अशा नकारात्मक घटनांवर लक्ष केंन्द्रीत केल्याने भिती आणि चिंता यांचे एक दृष्टचक्र सुरु होते. मानवी मुल्ये आणि आपल्या जीवनातील अध्यात्माचे स्थान याकडेही आपल्याला लक्ष द्यायला हवे. आपण एक मैत्रीपुर्ण आणि करुणामय असे वातावरण तयार करु शकु. आपल्या भोवतालच्या लोकांशी आपला काही संबंध आहे असे जेव्हा आपल्याला वाटते तेव्हा आपण होऊ न देण्यासाठी काही तरी करण्याची शक्यता आहे. त्याचप्रमाणे गुन्हेगारांना कडक शासन करणारे कायदेही असायला हवेत.

दारुमुळे समाजात जे अराजक माजले आहे त्याबद्दलही आपल्याला विचार करायला हवा. मद्यपान हे बरेचदा एक फॅशन म्हणुन केले जाते. पण वास्तव हे आहे की दारु पायल्यानंतर एखादा सुशिक्षित माणुसही दारुच्या प्रभावाखाली जातो. दारुची नशा हे महिलांवरील अत्याचाराचे मुळ कारण आहे, अगदी प्रगत समाजातदेखील.

सर्वात महत्वाचा मुद्दा हा आहे की समाजातील विकृत घटना घडण्याचे मुळ कारण मानवी मुल्ये नष्ट होणे हा आहे. एकमेकांची काळजी घेणे एकमेकात वाटुन घेण्याची वृत्ती ठेवणे , अपलेपणा बाळगणे, सेवा करण्यासाठी बांधील असणे या सारखी निरोगी, आनंदी , आणि सुसंवादी समाजाचे मुळ असलेली अध्यात्मिक मुल्ये पुन्हा एकदा रुजवण्याची जबाबदारी प्रत्येकाने पुढे येऊन घेण्याची गरज आहे.

शासनाची भूमिका

महिला अत्याचारा संदर्भात शासन सतत विविध कायदे व यंत्रणा राबवुन प्रदानशील आहे त्या पुढील प्रमाणे आहेत.

१) महिला अत्याचार प्रतिबंधक विभाग (PAW)

महाराष्ट्र (गृहविभाग) शासन निर्णय क्र. पी. पी. ए. १३१४/५/पोल-८दिनांक २९/०१/१९९५ अन्वये महाराष्ट्र राज्य पोलिस मुख्यालय याठिकाणी महिला अत्याचार प्रतिबंध विभागाची प्रथमत: स्थापना करण्यात आली. सद्या हा विभाग राज्य गुन्हे अन्वेषण विभाग संगम ब्रिज पुणे याठिकाणी कार्यरत आहे. विशेष पोलिस महानिरीक्षक दर्जाचे अधिकारी या विभागाचे प्रमुख आहेत.

२) महिला पोलिस कक्ष (महिला सहाय्यता कक्ष)

महाराष्ट्र राज्यामध्ये महिलाविरुध्द गुन्हास प्रतिबंध करणे, गुन्हे उघडकीस आणणे व गुन्हांचा तपास करणे इ. कामे संबंधीत पोलीस ठाण्याकडुन केले जातात. महिलाविरुध्द प्रकरणे हाताळण्यासाठी सर्व पोलिस ठाण्यामध्ये महिला पोलिस कक्षाची निर्मिती करण्याबाबत पोलिस महासंचालक महाराष्ट्र राज्य यांनी परिपत्रक पारीत केले आहे. महिला पोलिस अधिकारी आणि महिला पोलिस कर्मचारी यांची उपलब्धतेनुसार या कक्षामध्ये नेमणुक करण्यात आली आहे. आज पावेतो एकुण ९७५ महिला पोलिस कक्ष स्थापन करण्यात आले आहेत.

Scanned with CamScanner

३) महिला सुरक्षा समिती

राज्यातील सर्व पोलिस ठाण्यात व ४५ पोलीस घटकांच्या मुख्यालयात महिला सुरक्षा समिती स्थापन करण्यात आल्या आहेत. या समितीव्दारे संघर्षग्रस्त महिलांना कायदेविषयक सहाय्यता मिळवुन देण्याकरीता पोलिसांच्या अध्यस्थिने पुर्ण सहकार्य करण्यात येते. या समितीमध्ये महिला डॉक्टर , महिला वकील, महिला प्राध्यापक , सामाजिक कार्यकर्त्या इत्यादींचा समावेश करण्यात येतो.

४) सामाजिक सुरक्षा विभाग

पोलिस मुख्यालयामध्ये सामाजिक सुरक्षा विभाग कार्यरत असुन या विभागाकडुन महिलांवरील अत्याचारासंबंधी गुन्हांचा तपास करण्यात येतो. सद्या अशा प्रकारचे ३३ विभाग कार्यरत आहेत.

५) विशेष समुपदेशन केंद्र (स्पेशल कौनसिलींग सेंटर)

महाराष्ट्र राज्यामध्ये आज पावेतो एकुण ९० विशेष समुपदेशन केन्द्र पोलिस ठाण्याच्या आवारात कार्यरत आहेत. अशा केंन्द्रांना स्वतंत्र कार्यालय , प्रसाधनगृह, फर्निचर, दुरध्वनी इत्यादी सर्व सुविधा पोलिस खात्याकडुन पुरवण्यात आल्या आहेत. उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार हे केंन्द्र महिला व बाल कल्याण विभागाशी समन्वय साधुन काम करते. हे केन्द्र विशेष कौटुंबिक वादासंबंधी संघर्षग्रस्त महिलांना सहकार्य करते. शासनाने ५४ नवीन केंन्द्रास मान्यता दिली आहे.

६) बसस्थानकातील मदत केंन्द्र

न्यासाधीश धर्माधिकारी समितीच्या शिफारशीनुसार महिला व बालकांच अनैतिक व्यापारास आळा घालण्यासाठी बसस्थानकांमध्ये मदत केंन्द्रे स्थापन करण्यात आली आहे.

७) स्त्री भृणहत्या प्रतिबंधक उपाययोजना

गर्भधारणापुर्व व प्रसुतीपुर्व लिंग निदान तंत्र प्रतिबंधक अधिनियम १९९४ व वैद्यकीय गर्भपात अधिनियम १९७१ या कायदयाची परिणामकारक अंमलबजावणी करण्याकरीता पोलीस उपअधिक्षक / उपविभागीय पोलिस अधिकारी या दर्जाच्या अधिकाऱ्याची समन्वय अधिकारी (नोडल ऑफिसर) म्हणुन नियुक्ती करण्यात आली आहे.

८) हेल्पलाईन

संकटात असणाऱ्या महिलांना मदत करण्यासाठी मुंबई, ठाणे आणि नवी मुंबई या पोलिस घटकांमध्ये टोल फ्रि हेल्पलाईन नं. १०३ व उर्वरीत महाराट्रासाठी टोल फ्रि हेल्पलाईन नं. १०९१ सुरु करण्यात आलो आहे.

९) विशेष बाल सहायक पोलिस पथक आणि बाल कल्याण अधिकारी (स्पेशल ज्युवेनाईल युनिट ॲण्ड चाईल्ड वेलफेअर ऑफिसर)

संघर्षग्रस्त मुलांची काळजी घेण्यासाठी व तथ्यांचे संरक्षण करण्यासाठी महाराष्ट्रातील सर्व जिल्हामध्ये बाल कल्याण समिती (चाईल्ड वेलफेअर कमिटी) आणि बाल न्यायमंडळ (ज्युवेनाईल जस्टीस बोर्ड) स्थापन करण्यात आले आहे. राज्यातील सर्व ४५ पोलिस घटकामध्ये विशेष बाल सहाय्यक पोलिस पथक स्थापन करण्यात आले असुन १०२८ पोलिस ठाण्यामध्ये बाल कल्याण अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

Scanned with CamScanner

१०) लैंगिक अपराधापासुन मुलांचे संरक्षण अधिनियम २०१२

या कायदयान्वये गुन्हे दाखल करण्याचे प्रशिक्षण पोलिस अधिकाऱ्यांना देण्यात आले असुन १५२ कार्यशाळा आयोजीत करुन १७०५ पोलिस अधिकारी व ४५४८ पोलिस कर्मचाऱ्यांना या कायदयाची परिणामकारक अंमलबजावणी करण्याबाबत प्रशिक्षण देण्यात आले आहे.

११) कौटुंबिक हिंसाचार अधिनियम २००५

महिलांचे कौटूंबिक हिंसाचारापासुन संरक्षण करण्यासाठी हा कायदा अंमलात आणण्यात आला आहे. महिला व बाल कल्याण विभागाने नियुक्त केलेले संरक्षण अधिकारी (प्रोटेक्शन अधिकारी) या कायदयाची अंमलबजावणी करतात.

१२) विशेष आणि जलदगती न्यायालय

महिला अत्याचारासंबधी गुन्हांचा जलद गतीने निपटारा करण्यासाठी अहमदनगर, अकोला , अमरावती, औरंगाबाद, बुलढाणा, बीड, जळगाव, नागपुर , यवतमाळ , ठाणे, पुणे आणि कोल्हापुर या ठिकाणी विशेष न्यायालये कार्यरत आहेत. महिला आणि मानसिक विकलांग मुलोवरील अत्याचारासंबधी गुन्हांचा निपटारा करण्यासाठी २५ जलदगती न्यायालये प्रस्तावीत आहेत.

१३) हुंडाबळी प्रतिबंधक कारवाई

महाराष्ट्र शासन निर्णय क्र. डी. पी. ए. -१०८३/८०५१२/ सी. ए. -३ दिनांक २९/०१/१९८५ अन्वये महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हामध्ये जिल्हा दक्षता कक्ष स्थापन करण्यात आले आहेत. जिल्हा अधिकारी या कक्षाचे अध्यक्ष असुन पोलिस अधिक्षक , समाज कल्याण अधिकारी , वकील , महिला वैद्यकीय अधिकारी, स्थानिक महाविद्यालयाचे प्राचार्य , सामाजिक कार्यकर्ते आणि महिला संघटनांचे सभासद या कक्षामध्ये काम करतात. या कक्षाची मिटींग दर तीन महिन्यांनी जिल्हाधिकारी आयोजीत करतात.

१४) कामाच्या ठिकाणी तक्रार कमिटी (तक्रार निवारण समिती)

सर्वोच्च न्यायालय नवी दिल्ली यांच्या न्यायनिर्णयातील मार्गदर्शक तत्वे (विशाखा जजमेंट) विचारात घेवुन ४५ पोलिस घटकांच्या मुख्यालयात व राज्य गुन्हे अन्वेषण विभाग पुणे येथे या समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत. महिला पोलिस अधिकारी / कर्मचारी व पोलिस कार्यालयात कार्यरत असणाऱ्या मंत्रालयीन महिला कर्मचारी यांच्या कामाच्या ठिकाणी होणाऱ्या लैंगिक छळाची प्रकरणे या समितीकडुन हाताळण्यात येतात.

१५) महिलांच्या तक्रारीबाबत पोलीसांची संवेदनशिलता

महाराष्ट्र पोलीस अकादमी नासिक याठिकाणी पोलिसांच्या पायाभुत अभ्यासक्रमामध्ये महिला व मुलांवरील अत्याचार व लैंगिक गुन्हे याबाबतच्या कायद्यांचा समावेश करण्यात आला आहे.

१६) न्यायाधीश धर्माधिकारी समिती

महिलांवरील अत्याचाराच्या गुन्हास आळा घालण्यासाठी शासनाने निवृत्त न्यायाधीश श्री. चंद्रशेखर धर्माधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन केली आहे. या समितीने तीन अंतरीम अहवाल सादर केले असुन पहिल्या दोन अहवालातील सूचनांची अंमलबजावणी पोलीस खात्याकडुन करण्यात येते आणि तिसऱ्या अहवालातील सूचनांची अंमलबजावणी विचाराधीन आहे.

Scanned with CamScanner

९७

१७) अनैतिक व्यापार विरोधी कक्ष (ॲन्टी हयुमन ट्राफिकींग सेल)

अनैतिक व्यापाराच्या विविध समस्या तत्परतेने परिणामकारक व जदगतीने सोडवण्यासाठी महाराष्ट्र शासनाने राज्य गुन्हे अन्वेषण विभागाच्या अधिपत्याखाली अनैतिक व्यापार विरोधी कक्ष दिनांक ३१/०३/२००८ रोजी स्थापन केला आहे. तसेच विशेष पोलिस महानिरीक्षक (म. अ. प्र. वि.) गुन्हे अन्वेषण विभाग म. रा. पुणे यांची महाराष्ट्र राज्याचे समन्वय अधिकारी म्हणुन नियुक्ती केली आहे.


महाराष्ट्र राज्यामध्ये १२ अनैतिक व्यापार विरोधी पथके स्थापन करण्यात आली असुन मुंबई, ठाणे शहर, ठोण ग्रामीण , पुणे, सांगली, नागपुर, अहमदनगर , नवी मुंबई, सोलापुर शहर, बीड , कोल्हापुर, आणि यवतमाळ या जिल्हांमध्ये ही पथके पुर्णत: कार्यरत आहेत. प्रत्येक पथक २ अशासकीय संघटना (एन. जी. ओ) आणि महिला व बाल कल्याण अधिकारी यांचेची निगडीत ठेवण्यात आले असल्याने ते अनैतिक व्यापाराचा बिमोड करण्यास कटीबद्ध आहेत. त्यांना पायाभुत सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्या असुन ते सुटकेची कारवाई (रेस्क्यु ऑपरेशन) करण्यात अग्रस्थानी आहेत. ही पथके स्थापन झाल्यापासुन वेगवेगळी रेस्क्यु ऑपरेशन घडवुन आणली आहेत व पीडीतांची सुटका करुन तसकरांना अटक करण्यात आली आहे. महाराष्ट्रात पोलीस आयुक्तालयातील समाजसेवा शाखेमध्ये व जिल्हातील गुन्हे शाखेमध्ये कार्यरत असणारे पोलीस निरीक्षक अनैतिक व्यापार विरोधी विशेष पोलीस ऑफिसर म्हणुन जाहीर करण्यात आले आहेत.

संदर्भ

१) महिला अत्याचार विकीपिडीया ; https/mr.m.wikipedia.org
२) अनुमती नरसिंहन ; आर्ट ऑफ लिव्हिंग , महिला सबलिकरण आणि बालकल्याण विभाग संचालिका (लेख)
३) निलेश बामणे ; वैचारीक लेख , https/www.marathisrushti.com
४) महिलांच्या सुरक्षिततेसाठी महा. शासन , उपाययोजना, https/mr.m.wikaspedia.

PRINCIPAL I/c.
Dr. Ambedkar College of
Social Work, Wardha

Scanned with CamScanner



Scanned with CamScanner

ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

AJANTA

Volume - VII Issue - IV Marathi Part - III October - December - 2018

Peer Reviewed Referred
and UGC Listed Journal

Journal No. 40776



ज्ञान-विज्ञान विमुक्तये

IMPACT FACTOR / INDEXING
2018 - 5.5
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖
Asst. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Maths), M.B.A. (Mktg.), M.B.A. (H.R.),
M.Drama (Acting), M.Drama (Prod. & Dir.), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

Scanned with CamScanner

The information and views expressed and the research content published in this journal, the sole responsibility lies entirely with the author(s) and does not reflect the official opinion of the Editorial Board, Advisory Committee and the Editor in Chief of the Journal **"AJANTA"**. Owner, printer & publisher Vinay S. Hatole has printed this journal at Ajanta Computer and Printers, Jaisingpura, University Gate, Aurangabad, also Published the same at Aurangabad.

Printed by

Ajanta Computer, Near University Gate, Jaisingpura, Aurangabad. (M.S.)

Published by :

Ajanta Prakashan, Near University Gate, Jaisingpura, Aurangabad. (M.S.)

Cell No. : 9579260877, 9822620877, Ph.No. : (0240) 2400877

E-mail : ajanta1977@gmail.com, www.ajantaprakashan.com

AJANTA - ISSN 2277 - 5730 - Impact Factor - 5.5 (www.sjifactor.com)

Scanned with CamScanner

EDITORIAL BOARD

Professor Kaiser Haq
Dept. of English, University of Dhaka,
Dhaka 1000, Bangladesh.

Roderick McCulloch
University of the Sunshine Coast,
Locked Bag 4, Maroochydore DC,
Queensland, 4558 Australia.

Dr. Ashaf Fetoh Eata
College of Art's and Science
Salmau Bin Adbul Aziz University. KAS

Dr. Nicholas Loannides
Senior Lecturer & Cisco Networking Academy Instructor,
Faculty of Computing, North Campus,
London Metropolitan University, 166-220 Holloway Road,
London, N7 8DB, UK.

Muhammad Mezbah-ul-Islam
Ph.D. (NEHU, India) Assot. Prof. Dept. of
Information Science and Library Management
University of Dhaka, Dhaka - 1000, Bangladesh.

Dr. Meenu Maheshwari
Assit. Prof. & Former Head Dept.
of Commerce & Management
University of Kota, Kota.

Dr. S. Sampath
Prof. of Statistics University of Madras
Chennari 600005.

Dr. D. H. Malini Srinivasa Rao
M.B.A., Ph.D., FDP (IIMA)
Assit. Prof. Dept. of Management
Pondicherry University
Karaikal - 609605.

Dr. S. K. Omanwar
Professor and Head, Physics,
Sat Gadge Baba Amravati
University, Amravati.

Dr. Rana Pratap Singh
Professor & Dean, School for Environmental
Sciences, Dr. Babasaheb Bhimrao Ambedkar
University Raebareily Road, Lucknow.

Dr. Shekhar Gungurwar
Hindi Dept. Vasantrao Naik
Mahavidyalaya Vasarni, Nanded.

Memon Sohel Md Yusuf
Dept. of Commerece, Nirzwa College
of Technology, Nizwa Oman.

Dr. S. Karunanidhi
Professor & Head,
Dept. of Psychology,
University of Madras.

Prof. Joyanta Borbora
Head Dept. of Sociology,
University, Dibrugarh.

Dr. Walmik Sarwade
HOD Dept. of Commerce
Dr. Babasaheb Ambedkar Marathwada
University, Aurangabad.

Dr. Manoj Dixit
Professor and Head,
Department of Public Administration Director,
Institute of Tourism Studies,
Lucknow University, Lucknow.

Prof. P. T. Srinivasan
Professor and Head,
Dept. of Management Studies,
University of Madras, Chennai.

Dr. P. A. Koli
Professor & Head (Retd.),
Department of Economics,
Shivaji University, Kolhapur.

Scanned with CamScanner

EDITORIAL BOARD

Dr. P. Vitthal School of Language and Literature Marathi Dept. Swami Ramanand Teerth Marathwada University, Nanded.	**Dr. Jagdish R. Baheti** H.O.D. S. N. J. B. College of Pharmacy, Meminagar, A/P. Tal Chandwad, Dist. Nashik.
Dr. Sadique Razaque Univ. Department of Psychology, Vinoba Bhave University, Hazaribagh, Jharkhand.	**Prof. Ram Nandan Singh** Dept. of Buddhist Studies University of Jammu.
Prof. Dinesh R. Jaronde Head of Psychology Dept. Indira Mahavidyalaya, Kalamnb, Yavatmal.	**Prof. Sidhharth Bhagat** Head of Marathi Dept. Art & Commerce Mahavidyalaya, Ralegoan, Yavatmal.
Prof. Pravin Walke Dept. Of History, Jagannath Maharaj Mahavidyalaya, wani, Yavatmal.	**Ku. Manjusha S. Walke** Assistant Teacher, ZPUP School Narsapur, Kalamb, Yawatmal

PRINCIPAL I/c.
Dr. Ambedkar College of
Social Work, Wardha

PUBLISHED BY

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

Scanned with CamScanner

VOLUME - VII, ISSUE - IV - October - December - 2018
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

CONTENTS OF MARATHI PART - III

अ.क्र.	लेख आणि लेखकाचे नाव	पृष्ठ क्र.
२९	रस्त्यावरील मुलांचा विकास : विकसनशील भारतापुढील एक आव्हान **डॉ. अनिल आनंद सरगर**	१२४-१२९
३०	आर्थिक सुधारणा काळानंतर भारतातील महिला साक्षरता आणि महिला सबलीकरण एक अभ्यास **भगवान शंकरराव देशमुख**	१३०-१३४
३१	लैंगिक शिक्षणाबाबत प्रशिक्षणार्थिमध्ये प्रशिक्षणपुर्व व प्रशिक्षणानंतर झालेले परीवर्तन **डॉ. माधुनी झाडे**	१३५-१४२
३२	डॉलरच्या तुलनेत रुपयाच्या मूल्यातील घसरण २०१८ **प्रा. अजय तगलपल्लेवार**	१४३-१४७
३३	दहशतवाद - एक सामाजिक समस्या **प्रा. डॉ. संजय बाबुराव वाकळे**	१४८-१५२
३४	स्त्रियांवरील घरगुती हिंसाचार **प्रा. सुजाता आर. नाईक**	१५३-१५८
३५	आधुनिक काळातील डिजीटल ग्रंथालयाचे स्वरुप **डॉ. जी. पी. उरकुंदे**	१५९-१६२
३६	महाराष्ट्र : शेतकरी आत्महत्या स्थिती व उपाय **प्रा. डॉ. विवेक अ. चौधरी**	१६३-१६७

PRINCIPAL I/c.
Dr. Ambedkar College of
Social Work, Wardha

Scanned with CamScanner

३१. लैंगिक शिक्षणाबाबत प्रशिक्षणार्थिंमध्ये प्रशिक्षणपुर्व व प्रशिक्षणानंतर झालेले परीवर्तन

डॉ. माधुनी झाडे
डॉ. आंबेडकर कॉलेज ऑफ सोशनलवर्क वर्धा, जि. वर्धा.

आज एकीकडे समाजात विकास आणि विज्ञानाच्या गप्पा सर्वत्र सुरू असतांना आपणास दिसत आहे. परंतू याचदेखिल या विज्ञान युगात अनेकदा, अनेक ठिकाणी लैंगिक शिक्षण हा शब्द देखिल उच्चारण्याकरीता संकोच केला जातो. तंत्रज्ञानाचा वापर करून, स्मार्ट फोनचा वापर करून मोठया प्रमाणात वयस्कांबरोबर लहानगेही एका बटनवर सर्व काही बघतात. यातच किशोरवयीन तर विना कठडयाच्या पुलासारखे वय असते. या वयात त्यांच्या मनात असंख्य प्रश्न असतात. शारीरिक वाढ झपाटयानी होण्याच हे वय असतं. शारीरिक बदलासोबतच मानसिक आणि सामाजिक बदलही होतात. शरीर, मन आणि भावना यांची सततची होणारी गुंतागुत त्यातून बाहेर पडण्यासाठी इतरांची मदत या सर्वांना शास्त्रशुध्द पध्दतीने सामून घेण्याची गरज असते. वयात येणाऱ्या मुलामुलींच्या मनात अनेक गैरसमज असतात अज्ञान, संकोच यामुळे मनात असणारी अनेक प्रश्नासंदर्भातील गुंतागुंत कुणाकडे बोलून दाखवावी हे ही कळत नाही. आपल्याला नेमकं कोण व्यक्ती समजून घेईल याबद्दल खात्री नसते. तशी विश्वसनीय व्यक्ति त्यांना कुणी वाटत नाही लहान वयात योग्य माहितीच्या अभावी चुकिचे पाउल पडून अनेक कुमारवयीन मुली माता झालेल्या दिसतात. मुलामुलींचे लैंगिक शोषण होत असतांना आपण या संदर्भात बोलले पाहिजे हे देखिल त्यांना शास्त्रिय पध्दतीने अतिशय संवेदनशिलतेने व प्रामाणिकपने लैंगिकता शिक्षणासंदर्भात माहिती देणे आवश्यक आहे.

आजही अशी अडचन दिसते की, शाळेत या विषयाला शिक्षक संवेदनशीलपणे ज्येष्टेपणाने हाताळतांना दिसून येत नाही. सर्वच पालकांना या बाबत शास्त्रिय ज्ञान असेल असेही नाही. काही वेळेला या संदर्भात ज्ञान असेल तरीही पालकांना त्यांच्या पाल्यासोबत लैंगिकतेसंदर्भात बोलतांना वाटणारा संकोच या सर्वांमुळेच किशोरवयातच आवश्यक असणाऱ्या या विषयाकडे अत्यंत जाणिवपुर्वक दुर्लक्षच केल्या जाते. म्हणूनच लैंगिक शिक्षण हा विषय समजावून देण्याकरीता संवेदनशिल, काळजीपूर्वक तसेच जबाबदारीपूर्वक ही माहिती केवळ शारीरिक नाहि तर अंतरमनापर्यन्त संवाद साधणारी व्यक्ती तयार करण्याकरीता लैंगिकता शिक्षण देणारे प्रशिक्षक तयार करण्याची आवश्यक्ता आहे. लैंगिकता शिक्षण देणाऱ्या प्रशिक्षकांची संख्या समाजात वाढली तर अधिकाअधिक किशोरवयीन व तरूण यांच्यांपर्यन्त पोहचता येईल. योग्य वयात योग्य ती शास्त्रिय माहिती मिळाली तर लैंगिकशोषण, लैंगिक आजार, मासिक पाळी, मासिक पाळीसंदर्भातील गैरसमज, प्रेम, आकर्षन इत्यादी बद्दल ते जागृक होतील. त्यांना मिळालेली माहिती इतरांपर्यन्त पोहचवतील आणि स्वतः ते सावध राहून कशाला बळी पडणार नाही. सुदृढ शरीरात सुदृढ मन कार्यरत असते आणि सशक्त मनात चांगल्याच विचारांची निर्मिती होते. हा सर्व विचार लक्षात घेवून ' वयात येतांना ' या विषयावर प्रशिक्षक तयार करण्याकरीता ' प्रशिक्षकांकरीता प्रशिक्षण ' घेण्याचे ठरविले.

Scanned with CamScanner

किशोरवयीनांना विविध देशात आणि आपल्या देशात देखिल विविध नावांनी हे शिक्षण देण्यात येते कारण लैंगिक शिक्षण ' या नावाखाली प्रशिक्षण घ्यायच म्हटलं की समाजातील भ्रामक कल्पनांमुळे ते सर्वच ठिकाणी शक्य होत नाही. अशा वेळी शरीर साक्षरता, वयात येतांना, कळी उमलतांना, जीवन कौशल्य शिक्षण, गुजगोष्टी काही वेळा तर व्यक्तीमत्व विकास अशा विविध नावाचा वापर करून कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. विविध देशांना या विषयासंदर्भात आलेले अनुभव अभ्यासल्यावर आपल्या लक्षात येईलच की या बाबत डब्ल्यु एच ओ, इतर देशात व आपल्या देशात या संदर्भात काय परीस्थिती आहे.

डब्ल्यु. एच. ओ.

- 'शाळेतून लैंगिक शिक्षण' या संदर्भात डब्ल्यु. एच. ओ. ने अभ्यास केला असता दिसून आले की, लैंगिक शिक्षण दिल्यानंतर मुलांमध्ये नको ते धाडसी प्रयोग करण्याची प्रवृत्ती कमी होते. जबाबदार लैंगिक संबंध ठेवण्याचे वय होईपर्यन्त थांबवण्याच मनोबल त्यांना प्राप्त होतं. योग्य माहिती मिळाल्यामुळे फाजिल कुतूहल, घातकी प्रयोग करण्याची उत्सुकता व गैरसमजामुळे आलेले न्युनगंड यांना आळा बसतो लैंगिकतेचा सहज स्वाभाविक असा स्वीकार व्यक्तीमध्ये निर्माण होतो. अशा व्यक्ती मग निरामय कामजीवन जगू शकते.

1) 2009 ला युनेस्कोनी स्पान्सर्ड केलेली, ' इंटरनॅशनल सेक्स अन्ड रीलेशनशीप एज्युकेशन कॉनफरन्स ' ब्रिमीनगम युके येथे ' लिव्हर्स ऑफ सक्सेस ' या शिर्षकाखाली घेण्यात आली. चीन, केनिया, लॅटिन अमेरीका, कॅरेबीयन तसेच व्हियतनाम या देशांनी स्थानिक, प्रांतीय व देशपातळीवर शालेय स्तरावरील प्रभावी लैंगिक शिक्षणाच्या यशस्वीतेच्या अंमलबजावणीकरीता सहयोग देणाऱ्या घटकांच्या अभ्यासाला ' लिव्हरर्स ऑफ सक्सेस ' असे संबोधले आहे. या सर्व देशांच्या अभ्यासात असे दिसून आले की,

लैंगिक शिक्षण हे स्थानिक भाषेत शालेय स्तरावर दिल्या गेल्यामुळे सामाजिक आरोग्य सुधारणेकरीता त्याचा सकारात्मक परिणाम झाला.

- लहान वयातील गर्भधारणेचे प्रमाण कमी झाले.
- एच. आय. व्हि. संसर्ग नियंत्रणात मोठया प्रमाणात सहाय्यक ठरते.
- लैंगिक शिक्षण देण्याकरीता काही ठिकाणी शालेयप्रशासन, शिक्षक, व कॅथलिक चर्च यांनी विरोध केला. पण वेळोवेळी सरकारनी हस्तक्षेप करून, सुचना व निर्देशनामुळे या अडचणींवर मात करण्यात आली. यावरून असे निदर्शनास आले की सरकार व राजकीयांना या शिक्षणाचं महत्व पटले की हे काम सुकर होते.

2) कोलंबिया येथे अल्व्टो चॉंग आणि त्यांच्या सहकार्यानी ' ऑनलाईन लैंगिक शिक्षण ' या संदर्भात अध्ययन केले. याचे सर्वत्र चांगले परीणाम त्यांना दिसून आले. ते असे

- असुरक्षित लैंगिक संबंधाच्या प्रमाणात घट.
- मित्रांमधील संवाद वाढल्यामुळे लैंगिकतेसंदर्भात सतत बोलने, चर्चा करणे यामुळे लैंगिक संबंधामधील वारंवारीता कमी झाली.

Scanned with CamScanner

- एकापेक्षा अधिक जोडीदारांसोबत संबंध ठेवण्याचे प्रमाण कमी झाले.

3) इंग्लंड येथिल लायब्ररी हाउस ऑफ कॉमन्स यांद्वारे ' शाळेतील विद्यार्थ्यांचे शिक्षण आणि लैंगिकता यांचा परस्परसंबंध ' या विषयावर अभ्यास केला. यावरून त्यांनी केलेल्या सुचना

1998 मध्ये 38 टक्के किशोरवयीन मुलींना केवळ अज्ञानापोटी गर्भधारणा झाली ही बाब अतिशय गंभीर आहे. हे लक्षात घेवून काही सुचना केल्या,

- प्रत्येक शाळेतील मुलांच्या मानसिक व शारीरिक स्वास्थ्याकरीता सेक्स आणि रीलेशनशीप या कार्यक्रमाची गरज आहे.
- किशोर वयातील शारीरिक बदलाचे मानसिक समायोजन करण्याकरीता विद्यार्थ्यांना तयार करणे शाळेची जबाबदारी आहे.
- या संदर्भातील अभ्यासक्रम तयार करून शिक्षकांना प्रशिक्षण दयावे तसेच पालकांना या प्रकारच्या कार्यक्रमाची पुर्वसूचना दयावी. प्रशासणाने लक्ष घालून या शिक्षणाची अंमलबजावणी करावी.

4) जगभरात अनेक अभ्यास या संदर्भात झाले. अनेक प्रयोग झाले त्यातील काहीच संदर्भ आपण इथे अभ्यासू या

- डॅनिसल वेट 2011 यांनी, ' द इफेक्टीव्हनेस ऑफ स्कुल बेस सेक्स एज्युकेशन 'हा अभ्यासक्रम ब्रिटनमधील सरकारच्या या विससुत्री कार्यक्रमाचे मुल्यमापण करण्याकरीता केला गेला.
- अमेरीकेच्या स्टेट रीसर्च सेंटर च्या किंममेअर मॅन आणि त्यांच्या चमुने ' सिंगल सेक्स एज्युकेशन ' या कार्यक्रमाचा पडलेल्या परिणामांचा अभ्यास केला.
- कॅरोल जे.ए. आणि किर्क पॅट्रिक आर.एल. 2011 यांनी ' किशोरवयीनांच्या आरोग्य वर्तनासंदर्भात, सामाजिक वर्तनासंदर्भात प्रसारमाध्यमांचा प्रभाव ' या विषयावर अध्ययन केले.
- नॅशनल पब्लीक रेडीओ, कैस फॅमीली फाउंडेशन आणि स्कुल ऑफ गव्हरमेंट यांनी ' लैंगिक शिक्षणाची गरज महत्व आणि जागृती याबाबत असणारी संवेदनशीलता व त्यामागची कारणे अभ्यासली.
- टेक्सास येथिल सार्वजनीक शाळांमध्ये राबविण्यात येणाऱ्या ' लैंगिक शिक्षणाच्या पध्दती व परीणाम'यावर अभ्यास केला.
- युनायटेड नेशन युथ 2012 यांनी 'युथ ॲन्ड कॉम्फन्सीव्ह सेक्सयुॲलीटी एज्युकेशन ' या अभ्यासात लैंगिक शिक्षणामध्ये मुलभूत बाबी काय असाव्यात या संदर्भात विश्लेषण करण्यात आले.
- किस कोलीन, प्रिया अलगीरी, टॉड समर्स (2012) याच्या संयुक्तीक अशा 'ॲबस्टीनन्स व्हरर्सेस कॉम्फ्रन्सीव्ह सेक्स एज्युकेशन' हा धोरण आधारीत संशोधन अभ्यासाकमावर अध्ययन केले.
- 'सेक्स एज्युकेशन इन स्कुल ऑफ कॅनडा' या शिर्षकाखाली ओटॅरीओ येथिल किशोरवयीन मुलांवर अभ्यासक्रम केला.

Scanned with CamScanner

- या सर्वच संशोधणातून अभ्यासातून दिसून आले की लैंगिक शिक्षणासंदर्भात सर्वत्र काम होण गरजेचे आहे. त्यामुळे

- किशोरवयीन व तरूणांमध्ये जबाबदारपुर्व वर्तन वाढीस लागते.
- किशोरवयीन मुलींमधील गरोदर पणाच्या टक्केवारीमध्ये घट झाली.
- लिंगसांसर्गिक आजारांना आळा बसण्यास मदत होते.
- पालकांनी देखिल या शिक्षणाचा पुरस्कार केला.
- समाजामध्ये लिंग भाव समानता वाढिस लागून समाजस्वास्थ्य वाढिस लागते.
- आंतरदेशातील संदर्भासोबतच भारतातील संदर्भ अभ्यारले असता पुढिल बाबी निदर्शनास आल्या.
  - डब्ल्यु. एच. ओ. नी भारतासंदर्भात या विषयावर 2003 ला संशोधन केले असता काही बाबी समोरआल्या त्या पुढिलप्रमाणे.
- भारतात दरवर्षी 15 ते 19 वर्षे वयोगटातील मुलिंचे 50 लाख गर्भपात केल्या जाता.
- शाळेत जाणाऱ्या 67.02 टक्के तरूणींनी सेक्स चा अनुभव बॉयफ्रेंड अथवा परिचीत नातेवाईकसोबत घेतला आहे.
- 2002 मध्ये 14 टक्के मुली व 26 टक्के मुलांनी आत्महत्येचा प्रयत्न केला होता. यांनी कमी वयात सेक्स चा अनुभव घेतला होता व ज्यामुळे ते सातत्याने तनाव डिप्रेशन मध्ये होते.
- डॉ. राजन भोसल लैंगिक तज्ञ असे म्हणतात की,"जोपर्यन्त एखादी व्यक्ती स्वतःच्या लैंगिकतेचा सहज व पूर्ण स्विकार करत नाही व तिला जाणिवपुर्वक अंगिकारत नाही तोपर्यन्त ती व्यक्ती लैंगिक पातळीवर दुसऱ्याशी स्वस्थ व निरोगी संबंध कधीच प्रस्थापीत करू शकत नाही."
- सचिन गोडांबे म्हणतात की, " पुरूषांवर व स्त्रियांवर होणाऱ्या बलात्कारांना इंटरनेटवरून तसेच सीडी, डिव्हिडी व इतर माध्यमातून मोठया प्रमाणावर प्रसारीत होणारे अश्लील साहित्यही तितकेच जबाबदार आहे. यावर सर्वात महत्वाचा उपाय म्हणून शालेय व महाविद्यालयीन स्तरावर लैंगिक शिक्षण तातडीने सुरू करण्याची गरज आहे. "
- डॉ प्रभू या संदर्भात र. धो कर्वे याचे विचार मांडतात ते असे, "अश्लीलता वस्तूत नसून ती माणसाच्या मनात असते. जे जगायचे आहे त्याविषयी वैज्ञानिक माहिती मिळविणे गरजेचे आहे. अन्यथा लैंगिक समस्या उत्भवतात. त्यातून न्युनगंड, भीती, संघर्ष, घटस्पोट, वैदुकडून शोषण, आत्महत्या किंवा खून असे पर्यवसान होते. या करीता महत्वाचा उपाय म्हणजे वैज्ञानिक माहिती मिळविणे व गैरसमज दूर करणे हा होय.
- डॉ. विठ्ठल प्रभू हे म्हणतात की, लैंगिकता शिक्षण देण्याची सर्वप्रथम जबाबदारी पालकांची असते. अन्न, वस्त्र, निवारा, प्रेम, संरक्षण या गरजांसारखीच लैंगिकता शिक्षण, हि काळाची गरज असते. पालकांनंतर हि जबाबदारी शिक्षकांची असते.हे शिक्षण देणाऱ्या शिक्षकांना प्रशिक्षणाची गरज असते. त्याचबरोबर त्यांची मानसिक तयारी असनेही गरजेची आहे.

Scanned with CamScanner

- डॉ अनंत साठे व शांता साठे यांनी तर लैंगिक शिक्षणाची उपयुक्तता लक्षात घेवून आपले संपुर्ण जीवनच याकरीता वाहीले आहे.
- डॉ. प्रतिमा हवालदार, डॉ. ममता सावरकर, डॉ बोरकर, डॉ नंदा पांगुळ या आणि अशा अनेकांच्या अभ्यासात देखिल लैंगिक शिक्षणाचे महत्व स्पष्ट झाले आहे."

जागतीक आरोग्य संघटना, जगभरातील विविध देश तसेच भारतातील विविध संघटना व व्यक्तींनी केलेल्या अभ्यासावरून लैंगिक शिक्षणासंदर्भात अनेक सकारात्मक बाबी पुढे आल्या.

संशोधन कर्ती मागिल 20 वर्षापासून लैंगिक शिक्षणावर काम करते. राज्यसरकारच्या प्रजनन आरोग्य प्रकल्पामध्ये वर्धा जिल्ह्यातील माध्यमिक शिक्षकांना प्रशिक्षित करण्याचे काम केले आहे. विविध शाळा, महाविद्यालयांमध्ये कार्यक्रम घेवून आतापर्यन्त 50 हजार विद्यार्थ्यांपेक्षाही अधिक विद्यार्थ्यांपर्यन्त माहिती पोहचविली आहे. अमरावती जिल्ह्यातील मेळघाटमधिल आदिवासी आश्रम शाळेतील माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेतील मुलींकरीता जीवन कौशल्य शिक्षण या विषयावर कार्यक्रम घेण्याकरीता 10 तरूण व 10 तरूणींना प्रशिक्षीत करण्याचे काम केले आहे, या वेळी विद्यार्थ्यांना प्रशिक्षण साहित्य देतांना लैंगिक शिक्षणावर सतत त्याच्याकडे रहावी म्हणून एक पुस्तीका तयार केल्या गेली. त्या पुस्तीकेचे नाव आहे 'स्वतःला जाणू या' ही पुस्तीका विद्यार्थ्यांना फार उपयोगी पडली असे प्रशिक्षणाअंती लक्षात आले. संशोधनकर्तिने लैंगिक शिक्षण या विषयावर आचार्य पदवी प्राप्त केली आहे. सर्वच ठिकाणी आपणच या विषयावर कार्यक्रम घेणे आपल्याला शक्य होणार नाही. अधिक व्यापक प्रमाणात समाजात इतरत्र पोहचविण्याकरीता आपल्याला मर्यादा येतात. त्यामुळे अशा कार्यक्रम घेण्याकरीता अधिकाअधिक प्रशिक्षकांची संख्या वाढविण्याची गरज आहे. हि गरज लक्षात घेवूनच महाविद्यालयीन विद्यार्थीनिना प्रशिक्षित करण्यात आले.

या प्रशिक्षण कार्यक्रमात वर्धा शहरातील डॉ आंबेडकर कॉलेज ऑफ सोशलवर्क , कुंभलकर कॉलेज ऑफ सोशलवर्क तसेच अनिकेत समाजकार्य महाविद्यालय या तिनही महाविद्यालयातील प्रत्येकी 10 अशा एकूण 30 विद्यार्थिनींचा समावेश करण्यात आला. यांना प्रत्येक दिवशी 3 तास प्रशिक्षण देण्यात आले. दि 3 ते 8 सप्टेंबर 2018 कालावधित हे प्रशिक्षण होते. प्रशिक्षणामध्ये कार्यक्रमाकरीता लागणारे साहित्य तयार करण्याचे व ते वापरण्याचेही प्रशिक्षण देण्यात आले.

उद्देश

- प्रशिक्षणार्थिना लैंगिकता शिक्षणाबाबत असणारी माहिती अभ्यासणे
- प्रशिक्षणार्थिना लैंगिक शिक्षण देवून प्रशिक्षीत करणे
- प्रशिक्षण साहित्य तयार करण्यास शिकविणे
- प्रशिक्षण साहित्याचा वापर करण्यास प्रशिक्षित करणे
- प्रशिक्षणानंतर झालेला बदल अभ्यासणे.

गृहितके

- प्रशिक्षणापुर्वी प्रशिक्षणार्थिमध्ये लैंगिकशिक्षणाबाबत गैरसमज होते

Scanned with CamScanner

103

- प्रशिक्षणार्थिंना लैंगिक शिक्षणबाबत प्रशिक्षित केल्यामुळे त्यांच्यामध्ये असणारे गैरसमज दूर होतात.
- प्रशिक्षणार्थिंना लैंगिक शिक्षणबाबत प्रशिक्षित दिल्यामुळे ते इतर ठिकाणी लैंगिकशिक्षणावर कार्यक्रम घेवू शकतात.

संशोधन आराखडा

- प्रस्तुत संशोधनाकरीता प्रयोगात्मक व निदानात्मक संशोधन आराखडा वापरण्यात आला आहे.

संशोधनात प्रशिक्षणपुर्व व प्रशिक्षणानंतर काय बदल झाला हे जाणून घेण्यात आले. त्यातील काही निवडक संशोधन तक्त्यावरून लैंगिक शिक्षणाची गरज आपल्या लक्षात येईल.

प्रशिक्षणपुर्व व प्रशिक्षणानंतर प्रशिक्षणार्थिंच्या ज्ञानात, माहितीत झालेला बदल दर्शक तक्ता

अ.क्र.	प्रश्न	माहिती असण्याचे प्रमाण				एकूण
			पुर्ण माहिती	काही प्रमाणात	माहिती नाही	
1	किशोरवयात होणाऱ्या शारीरिक, मानसिक व भावणीक बदलाबाबत	प्रशिक्षणापुर्वी	03	08	19	30
		प्रशिक्षणानंतर	29	01	00	30
2	मासिक पाळी संदर्भात शास्त्रिय माहिती	प्रशिक्षणापुर्वी	00	05	25	30
		प्रशिक्षणानंतर	28	02	00	30
3	मासिक पाळी संदर्भात असणाऱ्या गैरसमजाबाबत माहिती	प्रशिक्षणापुर्वी	04	06	20	30
		प्रशिक्षणानंतर	28	02	00	30
4	मासिक पाळीच्या वेळी घ्यावयाच्या काळजीसंर्भात शास्त्रिय माहिती	प्रशिक्षणापुर्वी	05	12	13	30
		प्रशिक्षणानंतर	28	02	00	30
5	प्रजनन इंद्रियाला होणाऱ्या ससर्गाबाबत माहिती	प्रशिक्षणापुर्वी	01	08	21	30
		प्रशिक्षणानंतर	29	01	00	30
6	गरोदर रहाण्यासदर्भातील प्रक्रियेबाबत माहिती	प्रशिक्षणापुर्वी	01	16	13	30
		प्रशिक्षणानंतर	27	03	00	30
7	वाढावू वयातील पुरक पोषण आहारासदर्भात माहिती	प्रशिक्षणापुर्वी	02	13	15	30
		प्रशिक्षणानंतर	29	01	00	30

या तक्तायावरून असे निदर्शनास येते की,

- लैंगिक शिक्षणासंदर्भात प्रशिक्षणार्थिंमध्ये फारशी जागृकता दिसून आली नाही. परंतु त्यासंदर्भात जर आपण त्यांना योग्य प्रकारे माहिती दिली तर त्यांना समृध्द जीवन जगण्यास मदत होईल
- प्रशिक्षणार्थिंना प्रशिक्षणापुर्वी मासिकपाळी व गर्भधारणा या संदर्भात शास्त्रशुध्द माहिती नव्हती. अनेक गैरसमज देखिल होते परंतु प्रशिक्षणानंतर त्यांना या विषयासंदर्भात शास्त्रिय माहिती मिळून त्या इतरांना या विषयासदर्भात माहिती देतील असे दिसून आले.
- लिगसासर्गिक आजारा संदर्भात जागृकता येते.
- वयात येतांना या विषयावर कार्यक्रम घेण्यासंदर्भातही प्रशिक्षणार्थिंनी आश्वस्त केले.

Scanned with CamScanner

81 110

- या शिबीरात प्रशिक्षणार्थी प्रशिक्षण साहित्य तयार करण्याकरीता व त्याचा वापर करण्याचे शिकल्या हे त्यांनी दिलेल्या प्रात्याक्षिकावरून दिसून आले.

ठळक निष्कर्ष.

- विविध देशांनी केलेल्या अभ्यासावरून व या प्रशिक्षणावरून सामाजिक स्वास्थ्याकरीता लैंगिक शिक्षणाची नितांत गरज आहे.
- लैंगिक शिक्षणामुळे लैंगिक शोषणाचे प्रमाण कमी हाईल.
- मासिक पाळी, मासिक पाळीसंदर्भातील गैरसमज, लैंगिक आजार, गरोदरपण यासंबंधी शास्त्रिय माहिती मिळून जागृ कता येईल.

शिफारशी

- पालक व शिक्षकांनी वयात येणाऱ्या मुला मुलींन सोबत या विषयावर मोकळेपणाने संवाद साधला पाहिज.
- शासनानी स्वतः याकडे गांभिर्याने बघुन शाळांमधून हे शिक्षण देण्याकडे जातीने लक्ष घालायला पाहिजे.
- प्रशिक्षीत वर्ग तयार करायला पाहिजे
- या विषया संदर्भात तज्ञ व्यक्तीच्या मार्गदर्शनाखाली अभ्यासक्रम तयार करावयास पाहिजे.


संदर्भ ग्रंथ सुची.

- भांडारकर पु. ल. ; (1999) 'समाजिक संशोधण पध्दती',नागपूर : साईनाथ प्रकाशन
- आगलावे प्रदिप ; (2001) 'समाजिक सशोधण पध्दती',नागपूर : साईनाथ प्रकाशन
- बोधनकर सुधीर ; (2003) 'समाजिक संशोधण पध्दती',नागपूर : साईनाथ प्रकाशन
- साठे अनंत ; (2003) 'कुटुंबस्वास्थ शिक्षण', नाशिक : यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापिठ प्रकाशन
- प्रभू विठ्ठल ; (2006) 'लैगिकता शिक्षण', पुणे : राजहंस प्रकाशन
- भोसले राजन ; (2010) 'समग्र कामजीवन', मुबई : मनोविकास प्रकाशन
- सावरकर ममता ; (2011) 'नागपूर शहराग्रील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये एड्स सबंधीची जागृकता आणि अभिवृत्ती यांचे समाजशास्त्रीय अध्ययन', रा.तु.म.ना. विद्यपीठ, नागपूर
- साठे अनंत, शांता ; (2006) 'हे सार मला माहिती हवं ', पूणे : राजहंश प्रकाशन
- प्रतिमा हवालदार ; (6.8.2008) ,'उमज देनारे शिक्षक हवेत', लोकसत्ता चतुरंग पुरवणी, नागपूर.
- Alexander Mckay, Mary Bissell : 2010, "Sesual Health Education in the School : Question and Answer (3rd edition), Sieccan Sex information and education Council of Canada (SIECCAN)
- Alice Kleberg : 2011, "Sex Education in Texas Public School: Progress in the Lone Star State", TEXA Freedom Network Education Fund.

Scanned with CamScanner

- Carroll J.A. and R.L.: 2011 " Impact of Social media on adolescent behavioural health, Oakland", CA California, Adolescent Health Collaborative.
- Chesson, H.W., Blandford, J.M., Gift, T.L., Tao, G., and Irwin K.L. (2004) The estimated direct medical cost of sexually transmitted infection among American youth, 2000. Prevention of sex education and Reproductive Health ,36,11-19.
- Chris Collins, Priya Algari, Todd summers: 2002 "Abstinence only V.S. Comprehensive Sex Sex Education : What are the arguments ? What is the evidence? " , AIDS prevention studies, AIDS research institute , University of Californiya, San Franciosco.
- Marcus D. Rosenbaum: 2003-4, "Sex Education in America – General public/ Parents Survey", National Public Redio/ Kaiser Family Foundation/ Kennedy School of Government.
- Pangul Nanda (2011). Sex Education in School Curriculum in The World, International ISSN 2249-9849P.No.71-75
- UNECSCO : 2010, " Levers of Success case studies of national sexuality education programme", Section of HIV and AIDS, Division for the coordination of UN priorities in Educational sector, Pairs and France.
- UNITED NATIONS YOUTH : 2012, " Youth and Comprehensive Sexuality Education", United Nations Educational, Scientific and Cultural Organization, (UNESCO) and the United Nations Population Fund.(UNFPA).

Scanned with CamScanner



Scanned with CamScanner

113

ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

AJANTA

Volume - VIII Issue - I January - March - 2019

Kannada / English / Marathi / Hindi

Peer Reviewed Refereed
and UGC Listed Journal

Journal No. 40776

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

IMPACT FACTOR / INDEXING
2018 - 5.5
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖
Asst. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Maths), M.B.A. (Mktg.), M.B.A. (H.R.),
M.Drama (Acting), M.Drama (Prod. & Dir.), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

Ajanta Prakashan,
Aurangabad. (M.S.)

Verified
LECTURER
Dr. Ambedkar College of
Social Work, Nagpur

Scanned with CamScanner

114 93

EDITORIAL BOARD

Professor Kaiser Haq
Dept. of English, University of Dhaka,
Dhaka 1000, Bangladesh.

Roderick McCulloch
University of the Sunshine Coast,
Locked Bag 4, Maroochydore DC,
Queensland, 4558 Australia.

Dr. Ashaf Fetoh Eata
College of Art's and Science
Salmau Bin Adbul Aziz University. KAS

Dr. Nicholas Loannides
Senior Lecturer & Cisco Networking Academy Instructor,
Faculty of Computing, North Campus,
London Metropolitan University, 166-220 Holloway Road,
London, N7 8DB, UK.

Muhammad Mezbah-ul-Islam
Ph.D. (NEHU, India) Assoc. Prof. Dept. of
Information Science and Library Management
University of Dhaka, Dhaka - 1000, Bangladesh.

Dr. Meenu Maheshwari
Assit. Prof. & Former Head Dept.
of Commerce & Management
University of Kota, Kota.

Dr. S. Sampath
Prof. of Statistics University of Madras
Chennari 600005.

Dr. D. H. Malini Srinivasa Rao
M.B.A., Ph.D., FDP (IIMA)
Assit. Prof. Dept. of Management
Pondicherry University
Karaikal - 609605.

Dr. S. K. Omanwar
Professor and Head, Physics,
Sat Gadge Baba Amravati
University, Amravati.

Dr. Rana Pratap Singh
Professor & Dean, School for Environmental
Sciences, Dr. Babasaheb Bhimrao Ambedkar
University Raebareily Road, Lucknow.

Dr. Shekhar Gungurwar
Hindi Dept. Vasantrao Naik
Mahavidyalaya Vasarni, Nanded.

Memon Sohel Md Yusuf
Dept. of Commerece, Nirzwa College
of Technology, Nizwa Oman.

Dr. S. Karunanidhi
Professor & Head,
Dept. of Psychology,
University of Madras.

Prof. Joyanta Borbora
Head Dept. of Sociology,
University, Dibrugarh.

Dr. Walmik Sarwade
HOD Dept. of Commerce
Dr. Babasaheb Ambedkar Marathwada
University, Aurangabad.

Dr. Manoj Dixit
Professor and Head,
Department of Public Administration Director,
Institute of Tourism Studies,
Lucknow University, Lucknow.

Prof. P. T. Srinivasan
Professor and Head,
Dept. of Management Studies,
University of Madras, Chennai.

Dr. P. A. Koli
Professor & Head (Retd.),
Department of Economics,
Shivaji University, Kolhapur.

PRINCIPAL I/c.
Dr. Ambedkar College of
Social Work, Wardha

Scanned with CamScanner

VOLUME - VIII, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2019
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

CONTENTS OF ENGLISH/MARATHI/HI

अ.क्र.	लेख आणि लेखकाचे नाव
1	Synthesis and Characterization of 2, 3 bis (4'- Hydroxyphenyl) 4, 5, 6, 7, 8, 9 Hexahydroquinoxaline HPQ **Vidhyadhar B. Patil** **Umesh S. Shelke**
२	आर्थिक विषमता कमी करण्याकरीता उपाययोजना **प्रा. डॉ. अर्चना विजयकुमार भांगडीया**
३	सरोगसी आणि मानवी प्रतिष्ठा **डॉ. शिवाजी गायकवाड**
४	भारतात डॉ. बी. आर. आंबेडकरांच्या स्वप्नातील सामाजिक विकास प्रक्रीयेला गतिमान करणारे राज्य - उत्तरप्रदेश **डॉ. विजयकुमार एम. गवई**
५	चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत काम करणाऱ्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या कार्यसमाधानतेचे - एक चिकित्सक अध्ययन **Prof. P. S. Meshram**
६	प्रधानमंत्री उज्ज्वला योजना अंतर्गत गॅस - सिलेंडर लाभधारक महिलांचा जीवनमानात झालेले परिवर्तन **डॉ. माधुरी झाडे**
७	बाल हक्क संरक्षणात चाईल्डलाईन १०९८ चे विस्तारीक जाळे **प्रा. श्री. प्रशांत र. घुलक्षे**
८	प्रकृति : एक अधिगम-पध्दति **डॉ. लेखाराम दत्राना**
९	डॉ. भीमराव अम्बेडकर एवं उनके शैक्षिक विचारों की प्रासंगिकता **डॉ. जितेन्द्र कुमार सिंह** **डॉ. रामबाबू सिंह**
१०	डॉ. आंबेडकर की पत्रकारिता एवं राष्ट्रीय चेतना **श्री नरायन सिंह गौतम**
११	वैदिक वाङ्मय में पुनर्जन्म **प्रा. डॉ. अखिलेश शर्मा**

Scanned with CamScanner

- VIII, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2019
A - ISSN 2277 - 5730 -IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

प्रधानमंत्री उज्ज्वला योजना अंतर्गत गॅस - सिलेंडर लाभधारक महिलांचा जीवनमानात झालेले परिवर्तन

डॉ. माधुरी झाडे
डॉ. आंबेडकर कॉलेज ऑफ सोशलवर्क, वर्धा.

भारतीय समाजामध्ये आजही ७० टक्के लोकसंख्या ग्रामिण भागात वास्तव्यास आहे. त्यांचे जीवनमान हे निसर्गाशी जवळीक साधणारे आहे. महिला या पुर्वापार सातत्याने कुटुंबाच्या भोजनाची व्यवस्था करतात. स्वयंपाक तयार करण्याकरीता ग्रामिण भागात मोठ्या प्रमाणात चुलींचा वापर केल्या जातो. चुलींच्या वापरा होणारा त्रास महिलांनाच सहण करावा लागतो. हळूहळू त्यांच्या स्वास्थ्यावर त्याचे गंभीर परीणाम होतात पण त्याकडे देखिल दुर्लक्ष केल्या जातं. या सर्वांकडे अधिक गांभिर्याने मां. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बघीतले असे दिसते. त्यानी प्रधानमंत्री उज्वला योजना सुरू करून महिलांना मोठा दिलासा दिला. या योजनेची सुरूवात मा. पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यानी उत्तर प्रदेशच्या बलिया येथे १ मे २०१६ ला प्रधानमंत्री उज्वला योजनेला सुरूवात केली होती. त्यानंतर १४ ऑगस्ट २०१६ ला स्वतंत्रता दिवसाच्या पुर्व संध्येला या योजनेची सुरूवात नजरूल मंचापासुन करण्यात आली. संपुर्ण देशातील गावांना धुर विरहीत बनवण्याच्या पंतप्रधानाच्या स्वप्नाला साकार करण्याच्या दृष्टीने हे पहिले पाऊल होते. आता ही योजना दारिद्रय रेषेखालील जीवन व्यतित करणाऱ्या महिलांना सन्मान रूपातील एक ओळख झाली आहे. प्रत्येक घरात एल. पी. जी. ची संलग्नता देणारी हि योजना महिलांसाठी एक विशेष ओळख आहे.

पश्चिम बंगालमध्ये दोन कोटी तीन लाख परिवार आहेत. ज्यामध्ये एक कोटी सहा लाख कुटुंबाना या योजनेने सन्मानित केले जाते. ज्यामध्ये एक कोटी सहा लाख कुटुंबाना लाभान्वित करण्याने लक्ष ठरविण्यात आले आहे. या कुटुंबीयांना वर्षे २०१९ पर्यंत उज्वला योजनेअंतर्गत आणायने आहे. तेल विपणत कंपन्यांचे राज्यांमध्ये १० बॉटलिंग प्रोजेक्ट आहेत. तसेच वर्तमान एल. पी. जी. ग्राहकांसाठी यांची संयुक्त क्षमता ९९० टिएमटीपीए आहे. प्रधानमंत्री उज्वला योजनेचे लक्ष्य बघता सर्व तेल कंपन्या येणाऱ्या दिवसांमध्ये आपली बॉटलिंग क्षमता वाढवतील त्यामुळे एलपीजी सिलेंडरच्या वाढत्या मागणीला पुर्ण करता येईल. प्रधानमंत्री उज्वला योजनेमध्ये आधिच साडे सहा पेक्षा जास्त लोक प्रतिक्षा यादीत आहेत. सरकारतर्फे सर्व तेल कंपन्याना आदेश जारी करून सिलेंडर रेग्युलेटर आणि सहायक उपकरणांची पर्याप्त संख्या सुनिश्चित करण्यासाठी सांगण्यात आले आहे.

या योजनेला अधिक कार्यक्षम बनविण्यासाठी आणि मोठ्या प्रमाणावर या योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी प्रधानमंत्री उज्वला योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना एलपीजी कनेक्शन देण्यासाठी विशेष उज्वला

Scanned with CamScanner

मेळयांचे आयोजन करण्यात येत आहे. १५ ते १७ ऑगस्ट २०१६ दरम्यान सर्व एलपीजी वितरण केंद्रावर या मेळयांचे आयोजन करण्यात आले.

भारतात २४ कोटी पेक्षा जास्त कुटुंब गरीबात. ज्यामध्ये जवळपास १० कोटी कुटुंब अजुनही एल. पी. जी. गॅस पासुन वंचीत आहे आणि या लोकांना जेवन बनविण्यासाठी लाकुड, कोळसा किंवा शेणावर अवलंबुन राहावे लागते. प्रधानमंत्रीद्वारे राष्ट्रीय स्तरावर या योजनेच्या सुरूवातीनंतर ही योजना मे मध्ये उत्तर प्रदेश, राजस्थान तसेच गुजरात आणि जुन २०१६ मध्ये उत्तराखंड, ओडीसा आणि बिहारमध्ये लागु करण्यात आली. या योजनेचा शुभारंभ मध्यप्रदेशात करण्यात आला होता.

'स्वच्छ इंधन, बेहतर जीवन' असा नारा देत केंद्र शासनाने प्रधानमंत्री उज्ज्वला योजने अंतर्गत देशातील दारिद्रय रेषेखालील ५ कोटी महिलांना मोफत घरगुती एल. पी. जी. गॅस उपलब्ध करुन दिल्यामुळे महिलांच्या चेहऱ्यावर हास्य फुलले आहे. ग्रामीण भागात पारंपारिक पध्दतीने स्वयंपाक करताना धुरामुळे डोळयांवर व शरिरावर होणारा दुष्परिणाम टाळण्यासाठी ही योजना यशस्वीपणे राबविल्यामुळे महिलांचे सक्षमीकरण तर झालेच त्यासोबतच त्यांच्या आरोग्याची काळजी घेतांना पर्यावरणाचा मोठया प्रमाणात ऱ्हास थांबविण्यात ही योजना यशस्वी ठरली आहे. घरगुती इंधनासाठी दरवर्षी हजारो झाडांची कत्तल होत होती. परंतु या योजनेमुळे ग्रामीण भागातील घरापर्यंत एल.पी.जी. सिलेंडर पोहचले आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या दुर दृष्टीतुन साकारलेली ही योजना राज्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कुशल नेतृत्वाखाली घराघरापर्यंत पोहचली आहे.

ग्रामीण व निमशहरी भागात स्वयंपाक करण्यासाठी आजही अनेक गावात चुलींचा वापर केला जातो. ग्रामीण भागातील स्त्रिया पारंपारिक चुलीत जळणाऱ्या इंधनामुळे होणाऱ्या प्रदुषणाचा बळी ठरत आहेत. यावर कायमस्वरूपी उपाययोजना करण्यासाठी 'स्वच्छ इंधन, बेहतर जीवन' असा नारा देवुन केंद्र सरकारने १ मे २०१६ रोजी संपुर्ण भारतात प्रधान मंत्री 'उज्वला योजनेचा शुभारंभ केला. या योजनेचा मुळ उद्देश भारतातील दारिद्रय रेषेखालील सुमारे ५ कोटी महिलांना मोफत घरगुती एलपीजी गॅस देण्याचा केंद्र शासनाने संकल्प केला आहे. प्रधानमंत्री उज्वला योजनेअंतर्गत नागपुर विभागातील नऊ जिल्हयातील दारिद्रय रेषेखालील २ लाख ६ हजार कुटुंबाना उज्वला योजनेअंतर्गत एलपीजी गॅस जोडण्या देण्यात आल्या. हिंदुस्थान पेटोलियम कॉर्पोरेशन लिमिटेडने १ लाख ६ हजार ४९२ भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेडने ५३ हजार ३०६ अशा तिन कंपन्यानी गॅस वितरीत केल्या आहेत.

गेल्या अनेक वर्षापासुन ग्रामीण भाग चुल विहरीत करण्यासाठी प्रयत्न केले जात आहे. अनेक प्रकारच्या चुलींच्या रचना वापरात आल्या. तरीही त्यांची परिस्थिती मात्र आहे तशीच राहीली. चुलीतील धुरामुळे महिलांना त्रास होतो आणि त्यामुळे त्या विविध आजारांना बळी पडतात. स्वयंपाक करत असतांना घराच्या आतल्याआतच खेळत राहणाऱ्या या धुरामुळे स्त्रिया व त्यांच्या आसपास वागडत असलेले लहान बालके रोगग्रस्त होऊ शकतात. जवळच्या जंगलातुन व शेतातुन गोळाकरुन आणलेले लाकडे, चिपाड, वाळलेले गवत व थापलेल्या शेणाच्या गोवऱ्या इ. चा वापर करून ग्रामीण भागातील स्त्रिया स्वयंपाक

Scanned with CamScanner

करतात. अनेकवेळा इंधन जमा करण्याकरीता महिलांची पायपीट ही होते. त्यामुळे चुलीभोवती ग्रामीण भागातील सामाजीक, आर्थिक व आरोग्य विषयक समस्यांचे जाळे पसरलेले जाणवते ते दुर करण्याकरिता पुढाकार घेवुन प्रधानमंत्री उज्वला योजना कार्यान्वित करण्यात आली. या योजनेचा महिलांच्या जीवनमानात नेमके काय परीवर्तन झाले या योजनेची बरवर पहाता जी जाहीरात झालेली आहे, तेव्ह वास्तव आहे की वास्तव काही वेगळे आहे हे जाणून घेवून ते इतरांपर्यन्त पोहचविने अशा प्रकारचे महत्त्वाचे अध्ययन या माध्यमातून केल्या जात आहे. या योजनेचे महत्वपुर्ण उद्देश शासणाला जी वाटली ती अशी.

१. महिलांचे सक्षमीकरण व त्यांच्या आरोग्याची निगा राखणे.
२. स्वयंपाक करतांना लागडी जळण वापरल्यामुळे होणारे तीव्र दुष्परिणाम कमी करणे.
३. स्वयंपाककरीता अस्वच्छ जळण वापरल्यामुळे भारतात होणारे मृत्यु कमी करणे.
४. घरात लाकडी जळण वापरल्यामुळे लहान बालकांना बऱ्याच मात्रेत होणाऱ्या श्वासोच्छावासाच्या तक्रारी दुर करणे
५. दारिद्रय रेषेखालील जीवन जगणाऱ्या कुटुंबाना (उज्ज) निशुल्क एल गॅसकनेक्शन उपलब्ध करून देणे.
६. भारतामध्ये स्वच्छ इंधन वापरात वाढ घडवुन आणणे.

प्रधानमंत्री उज्वला योजनेस आवश्यक कागदपत्रे

१. बी. पी. एल. रेशनकार्ड
२. पंचायत अधिकारी किंवा नगरपालिका अध्यक्षाद्वारे अधिकृत बी. पी. एल. प्रमाणपत्र
३. एक फोटो व ओळखपत्र उदा. आधारकार्ड किंवा मतदान ओळखपत्र
४. एक पासपोर्ट आकाराचा फोटो
५. ड्रायव्हींग लायसेंन्स
६. टेलीफोन, लिज लिंक पानी बिल
७. पासपोर्ट झेरॉक्स
८. रेशनकार्ड
९. घराची अधिकृत कागदपत्रे
१०. LIC पॉलीसी
११. बँक स्टेटमेंट

ह्या योजनेचा लाभ घेण्यासाठी लाभार्थ्यांना केवळ एक अर्ज आपल्या जवळच्या एलपीजी वितरण केंद्रावर जाऊन सादर करावयाचा आहे. एलपीजी वितरण केंद्रावर अर्ज निशुल्क मिळतो अथवा ऑनलाईन अर्ज भरता येते. अर्ज सादर करतांना अर्जदाराला आपले संपुर्ण नाव, पत्ता, आधार कार्ड नंबर, जन–धन बँक खात्याचे नंबर देणे आवश्यक आहे.

Scanned with CamScanner

अर्ज सादर करताना अर्जदार वयानी १८ वर्षे पुर्ण केलेला असावा. तसेच दारिद्रयरेषे खालील महिलांनी अर्ज करणे आवश्यक आहे. प्रधानमंत्री उज्वला योजनेच्या या लाभार्थ्यांना योजने अंतर्गत गॅस कनेक्शन खरेदी करण्याकरिता १६०० रूपयाने आर्थिक सहकार्य करण्यात येणार आहे.

प्रधानमंत्री उज्वला योजनेकरीता पात्रतेचे निकश

१. ग्राहकाद्वारे देण्यात आलेली सर्व माहिती २०११च्या माहिती बरोबर जोडुनी जाईल व त्यानंतरच हा निर्णय घेतला जाईल की, ग्राहक योजनेस पात्र आहे की नाही.
२. ग्राहकाचे वय १८ वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक असणे गरजेचे राहील.
३. ग्राहक उच्च कुटुंबातील महिलाच असली पाहिजे. पुरूषांना या योजनेसाठी अर्ज करता येणार नाही.
४. ग्राहकांच्या घरामध्ये कोणाच्याही नावे पहिले स्वच्छ कनेक्शन नसावे.
५. ग्राहकांद्वारे अर्जामध्ये देण्यात येणारी संपुर्ण माहिती सत्य असावी.

गरीबांच्या फक्त ही योजना पोहचविण्याकरीता येत्या तीन वर्षात ८ कोटी कुटुंबे रूपये खर्च करून उज्वला योजना यशस्वी करण्याचा मानस केंद्र सरकारचा आहे. तसेच पात्रताधारी कुटुंबाला योजनेला एलपीजी सबसीडीमधुन जमा झालेल्या रकमेतुन गती दिली जाणार आहे. केंद्र सरकारने सन २०१५ मध्ये सुरू केलेल्या 'गिव्ह–इट–अप' अभियानाअंतर्गत आतापर्यंत ०१.१३ कोटी नागरिकांनी स्वतःहुन सबसीडीचा लाभ घेण्यास नकार दिला असुन ते बाजारमुल्यानुसार गॅस–सिलिंडर खरेदी करतात. या अभियानाला नागरिकांनी दिलेला भरघोस प्रतिसाद आणि त्या माध्यमातुन बँक खात्यात जमा झालेली रक्कम नक्कीच प्रधान मंत्री उज्वला योजनेला यश मिळवुन देणार आहे.

या योजनेसंदर्भात काही महत्वपुर्ण अभ्यासु व्यक्तींनी केलेले अभ्यासपुर्ण मतांचे

१) धर्मेंद्र प्रधान (पेट्रोलियम मंत्री)

धर्मेंद्र प्रधान यांनी २०१८–१९ पर्यंत संपुर्ण गॅस कनेक्शन देण्यात येईल असे त्यांनी सांगितले. त्याकरिता ८ करोड प्रावधान सरकारने केले आहे आणि १ वर्षाच्या आत ३ करोड नविन कनेक्शन करण्याने यायोजने अंतर्गत ठरविले आहे. प्रधानमंत्री यांनी सांगितले आहेत गॅस कनेक्शन २०११ च्या सोशल इकोनॉमिक कास्ट सेंससच्या आधारावर वाटप करण्यात येत होते. आता SC, ST वर्ग आदीवासी मागासलेले आणि भटकंती करणाऱ्या सोबतच काही आणखी जातींच्या लोकांना गॅस – कनेक्शन देण्यात येईल. https://indiatimes.com – feb 8, 2018 , Time – 07:35pm

२) अमित त्यागी

केंद्र सरकारच्या प्रधानमंत्री उज्वला योजने अंतर्गत कमजोर वर्गातील महाराष्ट्रातील परिवारातील महीला वर्गाना खुप मदत झाली. या योजनेला १ मे २०१६ ला उत्तरप्रदेशच्या बलिया या जिल्ह्यात (सबदबीद्ध सुरू करण्यात आली. या योजने अंतर्गत सरकारच्या दारिद्रय रेषेखालील जीवन जगणाऱ्या परिवारांना घरेलू गॅस कनेक्शन देण्यात आले. प्रधानमंत्री उज्वला योजना ही पेट्रोलिअम आणि प्राकृतीक गॅस मंत्रालयाच्या सहयोगाने चालवण्यात येत आहे. https://m.economictimes.com – Aug 17, 2018, Time – 3:36pm

Scanned with CamScanner

३) विवेक आनंद

२) व्यवायाभोवतालच्या परिस्थितीतील जे घटक व्यवसायाच्या विविध कार्यावर किंवा प्रगतीवर परिणाम करतात, त्या सर्व घटकांचा व्यावसायिक पर्यावरणाच्या संकल्पनेत समावेश होतो.

बी. सी. टंडन यांच्या व्याख्येवरुन खालील वैशिष्टये सांगता येतील.

१) व्यवसाय स्वतंत्रपणे वाढु शकत नाही.

२) व्यवसायाभोवतालचे वातावरण पोषक असावे लागते.

३) बदलांचा परिणाम व्यवसायावर होत असतो.

४) व्यवसायांवर परिणाम करणाऱ्या घटकांचा अभ्यास.

५) उद्योजकांनी जागरुक असावे.

Dr. Ambedkar College of Social Work ★ WARDHA

PRINCIPAL I/c.
Dr. Ambedkar College of
Social Work, Wardha

Scanned with CamScanner

तात्पर्य उद्योजकास पर्यावरणाच्या व्यावसायिक पर्यावरणातील विविध घटकातुन बदलाप्रमाणे योग्य ते निर्णय घेता येतात. निर्णय योग्य घेतले गेल्याने व्यवसाय सुरु करणे अथवा वाढविणे सोपे जाते तसेच व्यवसायामुळे जर नैसर्गीक पर्यावरण विपरित होत असेल तर उद्योजकाला प्रतिबंधक उपाय योजता येतात.

व्यावसायिक पर्यावरणाचे वैशिष्टये

१) परिणामकारक व यशापयश अवलंबुन असते.

२) व्यावसायिक पर्यावरण हे सापेक्ष आहे.

३) संख्यात्मक विचार केला जातो.

४) काही घटक स्थिर तर काही घटक अस्थिर असते.

५) बहिर्गत घटकांचा परिणाम होतो.

६) व्यावसायिक पर्यावरण गुंतागुंतीचे असते.

७) विविध घटकांचा परिणाम

व्यावसायिक पर्यावरणाचे घटक

व्यवसायाभोवतालच्या परिस्थितीतील जे घटक व्यवसायाच्या विविध कार्यावर किंवा प्रगतीवर परिणाम करतात. त्या घटकांचा व्यावसायिक पर्यावरणात समावेश होतो. व्यवसायांवर परिणाम करणाऱ्या विविध व्यावसायिक घटकांचा पुढीलप्रमाणे अभ्यास करता येईल.

व्यावसायीक पर्यावरणातील घटक

- राजकीय परिस्थिती
- नैसर्गिक परिस्थिती
- तांत्रीक परिस्थिती
- मनुष्यबळाची उपलब्धता
- कायदेविषयक परिस्थिती
- आंतरराष्ट्रीय परिस्थिती

उपरोक्त व्यावसायिक पर्यावरणातील घटकामधील येथे आपण नैसर्गिक परिस्थितीचा अभ्यास करु :-

नैसर्गिक परिस्थिती

नैसर्गिक परिस्थितीचा व्यवसायांवर परिणाम होतो याचे उत्तम उदाहरण म्हणजे शेतीसारखा सर्वस्वी निसर्गावर अवलंबुन असणारा व्यवसाय होय. जमीं कोणत्या पिकांना अनुकुल आहे. हवामान कोणत्या पिकांना पोषक आहे. एखाधा विकास किती पावसाची आवश्यकता असते यासारख्या प्रश्नाच्या उत्तरावर शेती व्यवसायात आपण कोणते पीक काढायचे हे शेतकरी ठरवतात. त्याचप्रमाणे कापड तयार करणाऱ्या कारखान्याला दमट हवामानाची आवश्यकता असते म्हणजेच व्यवसायांवर नैसर्गिक परिस्थितीचा परिणाम होत असतो. हे सिध्द होते ज्याप्रमाणे नैसर्गिक परिस्थितीचा व्यवसायावर परिणाम होत असतो. त्याचप्रमाणे

Scanned with CamScanner

व्यवसायांचाही परिणाम नैसर्गिक परिस्थितीवर होत असतो. रासायनिक पदार्थ बनवणाऱ्या व्यवसायामुळे हवेवर तसेच पाण्यावर अर्थात एकंदरित नैसर्गिक वातावरणावरच दुषित परिणाम होतो.

हया दुषित वातावरणामुळेच मानवावर नाहीतर इतरही सजिव सृष्टीवर विपरित परिणाम होतो आहे. अनेक नव - नवीन आजारांच्या विळख्यात अनेक सजिव बळी पडत आहे.

ऐका बाजुला यांत्रीकीकरणामुळे मानव जिवन सुखी समाधानी झाले असे आपण म्हणतो तर दुसरीकडे हया यांत्रीकीकरणाच्या , औद्योगिकरणाच्या प्रगतीमुळे नैसर्गिक वातावरण प्रभावित होत आहे. दिवसे दिवस दुषित होणाऱ्या हया वातावरणाला नियंत्रित करण्यासाठी भारतात पर्यावरण संरक्षण कायदा अस्तित्वात आला आहे. हया कायदयांच्या थोडक्यात काय तरतुदी आहे त्यांचा विचार आपण पुढे करु.

पर्यावरण संरक्षण कायदा १९८६ (Environment Protection Act 1986)

पर्यावरण संरक्षण कायदा १९८६ अंमलबजावणी केंन्द्र सरकारचे पर्यावरण , वन आणि वन्यप्राणी मंत्रालयाव्दारे केली जाते. त्याचे सर्व अधिकार केंन्द्र सरकारच्या अखत्यारीतील असतात. त्या दृष्टीने केंन्द्र सरकार अधिकाऱ्यांच्या नेमणुका करतो आणि त्या अधिकाराऱ्याचे अधिकार आणि कार्यपध्दती ठरवुन देते. त्यानुसार केंन्द्र सरकार अशा अधिकारी वर्गास आदेश देते , एखादया कारखान्याचे प्रदुषनाबाबत , हवेचे दर्जाबाबत, पाण्याच्या दर्जाबाबत, मातीच्या दर्जाबाबत तपासणी करुन त्यानुसार गॅझेटमध्ये त्याची माहिती प्रकाशित केली जाते. दुषित होण्याचे प्रमाण आणि त्याबाबतचे निर्देशांक ठरवते व प्रकाशित केले जातात. त्यात आवाजाचाही समावेश होतो. त्यानुसार विविध औद्योगिक उत्पन्नाच्या संदर्भात कारखान्यात मर्यादा ठरवुन दिली जाते. हया मर्यादेच्या उल्लंघन केल्यास त्यावर कारवाई केली जाते.

व्याख्या

१. " पर्यावरण " याचा अर्थ पाणी, हवा व जमीन आणि मनुष्यप्राणी तसेच इतर सजीव सृष्टी वनस्पती , सुक्ष्मजीव आणि संपत्ती यांच्यामध्ये आपसात आणि दोघांमध्ये परस्पर असलेला संबंध यांचा समावेश होतो.

२. " पर्यावरणविषयक प्रदुषण " याचा अर्थ पर्यावरणास अपायकारक असेल किंवा तसा ठरु शकेल अशा संकेद्रणात विद्यमान असलेला कोणताही घनरुप , द्रवरुप किंवा वायुरुप पदार्थ असा आहे.

३. " जोखमीचा पदार्थ " याचा अर्थ आपल्या रासायनिक किंवा भौतिक रासायनिक गुणधर्मामुळे किंवा हाताळण्यामुळे माणसांना इतर जीवसृष्टीस, वनस्पतींना , सुक्ष्मजीवांना , संपत्तीला किंवा पर्यावरणाला अपाय करु शकतो असा कोणताही पदार्थ किंवा सिध्द पदार्थ असा आहे.

कायद्याची उद्देश, कारणे, यंत्रणा व त्यात दिलेल्या उपाययोजना

नवनवीन उद्योगधंदयांना बाहेर सोडल्या जाणाऱ्या द्रवरुप, वायुरुप वा अन्य स्वरुपातील पदार्थांमुळे वातावरणातील नैसर्गिक घटकांना त्याच्या वाढीला आणि टिकुन राहण्याला विरोध होत आहे व परिणामी या सर्वांचाच मानवी जीवनावरही प्रतिकुल असाच परिणाम होत आहे. या सर्वांमधुन योग्य अशी उपाययोजना करुन याव्दारे बाहेर पडण्याच्या दृष्टीने कायद्याची

Scanned with CamScanner

गरज निर्माण झाली. जुन १९७२ मध्ये स्टॉकहोम येथे झालेल्या संयुक्त राष्ट्रांच्या मानवी पर्यावरणासंबधीच्या परिषदेत मानवी पर्यावरणाचे संरक्षण व सुधारणा करण्यासाठी समुचीत उपाययोजना करण्यासंबंधी निर्णय घेण्यात आला होता. या परिषदेच्या आधी आणि नंतरही पर्यावरण संरक्षणविषयक अनेकविधे उपाययोजना योजण्यात आल्या. मात्र या उपाययोजनांची अधिक चांगली अंमलबजावणी होण्यासाठी एक सर्वसाधारण असा कायदा असणे गरजेचे असल्याने जाणवल्यावरुन असा कायदा करण्याचा निर्णय घेण्यात आला.

पर्यावरण विषयक अनेक कायदे अस्तित्वात होते , मात्र हे सर्व कायदे एखाद्या विशिष्ट प्रकारच्या प्रदुषणाविषयी किंवा एखाद्या पर्यावरणाला घातक अशा पदार्थाविषयी होते व त्यामुळे सुंपर्णपणे सर्वसमावेशक अशा उपाययोजनांचा अशा कायद्यामध्ये अभाव असल्याचे आढळुन येते. म्हणुन पर्यावरणाचा आणि त्यांच्यावर परिणाम करणाऱ्या सर्वच प्रकारच्या घटनांचा पदार्थाचा आणि इतर घटकांचा विचार करुन पर्यावरण व मानवी आरोग्य यांना पुरक अशा उपायांची योजना करण्याच्या उद्देशाने हा कायदा करण्यात आला.

मानवी आरोग्याला , वनस्पतींना आणि मालमत्तेला तसेच पर्यावरणाला धोका पाहेचणार नाही या दृष्टीने त्यासाठी सुरक्षित पर्यावरणाची गरज लक्षात घेऊन हा कायदा तयार करण्यात आला.

पर्यांवरण अस्वच्छ , मलीन होणार नाही आणि पर्यांवरण दुषित होऊन बिघडणार नाही याची काळजी घेणे आवश्यक आहे. एखाद्या पदार्थांचे साठवणुकीमुळे, वाहतुकीमुळे, वापराच्या वेळी, गोळा करण्याच्या वेळी, त्याचा नाश करण्याच्या वेळी त्यात बदल करण्याच्यावेळी किंवा विक्रि करतांना प्रदुषण होणार नाही याची काळजी सर्वांनी घ्यावी, उत्पादन पर्यावरणविषयक संरक्षित, सुरक्षित असेल या सर्वांवर नियंत्रण ठेवणारी याबाबतची यंत्रणा केंन्द्र सरकारची असेल आणि त्या यंत्रणेव्दारे या अधिनियामानुसार केंन्द्र सरकार योग्य त्या उपाययोजना करेल की, ज्याव्दारे पर्यावरणाचा समतोल बिघडणार नाही. पर्यावरणाची प्रत सुधारली जाईल , तसेच हो दक्षता घेतली जाईल, की ज्यामुळे पर्यावरण दुषित होणार नाही या कायद्याची अंमलबजावणी करतांना प्रादेशिक राज्याची सरकारे आणि त्या सरकारमध्ये या संबंधीत काम करणारे अधिकारी यांची मदत घेतली जाते. मात्र त्याची अंमलबजावणी या अधिनियमातील तरतुदीनुसार केली जाते. या अधिनियमाची अंमलबजावणी करतांना या संबंधात असलेले उपलब्ध कायदेही विचारात घेतले जातात आणि त्यांचाही आधार घेतला जातो. ज्यामुळे उद्दिष्टांची पुर्तता होईल, त्यासाठी देशपातळीवर हा कार्यक्रम राबवितांना हेच उद्देश ठेवले जातात. ते म्हणजे पर्यावरणाचे संरक्षण पर्यावरण दुषित होणार नाही आणि त्या दिशेने नियोजन करुन त्यांची अंमजबजावणी केली जाते त्यासाठी पर्यावरणप्रतीबाबतचे निश्चित निर्देशांक ठरवले जातात.

त्यात प्रामुख्याने पर्यावरण दुषित होणारे घटक म्हणजे चिमण्यांमधुन तसेच वाहनांमधुन बाहेर पडणारे घातक वायु यांचाही विचार केला जातो. मात्र त्यात कोणत्या स्वरुपाचा वायु , धुर बाहेर पडत आहे आणि त्यापासुन पर्यावरणाचे प्रदुषण वाढण्यात कितपत घातक आहे याचे निर्देश ठरवले जातात. त्यासाठी काही सुरक्षिततेचे उपाय योजले जातात.

Scanned with CamScanner

126
157

केंन्द्र सरकारचे सर्वसाधारण अधिकार

पर्यावरणाचे संरक्षण व सुधारणा करण्यासाठी उपाययोजना करण्याचा केंन्द्र सरकारचा अधिकार

i) या कायदयाच्या तरतुदींच्या अधीनतेने, पर्यावरणाचे संरक्षण करण्याच्या आणि त्याचा दर्जा सुधारण्याच्या आणि पर्यावरणी प्रदुषणास प्रतिबंध करण्याच्या त्यांचे नियंत्रण करण्याच्या आणि त्या उपशम करण्याच्या प्रयोजनांकरिता आवश्यक किंवा समयोचित वाटतील असे सर्व उपाय योजण्याचा अधिकार केंन्द्र सरकारला असेल.

ii) विशेशत: आणि पोटकलम १ :- च्या तरतुदींच्या सर्वसाधारणतेला बाधा न आणता उपाय करता येतील.

१) पर्यावरणीय प्रदुषणास प्रतिबंध करणे, त्यांचे नियंत्रण व उपशम यासाठी एक राष्ट्रव्यापी कार्यक्रम आखणे व त्यांची अंमलबजावणी करणे.

२) पर्यावरणाच्या विविध स्वरुपांच्या संबंधात दर्जाविषयक मानके विहित करणे.

३) कोणत्याही विविध साधनांपासुन होणाऱ्या पर्यावरणविषयक प्रदुषकांच्या उत्सर्जनासंबंधी किंवा निस्सारणासंबंधी मानके घालुन देणे.

४) ज्या अपघातामुळे पर्यावरणविषयक प्रदुषण होण्याची शक्यता असेल अशा अपघातांना प्रतिबंध करण्याच्या कार्यपध्दती आणि संरक्षण तरतुदी अपघातांवरील सुधारात्मक उपाययोजना घालुन देणे.

५) पर्यावरणविषयक प्रदुषणास कारणीभुत ठरु शकतील अशा निर्मिती प्रक्रिया सामग्री आणि पदार्थ यांची तपासणी करणे.

६) पर्यावरणविषयक प्रदुषणाशी संबंधीत बाबी संबंधीची माहिती गोळा करणे आणि तिचा प्रसार करणे.

७) पर्यावरण प्रदुषनास प्रतिबंध करणे , त्यांचे नियंत्रण उपशम यांचेशी संबंधीत नियम पुस्तिका , संहिता किंवा मार्गदर्शिका तयार करणे.

८) कोणत्याही जागा , संयंत्रक , सामग्री , यंत्रसामग्री निर्मिती किंवा इतर प्रक्रिया सामग्री किंवा पदार्थ यांचे निरिक्षण करणे आणि पर्यावरण विषयक प्रदुषनास प्रतिबंध करण्याचे , त्यांचे नियंत्रण आणि उपशम करण्याचे उपाय योजन्याकरीता त्यास आवश्यक वाटतील अशा प्राधिकाऱ्यांना, अधिकाऱ्यांना किंवा व्यक्तिंना असे निर्देश आदेशाव्दारे देणे.

पर्यावरण (विवरणपत्र) सादर करणे

उद्योग, प्रचालन किंवा प्रक्रिया पार पाडणारी जल प्रदुषनास प्रतिबंध व नियंत्रण अधिनियम १९७४ (१९७४ चा ६) याच्या कलम २५ अन्वये किंवा हवा प्रदुषनास प्रतिबंध व नियंत्रण अधिनियम १९८१ (१९८१ चा १४) याच्या कलम २१ अन्वये किंवा या दोनही कलमान्वये संमती आवश्यक असणारी किंवा धोकादायक कचरा (व्यवस्थापन व हाताळणी) नियम १९८९ या खालील पर्यावरण (संरक्षण) अधिनियम १९८६ (१९८६ चा २९) या अन्वये दिलेल्या प्रतिकृतीची आवश्यकता असणारी प्रत्येक

Scanned with CamScanner

व्यक्ति ३१ मार्च रोजी संपणाऱ्या वित्तीय वर्षासाठीचे पर्यावरण विषयक (विवरणपत्र) संबंधीत राज्य प्रदुषण नियंत्रण मंडळाकडे १९९३ पासुन सुरु होणाऱ्या प्रत्येक वर्षाच्या (सप्टेंबर महिन्याच्या ३०) या तारखेला किंवा त्यापुर्वी सादर करावे.

शास्ती

न्यायधिकरणाच्या आदेशाचे अनुपालन करण्यात कसुर केल्याबद्दल शिक्षेची तरतुद पुढील प्रमाणे आहे.

१) जो कोणी या अधिनियमाखाली निर्णयाचे पालन करण्यास कसुर करणे , त्याला तीन वर्षांपर्यंत कारावास किंवा १० कोटी पर्यंत दंडात्मक कार्यवाही , किंवा दोन्ही शिक्षा होवु शकते. या शिक्षेनंतरही अश्याच प्रकारची कार्य सुरु ठेवल्यास , शिवाय अपराध सिध्द झाल्यास प्रत्येक दिवसासाठी २५,०००/- पर्यंत अतिरिक्त दंड होवु शकतो.
परंतु असे की , एखाद्या कंपनीने न्यायधिकरणाच्या व अधिनियमाखाली कोणत्याही आदेशांचे , निबाडयाचे किंवा निर्णयाचे पालन करण्यात कसुर केली असेल त्याबाबतीत अशी कंपनी २५ कोटी रुपयांपर्यंत असु शकेल अशा प्रकारचे वर्तन सुरु राहिल्यास प्रत्येक दिवसासाठी एक लाख रुपयापर्यंत अतिरिक्त दंडात्मक कार्यवाही होवु शकते.

२) फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ (१९७४ चा २) यामध्ये काहीही अंतर्भुत असले , तरी या अधिनियमाखालील प्रत्येक अपराध उक्त संहितेच्या अर्थांतर्गत बिगर जमानती असल्याचे मानण्यात येईल.
कायदयाच्या कक्षेत पर्यावरणाला नियंत्रीत करण्याकरिता कीतीही उपाययोजना केल्या तरी आपले पर्यावरण आणि त्यांची जपवणुक ही आपली जबाबदारी आणि कर्तव्य आहे, असे मानुन आपण आपले वर्तवणुक करित नाही तोपर्यंत पर्यावरणाची हानी थांबविणे तिचा आपल्या स्वार्थासाठी अधिकाधिक उपयोग करणे थांबविता येणार नाही. परंतु आपले पर्यावरण हे कोण्या एका व्यक्ती गट अथवा समुदायाची व्यक्तिगत मालमत्ता नाही तर तिची जपवणुक तिचा सांभाळ करणे हे प्रत्येकाचेच समतुल्य कर्तव्य आहे. ही जाणीव ठेऊनच आपण आपल्या पर्यावरणाचा सांभाळ करायला पाहिजे.

संदर्भ

१) बेले आकाश , तायवाडे बबनराव ; (२०१६), व्यवसाय संघटन , नागपुर : साई - ज्योती पब्लिकेशन
२) किशोर वंगळ ; (२०१५), उद्योजकता आणि विकास , नागपुर : साई - ज्योती पब्लिकेशन
३) नेरकर किरणचंद्र, कोल्हटकर मल्हार ; (२०१५), व्यावसायिक व औद्योगिक कायदे , नागपुर : साई - ज्योती पब्लिकेशन
४) पंडित र. वी. , देशपांडे प. श्री. ; (१९८०), कर्मचारी आणि औद्योगिक मानसशास्त्र, नागपुर : सुविचार प्रकाशन मंडळ

Scanned with CamScanner

List of Research Paper

Dr. Ambedkar College of Social Work, Wardha

2019 – 20

Research publication in the Journals notified on UGC International Journals

Sr. No	Faculty	Title of the paper	Impact Factor
1	Dr. S. D. Bhoikar	1) पालकत्व आणि पालकांची जबाबदारी	7.041
		2) सुजान पालकत्व	6.399
2	Dr. V. M. Vitankar	1)ग्रामीण भागातील वृध्दान्या कौटुबिंक आर्थिक आणि आरोग्यविषयक समस्याने अध्ययन	6.039
		2) Counseling for Neurotic persons	0.00
		3) Counselling for stress Reduction	0.00
3	Prof. P.R. Ghulaxhe	1) The Study on the Impact of cortoon Network on a childs Behavior	6.399
		2) मानवाधिकार व कौटुबिक हिसाचार	7.625
4	Dr. M. H. Zade	1) कौटुबिक सामाजिक व आरोग्यविषयक समस्याबाबत ग्रामिण भागातील महिलांचे अध्ययन विशेष सदर्भ – वर्धा जिल्हा	6.399
		2) किशोरी व युवतीना छेडखानी संदर्भातील दुष्टीकोन	7.041
		3) कौटुबिक हिसाचाराचे वास्तव	7.675

Social Work - Total Paper - 07


Total Impact factor - 33.503, Reecho Impact factor - 4.786

Sociology - Total Paper - 03

Total Impact factor - 21.115, Reecho Impact factor - 7.038

Principal T/C
Dr. Ambedkar College of Social Work, WARDHA

Scanned with CamScanner



Scanned with CamScanner

MAH/MUL/ 03051/2012 ISSN :2319 9318

आंतरविद्याशाखीय बहुभाषिक शोध पत्रिका

विद्यावार्ता™

April To June 2020
Issue-34, Vol-05

Date of Publication
1 May 2020

Editor
Dr. Bapu g. Gholap
(M.A.Mar.& Pol.Sci.,B.Ed.Ph.D.NET.)

विद्येविना मति गेली, मतीविना नीति गेली
नीतिविना गति गेली, गतिविना वित्त गेले
वित्तविना शूद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले

-महात्मा ज्योतीराव फुले

❖ विद्यावार्ता या आंतरविद्याशाखीय बहूभाषिक त्रैमासिकात व्यक्त झालेल्या मतांशी मालक, प्रकाशक, मुद्रक, संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायक्षेत्र:बीड

"Printed by: **Harshwardhan Publication Pvt.Ltd.** Published by **Ghodke Archana Rajendra** & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor **Dr. Gholap Bapu Ganpat.**

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205

Harshwardhan Publication Pvt.Ltd.
At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed
Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295
harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail com

All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

PRINCIPAL I/c.
Dr. Ambedkar College of
Social Work, Wardha

Scanned with CamScanner

ही या संकटाला सामोरे जाण्याची शक्ती आपण स्व बळावर मिळवू शकतो. आत्मविश्वास या गुणामुळे व्यक्ती शारीरिक, बौद्धिक व सामाजिक क्षेत्रात यश मिळवते व यशस्वी होते. यशस्वी झाल्याने आत्मविश्वास वाढतो. तेव्हाच व्यक्तीमत्व विकास झाला असे म्हणता येते.

संदर्भ-

१) वडनेरे, तंबाके (२०११) : उपयोजित मानसशास्त्र, कोल्हापूर, फडके प्रकाशन

२) करंदीकर, सुरेश (२००८) : शैक्षणिक मानसशास्त्र, कोल्हापूर, फडके प्रकाशन

३) पारसनीस, न.रा. (१९९०) : प्रगत शैक्षणिक मानसशास्त्र, पुणे, नरेंद्र प्रकाशन

४) कापंदे-पाटील, गंगाधर (२००९) : शैक्षणिक मानसशास्त्र, नाशिक, चैतन्य पब्लिकेशन

५) कुळकर्णी, के.व्ही. (२०००) : शैक्षणिक मानसशास्त्र, पुणे, श्री विद्या प्रकाशन

❑❑❑

20

पालकत्व आणि पालकांची जबाबदारी

डॉ. सुनिता भोईकर
सहाय्यक प्राध्यापक,
डॉ. आंबेडकर कॉलेज ऑफ सोशल वर्क वर्धा

आजच्या बदलत्या सामाजिक व आर्थिक परिस्थितीमध्ये आपल्या पाल्याकडे द्यावे तितके लक्ष देता येत नाही आणि बाहेरील बिघडलेल्या परिस्थिती मध्ये मुलावर जे वाईट संस्कार होण्याची भिती उत्पन्न झाली आहे. त्यामुळे भांबवलेले पालक संस्कार करणाऱ्या संस्थेकडे आपेने पाहात असल्यास त्यात फारसे नवल नाही.

प्रथम पालकांची कर्तव्ये काय आहेत, याचा विचार पालकांनी करावयास हवा खरे तर मुलांवर संस्कार कोण करतो ? याचे उत्तर पु. विनोबाजींनी दिले आहे. ते म्हणतात बालकांवर संस्कार करणारे आपण कोण किंवा कोणतीही संस्था हे काम पुर्णत्वाने करू शकत नाही. मुलांवर संस्कार करणारी आईच असते. तीच मुलांवर संस्कार करते आणि मुलही नकळत ते संस्कार उचलीत असतात.

सामाजिक परिस्थिती बदलत असली तरीही आपल्या बाळावर संस्कार होण्याच्या दृष्टीने आई वडिलांनी खबरदारी घेणे आवश्यक आहे. सिगारेट ओढणाऱ्या आपल्या वडिलांना पाहुन छोट्या बाळाला सुध्दा दोन बोट तोंडाशी नेण्याचा मोह आवरत नाही. आपले बाबा व आई कसे वागतात, काय करतात यावर लहानग्या गुप्त पोलिसांचे सतत लक्ष असते. बाळाला घरी ठेवुन आई वडिल सिनेमा पाह्यवयास जात असल्यास मुलाला एखादेवेळी तरी का इच्छा होणारच आपल्याला घरात ठेवुन दर रविवारी आई बाबा सिनेमाला जातात याचा राग लहान मुल आपल्या लहानशा चित्रकलेतुन प्रगट करतात. आपले वडील

PRINCIPAL I/c.
Dr. Ambedkar College of Social Work, Wardha

Scanned with CamScanner

आपल्याला सिगारेट आणावयास सांगतात आणि सिगारेट ओढणे लाईट या गोष्टींना मेळ मुलांच्या मनातून बसू शकत नाही. निष्पाप जीवाला खरे खोटे कळीन समजत नसते. त्याला खोटे बोलायला किंवा आचरण करायला आई व वडिलच अप्रत्यक्ष शिकवत असतात मुलांसमोर आई वडील भांडू लागले की, त्याचा विपरित परिणाम मुलांवर झाल्याशिवाय राहत नाही.

छोट्या बाळाने घरातील दैवत आई वडील असतात, जगात जे काही ज्ञान आहे ते आपल्या आई वडीलांच्याच जवळ आहे अशी त्याची गोड समजुत झालेली असते. या निष्पकल्याने शाळेत पहिले पाउल)ले म्हणजे त्याच्या निष्पकल्या जीवनात तिसरी ज्ञानी व्यक्ती प्रवेश करीत असते. ती म्हणजे त्याने शिक्षक अगर शिक्षिका. या तिघाच्या वरील त्यांच्या निष्ठेच्या भावनेला तडा पडू न देण्याची खबरदारी पालकांनी घ्यावयास हवी.

मुलांच्या संस्कारक्षम वयात जे संस्कार किंवा वळण मुलांना मिळते त्याचीच सोबत त्याला जीवनात मिळत असते. आणि ही त्याला मिळणारी सोबत मुलांला योग्य मार्गावर ठेवण्याच्या दृष्टीने उपयोगी पडते.

आई वडिलांवर अधिक जबाबदारी पडते ती आपल्या मुलाच्या जीवनाचे वळण सुसंस्कृत करण्याची, यासाठी त्यांनी पध्दतशीर प्रयत्न केले पाहिजे व कष्ट घेतले पाहिजेत. मुलांना वळण लावणारी परिस्थिती बाहेरून उत्पन्न करण्याचा आपण कितीही प्रयत्न केला ..ी आई व दायी मधील फरक त्यामध्ये असतोच. आजच्या या सामाजिक परिस्थितीत तर पालकांवरील ती जबाबदारी अधिक वाढली आहे आणि त्याला पालकांनी तोंड दिले पाहिजे.

उदयाच्या थोर नागरिकांचे जीवन घडविण्याचे कार्य आपल्याला करावयाचे आहे. याची जाणीव आई वडिलांनी सतत बाळगल्यास त्यांच्या पुढे मुलांच्या संस्काराच्या बाबतीत येणारी समस्या फारशी भेडसावणार नाही. पालकांनी हे लक्षात ठेवावे की, आपल्या बाळाची जडण घडण करण्याचे कार्य प्रामुख्याने त्यांनीच करावयाचे असते.

पालकत्व हा साडेचार अक्षरी शब्द आहे पण त्याची व्याप्ती मोठी आहे. पालकत्व हा शब्द याचाच म्हणजे बाळाच्या आई वडिलांशी संबंधित आहे. पालकत्व ही पालकांच्या आयुष्यात शेवटपर्यंत चालणारी क्रिया आहे. पालकत्वाची सुरूवात कधी आणि कशी होते हा प्रश्न बऱ्याच जणांच्या मनात असतो. त्याचे उत्तर मात्र सोप आहे.

पालकत्वाची सुरवात

(पहिला टप्पा)

आपण आपल्या बाळाला केव्हा आणि कशा मानसिक, भावनिक, शारीरिक आणि आर्थिक परिस्थितीत जन्म दयायचा? यावर जेव्हा पती पत्नी एकमेकांशी मन मोकळेपणाने चर्चा, विचार विनीमय करतात त्या क्षणापासुन पालकत्वाची सुरवात होते. लग्न झाल्यावर निसर्ग नियमानुसार स्त्रीला बाळ होणार याची खात्री असते. (काही स्त्रीया) पण .. आपल्या बाळाला आपल्या ईच्छेनुसार जन्म दयायचा की निसर्गाच्या ?.. हे ठरविण्याचा अधिकार पती पत्नीला असतो. या अधिकारानुसार जे पती पत्नी आपल्या सगळया शंका बाळाला वाढविण्यास आणि त्यांच पालन पोषण करण्यास समर्थ आहे याची सजगपणे आणि डोळसपणे तपासणी करून मग निर्णय घेतात त्यांचा तो निर्णय योग्य ठरतो.

(दुसरा टप्पा)

स्त्री जेव्हा गरोदर असते तो पालकत्वाचा दुसरा टप्पा होय. बाळ जेव्हा आईच्या पोटात असते तेव्हा त्याला आईची भावनिक, मानसिक आंदोलन कळत असतात. बाहेरच्या जगाच अवधान त्याला नसत आपल्या बाळाला काय आणि कस बनवायच आहे हे जर पालकाच्या मनात पक्क असेल तर त्यांच्यावर संस्कार करण्याचा हा सगळयात सुंदर कालावधी आहे. यात उदाहरण आईच्या पोटातुनच गर्भ संस्कार होत असतात. या टप्यात आई बरोबर वडिलही सहभागी झाले तर उत्तम. या गर्भ संस्कारामुळे बाळ जन्माला आल्यानंतर त्याला शिकवणं सोप जात. पोटात ऐकलेल्या गोष्टी आणि जन्मानंतर घडितलेल्या त्याच गोष्टी यात्यात त्याला संगती लावण सोप जात.

(तिसरा टप्पा)

Scanned with CamScanner

१ ते ३ वर्षे हा विसरु देवा हाल. यात मुलाला स्वत:च्या व्यक्तीमत्वाची जाणीव व्हायला सुरवात झालेली असते. त्याला स्वत:बद्दलचे निर्णय स्वत: घ्यायला आवडतात. उदा: – कोणते कपडे घालावे, खायला काय हवे, बाहेर कोणाबरोबर आणि कुठे जायचे. इत्यादी. ईथेच पालक त्याला आपल्या निर्णयाची अंमलबजावणी करायला भाग पाडतात आणि त्याची निर्णय घेण्याची क्षमता वाढण्याच्या आत खच्ची करतात. या वयात त्याने निर्णय त्याला घेतु दिले तर त्यालाच पुढे फायदा होईल.

३ ते ६, ६ ते १२, १२ ते १८, व १८ ते पुढे असे त्याच्या वयाचे टप्पे आहे त्यात त्याच्या वयानुसार पालकत्वाची दिशा ठरवावी लागते.

प्रत्येक मुल हे स्वतंत्र व्यक्तीमत्व असत.हे पालकांनी त्याच्याशी वागतांना लक्षात ठेवले पाहिजे. हाताची पाच बोट सारखी नसतात हे इथ लागु पडत भावंडामध्येही प्रत्येकाशी वागतांना पालकत्वाची दिशा वेगळी असु शकते. पुढची पिढी मानसिक, भावनिक, बौध्दीक आणि सामाजिक दृष्टया सुसंस्कृत घडवायची असेल तर पालकत्व अंगीकारून ते जाणीव पुर्वक आणि जबाबदारीने पुर्ण करण गरजेचे आहे.

पालकत्व हे अवघड असल तरी अशक्य नाही. ही अवघड वाट सहज करण्यासाठी पालकांनी स्वत:मध्ये वेळोवेळी बदल घडवुन स्वत:ला पाल्यांच्या जाणीवांना, भावनांना समजुन घेण्याच्या पातळीवर आणल पाहीजे. लहान मुल निरागस असतात त्याच वेळी पालकत्वाच नाणं खणखणीत वाजवल तर पुढल्या टप्यांमध्येही मुलांशी सुसंवाद साधण्यास आणि सशक्त नातेबंध निर्माण करण्यास सोप जात.

पालकच फक्त आपल्या पाल्यांना घडवतात अस नाही तर पाल्यही पालकांना त्यांच्या नकळत शिकवुन जातात.तेव्हा पालकत्व ही सहकार्यानी होणारी गोष्ट आहे. वयामुळे पालकांनी पुढाकार घेवुन मुलांना या क्रियेत सामिल करून घेतल तर पालकत्व खुप सोनेरी क्षण दोघांच्याही ओंजळीत भरभरून देत.

लग्न होताच पती पत्नीन पालकत्वाच ज्ञान घेण आवश्यक आहे. पुर्ण कुटूंबाच्या उत्तम प्रगतीसाठी ते फायदयाचच ठरत.

आजच्या धकाधकीच्या जीवनात आपण सर्वांना साध्या सोप्या आणि सुटसुटीत नियमांची आवश्यकता वारंवार असते. अशा नियमांची व्याप्ती व मर्यादाही ज्ञात असली पाहिजे वयाच्या सातव्या वर्षापासुन ते पंधराव्या वर्षापर्यंत [illegible] देत आहे.

१) आपल्या मुलांना स्वताची काळजी घ्यायला प्रेरित करा.

२) स्वत: आणि स्वत:च्या कार्यावर पुर्ण विश्वास ठेवायला शिकवा

३) मुलांच्या जिज्ञासु व्यक्तीला पोषक वातावरण निर्मीती करा.

४) स्वताचे ध्येय, उद्देश आणि कार्याचा ध्यास ठरवायला शिकवा.

५) मुलांना योजना बनवायला प्रेरीत करून मदत करा

६) मुलांना खेळाचे नियम जपत खिलाडु वृत्ती जपायला सांगा

७) मुलांना कार्यानुभव मिळविण्याकरीता कृती करायला प्रोत्साहन द्या

८) मुलांना दैनंदिन जीवनातील व्यवहारज्ञान शिकवा

९) घराची संस्कृती आणि शिष्टाचार पाळायला उद्युक्त करा.

१०) नेहमी विज्येत्यासम वर्तन ठेवायला प्रेरित करा.

११) स्वत:ची जबाबदारी/दायित्व आणि सहनशिलता अंगी बाणविण्यासाठी उत्तम मार्गदर्शक व्हा.

१२) सर्वत्र घरी विद्यालयात निपक्षपातीपणाची कास धरायला प्रोत्साहन द्या.

१३) परिस्थितीनुसार कणखर आणि मृदु वर्तन करायला प्रेरित करा

१४) यश आणि अपयश एकाच नाण्याच्या दोन बाजु आहेत दोन्हीचे दायित्व स्विकारण्यासाठी मन खंबीर ठेवण्यासाठी आपण सहाय्य करा. आपल्या अपत्यांना कोणत्याही गोष्टी तर्कशुध्द, ज्ञानरचानात्मक वृत्तीने आत्मसात करण्यास प्रोत्साहन द्या.

आपल्या जीवनशैलीला अनुसरून केलेला सारासार विचार व अनुभव यातुन सुजाण पालकत्व स्वीकरता येईल.

संदर्भग्रंथ सूची

—साळुंके उज्वला(२०१५ जुलै ०३),webdunia


—पाटील म. कृ.(२०१६ऑगस्ट २०)एवप्रभा

—_https://www.maayboli.com/node/52086

Dr. Ambedkar College of Social Work Wardha

PRINCIPAL I/c.
Dr. Ambedkar College of
Social Work, Wardha

Scanned with CamScanner



Scanned with CamScanner

ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL


AJANTA

Volume - IX Issue - I January - March - 2020

MARATHI PART - II

Peer Reviewed Referred
and UGC Listed Journal

Journal No. 40776



ज्ञान-विज्ञान विमुक्तये

IMPACT FACTOR / INDEXING
2019 - 6.399
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖
Asst. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Maths), M.B.A. (Mktg.), M.B.A. (H.R.),
M.Drama (Acting), M.Drama (Prod. & Dir.), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖



Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

Scanned with CamScanner

VOLUME - IX, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2020
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)

२६. सुजान पालकत्व

डॉ. सुनिता भोईकर
सहाय्यक प्राध्यापक, डॉ. आंबेडकर कॉलेज ऑफ सोशल वर्क, वर्धा.

यश आणि अपयश एकाच नाण्याच्या दोन बाजु आहेत. दोन्हीचे दायित्व स्विकारण्यासाठी मन खंबीर ठेवण्यासाठी आपण सहाय्य करा. आपल्या अपत्यांना कोणत्याही गोष्टी तर्कशुध्द , ज्ञानरचात्मक वृत्तीने आत्मसात करण्यास प्रोत्साहन द्या आपल्या जीवनशैलीला अनुसरून केलेला सारासार विचार व अनुभव यातुन सुजाण पालकत्व स्वीकाराल अशी अपेक्षा आहे.

प्रत्येक मातापित्यांना आपल्या मुलामुलींचे चांगले व्हावे, अशी अपेक्षा असते. आपली मुले स्वस्थ, निरोगी, सुदृढ , आनंदी आणि बहुगुणी असावीत ही त्यांची अपेक्षा रास्त असते. सर्वच क्षेत्रात त्यांनी यशस्वी व्हावे. त्यांच्या वाटयाला अपयश कधीच येऊ नये. मुलांना लहानाचे मोठे करतांना त्यांच्याकरिता भौतिक सुखसोयी सुविधा निर्माण करतांना अवघड परिस्थितीला तोंड देत भगिरथ प्रयत्न करावे लागतात. मुलांना शालेय अभ्यास करण्यासाठी प्रोत्साहन देत, प्रेरित कसे करावे हीच विवंचना त्यांना सारखी सतावत असते. दोन भावंडाची आपसातील भांडणे वादावादी कशी सोडवावीत ही समस्यांची उकल करतांना घरले तर चावते सोडले तर पळते अशी मनःस्थिती तयार होते. कारण प्रत्येक मुलाला आपुलकीने माया ममता करत लाडाकोडाने वाढविलेले असते. या समयी अतिशय संयमाने आणि समजुतदारपणाने दोघांनाही न दुखवता वाद मिटवावा लागतो.

अनेकदा पालक आपल्या लहानपणीच्या गोष्टी, अनुभव आठवुन समस्या सोडविण्याचा प्रयत्न करतात. माझ्या आईवडिलांनी माझे लालनपालन करताना ज्या पध्दती , रिती वापरल्या त्या आज विज्ञान तंत्रज्ञान माहिती युगात योग्य ठरत नाहीत. कारण त्यावेळची कौटूंबिक, सामाजिक आणि शैक्षणिक परिस्थिती व वातावरणामध्ये फारच तफावत असल्याची जाणीव होते. पण ते बोलुन दाखवता येत नाही यावर मात करण्यासाठी समवयस्क मित्रांना , सहकार्यांना मदतीसाठी विचारणा करतात. वैश्विक जाळे , संगणक , भ्रमणध्वनी या भौतीक साधनाव्दारे प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा प्रयत्न करतात. सर्वांकडुन उत्तरे मिळतात पण ती अर्थवट, संदिग्ध आणि व्यक्ती निरपेक्ष असतात. कारण " व्यक्ती तितक्या प्रकृती " हा निसर्ग नियम आहे. आजच्या जगण्यात, समाजात , अवती भोवती चंगळवादाचा प्रवाह अमर्याद वेगाने वाहतो आहे. मुलाची ईच्छा पुर्ण करण्यासाठी, त्यांना खुश करण्यासाठी कधीतरी त्या प्रवाहाबरोबर जाण्याचा नकळत प्रयत्नही केलेला असतो. शिशुवर्गातील मुले हट्ट करतात, रुसतात, रडतात. मागणीपुर्ण होताच हसु लागतात. किशोर आणि कुमार वयातील कधी कधी आक्रमक होवुन आकांडतांडव करतात. क्षोभजन्य उद्भवलेल्या प्रसंगी रागावा -रागवी, ओरडणे , भांडण हमरीतुमरी आणि अपशब्द बोलणे हे सर्व कटाक्षाने टाळण्याचा प्रयत्न , खटाटोप करायलाच हवा रागावल्याने प्रश्न समस्या , प्रसंग अधिकाधिक जटील होतात. राग येणे मनुष्याचा स्वभाविक गुणधर्म आहे. घर चौघात अथवा घरात त्याच प्रदर्शन हिंसक व्हायला नको पथ्य पाळणे

PRINCIPAL I/c.
Dr. Ambedkar College of
Social Work, Wardha

Scanned with CamScanner

पालकांच्याच हाती असत. आपल्या प्रतिष्ठेची, मान सन्मानाची नको तिथे शोभा करण्यात तथ्य नसण याची जाण आणि भान सातत्याने ठेवावि‍च लागते.

आपल्या मुलांच्या चांगल्या वर्तनाचे कामाचे कौतुक अथवा शाबासकी देतांना शब्दरचना तोलुन मापुन करणे गरजेचे आहे. याचे कौतुक करतांना इतर भावंडाशी किंवा तिकाईतापेक्षा चांगला / चांगली वागलीस , अशी तुलना मुळीच करू नका. मुलांना अशी एकमेकांशी केलेली तुलना आवडत नाही त्यांना कमीपणा वाटतो मुला मुलींचे कौतुक करणे म्हणजे चांगल्या अर्थपुर्ण शब्दांचा सकारात्मक दृष्टीकोनातुन केलेला सुयोग्य - सुसंगत वापर असतो. ते करतांना अंगलट येणार नाही याची खबरदारी मात्र घ्यायलाच हवी. मुलांनाही वाटते आई बाबांनी सारखे सारखे अभ्यासाचे दुमणे लावु नये. इतर मुलांसमोर, परक्या माणसांसमोर अपशब्द वापरून अपमान करू नये " हेच कर ते करू नको मी सांगतो ते ऐकलच पाहीजे , तुझ्यापेक्षा जास्त पावसाळे पाहिले आहे " मुलांना हे सर्व माहित असते याचा पुनरूच्चार केला की कटकट वाटते असा अनुभव पालकांना एकदा ना एकदा तरी आलेलाच असतो आई वडिलांच्या काही अपेक्षा, आकांक्षाही असतात यात आगळे वेगळे असे काहीच नाही पण ज्यावेळी मुल आई वडिलांच्या अपेक्षाची पुर्ती करू शकत नाही त्यावेळी सर्वच आई वडील स्वतचा त्रागा करतात. विषेशतः परिक्षेच्या वेळेचे गुणपत्रक पाहिल्यावर, क्रिडास्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा यावेळी हा त्रागा जास्त, त्रागेची जागा राग घेतो आणि त्याची आई वडिल व मुलांमध्ये दुरावा, नकळत निर्माण होतो. आई वडिल आणि मुलांच्या अपेक्षांमध्ये मतभेद असतात मुलांचे संगोपन करीत असतांना, लाड, कोडकौतुक किती करायचे, शिस्त कशी लावायची , वेळेची महत्व कसे पटवुन दयायचे याबद्दलही आई वडिलांमध्ये एकवाक्यता नसते. त्यातुनही मुलांनी यश संपादन केल तर त्यामध्ये आमचा वाटा अस सांगतांना मातापित्यांचा अहंनभाव सुखावतो. यश आणि स्थैर्य जर मुल मिळवु शकली नाही तर त्याला आम्ही जबाबदार नाही, आमचे दायित्व नाही, असे म्हणुन झटकताही येत नसते. अनेकदा यशापयशाच्या मोजायच्या फुटपटया मातापित्यांच्या आणि मुलांच्या वेगळया असतात. यामुळे घरात वैचारीक आणि भावनिक गोंधळाचे वातावरण निर्माण होते. नात्यामध्ये असहय ताण तणाव निर्माण होतो याचा विचार अवश्य करायला हवा.

मातापिता मुलांना प्रेम, माया, आपुलकी, ऐश्वर्य देवु शकतात. परंतु मुलांना विचार देवु शकत नाही. मुलांचे स्वतःचे स्वतंत्र असे विचार असतात. पालकांचा तसे नसे विचार त्यांच्यावर लादण्याचा सही असते. पालकांनी मुलाच्या सारख होण्याचा प्रयत्न करावा या मुलांना आत्मविश्वासाने व्यक्त करण्याचे स्वातंत्र्य देणे आवश्यक असते. प्रत्येक मुलांची आवड निराळी असते. [illegible] व्यक्तीमत्व असत त्यांच्या व्यक्तीमत्व विकासासाठी [illegible] करावे. आपल्याला वाटते म्हणुन असे करण्याचा प्रयत्न करू नये. प्रत्येक मुलांची आवड निराळी असते. [illegible] बळजबरीने लादुन व्यक्तीमत्व विकासासाठी [illegible] आवश्यक असत. एकतर वेळ नसे [illegible] नाही. मुल क्षणस्थ असतात. [illegible] रंगतो हा क्षणस्थ एकत्र होण्याचा सुर मुलांच्या [illegible] सांगड घातली तर , मन , [illegible] मुलांचे आंतरिक मनोबल

Scanned with CamScanner

आणि मानसिक सौदर्य खुलण्यास संधी प्राप्त होईल मुला मुलींच्या जीवनातील ऐन मोक्याच्या क्षणी मानवी मुल्य , विवेकबु आणि कौशल्य अपेक्षित असलेल्या घटना प्रसंगामध्ये कच खाणार नाही. मुल व्यक्ती म्हणुन व्यक्तीमत्वाची बहुरंगी , बहुढ आणि बहुगुणी बनतिल यात तिळमात्र शंका नाही. आपल्या मुला मुलींशी विविध प्रसंगी सुसंवाद साधतांना खालील विव करून पहा काही परिवर्तन होते का?

मुलांशी बोलतांना

- असे सांगणे टाळा - त्यांच्याशी अस बोलाव
- वडिलधाऱ्यांच नेहमी एकाव - तुला काय वाटत सांग वर
- दिलेला अभ्यास पाठ कर - अभ्यास समजुन उमजुन घे
- उगाचच फाजील चर्चा नको - यावर आपण चर्चा करू या
- पाठयपुस्तकाप्रमाणे सांग - तुझया स्वतःच्या शब्दात सांग
- जशास तसे लिहुन काढ - तुझ तु लिहुन बघ
- जस आहे तस पाहुन कर - तुला आवश्यक ते बदल कर
- भिऊन वाग - आपले काम योग्य असेल तर भिऊ नको
- प्रश्न विचारू नकोस - शंका निरासनासाठी जरूर प्रश्न विचार
- लहानांनी मोठयाच ऐकाव - लहान्यांना स्वतःची मत असतात
- यशस्वी व्हायलाच हव - यशापेक्षा प्रयत्नांच समाधान महत्वाच

वरील परिवर्तनामुळे विद्यार्थी किंवा मुल आपले स्वतंत्र विचार मांडतील. विचार करण्याचे सामर्थ्य आणि दाखवतील. याकरिता मुलांशी प्रत्येकवेळी नकारात्मकदृष्टीकोणातुन न पाहता, सकारात्मक दृष्टीकोनातुन त्यांच्याशी सुसं साधण्यातच आपल्या मुलांचा सर्वकष विकास होईल मुलांच्या मनोबलला भरभरक्कम असे अधिष्ठान लाभेल वर्तमानकाळात भविष्यकाळाचा वेग कसा घ्यायचा याचे ज्ञान ही अवगत होईल.

आपल्या लहान वयापासुन प्रौढवयापर्यंत फिटनेसचा वेगळा विचार करण्याची आवश्यकताच नाही कारण आप घरातील जीवनशैलीच आरोग्यवर्धक होतील. आजही थोडासा व्यायाम , शारीरिक हालचाली आणि सुयोग्य संतुलीत आ याचा समावेश दैनंदिन जीवनशैलीत अथवा दिनक्रमाने करायलाच हवा. कारण मुलांच्या वाढत्या वयातील शरीरिक उर्जा त्य स्वस्थ बसु देत नाही घरातच मोबाईलवर खेळ , दुरदर्शनवरील धारावाहीका पहा असा आपण त्यांना सल्ला व धाक असतो. शारीरिक उर्जेचे परिवर्तन चरबीमध्ये झाले की मग फिटनेससाठी प्रयत्न करतो. ज्याक्षणी शारीरिक हालचाली मंदाव , त्याक्षणापासुन अनेक व्याधी , तक्रारी सुरू होतील. आपण धाक देवुन मुलांच्या शारीरिक हालचाली थांबविल्यास आजा आवतन देणार हे निश्चीत शारीरिक हालचाली , कवायत , योगाने मन प्रसन्न आणि उत्साही होते. आळस , निराश्या उ

Scanned with CamScanner

नकारात्मक विचारांचा निचरा होतो. मन प्रसन्न असेल तर शरीर प्रसन्न, ताजेतवाने असते. शारीरिक व्याधी मुळेच मानसिक आरोग्य बिघडते. त्याकरीता जीवनात शारीरिक हालचाली , खेळ व्यायाम यांना स्थान दयायलाच हवे "निरोगी सुदृढ शरीर हाच खरा दागिणा आहे " असे आपणही अनुभवता आहात. मानसिक आरोग्य बिघडण्याचे पहिले कारण म्हणजे खाण किंवा दैनंदिन आहार. मुलांचा आहार कधी कमी तर कधी जास्त असतो आहार घेतात पण अनियमीतपणा असतो. अति खाण्याच्या वृत्तीमध्ये कधी जंक फुड , चिल्ड कोल्डींक असते कधी भुकच नाही. आहार आवडतां नाही. जेवणाला चवच नाही. खमंग व चमचमीत नाही असे अनेक कारणे सांगतात आणि जेवण टाळतात त्याचा परिणाम शरीरावर आणि मनावर होतो. त्यामुळे मानसिक आरोग्य बिघडते मुलें चिडचिडे , रागीट , उताविळ आणि हटवादी बनतात. मानसिक आरोग्य म्हणजे आपल्या मुलांच्या आयुष्यात घडणाऱ्या आणि भविष्यात येणाऱ्या बऱ्यावाईट सुख आणि दुःखदायक अनुभवांना खंबीरपणे सामना करण्याचे मनोबल असणे घरातील समाजातील विद्यालयातील व इतर व्यक्तींशी चांगला सुसंवाद साधुन एकमेकांना समजुन आणि उमजुन घेण्याची मानसिक शक्ती होय. संवेदनशील असणे हे सुयोग्य वर्तनाच लक्षण आहे. पण अतिसंवदेनशील व हळवे होणे योग्य नाही. मात्र घडलेल्या घटनेनुसार अभिव्यक्त होतांना संयम आणि समतोल राखण महत्वाच असत. आपली मुल नको तिथे आक्रमक किंवा हळवी होतात. त्यावेळी त्यांना कस हाताळायच , समजवायच हे न सुचल्यामुळे आपण हतबल होतो. मुलांनी खेळात सातत्याने भाग घेतल्यास सहभावना, सहनाभूती सात्विकवृत्ती जोपासली जाते. जिंकण्यासाठी नव्हे तर खिलाडुवृत्ती जोशिकपणा जोपासण्यासाठी खेळ खेळायलाच हवेत. त्याचवरोवर मुलांच्या व्यक्तीमत्वाला अनेकविध पैलु पडतात.

आजच्या धकाधकीच्या जीवनात आपण सर्वांना साध्या सोप्या आणि सुटसुटीत नियमांची आवश्यकता वारंवार असते. अशा नियमांची व्याप्ती व मर्यादाही जास्त असली पाहिजे वयाच्या सातव्या वर्षापासुन ते पंधराव्या वर्षापर्यंत उपयोगी पडणारी नियमावली पुढे देत आहे.

१. आपल्या मुलांना स्वताची काळजी घ्यायला प्रेरित करा.
२. स्वतः आणि स्वतःच्या कार्यावर पुर्ण विश्वास ठेवायला शिकवा
३. मुलांच्या जिज्ञासु व्यक्तीला पोषक वातावरण निर्मीती करा.
४. स्वताचे धेय , उद्देश आणि कार्याचा ध्यास ठरवायला शिकवा.
५. मुलांना योजना बनवायला प्रेरीत करून मदत करा
६. मुलांना खेळाचे नियम जपत खिलाडु वृत्ती जपायला सांगा
७. मुलांना कार्यानुभव मिळविण्याकरीता कृती करायला प्रोत्साहन द्या
८. मुलांना दैनंदिन जीवनातील व्यवहारज्ञान शिकवा
९. घराची संस्कृती आणि शिष्टाचार पाळायला उद्युक्त करा.
१०. नेहमी विज्येत्यासम वर्तन ठेवायला प्रेरित करा.
११. स्वतःची जबाबदारी / दायित्व आणि सहनशिलता अंगी बाणविण्यासाठी उत्तम मार्गदर्शक व्हा.
१२. सर्वत्र घरी विद्यालयात निपक्षपातीपणाची कास धरायला प्रोत्साहन द्या.

Scanned with CamScanner

१३. परिस्थितीनुसार कणखर आणि मृदु वर्तन करायला प्रेरित करा

१४. यश आणि अपयश एकाच नाण्याच्या दोन बाजु आहेत दोन्हीचे दायित्व स्विकारण्यासाठी मन खंबीर ठेवण्यासाठी आपण सहाय्य करा. आपल्या अपत्यांना कोणत्याही गोष्टी तर्कशुध्द, ज्ञानरचानात्मक वृत्तीने आत्मसात करण्यास प्रोत्साहन द्या. आपल्या जीवनशैलीला अनुसरून केलेला सारासार विचार व अनुभव यातुन सुजाण

१५. पालकत्व स्वीकरता येईल.

जो स्वतःच्या मुलाला त्यातील दोष घालवुन त्याच्यात सदगुण आणण्यासाठी सहाय्य करतो, तोच खरा पालक. सध्याची पालकाची व्याख्या काय? जास्तीत जास्त महागडे कपडे घेणे , त्यांना हवे ते खायला देणे आणि महागडया शिकवणी वर्गाला पाठविले की, यांचे कर्तव्य संपले. याने आपण आपल्या मुलाला भोगी बनवित आहो. भोगाच्या आधाराने अनेक विकार जन्म घेतात. भोगी व्यक्ती अनेक दोषांना जन्म देते. तर त्यागी व्यक्ती सदगुणांना जन्म देते. तेव्हा पालकांनी अंर्तमुख होवुन विचार करायला हवा की, आपण मुलाला खरोखरीचे शिक्षण देत आहे का? ""एखादया जीवाला सदगुणी करून त्याचे जीवन आनंदी करणे "" हाच पालकांचा धर्म आहे.

आनंदी पालकच आनंदी पिढी घडवु शकतो

आनंदी पालकच आनंदी पिढी घडवु शकतो. पाल्यांवर संस्कार करण्यासाठी पालक आणि पाल्य यांच्यात सुसंवाद असायला हवा. स्वतः तणावमुक्त असलेले पालकच आपल्या मुलांना तणावमुक्त जीवन जगायला शिकवु शकतात. आपल्या पाल्याशी सुसंवाद साधु शकतात. मुलांना तणावात असणाऱ्या पालकांशी संवाद करावसा वाटत नाही. त्यांना सुचणाऱ्या नविन कल्पना , विचार आणि स्वतःच्या समस्या तणावग्रस्त असणाऱ्या पालकांना सांगावश्या वाटत नाही. म्हणुन प्रथम पालक स्वतः तणावमुक्त असायला हवा.

पालकांच्या मनावर ताण येण्यामागील कारणे

अ) सतत भूतकाळात राहणे :- सतत भूतकाळात वावरणारे पालक मुलांशी संवाद साधु शकत नाही मुले सतत वर्तमान काळात जगतात, म्हणुन ती सतत आनंदी असतात. आपण आपल्या जीवनात घडलेले अनेक प्रसंग आणि घटना सतत आठवत राहतो. " शेजाऱ्याशी घडलेला प्रसंग ", " सासुबाई वाईट बोलल्या ", " कार्यालयात अधिकारी बोलले " या विचारांचे ओझे बहुतेकजण वाहत असतात. सहाजीकच मुले काही सांगत असतील, तर पालक त्यांचे विचार ऐकण्याच्या स्थितीत नसतो तेव्हा आपण सतत वर्तमानकाळात रहायला शिकले पाहिजे आपण भूतकाळाच्या विचारात वावरत असल्याने मुले आणि पालक यांच्यात सुसंवाद होवु शकत नाही.

आ) नकारात्मक बोलणे :- " तुला काही येत नाही , तुझ्या काही उपयोग नाही " अशा नकारात्मक बोलण्याने मुलांच्या मनावर घाव होतात एक वेळ स्थुलदेहावर केलेले घाव भरून निघतात, पण जीवाच्या मनावर झालेले घाव आयुष्य भरून काढु शकत नाही तेव्हा मुलांशी बोलतांना सतत सकारात्मक बोलायला हवे. आपल्या बोलण्यातुन प्रोत्साहन मिळायला हवे.

Scanned with CamScanner

इ) स्वतःच्या चुका मुलांसमोर मान्य न करणे :- स्वतःच्या चुका मान्य केल्याने मनावरचा ताण अल्प होतो मुलांच्या मनात आपल्या विषयी आदराचे स्थान निर्माण होते. आपले पालक कधीही आपल्याकडची चुका मान्य करायला शिकतात. आपण चुक लपवली तर , प्रथम आपल्या मनावर ताण येतो. दुसरा आपण केलेले कार्य चुका ठरतात " बाबा आणि आई स्वतःच्या चुका मान्य करीत नाही, मग मी का करावयात " असे मनात येऊ शकते. त्यामुळे पालक आणि मुले यांच्यात सुसंवाद दरी निर्माण होते.

ई) मुलांचे सतत दोष पाहणे :- मुलांमधील दोष सतत पाहिल्याने आपल्या मनावर ताण येतो. आपल्या मुलांचे गुण पाहावेत आणि त्यांचे कौतुक करावे. स्पर्धेमुळे मुले स्वतःचे दोष स्विकारून ते घालवण्यासाठी प्रयत्न करतात, पण बरेच पालक मुलांचे सतत दोषच दाखवतात " मुलांचे सतत दोष पाहणे - तणाव आणि मुलांचे सतत गुण पाहणे - आनंद " , हे सुत्र आचरणात आणले तर ताण न्युन होण्यास साह्य होते.

उ) स्वतःची प्रतीमा जपत बोलणे :- पालक व्यवहारातील त्यांच्या पदाला चिकटुन बोलतात. ते स्वतःला विसरत नाही. " मि आधुनिक वैद्य आहे " , " मि अभियंता आहे " किंवा " मि अधिकारी आहे " ही प्रतिमा जागृत ठेवुन बोलण्यानी पालक आणि मुले यांच्यात सुसंवाद कदापी होणार नाही. उलट पालकांना ताण येतो आणि मुले ऐकत नाही. " पालक " या भूमीकेत येवुन मुलांशी सहजतेने बोलायला हवे. व्यवहारातील प्रतिमा ठेवुन बोलणे , ताण आणि मुलांचा पालक म्हणुन बोलणे - आनंद हे सुत्र लक्षात ठेवायला हवे.

ऊ) अधिकारवाणीने बोलणे :- आपण मुलांशी बोलतांना अधिकारवाणीने बोलतो, तर त्यांना ताण येतो. मुलांना आपले बोलणे आवडत नाही. अधिकारापेक्षा आपण त्यांच्याशी प्रेमाने बोलायला हवे आपणाला स्वतःलाही कोणी एखादी गोष्ट अधिकारवाणीने सांगीतली, तर ती स्वीकारायीशी वाटत नाही तसेच हे आहे, अधिकारवाणीने बोलणे - तणाव आणि प्रेमाणे बोलणे - आनंद हे सुत्र आचरणात आणायला हवे

ए) " व्यक्ती तितक्या प्रकृती " , हे तत्व समजुन व्यवहार न करणे :- पालकांनो व्यक्ती तितक्या प्रकृती आहेत. आपल्या मुलाची प्रकृती कोणत्या प्रकारची आवड, कुवत, शारीरिक आणि मानसिक क्षमता या सर्वांचा विचार पालकांनी करायला हवा. स्पर्धावृत्ती आणि समाजातील स्वतःची प्रतिमा यानुसार काही पालक मुलांशी व्यवहार करतात. पर्यायाने मुले आणि पालक यांच्यात तणाव निर्माण होणे. असे होवु नये याकरिता मुलांची प्रकृती समजुन संवाद करायला हवा.

ऐ) समजादुन न सांगणे :- मुलांना प्रत्येक गोष्ट समजावुनच सांगावी. सम म्हणजे मुलांच्या स्तराला जावुन सांगणे. मुलगा पहिलीत असेल , तर पालकांनी त्याच्या स्तराला येवुन संवाद साधावा. यामुळे मुले आपले ऐकतात, पण पालक स्वतःच्या स्तरावर राहतात. त्यामुळे मुले ऐकत नाहीत. पालकांच्या अहंकारामुळे असे घडते, मुलांच्या स्तराला येवुन बोलणे त्यामुळे तणाव न्युन होतो.

ओ) मुलांशी संवाद नसणे :- स्वतः मुलांच्या समस्या ऐकुन घेणारे कोणीच नसते. पालक म्हणतात, " आम्हाला कामे आहेत ", तर शिक्षक म्हणतात " आम्हाला आमचा अभ्यासक्रम पुर्ण करायचा आहे ", पर्यायाने आज मुलांची फार मोठी मानसिक कोंडी झाली आहे. त्यामुळे पालकांविषयी मुलांच्या मनात आदर आणि विश्वास राहीला नाही. मग मुले ऐकत नाहीत,

Scanned with CamScanner

म्हणुन पालकांच्या मनावर ताण येतो. अनौपचारिक बोलल्यामुळे मने जुळतात याकरिता मुलांशी प्रतिदिन अनौपचारिक बोलणे आवश्यक आहे यातुन मुले मोकळी होतात. प्रतिदिन मुलांशी १५ मिनीटांचे अनौपचारिक मुलांमध्ये आनंद निर्माण होतो.

औ) अपेक्षा करणे :- आपण मुलांकडुन अपेक्षा ठेवुन व्यवहार करत असु, तर मुलांना आपले बोलणे अ त्यांच्यात अहं अल्प असल्यामुळे त्यांना अपेक्षेची स्पंदने कळतात. आपण निरपेक्षपणे त्यांच्याशी व्यवहार करावा. जे आहे, तेथेच प्रेम आहे. म्हातारपणी मुलगा माझा सांभाळ करील. समाजातील माझी पत टिकविल आणि वाढविल पालकांनी करू नये.


संदर्भ ग्रंथसूची

- पावसकर राजेंद्र गुरूजी य आदर्श पालक कसे व्हाल ;बाल संस्कार सुसंस्कारीत आणि आदर्श पिढी भवितव्य ख्र
- पाटील म. कृ. य ;२०१६ ऑगस्ट २०व्हए नवप्रभा
- https://www.navprabha.com

Dr. Ambedkar College of Social Work WARDHA

PRINCIPAL I/c.
Dr. Ambedkar College of
Social Work, Wardha

Scanned with CamScanner



Scanned with CamScanner

22

ग्रामीण भागातील वृद्धांच्या कौटुंबिक, आर्थिक आणि आरोग्यविषयक समस्यांचे अध्ययन

(विशेष संदर्भ – वर्धा शहरातील शांती नगर समुदाय)

डॉ. विजयता विटणकर
साहाय्यक, प्राध्यापक,
डॉ. आंबेडकर कॉलेज ऑफ सोशल वर्क वर्धा

मानवी जिवनचक्रातील अतिशय महत्वाचा आणि प्रेरणादायी कालखंड म्हणजे वृध्दावस्था आयुष्यभर प्राप्त केलेले अनुभव, ज्ञान आणि जिवनाविषयीचा उदार दुष्टिकोन आपल्या गाठीस बांधुन भावी पिढीला खऱ्या अर्थाने आपल्या अनुभवाचा फायदा व्हावा असा उददेश प्रत्येकच ज्येष्ठ नागरिकांचा असतो आणि त्यामुळेच ते प्रत्येकाला कधी आपल्या अनुभव संपन्न आयुष्याची माहीती देत असतात तर कधी – कधी तारूण्यामध्ये एखादी चुक होउन आयुष्य उध्वस्त होऊ नये हया करिता आजच्या तरूणानां जागरूक करत असतात परंतु त्यांनी सांगितलेल्या माहीतीचा किंवा दिलेल्या सल्याचा उपयोग आपल्या जिवनात करण्यापेक्षा सध्या परिस्थितीत आजची तरूण पिढी त्याची अवहेलना करण्यातच धन्यताच मानतात. आयुष्याच्या अखेरच्या टप्यात खऱ्या अर्थाने हया वृध्दांना त्यांच्या आप्ताची, नातेवाईकांची, मुलांची, नातवडाची आवश्यकता असते नेमके त्याच कालखंडात त्यांना हया सर्वाकडुन डावलेले जाते. सतत कुणाशी तरी बोलावे असे वाटत असतानां नेमके हयाच वयात त्याच्याशी बोलालयला वेळ नसतो, आयुष्यात अनेक अडचणी आणि संकटानां समोर जातानां केवळ आपल्या मुलांना विचार करणा–या हया वृध्दांकडे त्यानां जेव्हा हया मुलांची आवश्यकता असते तेव्हा मात्र त्याच्याकडे अजिबात वेळ न कमी अधीक प्रमाणात आज वृध्दाची ही स्थिती स समाजातच दिसायला लागली आहे. उच्च अ मध्यम वर्गातच नव्हे तर आर्थिक दृष्टया निम्न मध्ये असणाऱ्या वृध्दाची देखील अवहेलनां हो दिसत आहे. घरातुन बाहेर काढुन टाकणे, सतत टो बोलने, त्याच्यावर योग्य औषधउपचार न करणे, त मार – झोड करणे, पोटभर जेवायला न देणे सारख्या अनेक समस्या दिवसेनदिवस प्रकर्षाने जाण आहे. वृध्दाची समाजात होणारी ही अवहेलना खरोख चिंतेचा विषय बनत चालला आहे. वृध्दाची समाजात वर्तमान स्थितीती, समाजातील एंकदरीत त्याचा व त्याचे स्थान त्याच्या शारीरीक, मानसिक स्थितीत होणारा परिणाम जाणुन घेण्याकरिता संशोधनक वर्धा शहरातील शांतीनगर हया समुदयातील वृध्दा वर्तमान स्थितीचे अध्ययन करून मुलाखत अनुसुची माध्यमातुन हया परिसरातील वृध्दाचे माहीती प्र करून वृध्दाच्या वर्तमान स्थितीचे अध्ययन करण आले. हया परिसरात राहणारे सर्वच्या सर्व म्हणजे वृध्दाची माहीती प्राप्त करून त्या आधारे काही नि मांडण्यात आले आणि त्या निष्कर्षाच्या माध्यम वृध्दाची कौटुंबिक आणि सामाजिक दर्जा व सि सुधारावी हया करिता काही सुचना आणि शिफा सुचवण्यात आल्या.

महत्त्वपुर्ण अभ्यास –

टाटा इन्स्टिटयुट ऑफ सोशल सायन्सेस ऐका पाहणीनुसार वृध्दांच्या आर्थिक समस्या हया ८० टक्के आहेत. मोकळा वेळ कसा घालवावा समस्या २७.३५३ टक्के तर आरोग्य व वैद्यकी समस्या १०.२९ टक्के आहेत. एकटेपणाची स फक्त ७.०६ टक्के आहे. हया अभ्यासातुन आहे की, वृद्धत्वात आर्थिक साहाय्य किंवा पुरेसे प्राप्ती होणे आवश्यक ठरते.

ग्रामीण भागातील वृद्धांची स्थिती राहण्याच्या सोयीवरून अभ्यासली त्यात वृद्ध हे संयुक्त किंवा एकत्र कुटुंबात राहत ग्रामीण भागात वृद्धांच्या आरोग्य व वैद्यकीय हया शहरी वृद्धाप्रमाणेच असतात.

PRINCIPAL I/c.
Dr. Ambedkar College of Social Work, Wardha

Scanned with CamScanner

कुटुंबात वृध्दाना मार झोड करू नये, वृध्दाश्रमात टाकु नये, घरातील छोट्या मोठ्या निर्णयाबाबत सल्ला – मसलत केली जावी, कुटुंबातील वृध्दाच्या गरजा पुर्ण केल्या जाव्यात असे मत व्यक्त करणाऱ्या वृध्दानी संख्या ५५.५३ टक्के वृध्द आहेत म्हणजेच हया वृध्दानां कुटुंबात साधारणत: हया समस्या जाणवतात आणि त्या होउ नये असे त्यानां वाटते.

अर्थात आज वृध्दाच्या संदर्भात होणारे हींसात्मक प्रकरण वाढायला लागले आहे. त्यावर उपाय म्हणुन वृध्दाश्रम सुचविल्या जात असले तरी १००टक्के वृध्दांच्या समस्येवर प्रभावी उपाय असुच शकत नाही त्यामुळे वृध्दानी वर्तमान स्थिती सुधारण्याकरिता किंवा वृध्दाना सन्मानाने आपले जिवन जगता यावे याकरिता वृध्दानां आदर देणे आवश्यक आहे.

अशा प्रकारे वृध्दाच्या वर्तमान स्थिती आणि सामाजिक दर्जा जाणुन घेण्याच्या दृष्टिकोनातुन करण्यात आलेले संशोधनाच्या माध्यमातुन वर्धा शहरातील शांतीनगर समुदायात केलेल्या सर्वेक्षणातुन वृद्धांच्या संदर्भात उपरोक्त निष्कर्ष प्राप्त झाले हया निष्कर्षाच्या माध्यमातुन वृध्दाच्या समस्यावर सुचना, उपाय योजना आणि शिफारशी सुचवण्यात आल्या.

सुचना– शिफारशी

वृध्द समाजातील महत्वाचा घटक आहे, मानवी जिवनचकातील अतिशय महत्वाचा आणि आवश्यक घटक आहे. आजच्या पिढीला मार्गदर्शन करण्याकरिता वृध्द अत्यंत मार्गदर्शक ठरू शकतात त्या अनुसंघाने वृध्दाच्या समस्या सोडविण्याच्या दृष्टिने काही सुचनी हया संशोधनाच्या माध्यमातुन सुचविण्यात आल्या आहेत.

१. घरातील वृध्द हे आपली वैयक्तिकच नाही तर सामाजिक जवाबदारी आहे समाजातील प्रत्येकच वृध्दानां आदर–सन्मान दिला पाहोजे.तशी मुल्य जोपासुन तसे संस्कार आपल्या पाल्यानीं देयायला पाहीजे.

२. वृध्दाच्या गरजा समजुन घेउन त्यानां आदर सन्मान दयावा, वृध्दाअवस्थेतील त्यांच्या गरजा समजावून घेवून त्यांची पुर्तता करावी.

३. वृध्दानी स्वत:ला विविध कामामध्ये गुंतवून ठेवून त्यांना आवड असनाऱ्या सामाजिक कार्यात रूची घ्यावी.

४. आर्थिक गरजा लक्षात घेवून घरातील मंडळींनी वृध्दाना औषधोपचार, जीवनावश्यक वस्तूंची पुर्ती करण्याकरीता आर्थिक मदत करावी.

५. वृध्दाच्या वसाहती करिता वृध्दाश्रम हा पर्याय होवून शकत नाही त्यामुळे घरातील वृध्दाला कोणत्याही परीस्थितीत वृध्दाश्रमात जाण्यास भाग पाडू नये.

६. घरातील जबाबदार व्यक्तीने आपल्या वरिष्ठांसोबत सदैव सन्मानानेन बोलावे जेणे करून घरातील लहान मुले देखिल आपली वर्तनूक तशीच ठेवतील. एकंदरीत तोच सन्मान घरातील वृध्दांना प्राप्त होईल.

७. वृध्दांना देखिल आपल्या हक्क आणि अधिकाराबाबत जागरूक असावे. घरातील मंडळी त्यांच्यावर शारीरिक, मानसिक अथवा आर्थिक अत्याचार करत असतील तर तशी तक्रार पोलिस स्टेशन मध्ये करावी. यामूळे घरातील व्यक्तींच्या वर्तनुकीला नियंत्रनात ठेवता येईल.

८. वृध्दांना आपल्या समन्वयरकांना गट स्थापन करून त्या गटात आपल्या रूचीनुसार विविध कार्य करावे उदा. भजन, चर्चासत्र, वृक्षारोपन इ.

९. स्वत: वृध्दानी देखिल घरातील लहान लहान बाबींकडे दुर्लक्ष करावे.घरातील अनावश्यक बाबींकडे दुर्लक्ष करावे.

१०. शासनानी वृध्दांच्या समस्यांना गांभियाने विचार करून त्यांना सुखदायी जीवन जगता यावे याकरीता कार्यक्रमाची आखनी करावी आणि अंमलबजावणी देखिल करावी.

संदर्भ ग्रंथ सूची

१. बजाज संजय, २०११, निरामय वार्धक्य, नागपूर, विजय प्रकाशन.

२. बजाज संजय, २०१२, उत्तरायण, नागपूर, विजय प्रकाशन.

३. भागवत वि. गो. २००५, ज्येष्ट नागरिकांची सुखसोबती, पुणे सुयोग प्रकाशन

४. दांडेकर सुभाश, २००६, चाळाशीनंतरची वाटचाल, पुणे मेहता प्रकाशन.

PRINCIPAL I/c.
Dr. Ambedkar College of Social Work, Warora

Scanned with CamScanner

संस्कृती आणि वर्तमान स्थितीमध्ये
समस्येच्या संदर्भात त्याच्या सेवांच्या
Management of old Age– A critical
dia Persepecitive across cuture &
झालेल्या संशोधनात हया
यथायोग्य शास्त्रीय विश्लेषण Dr.
हयांनी 2011 मध्ये केले काही महत्त्वपुर्ण

वृद्धावस्थेतेनी सुरूवात नेमकी केव्हा
निश्चितता नसते.

व्यक्तीच्या शारिरिक आणि बौद्धीक वय
असा सहसबध लागुन पडेल असा
शारिरिक वय वाढत म्हणुन मानसिक ही
येत असेही नाही.

शारिरिक लक्षणावरून वृद्धत्वाचे मोजमापही
करता येत नाही. चिंता, भिती, तणाव,
आणि निराशितपणामुळेही अनेक व्यक्ती
लक्षणे वयाआधिच दिसायला लागतात.
हया संशोधनावरून अनेक महत्त्वपुर्ण
संशोधनाच्या दुष्टिकोनातुन प्राप्त झाले.

वृद्धांच्या आरोग्याच्या स्थितीबाबत Indian of
Research भारतीय वैद्यकीय परिषद (ICMR
प्रकाशित केलेल्या अहवालात वृद्धांच्या
शारिरिक व्याधीबाबत सखोल अध्ययन केले
अहवालानुसार वृद्धांना सर्वाधिक दृष्टिहिनतेची
आढळुन येते तर त्यानंतर बहिरेपणा हा आजारही
येत असल्याचे हया अहवालात म्हटले आहे.
पॉडीचेरी येथे २००५ मध्ये वृद्धांच्या संदर्भात
संशोधनात वृद्धांच्या शारिरिक व्याधीच्या बाबतीत
नमुद केल्या आहेत.

एकूण वृद्धापैकी सर्वाधिक म्हणजे ४३.४
वृद्धांना सांध्यातील दुखी व वागण्याची समस्या

२. सर्वाधिक म्हणजे ५७ टक्के वृद्धांना
आजार जसे अधुदृष्टी, दृष्टिहिनता दिसुन

३. तर ४२ टक्के वृद्धांना दाताची तसेच अन्न
समस्या दिसुन येते.

४. तसेच १५.०४ टक्के वृद्धांना कमी ऐकू
येण्याची समस्या आढळून येते.

५. १४ टक्के वृद्धांना इतरही आजार जसे
खोकला, नर्सिंग, वात, मधुमेह, अस्थमा, मुत्रविकार इ.
आजार दिसुन आले.

अश्याप्रकारे उपरोक्त संशोधन वृद्धांच्या संदर्भात अध्ययन करित असतांना अतिशय उपयुक्त आणि मार्गदर्शक ठरते.

उद्देश :–

१. ग्रामीण भागातील वृद्धांच्या कौटुंबिक समस्यांचे अध्ययन करणे.

२. ग्रामीण क्षेत्रातील वृद्धांच्या आर्थिक आणि आरोग्यात्मक समस्या जाणुन घेणे.

३. ग्रामीण भागातील वृद्धांच्या दर्जा आणि त्यांची भुमिका अभ्यासणे.

४. वृद्धांच्या समस्या सोडविण्याच्या दृष्टिकोनातुन सुचना सुचविणे.

उपकल्पना :–

१. ग्रामीण क्षेत्रातील वृद्धांना कुटुंबात समायोजन करतांना अनेक वैयक्तिक अडचणींना समोर जावे लागते.

२. ग्रामीण क्षेत्रातील वृद्धा तारूण्यअवस्थेत असंघटित क्षेत्रात कार्यरत असल्यामुळे उत्पन्नाचे निश्चत साधन नसल्यामुळे त्यांना वर्तमान परिस्थितीत आर्थिक अडचणींना समोर जावे लागते.

३. ग्रामीण भागातील कुटुंबात वर्तमान परिस्थितीत वृद्धांचा दर्जा दुय्यम आहे.

संशोधन पद्धती :–

उपरोक्त विषयाला अनुसरून माहिती प्राप्त करण्याकरिता समुदायातील वृद्धांकडुन प्रत्यक्ष माहिती प्राप्त करण्यात आली.

मुलाखत अनुसूचीच्या माध्यमातुन आणि निरिक्षणाच्या माध्यमातुन समाजात वृद्धांची वास्तविक स्थिती जाणुन घेवून विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा व दुय्यम स्त्रोतांचा वापर करण्यात आले आहेत.

संशोधन विषयाची व्याप्ती :–

संयुक्त राष्ट्रसंघाच्या दिलेल्या आकडेवारीनुसार सन १९८५ मध्ये जगातील वृद्धांची संख्या वय ६०

Dr. Ambedkar College of Social Work WARDHA
PRINCIPAL I/c.
Dr. Ambedkar College of
Social Work, Wardha
Scanned with CamScanner

Printing Area®

Peer Reviewed International Refereed Research Journal

At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed Pin-431126 (Maharashtra)

COSMOS IMPACT FACTOR 5.395

Certificate Of Publication

This is to certify that the review board of our research journal accepted the research paper/article titled आर्थिक मागासलेल्या कुटुंबातील मुलींच्या उच्च शिक्षणाचे समस्यात्मक अध्ययन of Dr./Mr./Miss/Mrs. VIJAYATA VIANKAR

It is peer reviewed and published in the Issue 60 Vol. 02 in the month of December 2019.

Thank you for sending your valuable writing for printing area Journal

Indexed (IIJIF) Impact Factor 6.039

ISSN 2394-5303

Editor in Chief Dr.Bapu G.Gholap

PRINCIPAL I/c. Dr. Ambedkar College of Social Work, Wardha

178 142

Scanned with CamScanner

IJEP International Journal of Economic Perspectives

ISSN: 1307-1637 UGC GROUP II

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

PUBLICATION CERTIFICATE

COUNSELING FOR NEUROTIC PERSONS

Authored By:

Dr. Vijayata Vitankar, Assistant professor

Dr.Ambedkar college of social work,Wardha

IN VOLUME 14 ISSUE 01 2020

Editor-in-Chief

Anthony Anyibuofu Kifordu (Ph.D)
Management, Leadership, Entrepreneurship & Human Resource Management
Delta State University Anwai Campus Asaba, Anwai, Nigeria,
https://ijeponline.org/

1307-1637

PEER REVIEWED REFEREED OPEN ACCESS UGC CARE INTERNATIONAL JOURNAL

PRINCIPAL I/c.
Dr. Ambedkar College of
Social Work, Wardha

Scanned with CamScanner

How to Cite:

Vijayata Vitankar (2020). Counseling for Neurotic Persons. *International Journal of Economic Perspectives*, 14(1), 13–22. Retrieved from https://ijeponline.org/index.php/journal/article/view/31

COUNSELING FOR NEUROTIC PERSONS

Dr. Vijayata Vitankar

Assistant professor

Dr.Ambedkar college of social work,Wardha.

Abstract

Modern era is the era of internets and networking for communication without personal contacts. Further globalization and industrial development have created stress and tensions. This mental pandemic has unfortunately resulted in creating the disorder and disruptions in the neurotic system in human brain. Since no established therapy has any curative or preventive medicines, the psychologists are attempting to minimize the impact of disorder on human performance and behavior. This paper is an attempt to throw light upon the system of counseling for the neurotics.

Introduction

समाजातील स्त्रियांचे स्थान हे कौटुंबिक स्थानावरून कळते. त्यांना घरामध्ये स्थान असेल, सन्मानाची वागणूक मिळत असेल तर त्यांना समाजात सुध्दा मानाचे स्थान फार महत्वाचे ठरते. त्यांना घरात स्थान मिळाले की त्यांच्या आरोग्याचा, त्यांचा मनाचा विचार देखिल घरामध्ये केला जातो.

संशोधिका कूटुंब व बाल कल्याण या विषयाची अभ्यासक असून गेली 22 वर्ष महिलांच्या विविध पैलुंवर अभ्यासपुर्ण लिखान करतात, व्याख्यान देतात. ग्रामिण महिलांसदर्भात जवळीक साधुन, संवाद साधुन त्यांनी महिलांची स्थिती जवळून बघितली आहे. गेल्या 10 वर्षांपासून त्या वर्धा येथे समाजकार्य महाविद्यालयात सहाय्यक प्राध्यापिका म्हणून कार्यरत आहे. या महाविद्यालयामार्फत दर वर्षी घेण्यात येणाऱ्या ग्रामिण शिबीराच्या माध्यमातून वेगवेळ्या गावातील महिलांशी संवाद साधण्याल्यानंतर त्याच्या समस्येची जाणीव संशोधनकर्तीला झाली. आणि म्हणूनच भारतामधील ग्रामिण महिलांची कौटुंबिक, सामाजिक तसेच आरोग्यविषयक स्थिती त्यांच्या स्वानुभवातून जाणून घेण्याकरीता हा अभ्यास करण्यात आला.

उद्देश

- ग्रामिण भागातील महिलांच्या कौटुंबिक जबाबदाऱ्या आणि असणाऱ्या समस्या जाणून घेणे.
- महिलांचे कुटुंबातील व समाजातील स्थान अभ्यासने.
- महिलांच्या आरोग्यविषयक समस्या जाणून घेणे.

प्रस्तुत अध्ययनात वापरण्यात आलेली संशोधन पध्दती.

गुणात्मक पध्दत

या विषयाच्या खोलवर जावून माहिती घेण्यासाठी आणि महिलांना बोलके करण्यासाठी या पध्दतीचा वापर केला. हा विषय जिव्हाळयाचा असल्यामुळे यात रूची वाढत गेली. हा विषय सर्वच महिलांच्या भावनांना व मनाला स्पर्श करणारा असल्यामुळे त्यांनीही उस्फुर्त प्रतीसाद दिला. या संशोधनात ही पध्दत वापरून संशोधन केल्यानी अधिक सुक्ष्मपणे अभ्यास करून मांडणी करणे उपयुक्त असल्यामुळे गुणात्मक पध्दतीचा वापर करून संशोधन करण्यात आले. गुणात्मक पध्दती मध्ये सहभागी संशोधन व फोकस ग्रुप डिस्कशन करून निरीक्षण नोंदविण्यात आली.

नमुनानिवड पध्दती

प्रस्तुत संशोधनाकरीता ग्रामिण भागातील महिलांची निवड ही विशिष्ट हेतू ठेवून करण्यात आली. म्हणून या करीता उद्देशपुर्ण नमुना निवड पध्दतीचा वापर केला गेला.

Scanned with CamScanner

तथ्यसंकलन पध्दती

प्रत्यक्ष मुलाखत

हा विषय अत्यंत संवेदनशील असल्यामुळे प्रत्यक्ष मुलाखत ही फार महत्त्वाची ठरते. कारण जेंव्हा आपण प्रत्यक्ष मुलाखत घेतो त्यावेळी वाचिक सारीक बाबी लक्षात घेवून पुढील व्यक्तीला जाणून घेवून तथ्य संकलन करीत असतो. परंतु सदर संशोधनात व्यक्तिश: प्रत्यक्ष मुलाखत घेवून तथ्यसंकलन करण्यात आले.

निरीक्षण

या सर्व मुलाखतीच्या वेळी संशोधकाला तेथील परीस्थितीचे तसेच उत्तरदात्यांचे निरीक्षण करता यावे म्हणून निरीक्षण पध्दतीचाही वापर करण्यात आला.

काही महत्वपुर्ण अभ्यास

स्त्रियांच्या सामाजिक कौटुंबिक व आरोग्यविषयक समस्येवर बोलतांना आपल्याला लिंगभेदानवर अभ्यास करणे आवश्यक आहे. कारण सकाळी उठल्यापासून तर रात्री झोपेपर्यन्त महिला घरातील काम करीत असतात. त्यांच्या या कामाचे कोणीही मोजमाप ठेवत नाही आणि त्याचा मोबदला त्यांना योग्य त्या प्रमाणात कधीच मिळत नाही.

- श्रमशक्तीमधील स्त्रियांचा सहभागाचा दर सर्वात कमी असलेल्या उदयोन्मुख अर्थव्यवस्थांमध्ये भारताचा समावेश होतो. आणि भारतातील हा दर कमीच होतो आहे. कामाच्या वेळा लवचीक असणं आणि घराजवळ काम मिळणं याला महिला प्राधान्य देतात. 2018 साली झालेल्या एका अभ्यासानुसार काळजी वाहू अर्थव्यवस्थेना ताण म्हणजे घरात व सामुदायीक पातळयांवर स्त्रीयांना कराव्या लागणाऱ्या आर्थिक कृतींचा मोबदला मिळत नाही. आणि त्यात त्यांचा वेळ जातो. हा एक महत्वाचा घटक स्त्रियाचा श्रमशक्तीमधील सहभाग कमी होण्याला कारणीभूत ठरतो. तर विनामोबदला कामामध्ये जाणारा वेळ, विशेषत: ग्रामिण समाजामध्ये हे अधिक प्रमाणात दिसतं कारण तिथे पितृसत्ताक नियमानुसार लिंगभावात्मक भूमिकांनी कठोर विभागणी असते. आणि धार्मिक, निषिध्दता आणि सांस्कृतिक पुर्वग्रह यांनी हे नियम टिकवून ठेवले जातात. अलिकडच्या काळात कुटुंबाचा आकार कमी झाला आणि दुर्दशेवर तोडगा काढण्यासाठी ग्रामिण पुरूषांचं स्थलांतरण वाढलं त्यामुळे विनामोबदला कामाचा महिलांवरचा ताण प्रमाणाबाहेर वाढतो आहे.
- ' ऑर्गनायझेशन फॉर इकॉनॉमिक को –ऑपरेशन ॲन्ड डेव्हलपमेनट " या संस्थेने केलेल्या वेळवापरासंबधीच्या अभ्यासानुसार भारतीय स्त्रिया सध्या दर दिवसाला 352 मिनिटं घरघुती कामावर खर्च करतात. विनामोबदला कामावर पुरूषांचा जितका वेळ खर्च होतो त्याहून 577 टक्के अधिक वेळ स्त्रीया या कामावर खर्च करतात.

स्त्रियांच्या कामाचा मोबदला न देता त्यांच्याकडून काम करवून घेतल्या जाते आणि ते फक्त कर्तव्य आहे, स्त्रियांचे त्यानी घरातील सर्व कामे केलीच पाहिजे. लग्न करतांना शिक्षणासोबतच तीला घरकाम येणंही आवश्यक समजल्या जात. लग्नाआधी अभ्यासात अत्यंत हुशार असणाऱ्या मुली लग्नानंतर करीअर करतीलच असे नाही. करीअर पेक्षाही त्या संसारात अधिक गुरफटलेल्या दिसतात. या सर्वामध्ये तिची घुसमट होते. ती स्वत: पुरती मर्यादित न राहता कुटूंबच तीचे सर्वस्व असते. आता तरी बदलत्या काळानुसार पुरूषांनी बदलायला हवं.

Scanned with CamScanner

तथ्य संकलन व विश्लेषण

- ग्रामिण महिलांची शैक्षणिक स्थिती जाणून घेतली असता असा निष्कर्ष निघतो की, अधिकाअधिक महिलांना इच्छा असूनही शिक्षण घेता आले नाही. घर सांभाळण्याकरिता, लहान भावंडांना सांभाळण्याकरिता तसेच आर्थिक परिस्थिती ठिक नसल्यामुळे त्यांना शिक्षण घेण्यापासून वंचित रहावे लागले. म्हणेचच या सर्व विपरीत परीस्थितीच्या बळी या महिलाच ठरल्या आहेत.
- ग्रामिण महिलांना घरकामासोबतच शेतीकामात देखिल मोठया प्रमाणात सहभाग घ्यावा लागतो. घरी येवून पुन्हा घरकाम वाट बघतच असतं. अशा एक ना अनेक जबाबदाऱ्या त्यांना समाजाच्या चाकोरीत राहून पार पाडाव्या लागतात.
- लग्न करताना त्यांना विचारले देखिल नाही असे 99 टक्के महिलांच्या बाबतीत घडले. लग्ना संदर्भात त्यांना विचारत घेतले नाही, परंतु घेणे तर फारच दूर राहिले. होणाऱ्या जोडीदारासंदर्भात त्यांना अजिबात माहिती नव्हती. सासरच्या मंडळींबाबत तर त्यांना माहिती देखील नव्हती. म्हणजेच जोडीदार निवडीचा अधिकार त्यांना नाहीच.
- सोळा ते वीस वर्ष या वयोगटात विवाहीत होवून लगेच दुसऱ्या वर्षी बाळंतपणाला सामोरे जाणाऱ्या महिला या 75 टक्क्याहून अधिक आहे. बाळंतपणात फारशी काळजी न घेणे, औषधोपचार व्यवस्थितपणे न होने, वारंवार बाळंतपण व गर्भपाताला सामोरे जाण्यामुळे आरोग्यावर त्याचा विपरीत परीणाम होतो आहे. आज अनेक आजारांना महिलाना सामोरं जावं लागत आहे. आजही त्यांना होणाऱ्या आजारपणाकडे त्या लक्ष देत नाही तर अनेकदा दुखने अंगावर काढतात. परीणामी दिवसेदिवस आरोग्य ढासळत जाते.
- जवळजवळ साठ टक्के महिलांना तंबाखू, नस, खर्रा, गुटखा, सुपारी इत्यादी व्यसन आहे. यामुळे देखिल त्यांच्या आरोग्यावर विपरीत परीणाम होतात.
- घरामध्ये महिलाच्या मताचा आदर होत नाही. त्यांच्या मनाचा विचार होत नाही. त्यांना अनेकदा दुखावल्या जातं नव्वद टक्क्याहून अधिक महिलाना या त्रासामुळे घर सोडून जावेसे वाटते पण सातत्यांनी आपल्या मुलांचा विचार करून त्या घर देखिल सोडून जावू शकल्या नाही. इथल्या पुरूष सत्ताक व्यवस्थेने तिला इतकं जखडून ठेवले आहे की,त्या या दुष्टचक्रातून बाहेर पडू शकत नाही.
- 80 टक्के महिलांना वाटते की केवळ समाजाच्या विविध बंधनामुळे त्या कोणत्याही बाबी करावयास धजावत नाही. समाजाचं दडपण सातत्यानी जाणवते.

निष्कर्ष व सारांश

"कौटुंबिक, सामाजिक व आरोग्यविशयक समस्यांबाबत ग्रामिण भागातील महिलांच्या स्वानुभावाचे अध्ययन". या विशयावर अभ्यास करतांना ग्रामिण भागातील महिलांच्या घेतलेल्या मुलाखतीवरून असे आढळून आले की, महिलांना घरामध्येच सन्मानाची वागणूक मिळत नाही. त्यांच्या आरोग्याकडे पण जबाबदारीने लक्ष दिल्या जात नाही. सर्व महिलांच्या समस्यांचा विचार केला तर असे लक्षात येते की, सर्वच महिला शेतीचे काम करतात. तर आजही

Scanned with CamScanner

ग्रामीण भागातील स्थिती फारशी सुधारलेली नाही. कारण स्त्रियांना घरकामाच्या जबाबदारीबरोबरच शेतीतिल कामाचीही जबाबदारी पार पाडावी लागते.

महिला स्वतःचा विचार न करता, त्यांच्या आजारपणाकडे दुर्लक्ष करून दुसऱ्यांसाठी काबाडकष्ट, याचाच परीणाम नंतर त्यांना अनेक आजारांना बळी पडावं लागतं.आजही ग्रामीण भागातील महिलांचे हिमोग्लोबीन हे 7 ते 9 ग्रॅम असणाऱ्या महिला अधिकाश आहेत. प्रसुतीकाळात मृत्युपावणाऱ्या महिलाही अधिक आहे. एकुणच त्यांची प्रकृती ढासळण्याचे कारण त्या स्वतःच्या आहाराबाबत, त्यातील पोशक घटकांबाबत त्यांना फारशी माहित नसते. कुटुंबातील इतर सदस्यांच्या जेवनानंतर जे उरणार त्यातून त्या जेवण करतात. एकूणच आहाराची गुणवत्ता व प्रमाणाची पुर्तता होत नाही. याचा परीणाम त्यांच्या शरीरावर होतो.

कुटुंबातील कौटुंबिक वातावरणात त्यांना किंमत असेलच असे नाही. त्यांच्या मनाप्रमाणे अनेक बाबी होत नाही. त्यांचे मत लक्षात घेतले जात नाही. निर्णय प्रक्रीयेत त्यांना सहभाग नसतो. दुय्यम दर्जाची वागणूक त्यांना मिळते. समाजात महिलांना आजही दुय्यम दर्जाची वागणूक मिळताना दिसते. अनेकदा या अहवेलनेचा अंत होतो आणि त्यांना घर सोडून देखिल जावस वाटतं. घर काही त्यांची पाठ सोडत नाही. मुलाबाळांचा विचार करून त्यांचा पाय निघत नाही इतकी कर्तव्य निश्ठा त्यांच्या ठायी असते.

सुचना / शिफारशी

- महिलांचा समाजातील दर्जा सुधारण्याकरीता प्रत्येकाने आपल्या घरापासून सुरूवात करावयास पाहिजे.
- महिलांनी आपल्या मुलाला व मुलीला समान संधी व समान वागणूक दिली पाहिजे.
- घरामध्येच मुलगा व मुलगी यात भेदपुर्ण वातावरण ठेवू नये.
- सरकारणी शाळा, महाविद्यालयांमधुन स्त्री पुरूष समानतेचे मुल्य रूजविणारे अभ्यासकम तयार करून ते शिकवायला पाहिजे.
- आरोग्य, आहार याविशयी मुलिंना व मुलांना लहानपणापासूनच दक्षता घ्यावयाची सवय अंगवळणी पडावयास प्रयत्न व्हावयास पाहिजे.
- गावोगावी आरोग्य तपासणी होवून महिलांना जागृत केले पाहिजे.
- गरोदर पणात महिलांची अधिक दक्षतेने काळजी घेतली पाहिजे.
- गर्भपाताचे प्रमाण कमी व्हायला पाहिजे. अपत्यांच्या संख्येसंदर्भात जागृकता वाढविणे गरजेचे आहे.
- प्रत्येक व्यक्तीचे व्यक्तीस्वातंत्र मान्य करून त्यानुसार त्यांना जगण्याची मुभा देणे.
- स्त्रियांना व्यक्ती म्हणून, एक मानुस म्हणुन सन्मान दयावा.
- कौंटुंबिक जीवन सामाजिक स्थिती, आर्थिक अधिकार व आरोग्यविषयक प्रश्न यावर महिलांचे गटागटातून प्रशिक्षण, गटचर्चा व इतर साधणाद्वारे शिक्षण झाले पाहिजे या काळात सामाजिक संस्था, शिक्षणसंस्था व शासकियविभागांनी विस्तार कार्यकम रावविणे गरजेचे आहे.
- अशा संस्थांना शासकीय पातळीवरून वित्तीय मदत मिळाली पाहिजे.

Scanned with CamScanner


- स्त्रियांप्रमाणे पुरूषाचे सुध्दा गटागटातून शिक्षण व प्रशिक्षण व्हावयास पाहिजे.
- समतामुलक कुटुंब पध्दती समाजात ताबिस लागावयास हवी.

संदर्भ सूची

- नंदिता शहा , (1992) 'स्त्री संघर्षाची नवी रूपं', मुंबई : पाप्युलर प्रकाशन
- सरोजा परूळकर , (1988) ' बाईमाणूस' ,पुणे :श्री विद्या प्रकाशन
- सचिनकुमार जैन , (2005) 'भुकमरी का स्त्रीलींग', दिल्ली : बुक फॉर चेंज
- पंडिता रमाबाई. ; (2006) 'हिंदू स्त्री का जीवन',मुंबई : संवाद प्रकाशन
- प्रा. नंदा पांगुळ, वाराहाते ; (2008) ' मुक्त व्हायचं मला' ,नागपूर : आर. बी. प्रकाशन
- आ. ह. साळुके , (2008) ' हिंदू संस्कृती आणि स्त्री' ,मुंबई :. प्रकाशन
- विश्वासराव लोकवांड्मय गृह, मुवई.
- डॉ नारायण भोसले ; (2009) 'तोड मर्दा तोड हि चाकोरी', पुणे : पाप्युलर प्रकाशन
- वंदना भागवत ; (2015) ' संदर्भासहित स्त्रीवाद' ,मुंबई :. शब्द प्रकाशन

PRINCIPAL I/c.
Dr. Ambedkar College of
Social Work, Wardha

Scanned with CamScanner



Scanned with CamScanner

MAH/MUL/ 03051/2012 ISSN :2319 9318

आंतरविद्याशाखीय बहुभाषिक शोध पत्रिका

विद्यावार्ता™

April To June 2020
Issue-34, Vol-05

Date of Publication
1 May 2020

Editor
Dr. Bapu g. Gholap
(M.A.Mar.& Pol.Sci.,B.Ed.Ph.D.NET.)

विद्येविना मति गेली, मतीविना नीति गेली
नीतिविना गति गेली, गतिविना वित्त गेले
वित्तविना शूद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले

-महात्मा ज्योतीराव फुले

❖ **विद्यावार्ता** या आंतरविद्याशाखीय बहूभाषिक त्रैमासिकात व्यक्त झालेल्या मतांशी मालक, प्रकाशक, मुद्रक, संपादक सहमत असतीलच असे नाही. **न्यायक्षेत्र:बीड**

"Printed by: **Harshwardhan Publication Pvt.Ltd.** Published by **Ghodke Archana Rajendra** & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor **Dr. Gholap Bapu Ganpat.**

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205
Harshwardhan Publication Pvt.Ltd.
At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed
Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295
harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com
All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

PRINCIPAL I/c.
Dr. Ambedkar College of
Social Work, Warora

Scanned with CamScanner

Date of Publication
01 May 2020

Vidyawarta™

International Multilingual Research Journal

www. विद्यावार्ता® .कॉम
YouTube Channel

Vidyawarta is peer reviewed research journal. The review committee & editorial board formed/appointed by Harshwardhan Publication scrutinizes the received research papers and articles. Then the recommended papers and articles are published. The editor or publisher doesn't claim that this is UGC CARE approved journal or recommended by any university. We publish this journal for creating awareness and aptitude regarding educational research and literary criticism.

The Views expressed in the published articles,Research Papers etc. are their writers own. This Journal dose not take any libility regarding appoval/disapproval by any university, institute, academic body and others. The agreement of the Editor, Editorial Board or Publicaton is not necessary.

If any judicial matter occurs, the jurisdiction is limited up to Beed (Maharashtra) court only.

Indexed

IMPACT 7.041 IIJIF FACTOR

Govt. of India,
Trade Marks Registry
Regd. No. 2611690

http://www.printingarea.blogspot.com

Scanned with CamScanner

Editorial Board & review Committee

- **Chief Editor**
  Dr Gholap Bapu Ganpat
  Parli_Vaijnath,Dist. Beed Pin-431515 (Maharashtra)
  9850203295, 7588057695
  vidyawarta@gmail.com

- **M.Saleem**
  salen Ghulam street
  Fatehgarh Sialkot city
  Pakistan. Phone Nr. 0092 3007134022
  saleem.1938@hotmail.com

- **Dr. Momin Mujtaba**
  Faculty Member,Dept. of Business Admin.
  Prince Salman Bin AbdulAziz University
  Ministry of Higher Education,Kingdom of Saudi Arabia, Tel No. +966-17862370 Extn: 1122

- **N.Nagendrakumar**
  115/478, Campus road,
  Konesapuri, Nilaveli (Postal code-31010),
  Trincomalee, Sri Lanka
  nagendrakumarn@esn.ac.lk

- **Dr. Vikas Sudam Padalkar**
  vikaspadalkar@gmail.com
  Cell. +91 98908 13228 (India),
  • 81 90969 83228 (Japan)

- **Dr. Wankhede Umakant**
  Navgan College, Parli –v Dist. Beed
  Pin 431126 Maharashtra
  Mobi 9421336952
  umakantwankhede@rediffmail.com

- **Dr. Basantani Vinita**
  B-2/8, Sukhwani Paradise,
  Behind Hotel Ganesh, Pimpri,
  Pune-17 Cell: 09405429484,

- **Dr. Bharat Upadhya**
  Post.Warnanagar, Tq.Panhala,
  Dist.Kolhapur-4316113
  Mobi.7588266926

- **Jubraj Khamari**
  AT/PO - Sarkanda, P.S./Block - Sohela
  Via/Dist. - Bargarh, Pin - 768028 (Orissa)
  Mob No. – 09827983437
  jubrajkhamari@gmail.com

- **Krupa Sophia Livingston**
  289/55, Vasanthapuram,
  ICMC, Chinna Thirupathy Post,
  Salem- 636008 +919655554464
  davidswbts@gmail.com

- **Dr. Wagh Anand**
  Dept. Of Lifelong Learning and Extension
  Dr B A M U Aurangabad pin 431004
  Mobi. 9545778985
  wagh.anand915@gmail.com

- **Dr. Ambhore Shankar**
  Jalna,Maharashtra
  shankar296@gmail.com
  Mobi.9422215556

- **Dr. Ashish Kumar**
  A-2/157, Sector-3, Rohini, Delhi -110085
  Ph.no: 09811055359

- **Prof. Surwade Yogesh**
  Dept. Of Library, Dr B A M U Aurangabad , Pin 431004
  Cell No: +919860768499
  yogeshps85@gmail.com

- **Dr.Deepak Vishwasrao Patil,**
  At Post Saundhane, Near
  Kalavishwa Computer, Tq.Dist.Dhule-424002.
  Mobi. 9923811609
  patildpak22583@gmail.com

- **Dr.Vidhya.M.Patwari**
  Vanshree Nagar,Behind Hotel
  Dawat, Mantha Road, Jalna-431203
  Mobi.9422479302
  patwarivm@rediffmail.com

- **Dr.Varma Anju**
  Assistant Professor, Dept. of Education,
  Sikkim University 6th Mile, Samdur Tadong-737102
  GANGTOK - Sikkim, (M.8001605914)
  anjuverma2009@rediffmail.com

- **Dr.Pramod Bhagwan Padwal**
  Associate Professor,Department of Marathi
  Banaras Hindu University,
  Varanasi-221005 (Uttar Pradesh)
  Mobi. 9450533466
  pbpadwal@gmail.com

Scanned with CamScanner

- **Dr. Nilendra Lokhande**
Head-Department of Commerce,
S.N.D.T. College of Arts & S.C.B.College of Comm. & Sci., S. N. D. T. Women's University,
Mumbai-20. Mobile: 98 21 230 230
Email: lokhandend@gmail.com

- **Dr. Bhairulal Yadav**
Assistant Professor,
Department of Geography
Visva-Bharati University,Santiniketan,
West Bengal 731 235,Mob. +91 8670027217
blal.yadav@gmail.com

- **Dr. Madan Mohan Joshi**
Asst.Professor of History, School of Social Sciences
Uttarakhand Open University, Haldwani (Uk)
Cell nos. 09690676632,09412924858
mmjoshi@uou.ac.in

- **Dr.Seema Sharma (Tiwari)**
Assistant Professor-Political Science,
Govt. M.L.B. Girls P.G. College, KilaBhavan, Indore-66
Mob: 9425904160
seemasharmam4@gmail.com

- **Dr. N.D. Choudhari**
Dept. of Marathi
Anandrao Dhonde Alias Babaji College,
Kada, Tal-Ashti, Dist- Beed (India) Mobi. 7350474989
ndbchoudhari@gmail.com

- **Dr. Yallawad Rajkumar**
Lt. Laxmibai Deshmukh Mahila College,
Parli v. Dist. Beed,Pin. 431515,
Mobi. 9881294195

- **Dr. Awasthi Sudarshan**
Navgan college, Parli Vaijnath
Dist. Beed Pin.431515, Mobi.9960127866
sudarshanawasthi@gmail.com

- **Dr. Ravindranath Kewat**
Teacher Colony, Bamni- Bllarpur, TQ. Ballarpur
Dist. Chandrapur Pin 442701, Mobi- 9421715172
kwmmballarpur@rediffmail.com

- **DR.PIYUSH PANDDEY**
371 H POCKET II, MAYUR VIHAR PHASE I
NEW DELHI 110091,Mobi:9871415353
opiyushpandey@gmail.com

- **Dr. M.SURESH BABU,**
Librarian,
C.M.R. College of Engineering & Technology (Autonomous). Kandlakoya, Medchal Road,
Hyderabad - 501 401
Mobile : 9492759646
drsureshsvu@gmail.com

- **Dr. DEEPAK NEMA**
S/O Dr. B.D. Nema, Near Prem Nagar Power House,
Satna-485001,Contact No.8989469156,
Email: dnema14@gmail.com

- **Dr. Neeraj Kumar Shukla**
HEAD, Department of B.Ed. Government
Post Graduate College Kashipur, Udham
Singh Nagar, Uttarakhand, India 244713
9450223977
nshuklan@gmail.com

- **Sunil S Trivedi**
Rameshwar Park,B/h Navarang Society,
Mogri-388345 Ta & Di: Anand
Mob: 9727290344, 8866465904
trivediss@ymail.com

- **Dr. Anil Kumar Singh**
H.O.D. Library & Information Science
Nandini Nagar P.G. College
Nawabganj, Gonda
Email-singh.anil224001@gmail.com
Mob-09793054919

- **Dr. Preeti Sarda,**
Flat No.505Amrapali Arcade, Street
No.10, Himayat Nagar, Hyderabad.-500029,
Telangana . Mob.08374378080
pritibhala@gmail.com

- **Ramakant Ambadas Choudhari**
Plot No. 43 B / Vidyavihar Colony Part -01,
SHIRPUR , DIST- DHULE (MH) 425405
Mobi – 7588736283
rac2722@gmail.com

- **Dr. Dinesh Kumar Charan**
Associate Professor and HOD-History Dept.,
Govt.Lohia College Churu (Rajasthan) India
Pin- 331001
Mob. No.-9414305804

Scanned with CamScanner

MAH MUL/03051/2012
ISSN: 2319 9318

Vidyawarta®
Peer-Reviewed International Journal

April To June 2020
Issue-34, Vol-05

010

INDEX

01) "Soil Formation and its Conservations" A Geographical Analysis
Dr. Mirza Wajid Rustum Baig, Beed ||14

02) WEB 2.0 TOOLS: An Innovative Techniques for Pre Service Teacher Education
Dr. Mahadeo Sadashiv Disale, Dist – Solapur (MS) ||17

03) Translation: Creation of Creation
Prof. Dr. Aparna Mahajan, Chakan ||23

04) Use of Statistical Research in Everyday Life Experiences
Mr. Abhijit P. Mahale, District- Sindhudurg ||27

05) ROLE OF LIBRARY AND ITS SOURCES IN LEARNING
PROF. SIDDHARTH A. PATIL, DIST. AKOLA ||31

06) Glimpses of child Abuse: prevalence and Dynamics
Prof.Dr. Baviskar Kunda Vitthal, Jalgaon ||33

07) Impact of Globalization on Indian Society in Anita Desai's 'Voices in the City'
Dr. Shrinivas Sambhajirao Gadhe, Dist: Nanded (M.S.) ||35

08) Mahesh Dattani's Seven Steps Around the Fire: Customs and Beliefs
Asst.Prof. Ayodhya Jadhav, Pune, Maharashtra ||37

09) Trauma of Women with special reference to the Partition Story A Leaf in ...
Dr. Vaishali Vasant Joshi, Sangli ||41

10) The Study On effectiveness of community based Rehabilitation for ...
Dr. T. S. Rathod, Amaravati ||43

11) A Report on Environment Pollution as a Tort
Pragya Seth, Jaipur ||46

12) The Posthuman in Greg Egan's Permutation City
Rajendra Tambile, Shirwal ||48

13) ENTREPRENEURIAL CHALLENGES IN INDIA AND FINDING THE WAY OUT
Dr. P. N. Tiwari & Dr. P. C. Suyal, U.S. Nagar (Uttarakhand) ||52

www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com

Scanned with CamScanner

14) किशोरी व युवतींचा छेडखानी संदर्भातील दृष्टिकोन
डॉ. माधुरी झाडे, वर्धा ||61

15) शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा ऑनलाईन शिक्षणाविषयी असलेल्या अभिवृत्तीचा अभ्यास
प्रा. डॉ. पुरुषोत्तम ओंकार चौधरी, जि. धुळे ||66

16) समाज परिवर्तन व प्रबोधनामध्ये विचारवंतांचे योगदान
डॉ. अण्णासाहेब म्हळसने, बुलडाणा ||70

17) भारतातील पाणी साठवणुकीच्या पद्धती व उपाययोजना
डॉ. एस. पी. झांबरे, जि. गोंदिया ||72

18) पाली साहित्यामध्ये अप्पमादो अमतपदं : एक चिकित्सक अध्ययन
प्रा.डॉ. सुभाष आठवले, जि. धुळे ||77

19) व्यक्तिमत्व विकासात स्वसंकल्पनेची भूमिका
प्रा.डॉ.सौ. विजया विठ्ठल बाविस्कर, नंदुरबार ||80

20) पालकत्व आणि पालकांची जबाबदारी
डॉ. सुनिता भोईकर, वर्धा ||84

21) महात्मा गांधी यांच्या मूलोद्योगी शिक्षण पद्धतीची आजच्या काळातील उपयोगिता
प्रा.डॉ.गोकुल शामराव डामरे, शेगांव ||87

22) वनसंपत्ती आणि छत्रपती शिवराय
प्रा.सौ. कापशीकर धनश्री रामचंद्र, पंढरपूर ||91

23) गोपाळ गणेश आगरकर यांचा सामाजिक दृष्टीकोन
प्रा. डॉ. चंद्रशेखर टी. क्षिरसागर, जि. नागपूर ||94

24) नक्षलवादी चळवळ आणि भारताची अंतर्गत राष्ट्रीय सुरक्षा
डॉ. देवेंद्र गंगाधर विसपुते & श्री. प्रमोद रमेश पाटील, धुळे ||96

25) आदिवासींच्या विकासात माध्यमाची भूमिका
डॉ. रमेश अर्जुन पवार, सोविपूर ||103

26) महिला सक्षमीकरणात स्वाधार गृह योजनेची भूमिका
डॉ. मदन जी. प्रधान, सिहोरा ||105

www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com

PRINCIPAL I/c.
Dr. Ambedkar College of
Social Work, Wardha

Scanned with CamScanner

14

किशोरी व युवतींचा छेडखानी संदर्भातील दृष्टिकोन

डॉ. माधुरी झाडे
सहाय्यक प्राध्यापक,
डॉ. आंबेडकर कॉलेज ऑफ सोशलवर्क वर्धा

भारतीय समाजाचे गोडवे आजही मोठया प्रमाणात गायील्या जाते. येथिल संस्कुती ही एक पती व एक पत्नीव्रताची आहे, परस्त्री मातेसमान असते. परस्त्रीकडे डोळे वर करून देखील पाहिल्या जात नाही, स्त्रीला समाजात अत्यंत आदराचे, सन्मानाने व देवीचे स्थान आहे, असा गोड गैरसमज आहे. कारण वास्तव मात्र काळयाकुट्ट अंधारात गडप नव्हे तर अगदीच गडद झाले आहे. पण तरीदेखील आमच्या डोळयावरील पट्टी किंवा आम्ही लावलेल चश्मे काही निघायला तयार नाही.

वास्तवीक पहाता आपल्या समाजात आजही महिलांवर मोठया प्रमाणात अन्याय अत्याचार होतांना आपणास दिसेल पण त्याकरीता पहिल्यांदा आपल्याला डोळस होणं आवश्यक आहे. आज स्त्री सन्मान आणि स्त्री सुरक्षा हा विषय सतत ऐरणीवर रहावा अशीच परीस्थिती देशात सर्वत्र दिसत आहे. जरा मागोवा घेतला तर असे दिसते की ही परीस्थिती केवळ आपल्याच देशात आहे असे नाही तर थोडया फार फरकानी जगात सर्वत्र पुरूषसत्ताक मानसिकतेच्या बळी गेलेल्या, ठरलेल्या महिला वर्गाची स्थिती सारखीच आहे. अमेरीकेसारख्या प्रगत देशात सातशेहून अधिक 'बलात्कार आपत्ती केंद्र' (रेप क्रायसीस सेंटर) काम करीत आहेत. या केंद्रात २४ तास तज्ञ सल्लागारांची सेवा व मदत बलात्कारास बळी पडलेल्या स्त्रीला उपलब्ध हावू शकते. जे घडले ते एक सामाजिक रोगाचा भाग असून त्या रोगाचा निपटारा करण्यासाठी हया गुन्हयाच्या नोंदिच्या गरजेची तीला जाणिव करून दिल्या जाते. गुन्हयाची नोंद करण्याकरीता तत्पर मदत मिळते आणि नंतर न्यायालयाच्या किचकट व्यवहारांतही बलात्कारीत स्त्रीचं मनोधैर्य टिकविल्याकरीता प्रयत्न केले जातात.

लॉस एंजिल्सच्या 'अॅसॉल्टस् अबोन्स्ट वुइमेन' या संस्थेच्या संचालिका श्रीमती ज्युडी गॅविट्झ म्हणतात की, "स्त्रीवर कोणाकडून बलात्कार होईल याबद्दल बांधणे अवघड आहे. नोकरीतील वरीष्ठ अधिकारी, शाळेतील तिच्यासोबत काम करणारा इसम, किंवा अन्य कुणिही तिच्यावर बलात्कार करण्यास प्रवृत्त होवू शकतो." बाल्टिमोर येथील रूग्णालयात लैंगिक गुन्हेगारीसंबंधी काम करणारे मनोवैज्ञानिक श्री. फ्रेड बर्लिन यांनी तर असे स्पष्ट नमूद केले की, "लैंगिक गुन्हेगार म्हणून त्यांच्याकडे येणाऱ्यांत धर्मोपदेशक, डॉक्टर, वकील, शिक्षक इत्यादिंचा समावेश आहे. त्यामुळे बलात्कार कुणाकडून घडतो व कोणावर घडतो याबाबत कोणतेच निष्कर्ष गृहित धरता येणार नाही." बलात्कार हा अत्यंत कमी नोंदविला जाणारा गुन्हा आहे. ३.५ ते १० टक्यांपर्यन्तच बलात्कारची नांद होत असेत.

२५ नोव्हेंबर ते १० डिसेंबर हा कालावधी जगातील सर्व देशांत 'महिलाविरोधी हिंसाचार प्रतिबंध कार्यक्रमांसाठी कृती पंधरवाडा' म्हणून पाळल्या जातो. त्यालाही या वर्षाची मुख्य घोषणा 'बलात्कार थांबवा' व 'जनरेशन इक्वालिटी' म्हणजे समानता मानणारी पिढी हा आहे. परंतू भारतात मात्र वास्तव काही वेगळच आहे. महिला, मुली, बालिका यांच्यावरील अण्याय अत्याचाराचा आकडा हा सातत्यानी वाढतच जाणारा आहे. असे वाटते की, याला कारणेही भरपूर आहेत आणि त्यावर उत्तरे शोधली तरी त्या सोडवीणाऱ्या यंत्रणा दुर्बल व गुंतागुतीच्या झाल्यासारख्या दिसतात.

अत्याचार होवून बचावलेल्या मुलींना अनेक टप्यांबधून जावं लागतं. अशावेळी तिच्यासोबत तिचे कुटुंब असल्यास ती थोडीफार तग धरते. परंतु घटणा नोंदविने, रूग्नालयात तपासणी करून घ्यायला जाणे, तिथे तपासणी व उपचार, मग डिसचार्ज, नंतर घरी परतने, आरोपींना अटक व आरोपपत्र दाखल करेपर्यन्तच्या प्रकियेसाठी पोलिसांना सहाकार्य,

PRINCIPAL I/c.
Dr. Ambedkar College of
Social Work, Warora
Scanned with CamScanner

प्रकृतीकरिता शस्त्रक्रिया किंवा उपचार, नंतर न्यायालयाच्या तारखांची प्रतिक्षा व शेवटी सत्र न्यायालयात निकाल, त्यानंतर उच्च न्यायालयात, सर्वोच्य न्यायालय अशा सुमारे बारा टप्प्यातून या मुली जातात व त्यानंतरही कायम या घटना मनाच्या अंतरपटलावर उमटल्यामुळे मनावरचे ओझे कायम रहातेच.

अनेकदा लहान मुलिंचे अपहरण करतांना तीला बोलता येणार नाही, ती प्रतीकार करू शकत नाही हा विचार आरोपी करतो. 'मुलगी हरवली अथवा सापडत नाही' अशी तक्रार पालकांनी केली की, बहुतेक पोलिसठाण्यात प्रघात आहे, की चोविस तास वाट पहायला सांगतात. खर तर, विधानपरिषदेत गृहखात्याने यापुर्विच पोलिसांना सुचना दिल्या आहेत की, एखादी मुलगी बेपत्ता झाली असेल तर लगेच तपासाला सुरूवात करावी. विशेषत: एक दिड तास हा जसा ह्रदयविकाराच्या झटक्यात महत्वाचा काळ मानला जातो, त्याचप्रमाणे याच काळात मुलींच्या अपहरणाच्या केससंदर्भातील महत्वाच्या खाणाखुणा सापडू शकतात. काही वेळा लोकांच्या लक्षात आले तर आरोपी सापडू शकतो. पण असे न केल्यामुळे (विलंब हा सहेतूक असो वा निहेतूक) त्यातून आरोपींचे मनोबल मजबूत होते. व पिडीताचा प्रवास मरनाकडून मरनाकडेच चालू रहातो.

आपल्या देशात ४२६ कैदयांना शिक्षा सुनावण्यात आली. दररोज सरासरी ९० बलात्कार होतात. परंतू सहा लाख प्रकरणे द्रुतगती न्यायालयात प्रलंबीत आहेत. न्यायालयात न्याय मिळण्याचा वेग लक्षात घेतला तर २००२ ते २०११ दरम्यान न्यायाचा वेग २६ टक्के होता. 'पास्को' अर्थात बाल लैंगिक अत्याचारासंबाबतच्या गुन्हयांनमध्ये उत्तरप्रदेश ४२३७९ प्रकरणे तर महाराष्ट्रात १९९६८ इतकी प्रकरणे नोंदविली असल्याने महाराष्ट्र दुसऱ्या क्रमांकावर आहे. देशात बलात्कार करून खुनाचे २२३ गुन्हे घडले. महाराष्ट्रात १९३३ दावे बाकी असल्याचे 'क्राईम इन इंडिया' च्या अहवालात म्हटले आहे. दिल्ली मध्ये शाळेजवळ जावून मुलींचा विनयभंग करणाऱ्या एका गुन्हेगाराला पकडल्यावर गेल्या दहा वर्षात ५०० हून अधिक शाळकरी मुलींचे विनयभंग केल्याचे त्याने कबूल केले होते. यावरून लक्षात येते की, वरकरनी किरकोळ गुन्हा वाटला तरी तो किरकोळ नसतो. नंतर त्याचाच गंभिर गुन्हाकडे प्रवास सुरू होतो.

भारतातील महिलांवरील लैंगिक अत्याचाराचा विचार केला असल्यास असे दिसून की, अल्पवयीन मुली आणि भारतात २०६० बलात्काराचे प्रकरण पंजीकृत केले गेले. जे १९८५ मध्ये ६१८९ आणि १९९३ मध्ये १११९७ झाले. विनयभंगाच्या १९८५ मध्ये १३९५२ केसेसची नोंद झाली. जी १९८९ मध्ये १६६८९ झाली. १९९१ मध्ये १३६०३ झाले. गृहमंत्रालयाच्या अवालानुसार देशात प्रति ४७ मिनिटाला एका महिलेसोबत बलात्कार तसेच ४४ महिलांचे अपहरण होते. अधिकतर प्रकरणांची खरे पहाता नोंदच नाही. नॅशनल क्राईम ब्युरेनुसार मागील काही वर्षात महिलांवरील अपराध ३५ ते ४० टक्यांनी वाढले आहेत. गेल्या काहि वर्षात अल्पवयीन गुन्हेगारांनी बलात्कार केल्याच्या प्रकरणांमध्ये प्रचंड वाढ झाली आहे. देशातील बालसुधार गृहांची स्थिती चिंताजनक झाल्याचे 'एसी एच आर' च्या 'इंडियाज हेल होल्स : चाईल्ड सेक्सुअल असॉल्ट इन ज्युव्हेनाईल जस्टिस होम' या अहवालात म्हटले आहे. सरकारी बालसुधार गृहामध्ये स्वयंपाकी, सुरक्षारक्षक, तसेच वरिष्ठ अधिकारी लैंगिक गुन्हयांमध्ये सहभागी असल्याचे चित्र आहे. राष्ट्रिय गुन्हे नोंदी पहाता १० वर्षात अल्पवयीन गुन्हगारांनी बलात्कार केल्याच्या प्रकरणात १७० टक्यांनी वाढ झाली आहे. राष्ट्रिय सरासरीचा विचार करता दुसऱ्यांदा गुन्हे करणारे अल्पवयीन गुन्हेगार ११ टक्याहून अधिक आहे.

■ 'अमेरीका' (१९९५) शाळेत घडणाऱ्या लैंगिक शोषणाबद्दल परदेशात काही तुरळक अभ्यास झाले आहेत. १९९५ सालच्या अमेरीकेतील एका अभ्यासात असे आढळले होते की, ८ वी ते ११ वी या गटातील २५ टक्के मुलींना कोणत्या ना कोणत्या प्रकारच्या लैंगिक छळणूकीला समोर जावे लागले होते. या पुर्विचा अमेरीकेचाच अहवालात हे प्रमाण ४२ टक्के होतं.

■ 'संवाद' (१९९६) मध्ये बंगलोरमधील 'संवाद

Scanned with CamScanner

होते. अशा प्रकारच्या शारीरिक व मानसिक अपमाण दुसऱ्याजवळ बोलून दाखविण्याने धडसही तिच्यात नसते. आपल्यालाच ऐकावे लागेल, आपलीच चूक दाखवतिल अशी भिती तिला वाटत असते. या कारणामुळे कित्येक मुलींना आपले शिक्षण सोडून दयावे लागले किंवा त्यांना त्यांच्या मनाप्रमाणे शिक्षण घेता आले नाही. लहान गावांमध्ये शिक्षणाच्या सोयी नसतात. ते घेण्याकरीता मुलिंना शेजारच्या गावातील शाळेत अथवा महाविद्यालयात जाण्याकरीता त्यांना घरच्यांची मनधरणी करावी लागते. या सर्व परीस्थितीचा अंदाज आपणास पुढिल काही संदर्भावरून येईल

▪पालकांनी मुलिंना घराबाहेर पडण्यास बंदी घातली कारण तर त्या मुली आहेत म्हणून.

▪नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्युरो यांच्यानुसार ८८५ बालीकांच्या घराबाहेर पडू न देण्याच्या केसेस २०१५ मध्ये नोंदविल्या गेल्या आहे. २०१४ ला त्यांची संख्या ९८३ होती.

▪NCRB चा २०१४ च्या अहवालानुसार महाराष्ट्रात अशा केसेस सर्वात अधिक आहेत.

मुलिंच्या संदर्भात होणाऱ्या या सर्व छेडछाडीचा आढावा घेतल्यानंतर एक नव्या आयामानी संशोधन करावे असे संशोधनकर्तीला वाटले. संशोधनकर्ती समाजकार्य महाविद्यालयामध्ये गेली ११ वर्षापासून सहाय्यक प्राध्यापक म्हणून कार्यरत आहे. महाविद्यालयातील काही मुली सातत्यानी अशा प्रकारच्या छेडछाडीसंदर्भात संशोधनकर्तीसोबत चर्चा करायच्या यातून अनेकदा मार्गदिखिल काढण्यात आले आहे. या विद्यार्थिनी क्षेत्रकार्याच्या निमित्ताने वर्धा शहराच्या आजुबाजुला असणाऱ्या वस्ती व खेडयांमध्ये जातात. क्षेत्रकार्याच्या परीक्षेत्रातील मुली देखिल काहीवेळा या मुलींसोबत छेडछाडी संदर्भात चर्चा करायच्या ही सर्व परीस्थिती लक्षात घेता संशोधनकर्तीच्या मनात सुचले की, छेडछाडीला समोरे जात असणाऱ्या मुलिंचा एक संशोधनात्मक सुक्ष्म पध्दतीने अभ्यास करावयास हवा आणि याच विचारातून प्रस्तुत संशोधन "किशोरी व युवतींचा छेडखानी संदर्भातील दृष्टिकोन" या विषयाची निवड करण्यात आली.

संशोधनाचे उद्देश :

१ मुलिंना छेडखानीला समोरे जावं लागण्याचं वय अभ्यासने.

२ छेडछाडीचे प्रकार व ते करणारे व्यक्ती जाणून घेणे.

३ छेडछाडीनंतर तक्रार करून दाद मागण्यात येणाऱ्या व्यक्तींचा अभ्यास करने.

४ किशोरी व युवती त्यांच्यावर होणाऱ्या अत्याचारासंदर्भात घेण्यात आलेली भूमिका जाणून घेणे.

५ महिलांसदर्भात असणारी हेल्पलाईनविषयी किशोरी व युवर्तीची जागृकता अभ्यासने.

गृहितकृत्य :

१ वयाच्या १० व्या वर्षापासूनच मुलींना छेडछडीला समोरं जावं लागतं

२ छेडछाड करणारे बहुसंख्य व्यक्ती हे परीचित, संबंधित नातेवाईक असतात.

३ छेडछाडी संदर्भात मुली कुठेही तक्रार करीत नाही.

४ महिलांसंदर्भात असणाऱ्या हेल्पलाईनविषयी मुलींना माहिती नसते.

अध्ययन पध्दती :

वर्धा शहराच्या परीसरातील शांतीनगर, बहूजन नगर, सिध्दार्थ नगर, नेरीपुनर्वसन, सरोदीपुरा या सहा वस्ती अध्ययनाचे क्षेत्र आहेत. या प्रत्येक क्षेत्रामधुन १२ मुलींची निवड सोयीस्कर नमुना निवड पध्दती वापरून केली अशाप्रकारे ६० उत्तरदात्यांची निवड अध्ययनामध्ये करण्यात आली आहे.

तथ्य संकलन :

प्राथमिक तथ्यसंकलन यात मुलाखत अनुसूचीचा व निरीक्षण पध्दतिचा वापर करून तसेच द्वितीय तथ्यसंकलनामध्ये पुस्तके, संशोधन अहवाल, न्युजपेपर, वबसाईट्स इत्यादिंचा वापर करून तथ्यसंकलन करण्यात आले आहे.

प्रस्तुत संशोधनात आढळून आलेल्या बाबी पुढिल प्रमाणे.

➤अध्ययनात समाविष्ट असणाऱ्या ६० उत्तरदात्यांपैकी २७ मुली या ११ ते १३ वयोगटातील आहेत तर १९ मुली या १३ ते १५ या वयोगटातील

Scanned with CamScanner

या संस्थेने ३४८ मुलींचा अभ्यास केला. बाललैंगिक संदर्भातील विशेष अभ्यास केलेल्या डॉ. शेखर शेषाद्री या भारतातील पहिल्या डॉक्टरांनी हा अभ्यास केला होता. त्यात आढळले की, ८३ टक्के मुलींना छेडछाडीला समोरे जावे लागले आहे. त्यातील १३ टक्के मुलींना वयाच्या १० वर्षाच्या आतच शाब्दीक आणि दृश्य स्वरूपाचा लैंगिक छळ सहन करावा लागला.

▪ UNICEF (२००२) युनिसेफच्या आकडेवारीनुसार जगभरातील १५० लाखापेक्षा अधिक मुली व ७० लाखापेक्षा अधिक मुलग्यांना जबरदस्तीचा संभोग वा इतर अत्याचारांना बळी पडावे लागले.

▪'सेव्ह द चिल्ड्रेन' (२००६) या संस्थेतर्फे चेन्नई मधील मुलांपैकी ४२ टक्के मुलांना कोणत्या ना कोणत्या प्रकारच्या लैंगिक अत्याचाराला तोंड दयावे लागले होते. सर्वेक्षित एकूण मुलिपैकी ३९ टक्के मुलींनी लैंगिक शोषण झाल्याचे सांगितले.

▪'ह्युमन राईट्स वॉच' या संस्थेने २०१३ मध्ये (दिल्लीतील सामूहिक बलात्काराच्या घटनेनंतर) भारतातील बालकांच्या लैंगिक शोषणासंदर्भात एक गुणात्मक अभ्यास केला. त्यांच्या वृतांतात अनेक अत्याचारीत मुलांच्या कहाण्या आहेत. त्या कहाण्या वैयक्तिक वेदना समोर आणतात या अभ्यासातून असे आढळते की शाळा देखील सुरक्षित जागा नाही.

▪महिलांविरूध्दची वाढती गुन्हेगारी रोखण्याकरीता भारतीय दंड विधान फौजदारी प्रक्रिया संहिता आणि भारतीय पुरावा कायदयात सुधारणा करण्यात आलेली आहे. भांदविच्या १६६ (लोकसेवकाकडून कायदयाच्या निर्देशांची अवज्ञा), ३२६ (गंभिर दुखापत), ३५४ (विनयभंग करण्याच्या हेतूने हल्ला), ३७०(गुलाम म्हणून खरेदी विक्री), ३७६ (बलात्कार), ५०९ (छेडखानी) या कलमांमध्येही सुधारण करण्यात आलेली आहे. यातील संशोधणाच्या दशष्टिने काही गुन्हे आणि त्याकरीता शिक्षेचे प्रावधान अभ्यासण्यात आले.

▪स्टॉकिंग – महिलेचा पाठलाग करणे, तिच्यावर पाळत ठेवणे, महिलेची इच्छा नसतांना तिच्याशी ओळख काढून ओळख लादने, याकरीता गुन्हयाची पहिली वेळ असेल तर १ते ३ वर्षे तर दुसऱ्यांदा गुन्हा केल्यास ०५ वर्षापर्यन्त शिक्षा केली जावू शकते.

▪बळजबरीने पोर्न दाखविने.– स्त्री किंवा पुरूष यापैकी कुणालाही पोर्न दाखविणे यकरीता ३ वर्षे सक्तमजूरी व दंड या शिक्षा ठोठावण्यात आलेल्या आहेत.

▪स्त्रीला स्पर्श करणे – लैंगिक दृष्टिने महिलेच्या संमतीविना स्पर्श करणे. याकरीता ३ वर्षापर्यन्त सक्त मजूरी अथवा दंड.

▪शरीर सुखाची मागणी करणे – पुरूषाने शरीर सुखाची मागणी किंवा विनंती करणे. या गुन्हयाकरीता तीन वर्षाकरीता सक्तमजुरी अथवा दंड ठोठावल्या जावू शकतो.

▪लैंगिक शेरेबाजी करणे – पुरूषाने लैंगिक शेरेबाजी केल्यास १ वर्षापर्यन्त सक्तमजूरी अथवा दंड केल्या जातो.

▪रस्त्यावरून जातांना मुलींकडे बघून शिट्टी वाजविने, डोळा मारणे, गाणे म्हणणे, अश्लील शेरेबाजी करणे अनावश्यक स्पर्श करणे, चापट मारणे, चिमटे घेणे या छेडछाडीच्या सर्व प्रकारांना 'विनयभंग' म्हटल्या जातं. रूपम देओल बजाज खटल्याच्या निमित्ताने या प्रश्नांची सखोल चर्चा झाली. भारतीय दंडविधानाच्या कलम ३५४ आणि ५०९ मध्ये विनयभंगाच्या गुन्हयासाठी १ ते २ वर्षे तुरूंगवास आणि दंड अशी शिक्षा सुचवली आहे.

▪मुलगी वयात आली की, पुरूषी मानसिकतेचे उपभोगाचे साधन म्हणून तिची छेडछाड सुरू होते. व हा क्रम तिचे तारूण्य सपेपर्यन्त सुरू राहते. घराच्या बाहेर पडल्यावर रस्त्यात, बाजारात, सिनेमागृहात, यात्रेत, बसस्टॉप, रेल्वेस्टेशन, धार्मिक स्थळ, सहल इत्यादि सर्वच ठिकाणी मुलींची छेडकाढण्याचे प्रमाण हे सातत्याने सुरूच आहे. त्यांच्या आकडेवारीमध्ये वाढता बदल होतांनाही दिसतो. अशाप्रकारच्या छेडछाडीला प्रत्येक मुलीला कधिनाकधी समोर जावं लागतं हे अनेक प्रसंगातून तसेच मुलींशी चर्चा केल्यावर लक्षात येतं. छळवनूक सहन करणे ही जणू तिच्यासंदर्भातील अपरीहार्य बाब आहे. सांकेतीक इशारे व शाब्दीक क्लुप्तांनी तसेच केवळ डोळयांचा वापर करून तिची होणारी छळवणूक सहण करताकरता तिची दमछाक

Scanned with CamScanner

असून १५ ते १७ या वयोगटातील ०४ मुली आहेत.

यावरून असे दिसून येते की, किशोरवयीन मुलींसोबत छेडछाड ही वयाच्या ११ वर्षापासूनच सुरू होत असून या वयोगटातील मुलींचाच समावेश यात सर्वाधिक आहे.

➢५४ उत्तरदात्यांना शारीरिक जवळीक साधण्याचा अनुभव आला असून तो प्रयत्न करणारे नातेवाईक तसेच परीचितांपैकी ३५ व्यक्ती होते तर अपरीचित १९ होते.

यावरून असा निष्कर्ष निघतो की, शारीरिक जवळीक साधणारे अधिकतर हे जवळचे नातेवाईक परीचीत असतात.

➢इतरांसोबत छेडछाड होतांना वघितल्याचा अनुभव १०० टक्के उत्तरदात्यांना आला असून यातमध्ये एकटक बघणे, धक्का मारणे, हेतूपुरस्सर अंगाला स्पर्श करणे या कृतींचा समावेश होतो.

यावरून असा निष्कर्ष निघतो की, बालीका, किशोरी तसेच युवती या सर्वांनाच कधीनाकधी अशा प्रकारच्या छेडखानीला समोरं जावंच लागतं

➢लैंगिक जवळीक साधण्याचा प्रयत्न घरी, शिक्षणघेत असणाऱ्या स्थळी, बसस्टॉप, रेल्वे स्टेशन, प्रवासात, धार्मिक स्थळी अशा सर्वच ठिकाणी येत असतो. असे मत सर्वच उत्तदात्यांनी व्यक्त केले.

यावरून असं दिसतं की कुठल्याच ठिकाणी मुली सुरक्षित आहे असे नाही. सर्वच ठिकाणी त्यांच्यावर छेडखानीचे प्रसंग ओढवतात.

➢लैंगिक छेडखानी होतांना वाबरल्यासारख वाटतं असे मत ०६ उत्तरदात्यांनी व्यक्त केले तर शांत रहातो, काहीच सूचत नाही असे मत व्यक्त करणाऱ्यां मध्ये १० उत्तरदात्या आहेत. तसेच असे कृत्य करणाऱ्या व्यक्तीची चीड येते, संताप येतो, त्याला मारावसं वाटतं असे २४ उत्तरदात्यांनी प्रतिक्रीया दिली. त्याचप्रमाणे घरी सांगतो असे ०६ उत्तरदात्यांनी आपले मत नोंदवीली, तर ०४ उत्तरदात्या म्हणाल्या की, इतरांजवळ सांगून मन मोकळ करतो.

या सर्व प्रतीक्रियांवरून असा निष्कर्ष निघतो की, छेडछाडीला समोरे गेलेल्या प्रत्येकीच्या मनात प्रचंड चिड निर्माण होते. त्या व्यक्तीला मारावसं वाटतं.

➢अशा प्रकारच्या अत्याचाराच्या विरोधात लढा उभारायला पाहिजे असे सर्वच म्हणजेच १०० टक्के उत्तरदात्यांना वाटतं. पण त्यांनी स्वत: मात्र आजपर्यन्त या संदर्भात खंबीर पाउल उचलली नाही.

➢मुली व महिलांवर होणाऱ्या अत्याचारासंदर्भात कुटूंब, शेजारी, समाजातील लोक, सामाजिक कार्यकर्त्या, शाळा, महाविद्यालय, शासन यापैकी सर्वांनीच भुमिका घ्यावी असे १०० टक्के उत्तरदात्यांना वाटते.

➢महिलांकरीता असणाऱ्या हेल्पलाईनसंदर्भात १०० टक्के उत्तरदात्यांना काहीही माहिती नाही. अशी प्रतिकीया त्यांनी व्यक्त केली.

निष्कर्ष व विश्लेषण :

➢आजही मोठया प्रमाणात मुली, युवती, महिला यांना शारीरिक छेडखानीला समोर जावं लागत.

➢छेडखानी करणाऱ्यांपैकी अधिकांश हे कुटुबातील, परीचित व्यक्ती असतात.

➢सर्वच किशोरवयीन छेडछाडीला कधिनाकधी समोरं जावं लागतं. त्याच प्रकारे इतर सर्वच मुलींची छेडछाड होत असते.

➢शारीरिक छेडछाड करणाऱ्या व्यक्तिबद्दल अतिशय राग येतो, संताप येतो, त्याला मारावसं वाटतं, पण त्या हतबल असतात. त्रागा करण्यापलिकडे त्या काहिच करीत नाही.

➢घरी, समाजात, प्रवासात, प्रवासांच्या ठिकाणी, वाहणांमध्ये, धार्मिक स्थळी अशा सर्वच स्थळी शारीरिक छेडखानीला मुलींना समोरं जावं लागतं.

➢छेडछाडीसंदर्भात योग्य कार्यवाही करून मुली सुरक्षित आहेत असा विश्वास मिळाल्याशिवाय या संदर्भात कुणी सहसा धजावणार नाही.

➢किशोरवयीन मुली व युवती यांना महिलांकरीता असणाऱ्या हेल्प लाईनविषयी माहिती नाही.

सुचना व शिफारशी :

➢मुलिंना व युवतींना त्यांच्यावर होणाऱ्या या अन्यायासंदर्भात जागृक करने. याकरीता शाळा महाविद्यालयामध्ये प्रशिक्षित व संवेदनशिल व्यक्तींकडून शिबीरं घेणे.

➢किशोरी व युवतींना बोलकं करण्याकरिता

Scanned with CamScanner

असून १५ ते १७ या वयोगटातील ०४ मुली आहेत.

यावरून असे दिसून येते की, किशोरवयीन मुलींसोबत छेडछाड ही वयाच्या ११ वर्षापासुनच सुरू होत असून या वयोगटातील मुलींचाच समावेश यात सर्वाधिक आहे.

➢५४ उत्तरदात्यांना शारीरिक जवळीक साधण्याचा अनुभव आला असून तो प्रयत्न करणारे नातेवाईक तसेच परीचितांपैकी ३५ व्यक्ती होते तर अपरीचित १९ होते.

यावरून असा निष्कर्ष निघतो की, शारीरिक जवळीक साधणारे अधिकतर हे जवळचे नातेवाईक परीचीत असतात.

➢इतरांसोबत छेडछाड होतांना बघितल्याचा अनुभव १०० टक्के उत्तरदात्यांना आला असून यातमध्ये एकटक बघणे, धक्का मारणे, हेतूपुरस्सर अंगाला स्पर्श करणे या कृतींचा समावेश होतो.

यावरून असा निष्कर्ष निघतो की, बालीका, किशोरी तसेच युवती या सर्वांनाच कधीनाकधी अशा प्रकारच्या छेडखानीला समोरं जावंच लागतं

➢लैंगिक जवळीक साधण्याचा प्रयत्न घरी, शिक्षणघेत असणाऱ्या स्थळी, बसस्टॉप, रेल्वे स्टेशन, प्रवासात, धार्मिक स्थळी अशा सर्वच ठिकाणी येत असतो. असे मत सर्वच उत्तदात्यांनी व्यक्त केले.

यावरून असं दिसतं की कुठल्याच ठिकाणी मुली सुरक्षित आहे असे नाही. सर्वच ठिकाणी त्यांच्यावर छेडखानीचे प्रसंग ओढवतात.

➢लैंगिक छेडखानी होतांना बावरल्यासारख वाटतं असे मत ०६ उत्तरदात्यांनी व्यक्त केले तर शांत रहातो, काहीच सूचत नाही असे मत व्यक्त करणाऱ्यां मध्ये १० उत्तरदात्या आहेत. तसेच असे कृत्य करणाऱ्या व्यक्तीची चीड येते, संताप येतो, त्याला मारावसं वाटतं असे २४ उत्तरदात्यांनी प्रतिक्रीया दिली. त्याचप्रमाणे घरी सांगतो असे ०६ उत्तरदात्यांनी आपले मत नोंदवीली, तर ०४ उत्तरदात्या म्हणाल्या की, इतरांजवळ सांगून मन मोकळ करतो.

या सर्व प्रतीक्रियांवरून असा निष्कर्ष निघतो की, छेडछाडीला समोरे गेलेल्या प्रत्येकीच्या मनात प्रचंड चिड निर्माण होते. त्या व्यक्तीला मारावसं वाटतं.

➢अशा प्रकारच्या अत्याचाराच्या विरोधात लढा उभारायला पाहिजे असे सर्वच म्हणजेच १०० टक्के उत्तरदात्यांना वाटतं. पण त्यांनी स्वत: मात्र आजपर्यन्त या संदर्भात खंबीर पाउल उचलली नाही.

➢मुली व महिलांवर होणाऱ्या अत्याचारासंदर्भात कुटूंब, शेजारी, समाजातील लोक, सामाजिक कार्यकर्त्या, शाळा, महाविद्यालय, शासन यापैकी सर्वांनीच भुमिका घ्यावी असे १०० टक्के उत्तरदात्यांना वाटते.

➢महिलांकरीता असणाऱ्या हेल्पलाईनसंदर्भात १०० टक्के उत्तरदात्यांना काहीही माहिती नाही. अशी प्रतिक्रीया त्यांनी व्यक्त केली.

निष्कर्ष व विश्लेषण :

➢आजही मोठया प्रमाणात मुली, युवती, महिला यांना शारीरिक छेडखानीला समोर जावं लागत.

➢छेडखानी करणाऱ्यांपैकी अधिकांश हे कुटुबातील, परीचित व्यक्ती असतात.

➢सर्वच किशोरवयीन छेडछाडीला कधिनाकधी समोरं जावं लागतं. त्याच प्रकारे इतर सर्वच मुलींची छेडछाड होत असते.

➢शारीरिक छेडछाड करणाऱ्या व्यक्तिबद्दल अतिशय राग येतो, संताप येतो, त्याला मारावसं वाटतं, पण त्या हतबल असतात. त्रागा करण्यापलिकडे त्या काहिच करीत नाही.

➢घरी, समाजात, प्रवासात, प्रवासांच्या ठिकाणी, वाहणांमध्ये, धार्मिक स्थळी अशा सर्वच स्थळी शारीरिक छेडखानीला मुलींना समोरं जावं लागतं.

➢छेडछाडीसंदर्भात योग्य कार्यवाही करून मुली सुरक्षित आहेत असा विश्वास मिळाल्याशिवाय या संदर्भात कुणी सहसा धजावणार नाही.

➢किशोरवयीन मुली व युवती यांना महिलांकरीता असणाऱ्या हेल्प लाईनविषयी माहिती नाही.

सुचना व शिफारशी :

➢मुलिंना व युवतींना त्यांच्यावर होणाऱ्या या अन्यायासंदर्भात जागृक करने. याकरीता शाळा महाविद्यालयामध्ये प्रशिक्षित व संवेदनशिल व्यक्तींकडून शिबीरं घेणे.

➢किशोरी व युवतींना बोलकं करण्याकरिता

Scanned with CamScanner

(3) 111

(SJIF) Impact Factor-7.675 ISSN-2278-9308

B.Aadhar

Peer-Reviewed Indexed

Multidisciplinary International Research Journal

March -2020

SPECIAL ISSUE-CCXXV (225)

Domestic Violence: Impact on Indian Society



Chief Editor
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

Editor:
Dr Nitin A. Mathankar
Principal
Late Vasantrao Kolhatkar Arts
College, Rohana

Guest Editor:
Prof. Deoman Umbarkar
Late Vasantrao Kolhatkar Arts
College, Rohana

The Journal is indexed in:

Scientific Journal Impact Factor (SJIF)

Cosmos Impact Factor (CIF)

International Impact Factor Services (IIFS)

PRINCIPAL I/c.
Dr. Ambedkar College of
Social Work, Wardha

Scanned with CamScanner

B.Aadhar International Multidisciplinary Research Journal
Impact Factor - (SJIF) -7.675,
Special Issue
ISSN : 2278-9308
March 2020

Impact Factor – 7.675 ISSN – 2278-9308

B.Aadhar

Multidisciplinary International Research Journal

Peer-Reviewed Indexed

March - 2020
SPECIAL ISSUE -CCXXV (225)

Domestic Violence: Impact on Indian Society

Chief Editor :
Prof. Virag.S.Gawande

Editor :
Dr Nitin A. Mathankar
Principal
Late Vasantrao Kolhatkar Arts College, Rohana
Guest Editor :
Prof. Deoman Umbarkar
Late Vasantrao Kolhatkar Arts College, Rohana

Aadhar International Publications
For Details Visit To : www.aadharsocial.com
© All rights reserved with the authors & publisher
Price : Rs. 425/-

Scanned with CamScanner

Editorial Board

Chief Editor -
Prof.Virag S.Gawande,
Director,
Aadhar Social Research &,
Development Training Institute. Amravati. [M.S.] INDIA

Executive-Editors -

- Dr.Dinesh W.Nichit - Principal, Sant Gadge Maharaj Art's Comm,Sci Collage, Walgaon.Dist. Amravati.
- Dr.Sanjay J. Kothari - Head. Deptt. of Economics, G.S.Tompe Arts Comm,Sci College Chandur Bazar Dist. Amravati

Advisory Board -

- Dr. Dhnyaneshwar Yawale - Principal, Sarswati Kala Mahavidyalaya , Dahihanda, Tq-Akola.
- Prof.Dr. Shabab Rizvi ,Pillai's College of Arts, Comm. & Sci., New Panvel, Navi Mumbai
- Dr. Udaysinh R. Manepatil ,Smt. A. R. Patil Kanya Mahavidyalaya, Ichalkaranji.
- Dr. Sou. Parvati Bhagwan Patil , Principal, C.S. Shindure College Hupri, Dist Kolhapur
- Dr. Jiro Akita - Professor Of Economics Tohoku University. Japan
- Dr.Usha Sinha , Principal ,G.D.M. Mahavidyalay,Patna Magadh University.Bodhgay Bihar

Review Committee -

- Dr. D. R. Panzade, Assistant Pro., Yeshwantrao Chavan College, Sillod. Dist. Aurangabad (MS)
- Dr.Suhas R.Patil ,Principal ,government College Of Education, Bhandara, Maharashtra
- Dr. Kundan Ajabrao Alone ,Ramkrushna Mahavidyalaya, Darapur Tal-Daryapur, Dist-Amravati.
- DR. Gajanan P. Wader Principal , Pillai College of Arts, Commerce & Science, Panvel
- Dr. Bhagyashree A. Deshpande, Asstt. Professor Dr. P. D. College of Law, Amravati

Our Editors have reviewed paper with experts' committee, and they have checked the papers on their level best to stop furtive literature. Except it, the respective authors of the papers are responcible for originality of the papers and intensive thoughts in the papers.

- Executive Editor

Published by -
- Prof.Virag Gawande Aadhar Publication Amravati 444604

Email : aadharpublication@gmail.comWebsite : www.aadharsocial.comMobile : 9595560278

PRINCIPAL I/c.
Dr. Ambedkar College of
Social Work, Wardha

Scanned with CamScanner

INDEX

No.	Title of the Paper	Authors' Name	Page No.
1	आर्थिक परावलंबित्व आणि कौटुंबिक हिंसाचार	डॉ. वर्षा गंगणे	1
2	कौटुंबिक हिंसाचार व प्रतीबंधक कायदे	सिध्दार्थ बी. टेंभूर्णे	6
3	कौटुंबिक अत्याचार आणि महिलांच्या संरक्षणात्मक कायदे	डॉ. विद्या भैसारे	11
4	मानवाधिकार आणि घरगुती हिंसा	प्रा. अनिल रा. गावंडे	15
5	कौटुंबिक हिंसाचार आणि महिला सुरक्षा विषयक कायदे	प्रा. डॉ. अर्चना भी. खंडागळे	19
6	मानवाधिकार आणि कौटुंबिक हिंसा	डॉ. अभिजित वेरूळकर	24
7	पितृसत्ताक पद्धती व कौटुंबिक हिंसे संदर्भात जोतीबा फुले यांचे कार्य व विचार	प्रा. डॉ. सुनिल चवळे	29
8	नेपाली संस्कृति के एक आराध्य देव : नाटेश्वर	डॉ. प्राची हलगांवकर	32
9	मानक कार्यप्रणाली (NAAC)	डॉ. पुरूषोत्तम गुणवंतराव पखाले	35
10	कौटुंबिक हिंसाचार : स्वरूप, परिणाम आणि उपाय	डॉ. अतुल म. महाजन	39
11	१५ व्या लोकसभेत महाराष्ट्रातील खासदारांचा तारांकीत व अतारांकीत प्रश्ना बाबतचा सहभाग	प्रा. अतुल नारायण खोटे	43
12	पुरुषप्रधान समाजव्यवस्था व कौटुंबिक हिंसाचार	प्रा. डॉ. होमराज टी. राठोड	48
13	डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे ओबीसी करिता केलेले कार्य	प्रा.सतिश कुमार घनश्याम धवड,	52
14	स्त्री आणि कौटुंबिक हिंसाचार कायदा	प्रा.मोनाली वहादूरे	56
15	भारतातिल महिला हिंसाचाराविरुद्ध कायदे	प्रा. डॉ. रविंद्र विठोबा विखार	60
16	भारतीय संस्कृती आणि कौटुंबिक हिंसाचार	प्रा. अनिल एन. चकोले	65
17	कौटुंबिक हिंसाचाराचा भारतीय समाजावर होणारा परिणाम	प्रा. कोटरंगे दत्ता नामदेव	68
18	स्वंतत्र भारतातील संस्कृती व स्त्रीकलह	डॉ. सिद्धार्थ बुटले	72
19	सदयस्थितीतील घरगुती हिंसाचार	प्रा.डॉ. एस.पी. चव्हाण	75

Dr. Ambedkar College of Social Work WARDHA
PRINCIPAL I/c.
Dr. Ambedkar College of
Social Work, Wardha

Scanned with CamScanner

B.Aadhar' International Multidisciplinary Research Journal
Impact Factor - ((SJIF) -7.675,
Special Issue
ISSN : 2278-9308
March 2020

20	भारतीय स्त्रीजीवन आणि कौटुंबिक हिंसा प्रा.डॉ. दशरथ धर्माजी आदे	77
21	आजनी संस्कृती नि घरेलु संघर्ष प्रा.डॉ.लक्ष्मीकांत ना. देशपांडे	82
22	स्त्रियांच्या कवितेतील बदलत्या जाणिवा अर्चना सं. देशपांडे	85
23	मानवी विकासावर बदलत्या पर्यावरणाचा परिणाम प्रा.डॉ.अल्का दहीकर	91
24	महाराष्ट्र राज्यात महीलांवरील अत्याचारांचे वाढते प्रमाण एक समस्या डॉ.संजय धनविजय	94
25	कौटुंबिक हिंसाचार व शासकीय धोरण सहा.प्रा. दिपक आर.आटे	99
26	महिला सक्षमिकरण आणि कौंटुबिक हिंसाचार प्रा.दिपाली अतुल पडोळे	104
27	स्त्रियांवरील हिंसा : एक स्त्रीवादी आकलन डॉ. धनंजय के.सोनटक्के	107
28	कौटुंबिक हिंसाचाराचे–वास्तव डॉ. एम. एच. झाडे	112
29	कौटुंबिक हिंसाचार : समाजाचे विदारक सत्य डॉ. वैशाली उगले	117
30	कौटुंबिक हिंसाचार कायदा–२००५ चे सामाजिक अंकेक्षण–एक अध्ययन प्रा.डॉ.संजय गुडधे	120
31	आर्थिक परिस्थितीमुळे स्त्रियांवर होणारे अत्याचार : एक अभ्यास प्रा. जयवंत नथ्थूजी काकडे	125
32	कौटुंबिक हिंसाचार सामाजिक स्वास्थ्याला पोखरणारी किड डॉ.मंगला गोरे	132
33	मानवी हक्क आणि स्त्रियांवरीलकौटूंबिक हिंसाचार डॉ.एम.बी.ठिकरे	136
34	कौटूंबिक सुख, शांती आणि शक्तिचा राज मार्ग संगीत डॉ.सुनिल बाबुलालजी पटके	141
35	घरगुती स्त्रीमनाचा हुंकार डॉ.सतीश माधवराव चहांदे	144
36	स्त्रियांवरील कौटुंबिक हिंसाचार : ज्वलंत समस्या डॉ. साधना विजय लांजेवार	148
37	स्त्रीमुक्ती करणात कायदयाचे महत्व डॉ.सच्चिदानंद जुनघरे	152
38	महाराष्ट्रातील कौटुंबिक हिंसाचार डॉ.एस. पी. झांबरे	155
39	स्त्री शक्ती जागृती डॉ. रवींद्र एम. बेले	159
40	"घरेलू हिंसा व महिलाओं के प्रति हिंसाके कारण" छत्तीसगढ़ राज्य के विशेष संदर्भ में Dr. Niraj Kumar Khare	163
41	समाज एवं संगीत का संबंध डॉ .मुणाल प्रभाकराव कडू	172
42	एकविसाव्या शतकातील स्त्रियांसमोरील आव्हानेडॉ. मंदा वि.तडस	175

Scanned with CamScanner

B.Aadhar *International Multidisciplinary Research Journal*
Impact Factor - ((SJIF) -7.675,
Special Issue
ISSN : 2278-9308
March 2020

कौटुंबिक हिंसाचाराचे– वास्तव

डॉ. एम. एच. झाडे
सहाय्यक प्राध्यापक डॉ. आंबेडकर कॉलेज ऑफ सोशल वर्क, वर्धा.
ता. जि. वर्धा.

प्राचीन काळापासून महिलांवर हिंसाचार होतांना दिसून येतात. महिलांवर होणाऱ्या या हिंसाचाराची सुरूवात कुटुंबातूनच झालेली आहे. पुर्वी मुलींनी जन्म घेतल्या नंतर तीला मारून टाकण्यात येत होते. याकरीता भारतातील प्रत्येक राज्यात वेगवेगळ्या प्रथा अस्तित्वात होत्या. अगदी उत्साह साजरे करून हत्या केली जात असे. उदा. दुधात बुडवून मारने, उकळत्या तेलात टाकणे, उकळत्या तेलात टाकणे, खाटेच्या ठाव्याखाली ठेवणे इत्यादी. स्त्रियांवर कुटुंबातून होणाऱ्या हिंसाचाराची मालीका शेकडो वर्षापासून चालत आलेली आहे. आजही त्याचे अनुकरण आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून करण्यात येतो. कुटुंबातिल सदस्यांचे याला समर्थन असते.

आजही महिलांना कुटुंबामध्ये दुय्यम स्थान दिल्या जाते. तिला अपमानजनक वागणूक दिणे, रागावणे, शिवीगाळ करणे, टोमणे मारणे, यासोबतच मारझोड करणे इत्यादि प्रकारचे शारीरिक, मानसिक, आर्थिक छळ करण्यात येतात. या सर्वाकरीता व ते सहनकरण्याकरीता भारतामध्ये संस्कृतीच्या माध्यमातून काही मिथके आहेत जसे, समाजव्यवस्थेत स्त्रियांना दुय्यम स्थान देणे, स्त्रियांना अपमानास्पद वागणूक देणे, श्रमविभाजनामध्ये अर्थकारण करणे, घरगुती कामांना दुय्यम लेखने इत्यादी. यामुळेच स्त्रियांवर मोठया प्रमाणात अत्याचार होतांना दिसून येतो.

महिला या कुटुंबात सुरक्षित आहे असा चुकीचा समज या समाजात रूढ आहे. खरं पाहिलं तर आज स्त्री समाजात ना घरात कुठेच सुरक्षित नाही. कुटुबातच तिच्यावर जन्मापुर्विपासून तर जन्मानंतर मरेपर्यन्त अत्याचार होतच असंतात. बलात्काराचे प्रमाण अभ्यासले तर दिसून येतं की ८५ प्रतिशत घरातील व्यक्तीच ते करतात. लहान मुली देखिल घरात सुरक्षितन नसतात. कुटुंबातच महिला सुरक्षित नसतील ती त्यांनी आसरा शोधायचा कुठे हाच खरा प्रश्न आहे. या सर्वाकरीता भारतीय व्यवस्थेत असलेली पुरूषसत्ताक कुटुंबपध्दती, पुरूषसत्ताक समाजव्यवस्था करणीभूत आहे असे म्हटल्यास अतीशयोक्ती होणार नाही.

२०१२ मध्ये नॅशनल क्राईम ब्युरो रिपोर्ट नुसार भारतामध्ये रिपोर्ट केलेला (नोंदविल्या गेलेल्या) क्राईम रेट ४६ आहे. एक लाख माहलांमधून केवळ दोन महिला बलात्काराच्या केसेस नोंदवितात. हिसाचाराचे प्रमाण एक लाख महिलांमधून ५.९ आहे. हे सर्व त्यांच्या पतीकडून तसेच कुटुबातील इतर सदस्यांकडून घडून येतात. मार्च २०१९ मध्ये पोलिस स्टेशनमध्ये नोंदविल्या गेलेले कौटुंबिक हिंसाचाराचे प्रकरण १.३२ मिलीयन आहे. यामधिल ७४६२१९ केसेस या कुटुंबात घडलेल्या बाललैंगिक शोषणाच्या आहेत, अशी नोंद आहे.

वरील संदर्भावरून कौटुंबिक हिंसाचाराची तिव्रता आपल्या लक्षात येत. आज कौटुंबिक हिंसाचारामध्ये लैंगिक हिंसाचाराचे प्रमाण मोठया प्रमाणात आहे. यासोबतच अनेक कुटुंबामध्ये शारीरिक व मानसिक हिंसाचाराला रोजच समोरे जावे लागते. एकीकडे महिलांची होत चाललेली प्रगती तर दुसरीकडे महिलांवर होणारे अन्याय अत्याचार यामध्ये कुठेतरी विसंगती निर्माण होतांना आपणास दिसते आहे.

संशोधनकर्ती मागील अकरा वर्षापासून डॉ. आंबेडकर कॉलेज ऑफ सोशलवर्क वर्धा येथे समाजशास्त्र हा विषय शिकवितात, तसेच त्यांनी पाच वर्ष कौटुंबिक समुपदेश केंद्रामध्ये

PRINCIPAL I/c.
Dr. Ambedkar College of
Social Work, Wardha

Scanned with CamScanner

समपदेशनाचे कार्य केले आहे. हे कार्य करीत असतांना त्यांना अनेक वेळा कौटुंबीक अत्याचाराच्या केसेसला समुपदशन केले आहे. त्यावेळी आणि आज कौटुंबिक हिसाचार होण्यामध्ये काही बदल झालेला दिसत नाही. हा विषय विखारी मानसिकतेतून सतत पुढे यतो. या विषयावर संशोधन करून वास्तव जाणून घण्याकरीतान संशोधन कर्तीने "कौटुंबिकहिंसाचाराचे – वास्तव" य विषयाची निवड केली.

मग सुरु झाली तो मनमानी ! प्रत्येक जण आपल्या मनाप्रमाणे वागू लागला. राज्यकर्ते तरी त्याला कसा अपवाद असणार? केंद्रापासून राज्यापर्यंत आणि महापालिकेपासून ग्रामपंचायती पर्यंत सगळ्यांनीच आदेश द्यायला सुरुवात केली. आदेशावर आदेश, त्यातील चुका निस्तरण्यासाठी आदेश, अधिकारपदावरील प्रत्येक माणूस त्याच्या समजुतीनुसार या साथीचा मुकाबला करण्याचा प्रयत्न करीत आहे. राज्यकर्त्यांच्या वर्तुळात वावरणाऱ्यांची अनेक आदेशांना आणखी फोडणी दिली. जेवण्यासाठी शिधा देण्याऐवजी तयार जेवन पांहचविण्याचा हट्ट धरला. भलेही ते जेवन मुखात जाईपर्यंत विटले असले तरी कांणत्या तरी बाबुचा खिसा भरणेही तितकेच महत्त्वाचे होते. मग अचानक वाहतुक बंदी झाली. लाखो कामगार देशोधडीला लागले. हाताला काम नाही, पोटात अन्न नाही म्हणून आपल्या मूळ गावाला जाऊन तेथे जगू असा विचार ते करु लागले. तोपर्यंत वाहतुक बंद झाली मग त्यांनी चालत जाण्याचा, सायकलवरुन जाण्याचा मार्ग स्वीकारला. प्रसंगी रेल्वे रुळावरुन चालण्याची तयारी दाखविली. पण शेवटी तेही थकले. विश्रांतीसाठी तेथेच कलंडले तर त्यांच्या अंगावरुन रेल्वे गेली. अनेकांनी गावापर्यंत पोहचण्यापुर्वीच प्राण सोडले. काहीजण गावात पोहचले पण गावाने त्यांना आत घेण्यास नकार दिला. पोटात अन्नाचा कण नाही आणि कोणी आश्रय देण्यास तयार नाही. इकडे शहरात राहणाऱ्यांची अवस्थाही तितकीच बिकट होती. दुसऱ्या बाजुला करोनाचे संकट वाढत असल्याचे आकडे सांगत होते. करोनापेक्षा भुकेने आणि उन्हाळ्याच्या झळा बसून व्याकुळ होणाऱ्यांची संख्याही किती तरी अधिक होती. इकडे पोलीस, सुरक्षा सैनिक, डॉक्टर, परिचारिका यांचे वेगळच हाल होत होते. करोनाच्या संकटाशी नेमके कसे लढायचेहे कुणालाच माहित नव्हते. फक्त आदेशाचे पालन करणे एवढेच त्याच्या हातात होते तरीही ते लढत होते. एका अदृश्य शक्तीशी प्रसंगी आपल्या प्राणांचे मोल देऊनही त्याच्यानंतर मोठ्या रकमेचे अनुदान देण्याच्या घोषणा झाल्या पण जगण्याची लढाई कशी करायची हे मात्र कोणी सांगत नव्हते.

जगण्याची ही लढाई सुरु असताना विद्यार्थ्यांचे हाल तर कोणीच बघत नव्हते. मध्ये मग कोणाला तरी परीक्षा न घेता पदव्या देण्याची हौस आली. कोणी म्हटले ऑनलाईन शिक्षण देण्यासाठी हीच योग्य वेळ आहे आणि मग तसे आदेशही निघाले. इकडे पोटात अन्न नसणाऱ्यांनी मोबाईल कोठून आणायचे आणि तो रिचार्ज कसा करायचा. याचे उत्तर देण्याची तसदी कोणीच घेतली नव्हती. कारण त्याच्यासमोर प्रश्न विचारणारेच कोणी नव्हते. 'सो कॉल्ड ऑनलाईन' शिक्षण सुरु झाले. ज्यांना ते शक्य होते त्यांनी मुलांसाठी नवे मोबाईल घेतले. मोठे स्क्रीन असलेले संगणक घेतले, पण असे परवडणाऱ्यांची संख्या नक्की किती होती हा प्रश्न पुन्हा कोणीच विचारला नाही. ऑनलाईन शिक्षण देण्याचे कौशल्य कोणत्या शिक्षकामध्ये आहे याचाही विचार करायला कोणाला वेळ नाही. 'केजी' पासून 'पीजी' पर्यंत सगळ्यांचेच ऑनलाईन शिक्षण सुरु झाले. त्यातून नक्की कोणाच्या डोक्यात काय गेले हे त्याचे त्यांनाच माहित. पण प्रत्येकाने आपआपले काम केले. कुठे नवीन वर्गांचा अभ्यासक्रम तर कुठे उर्वरित अभ्यास पूर्ण करण्यासाठी ऑनलाईनचा पर्याय सुचविण्यात आला आणि घाईघाईने म्हणा अथवा नाईलाजाने तो व्यवहार्य उपयोगातही आणण्यात आला. तो किती प्रभावी आहे, त्याच्या मर्यादा काय, त्याची उपयुक्तता किती ह्याचा विचार न करता केवळ एक अत्यावश्यक पर्याय म्हणून ऑनलाईन शिक्षणाचा स्वीकार करण्यात आला. हळूहळू त्याचे काही दुष्परिणाम विद्यार्थ्यांच्या जीवनशैलीत शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या दिसायला लागले खरे कंबरदुखी, डोकेदुखी, डोळ्याचा त्रास ह्यासारख्या शारीरिक व्याधी डोके वर काढू लागल्या तरी सध्या परिस्थितीत मात्र ऑनलाईन शिक्षणाला पर्याय नाही हेच खरे. ही एक बाजू असली तरी तंत्रज्ञानाचे फायदे हे आहेत आणि या निमित्ताने त्याचा विचार करणे अधिक अगत्याचे ठरते.

करोनाने आणलेले एक वादळ म्हणजे ऑनलाईन शिक्षण. खरे तर संगणक वापरुन विद्यार्थ्यांचे शिक्षण अधिक चांगले व्हावे यासाठी अनेक दशके संशोधन व प्रयोग सतत सुरु राहतात. मोठ्या प्रमाणात ऑनलाईन अभ्यासक्रम (मुक) वापरण्याची कल्पना त्यातलीच.

PRINCIPAL I/c.
Dr. Ambedkar College of Social Work, Wardha

Scanned with CamScanner

३. अनेक विद्यार्थ्यांकडे संगणक सोडाच पण स्मार्टफोनही नाही. कित्येक ठिकाणी इंटरनेट नाही किंवा सिग्नल मिळत नाही. ह्या त्रुटी देखील दूर करणं गरजेचे आहे.

४. झूम ॲप, गुगल क्लास यासारखे अनेक पर्याय उपलब्ध असले तरी त्याचे पाहिजे तसे गांभीर्य शिक्षक, विद्यार्थी आणि पालकामध्ये होणे अंत्यत आवश्यक आहे केवळ औपचारिकता म्हणून नव्हे तर जिवनावश्यक व्यवस्था म्हणून त्याकडे बघणे महत्त्वाचे वाटते.

पूर्वीच्या अनेक शतकाच्या तुलनेत आज परिस्थिती चांगली आहे. सरकार व औद्योगिक प्रयत्नातून ती सतत सुधारत आहे. तरीही मोठ्या संख्येने ग्रामीण विद्यार्थी व शिक्षक यापासून वंचित आहे. यावर तातडीने उपाय झाले पाहिजेत. करोना शक्य तितक्या लवकर आटोक्यात येईलच परंतु ऑनलाईनचे महत्त्व सर्वांना आज निदान समजले आहे. आज करोना काळात एक पर्याय म्हणून नव्हे तर आवश्यक गरज म्हणून ऑनलाईन व्यवस्था आपल्यापुढे आहे. ह्यांचा स्वीकार जेवढा लवकर आपण करु तेवढ्या लवकर आपली ऑनलाईन शिक्षण सुरळीत होईल. आज करोना कधी थांबेल याची सर्वाधिक निकड विद्यार्थ्यांना आहे. एकत्र जमणे, वर्गात बसून शिकणे, सगळ्यांना भेटणे, त्यांच्याशी बोलणे याचे फायदे कदाचित तसेच करता येत नसल्याने जास्त जाणवतात. विद्यार्थ्यांना नक्की काय फायदे आहेत हे नेमके कळत नसले तरी काहीतरी हरवल्याची खंत त्यांना नक्कीच वाटते.

आज हळूहळू जग उघडायला लागले आहे परंतु आजही करोनाची भीती मात्र कमी झालेली नाही. पर्याय नाही म्हणून ने स्वीकारलय एवढच. परंतु सतत डोक्यावर टांगती तलवार तर येतेच अशी आशा. संपूर्ण वर्ष ह्या भीती आणि सर्व निट होईल या आशेतच सरलय. परंतु येणारे नवीन वर्ष असे नसावे. संकट येणारच असेल तर त्याला तोंड कसे द्यायचे यांची किमान मानसिकता त्याच्या समोर जाण्याचे धाडस तरी हे करोना संकट देऊन गेलं.

माणसांमधील परस्पर विश्वास आणि ह्याकाळात एकमेकांना दिलेली साथ ही खऱ्या अर्थाने करोनाकाळातील माणसातील माणसांचा विजय आहे. ह्या काळात माणसा-माणसातील सामाजिक व आर्थिक दरी नाहीशी होऊन नवीन डिजिटल युग सर्वांना आणखी जवळ आणण्याचा प्रयत्न करीत आहे. ही हे डिजिटलायेशन नवीन शिक्षण पध्दतीला आणखी समृध्द करेल यात यत्किंचितही शंका नाही.

सदंर्भ ग्रंथसूची :

१. महाराष्ट्र टाइम्स. करोना काळातील ऑनलाईन शिक्षण-एक उत्तम पर्याय युक्त संधी.
२. महाराष्ट्र टाइम्स. करोनाचा शिक्षण व्यवस्थेवरील परिणाम
३. महाराष्ट्र टाइम्स. करोना आणि ऑनलाईन शिक्षणाची संधी
४. महाराष्ट्र टाइम्स. (२६/१२/२०). करोना कल्लोळ सरो.
५. महाराष्ट्र टाइम्स. (२५/१२/२०). ऑनलाईन शिक्षणाची मुहूर्तमेढ
६. महाराष्ट्र टाइम्स. (१६/१२/२०). हे जरा अतीच झालं

College of Social Work

PRINCIPAL I/c.
Dr. Ambedkar College of
Social Work, Wardha

Scanned with CamScanner

B.Aadhar

Peer-Reviewed & Refreed Indexed

Multidisciplinary International Research Journal

Human Rights : Reality & Challanges

SPECIAL ISSUE

December-2020



Chief Editor
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

Editor:
Dr. Sandip B. Kale
Coordinator
HOD. Dept. Of Political Science
Yeshwant Mahavidyalaya Seloo
Dist. Wardha

Executive Editor:
Dr. Archana S. Dahane
Officiating Principal
Yeshwant Mahavidyalaya Seloo
Dist. Wardha

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.aadharsocial.com

Aadhar PUBLICATIONS

PRINCIPAL
Dr. Ambedkar College of Social Work, Wardha

Scanned with CamScanner

46	भारतीय राज्यघटना व मानवी अधिकार — अश्विन खांडेकर	191
47	महिला आणि मानवी हक्क — प्रा. डॉ. ममता आर. साहू	196
48	स्त्रीयांचेसबलीकरण आणि मानवाधिकार — प्रा.डॉ. हरीदास लाडके	200
49	कौटूंबिक हिंसाचार – महिलांच्या विकासातील एक अडथळा — सहा.प्रा. कु. प्रतिभा सुभाषराव काटकर	203
50	वैधिक संदर्भात मानवी हक्काच्या प्रकाशातील भारतीय अपंगतत्वाच्या समस्येची उकल — डॉ.विजय साहेबराव कदम	209
51	बालकामगार व मानवाधिकार — प्रा. डी.टी. स्वर्गे	216
52	मानवी हक्क आणि महिला — प्रा. लक्ष्मण फुलचंद शिराळे	219
53	आंतरजातीय विवाहाचा जातीव्यवस्था निर्मुलनावर झालेल्या परिणामांचे अध्ययन — प्रा. डॉ. सुनिता भोइकर	224

Dr. Ambedkar College of Social Work WARDHA

PRINCIPAL I/c.
Dr. Ambedkar College of
Social Work, Wardha

Scanned with CamScanner

B.Aadhar International Peer-Reviewed Indexed Research Journal | ISSN : 2278-
Impact Factor - ((SJIF) -7.675, Issue NO, 257 | December

266

आंतरजातीय विवाहाचा जातीव्यवस्था निर्मुलनावर झालेल्या परिणामांचे अध्ययन

प्रा. डॉ. सुनिता भोइकर
डॉ. आंबेडकर कॉलेज ऑफ सोशल वर्क, वर्धा
मो. ९८८११७२८५८, Mail ID : bhoikarsunita@gmail.com

भारतासारख्या कृषीप्रधान व धार्मिकतेचा प्रभाव असणाऱ्या देशात जातीव्यवस्थेची मजबूत पकड आहे. जात ही आजच्या स्थितीत शिक्षण व नोकरीतील आरक्षणाचा आधार बनली आहे. जाती व्यवस्थेमुळे शतकानुशतके लोकांच्या सामाजिक आणि आर्थिक जिवनावर परिणाम झाला आहे. आणि ही प्रकिया आजही सुरु आहे. युनिसेफच्या एका अंदाजा नुसार जगभरातील २५ कोटी लोकांना जातिआधारीत भेदभावाला तोंड द्यावे लागले. आता सुध्दा वर्तमानपत्रात महिन्यातुन एक दोन ठळक बातम्या येतात की जातीबाह्य विवाह केला म्हणून तसा विवाह करणाऱ्या मुला–मुलींना जिवंत जाळले जाते. ठार मारल जाते किंवा मग त्या संपूर्ण कुटूंबाचा काहीच विचार न करता जाहीर विटंबना केली जाते. हजारो वर्षा पासून आपल्या समाजाला चिकटलेली जात आणि अस्पृश्यता दूर करण्यासाठी सर्वच जातीतील समाज सुधारकांनी आपले आयुष्य वेचले शासनाने अस्पृष्यता आपणी जातीयतेचा भेदभाव कमी करण्याठी समाजकल्याण विभागाअंतर्गत प्रोत्साहन योजना अमलात आगामी आहे. तरीही जातीबाह्य लग्न झाल्यावरही लोक मुला–मुलींची जात लक्षात ठेवतात. नॅशनल क्राईम रेकॉर्डस ब्युरो (NCRB) वरुन उपलब्ध आकडेवारी नुसार सलाम व प्रेतिष्ठेच्या नावाखाली २०१६ या वर्षात ७७ आंतरजातीय विवाह करणाऱ्या जोडप्याचा खून झाल्यांची संख्येची नोद आहे. Social Attitudes Research for India (SARI) या संस्थेकडून दिल्ली, मुंबई, उत्तरप्रदेश व राजस्थान या ठिकाणी केलेल्या सर्वेक्षणानुसार बहुतांश लोकांचा आंतरजातीय विवाहाला विरोध अन्यायाचा प्रतिसाद नोंदविण्यात आला. शासकीय स्तरावर आंतरजातीय विवाहास कायदेशीर मान्यता मिळावी याकरीता कायद्याची अमलबजावणी करण्यात येत आहेत. आजच्या घडीला हिंदू विवाह कायदा १९५५, मुस्लीम विवाह (सुन्नी, सिया, इतर धर्मीय) कायदा आणि विशेष विवाह कायदा १९५४ अस्तित्वात आहेत. तसेच केन्द सरकारच्या वतीने Dr. Ambedkar Scheme for Social Integration through Inter cast marriages ही योजना समाजीक न्याय व सशक्तीकरण मंत्रालय, भारत सरकार डॉ आंबेडकर फांउडेशन च्या वतीने राबवित आहे. तसेच महाराष्ट्रात महाराष्ट्र आंतर जातीय विवाह योजना – २०२१ समाजकल्याण विभागा अंतर्गत राबविण्यात येत आहे. असे असून सुध्दा आंतरजातीय विवाहाचे प्रमाण अत्यंत अल्प आहे. या संशोधनामध्ये आंतरजातीय विवाहाची जातीव्यवस्था निर्मुलनाच्या कार्यात भूमीका कशी आहे व आंतरजातीय विवाह मुळे जाती व्यवस्था निर्मुलनावर व समाजव्यवस्थेवर कोणता परिणाम झाला याचा उलगडा करण्याचा प्रयत्न केला आहे.

उद्देश :–

१) आंतरजातीय विवाहामुळे सामाजिक जिवनावर होणाऱ्या परिणामांचे अध्ययन करणे
२) आंतरजातीय विवाहमुळे जातीभेद निर्मुलनाच्या कार्यावर होणाऱ्या परिणामाचे अध्ययन करणे.
३) संबधीत जोडप्यांच्या होणाऱ्या वैवाहिक जिवनावर परिणामांचे अध्ययन करणे.

अध्ययन पध्दती :– सदर संशोधन कार्य हे गुणात्मक संस्थात्मक दोन्ही पध्दतीचे आहे. वर्णनात्मक संशोधन आराखड्याचा वापर करण्यात आला असुन नमुना निवडीकरीता गैरसंभाव्यता नमुना निवडीच्या सोयीस्कर तंत्राचा उपयोग करुन ३० जोडण्यांची निवड करण्यात आली. अध्ययनाचे क्षेत्र

College of Social Work WARDHA
PRINCIPAL I/c.
Dr. Ambedkar College of Social Work, Wardha
Scanned with CamScanner

वर्धा जिल्हा आहे. विवाह नोंदणी कार्यालयाअंतर्गत नोंदणी केलेल्या तसेच धार्मीक देवस्थान/मंदिरात आंतरजातीय लग्न केलेल्या जोडप्यांची निवड करण्यात आली. तथ्य संकलनकरीता प्रश्नावली, मुलाखत अनुसुची, गुगल फॉर्म ग्रंथसाहित्य इत्यादींचा उपयोग करण्यात आला.

माहिती विश्लेषण :– तक्ता क्र. १

आंतरजातीय विवाहाचा सामाजिक जीवनावर झालेला परिणाम

अ.क्र.	विवरण	वारंवारिता	टक्केवारी
१	सामाजिक वैमनस्य निर्माण होते	१५	५०.००
२	सामाजिक असुरक्षितता निर्माण होते	०३	१०.००
३	कुटूंबाची प्रतिष्ठा खालावते	०४	१३.३३
४	मुलीवर जास्त बंधने लादले जातात.	०८	२६.६७
	एकुण	३०	१००.००

सामाजिक परिणाम : २०११ च्या जनगणनेनुसार केवळ ५.८ टक्के भारतीय विवाह आंतरजातीय होते म्हणजेच गत ४० वर्षाचा विचार केला तर हे प्रमाण फारसे वाढलेले नाही. जाती व धर्म हा भारतीय समाजाचा महत्वाचा अंग आहे. या जातीय–धर्मीय भेदामुळे विविध सामाजिक गटांमध्ये मतभेद द्वेष आणि तणाव आहे. वर्षानुवर्षे पासून भारतीय समाजामध्ये रुढीवादी मानसिकता आहे. त्याची आजही अशी धारणा आहे की विवाह फक्त एकाच समाजात आणि जातीमध्ये शक्य आहे. परंतु आजच्या तरुणवर्गामध्ये प्रेम विवाह व आंतरजातीय विवाहाविषयी सकारात्मकता दिसून येते. परंतु रुढीवाढी परंपरामुळे अशा विवाहांना नेहमीच विरोध आहे. आंतरजातीय विवाहामुळे जातीयता कमी होण्याची शक्यता असली तरी सामाजिक वैमनस्य वाढण्याचे प्रमाण जास्त आहे. याचा परिणाम विवाहीत जोडप्यांचा वैवारिक जीवनावर सुध्दा होतो.

तक्ता क्र. २

आंतरजातीय विवाहामुळे जातीय भेदाभेद कमी होण्याविषयी

अ.क्र.	विवरण	वारंवारिता	टक्केवारी
१	पूर्णपणे	०८	२६.६७
२	अंशत:	१२	४०.००
३	नाही	१०	३३.३३
	एकुण	३०	१००.००

जातीय भेदाभेद : आंतरजातीय विवाहाच्या स्थितीमध्ये प्रदेशानुसार प्रमाण कमीजास्त आहे. उत्तरप्रदेश, बिहार, मध्यप्रदेश या सामाजिक–आर्थिक दृष्टया अविकसीत राज्यांपेक्षा हरीयाना, पंजाब कर्नाटक, महाराष्ट्र या विकसित राज्यांमध्ये जास्त आंतरजातीय विवाह झाले आहे. समाजातील सौव्यवस्था नष्ट करण्यासाठी ही योग्य सुरवात आहे. कारण विवाह प्रथेमध्ये जोडीदाराच्या निवडीमध्ये जाती आणि धर्म यांची महत्वपूर्ण भूमीका आहे. तरुण वर्गामध्ये जातीय भेदाभेद कमी होतांना दिसतो. सोबत राहणे, अभ्यास करणे, भिन्न–भिन्न जातीच्या मुला–मुलींशी मैत्री करणे यामुळे समाजात अशा विवाहाविषयीचा दृष्टीकोन विकसित होत आहे. परंतु जुन्या पिढ्या अजूनही

Scanned with CamScanner

लग्नाच्या बाबतीत जाती व धर्माविषयी कट्टर समर्थक आहे. त्यामुळे जातीय भेदाभेद कमी होण्यास अडथळे निर्माण होत आहे. त्यामुळे आतंरजातीय विवाह होण्याचे प्रमाण कमी आहे. रुढीवादी विचार, जातीचा प्रभाव यामुळे जातीभेद कमी होण्यास आंतरजातीय विवाहाचे महत्व कमी आहे.

268

तक्ता क्र. ३

आंतरजातीय विवाहामुळे जातीय भेदाभेद कमी होण्याविषयी

अ.क्र.	विवरण	वारंवारिता	टक्केवारी
१	समाजाची संकुचित मानसिकता	०३	१०.००
२	जातीप्रथेचा कट्टर प्रभाव	०९	३०.००
३	धार्मीक गुरुची चिथावणी	०२	०६.६७
४	विवाहाचा संबंध मानप्रष्ठेशी	०५	१६.६७
५	सामाजिक दबाव व भिती	११	३६.६६
	एकुण	३०	१००.००

जातीय भेद कमी न होण्याचे कारणे : भिन्न जाती धर्मामध्ये होणाऱ्या आंतरजातीय विवाहाची संकल्पना भारतीय समाजाला अस्वीकार्य आहे. खरतर भारताच्या विकासात येणाऱ्या अडचणीचे जाती आणि धर्म या आधारे समाजामध्ये असणारा भेदभाव व जाती विषयी असणारा देव हा मुख्य अडथळा आहे. जातीव्यवस्थेचा पगडा समाजाच्या मनावर ईतका रुजलेला आहे की त्याला बाहेर पडायला कित्येक वर्ष लागतील. आंतरजातीय विवाह हा कलंक समजल्या जातो. या विवाह उभे ठाकण्यास अनेक धर्मगुरु कारणीभुत असतात. ज्यामुळे दोन जाती व धर्मामध्ये वैमनस्य निर्माण होते. काही प्रसंगी तर विवाहीत जोडप्यांचे जीव सुध्दा घेतलेले आहे. त्यामुळे सुशिक्षीत आंतरजातीय विवाह करण्यास भीती निर्माण होत आहे. असे विवाह करणाऱ्या कुटूंबावर बहिष्कार घालने, असहकार्य व दबाव टाकण्याचे प्रयत्न केले जात आहे. अशा विविध कारणामुळे आंतरजातीय विवाहाचा परिणाम जातीभेद कमी करण्यासाठी निष्फळ ठरत आहे.

तक्ता क्र. ४

आंतरजातीय विवाहामुळे वैवाहिक जिवनात येणाऱ्या समस्या

अ.क्र.	विवरण	वारंवारिता	टक्केवारी
१	कौटूंबीक व सामाजिक असहकार्य	१३	४३.३३
२	कमीपणाची वागणूक	०३	१०.००
३	असुरक्षितेचे वातावरण	०७	२३.३३
४	समायोजनाची समस्या	०४	१३.३४
५	यापैकी नाही	०३	१०.००
	एकुण	३०	१००.००

Scanned with CamScanner

९) लिंक : www.nscsindia.org
www.lawctopus.com
www.business-standard.com
10) https://vikaspedia.in/social-wel tare/social awareness/schemes/
dr. ambedkar.scheme for social-integration throw in ter-cast marriage
11) https://www.bbc.com/news/world asia-india- 47823588
12) https://www

Dr. Ambedkar College of Social Work WARDHA

PRINCIPAL I/c.
Dr. Ambedkar College of
Social Work, Wardha

Scanned with CamScanner

Impact Factor-7.675 (SJIF) ISSN-2278-9308

B.Aadhar

Peer Reviewed & Refereed Indexed

Multidisciplinary International Research Journal

ISSUE No- (CCCV)305

July -2021

Impact of Race, Caste, Class and Religion on Indian and International Society



Prof. Virag S. Gawande
Chief Editor
Director
Aadhar Social Research & Development Training Institute Amravati

Dr Nitin A. Mathankar
Executive-Editor
Principal,
Late Vasantrao Kolhatkar Arts College, Rohana

Dr. Deoman S. Umbarkar
Editor
Organizing Secretary
,Department of Sociology
Late Vasantrao Kolhatkar Arts College, Rohana

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

Aadhar Publication

For Details Visit To : www.aadharsocial.com

PRINCIPAL I/c.
Dr. Ambedkar College of Social Work, Wardha

Scanned with CamScanner

INDEX

No.	Title of the Paper — Authors' Name	Page No.
1	जातींचा राजकारणावर होणारा परिणाम — प्रा.डॉ.कविता मनिष थूल	1
2	जाती, धर्म आणि वर्गाचा सामाजिक संबंधावर होणारा परिणाम — प्रा. राजु बुरीले	7
3	जनसंपर्क प्रक्रिया में विज्ञापन विचारप्रसारण की व्यावसायिक भूमिका का अध्ययन — डॉ. आशीष गंगाधर उजवणे	14
4	अनुसूचित जातींच्या समस्या — प्रा.डॉ. निशा अशोक कळंबे	20
5	भीष्म साहनी के उपन्यास साहित्य में अभिव्यक्त सामाजिक चेतना — डॉ.श्यामप्रकाश आ. पांडे	24
6	डॉ. आंबेडकर जातीव्यवस्थेचे निर्मूलन विषयक विचार — प्रा.बाळकृष्ण कारू रामटेके	32
7	'भ्रमणध्वनी तंत्रज्ञानाचा वाढता उपयोग व त्याचा समाजव्यवस्थेवर होणारा परिणाम' — डॉ. सविता भा. चिवंडे	35
8	वंशश्रेष्ठत्व आणि दुसरे महायुध्द — डॉ.दिगांबर द. कापसे	42
9	भारतीय राजकारणावर जातींचा प्रभाव — डॉ. पी.एस. लोखंडे	48
10	भारतातील परंपरागत पोशाख व वेशभूषा — डॉ. अर्चना आ. निखाडे	51
11	भारतीय जातीव्यवस्थेचे सामाजिक जिवनावर परिणाम — प्रा.डॉ.उल्हास रामजी राठोड	62
12	संगीत साधना में घराने का योगदान येऊ महत्व ग्वालियर घराने के विशेष संदर्भ मे — डॉ. श्रीमती रूपाली गोखले	66
13	वसई प्रांतातील कुपारी समाजावरील (सामवेदी ख्रिस्ती) पोर्तुगीज संस्कृतीचा प्रभाव — नेहा किशोर सावंत भवन्स	70
14	बौध्ददर्शनाचा जिवनविषयक दृष्टिकोन — डॉ.आंबटकर वृषाली ओंकार	76
15	जाती व वर्णव्यवस्थेचा भारतीय समाजावर झालेला परिणाम — प्रा. डॉ. नागोराव के. सोरे	79
16	आदिवासी महिला सरपंचाची ग्रामपंचायत कार्यविषयक जाणीव व निर्णय प्रक्रियेतील सहभाग — डॉ. दीपक मगरदे	83
17	भगवानदास मोरवाल के उपन्यासों में धार्मिक प्रभाव — डॉ. डिंपल सुरेश पाटिल	87
18	जेरेमी बेंथॅमची सुखवादी संकल्पना — प्रा. डॉ. सुनिलदत्त सोपान गवरे	90

Scanned with CamScanner

B.Aadhar International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - (SJIF) -7.675, Issue NO, 305 (CCCV)
ISSN : 2278-9308
July 2021

आदिवासी महिला सरपंचाची ग्रामपंचायत कार्यविषयक जाणीव व निर्णय प्रक्रियेतील सहभाग

डॉ. दीपक मगरदे
डॉ. आंबेडकर कॉलेज ऑफ सोशल वर्क, वर्धा.
Email id : deepakmagarde1975@gmail.com ,भ्रमणध्वनी—९४२१७२७१८४

प्रस्तावना –

पंचायत राजमध्ये स्त्रियांच्या सरळसाक्ष वाहीने स्त्रियांचे प्रश्न आता राजकारणाच्या चौकटीत आल्याचे दिसून येते. पाणी, स्वच्छता, सुविधा, रस्ते, आरोग्य, शिक्षण, विज, दारूबंदी यांची अग्रक्रमाने चर्चा होवू लागल्याचे दिसून येते. आपल्या भागातील हे प्रश्न स्त्रिया वैठकीत पुरूषापेक्षा जास्त प्रभावीपणे व पोवरता रेटताना निरीक्षणातून दिसून आले. पंचायतीमध्ये महिलाकरीता आरक्षित जागा असल्यामुळे पंचायतीमध्ये महिलांना प्रवेश निश्चित असतो. महिला ज्ञानाद्वारे आणि तंत्राद्वारे गावाचा विकास होण्याच्या दृष्टीने प्रयत्न करीत आहे. महिलांमध्ये पंचायत व स्थानिक स्वराज्य संस्थामधील पदावर राहून कामाच्या अनुभवामुळे नवा आत्मविश्वास निर्माण होवू लागला आहे. आदिवासी समाजात महिला या सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक व राजकीयदृष्टया मागासलेल्या आहेत. त्याच्या मागासलेपणाची व समस्याची कारणे आपल्याला वेगळी दिसून येतात. आदिवासी महिलांना आरक्षणामुळे राजकारणात प्रवेश मिळाला परंतु त्यांनी नेतृत्व करतांना येणाऱ्या अडचणी व त्यावर मात करीत ग्रामीण विकासात त्यांची भुमिका या विषयावर अध्ययन केले असता त्यांची भूमिका सकारात्मक आहे. राजकारणाची सखोल माहिती नसल्याने निर्णय प्रक्रियेत त्यांना इतरांवर अवलंबून रहावे लागते.

विषय ओळख –

ग्रामपंचायत म्हणजे गावाच्या सर्वांगिण विकासाचे कार्य करण्यासाठी स्थापन केलेली लोक नियुक्त संस्था होय. पंचायतराजचा पायाभूत घटक व ग्रामसभेची कार्यकारी समिती म्हणून ग्रामपंचायतीला संबोधले जाते. महाराष्ट्रात १९५८ च्या मुंबई ग्रामपंचायत कायद्यानुसार स्थापन झालेली ग्रामपंचायत हीच गावाची स्थानिक प्रशासन करणारी विधीमान्य संस्था आहे. ग्रामपंचायत या नावाने ओळखली जात असली तरी मुंबई ग्रामपंचायत अधिनियमातील घटनेचा २४३ 'ब' कलमाखाली ग्रामीण भागाच्या सर्वांगीण विकासासाठी निर्माण करण्यात आलेली स्थानिक स्वराज्य संस्था होय. ग्रामपंचायतीच्या प्रमुखाला सरपंच असे म्हणतात. थेट मतदान पद्धतीनुसार लोक प्रतिनिधी म्हणून निवडून आलेल्या ग्रामपंचायतीच्या एकूण सभासदांपैकी एकाची निवड सरपंच म्हणून केली जाते. सरपंच हा गावाचा प्रमुख असतो. महिलांनाही सरपंच पद भुषवण्याची संधी मिळते. ही निवड पाच वर्षासाठी केली जाते. सरपंचाच्या मार्गदर्शनाखाली ग्रामपंचायतीचा कारभार चालतो. गावाच्या विकास योजना प्रत्यक्ष राबविण्याची जवाबदारी सरपंचावर असते.

स्वातंत्र्यपूर्व काळात स्वातंत्र्याच्या चळवळीत महात्मा गांधीच्या आव्हानाने अनेक स्त्रिया सहभागी झाल्या होत्या. म्हणजे भारतात स्त्रियांचा राजकारणातील सहभाग स्वातंत्र्य लढ्याच्या चळवळीतून सुरू झाला होता. १९२१ ला भारतात स्त्रियांना संपत्तीच्या कायदेमंडळाची सदस्य म्हणुन मान्यता मिळाली. वलवंतराय मेहता समितीने १९५७ ला शासनाला शिफारशी सादर केल्या. त्या शिफारशीनुसार पंचायत राज संस्थामध्ये दोन महिला प्रतिनिधी नियुक्त करण्याची तरतुद होती. त्यामुळे महिलांना स्थानिक स्तरावरील ग्रामपंचायत, पंचायत समिती आणि जिल्हा परीषद मधील

Scanned with CamScanner

राजकारणात सहभाग मिळाला. पण हा स्थानिक मर्यादेतील सहभाग कायदेशीर होतो. कारण तेव्हा स्त्रियांचे क्षेत्र चूल आणि मूल एवढ्यापुरतेच मर्यादित होते. महिलांच्या सहभागासाठी शिफारस होवून नेमणूक झाली तरी प्रत्यक्षात कामकाजात त्यांचा सहभाग फारच कमी म्हणजे नसल्या सारखाच होतो.

२८ एप्रिल १९९३ ला मा. राष्ट्रपतींची स्वाक्षरी होवून ७३ आणि ७४ वी घटनादुरूस्ती अस्तित्वात आली. या घटना दुरूस्तीमुळे पंचायत राज म्हणजे गाव पातळीवर ग्रामपंचायत, तालुका स्तरावर पंचायत समिती आणि जिल्हा पातळीवर जिल्हा परीषद तसेच स्थानिक संस्था म्हणजे शहर पातळीवर नगरपालिका व महानगरपालिका यामध्ये महिलांसाठी ३३ टक्के जागा व अधिकार पदे अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, भटक्या विमुक्त व मागासवर्गीय महिलांना आरक्षण सेप्टर पद्धतीने देण्यात आले.

आदिवासी समाजातील स्त्रियांना पूर्वी स्वतंत्र होते. पण समाजाच्या जबाबदारीमुळे या स्त्रियांना पुरूषप्रधान संस्कृतीमुळे दुय्यम स्थानावर राहावे लागले. स्वातंत्र्य प्राप्तीनंतरच्या काळात आदिवासी स्त्रियांना आपले अस्तित्व सिद्ध करण्यासाठी वरीच धडपड करावी लागली. प्राचीन काळापासून जुन्या रूढी, चालीरिती, प्रथा, परंपरा, मागासलेपणा या सर्व बाबींनी या समाजातील स्त्री जीवन संकुचित झाले होते.

१९९१ च्या जनगणेनुसार भारतात आदिवासी महिला साक्षरतेचे प्रमाण १८.२ टक्के तर महाराष्ट्रात २४.२ टक्के एवढे होते. शिक्षणाविषयी महिलांमध्ये जागरूकता नव्हती. दिवसेंदिवस इतर समाजासोबत आदिवासी समाजात जागृती व्हायला लागली व या समाजातील स्त्रिया शिक्षणाकडे वळू लागल्या. आज शिक्षण, व्यवसाय, नोकरी, साहित्य निर्मिती तसेच राजकारण या सर्वच क्षेत्रांमध्ये आदिवासी महिला हळूहळू पुढे येत आहेत. आदिवासी महिला सरपंच आहे. वर्धा जिल्ह्यात गोंड, परधान, हलबी, कोलाम या जमाती आढळून येतात.

अध्ययन पद्धती :

उद्देश :

१. आदिवासी महिला सरपंचाच्या ग्रामपंचायतीतील कार्यविषयक जाणिवेचा अभ्यास करणे.

२. ग्रामविकास महिला सरपंचाच्या निर्णय स्वातंत्र्याचे अध्ययन करणे.

गृहितकृत्य :

१. राजकारणी पार्श्वभूमी नसल्यामुळे महिला सरपंचाना त्यांच्या अधिकार व कर्तव्याची जाणीव नसते.

२. पतीच्या राजकीय हस्तक्षेपामुळे निर्णय प्रक्रियेत महिला सरपंचाना सहभागी करून घेतले जात नाही.

सदर नमुना अध्ययनाचे क्षेत्र हे वर्धा जिल्हा आहे. जिल्ह्यातील २१ आदिवासी महिला सरपंचानी गैरसंभाव्यता नमुना पद्धतीच्या सोयीस्कर नमुना निवड पद्धतीने निवड करण्यात आली.

तक्ता क्र. १कौटुंबिक सदस्याची राजकारणात सक्रियता दर्शक तक्ता

अ. क्र.	सदस्य	वारंवारिता	टक्केवारी
१	वडील	०३	१४.२८
२	पती	०९	४२.८५
३	सासरे	०४	१९.०७
४	आई किंवा सासू	०१	०४.७६
५	भाऊ	०२	०९.५२
६	कोणीही नाही	०२	०९.५२
	एकूण	२१	१००

Scanned with CamScanner

वरील तक्त्यावरून स्पष्ट होते कि, जास्तीत जास्त महिला सरपंचानी पती राजकारणात सक्रिय आहेत.

तक्ता क्र. २सरपंचाचे अधिकार व कर्तव्यानी माहिती दर्शक तक्ता

अ. क्र.	सदस्य	वारंवारिता	टक्केवारी
१	काही प्रमाणात	११	५२.३८
२	पूर्णपणे	०४	१९.०५
३	नाही	०६	२८.५७
	एकूण	२१	१००

वरील तक्त्यावरून निरीक्षणात येते कि, जास्तीत जास्त ८०.९५ टक्के महिला सरपंचाना त्याच्या अधिकार व कर्तव्याची जाणीव नाही.

तक्ता क्र. ३निर्णय घेताना कोणाची मदत दर्शक तक्ता

अ. क्र.	सदस्य	वारंवारिता	टक्केवारी
१	स्वत: निर्णय घेते	०५	२३.८०
२	ग्रामसेवकाची मदत	०३	१४.२८
३	सदस्य मिळून	०३	१४.२८
४	पतीची मदतीने	१०	४७.६४
	एकूण	२१	१००

वरील तक्त्यावरून असे निदर्शनात येते कि, जास्तीत जास्त महिला सरपंच निर्णय घेताना स्वत:च्या पतीची मदत घेतात.

प्रमुख निष्कर्ष :

१. आदिवासी महिला सरपंचाची राजकारणातील सक्रियता कमी आहे.

२. महिला सरपंचाच्या पतीचा निर्णय प्रक्रियेत हस्तक्षेप असतो.

३. आदिवासी महिला सरपंचांना ग्रामपंचायतीच्या कामकाजाविषयी शिक्षणा अभावी अत्यल्प माहिती आहे.

४. आदिवासी महिलांचा राजकारणातील प्रवेशाचे प्रमाण वाढत आहे.

सुचना व शिफारशी :

१. बहुसंख्य आदिवासी महिला सरपंचाना संवैधानिक आरक्षणाच्या तरतूदीविषयी विस्तृत माहिती नाही. त्याकरिता आरक्षणाविषयी आदिवासी महिलांमध्ये जागृती करण्यासाठी सरकारने प्रचार यंत्रणा राबवावी.

२. नवनियुक्त सरपंचाच्या क्षमता बांधणी करिता प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करून ग्रामपंचायतीचे कार्य, योजना व सरपंचाची भूमिका याविषयी जागरूकता निर्माण करावी.

३. स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणूका राजकीय पक्ष प्रक्रियेतून मुक्त करण्यात याव्यात आणि स्थानिक गटांच्या आधारावर निवडणूकाचे स्वरूप ठरविण्यात यावे. ज्यामुळे स्त्रियांच्या सक्षमीकरणाच्या प्रक्रियेत पक्षीय घटक अडसर ठरणार नाही.

संदर्भ ग्रंथसूची

१. काळदाते, सुधा (2005); ग्रामपंचायत : सामाजिक परिवर्तनाचे साधन, ठाणे : पंचायती राज प्रबोधन संस्था प्रकाशन.

२. कौशीक, आशा (2004); नारी सशक्तीकरण, जयपूर : पोइन्टर पब्लिकेशन

३. कुलकर्णी अ. ता. (2007); भारतीय स्थानिक स्वशासन, नागपूर : विद्या प्रकाशन.

Scanned with CamScanner

४.कन्हाडे वी. एम. (2007); शास्त्रीय संशोधन पद्धती, नागपूर : पिपल्लापुरे अॅन्ड पब्लिशर्स कंपनी.
५.मेश्राम सुरेश (2000); प्रात्याक्षिक सामाजिक संशोधन, नागपूर : कृष्णचंद्र एजन्सीज.
६.भागवत विश्रुत (1993); भारतीय समाजशास्त्र आणि स्त्री–पुरुष विषमतेचा प्रश्न, पुणे.
७.पाटील, भारती (2001); पंचायतराज संस्था मधील स्त्रीयांचा सहभाग, पुणे : प्रबोधन प्रकाशन.
८.देवगावकर शैलजा (1989); स्त्रियांचा राजकारणातील सहभाग (संपा) पुणे, डॉ. जया सागडे, प्रकाशक इंडीयन लॉ सोसायटी.

PRINCIPAL I/c.
Dr. Ambedkar College of
Social Work, Wardha

Scanned with CamScanner

ISSN 2230-7745

समाजशास्त्र संशोधन पत्रिका

मराठी समाजशास्त्र परिषद

वर्ष ३८ वे अंक २५ वा डिसेंबर, २०२०.

मराठी समाजशास्त्र परिषदेचे मुखपत्र

Dr. Ambedkar College of Social Work WARDHA

PRINCIPAL I/c.
Dr. Ambedkar College of
Social Work, Wardha

Scanned with CamScanner

मराठी समाजशास्त्र परिषद

(नोंदणी क्रमांक : महाराष्ट्र/२७-८३ औरंगाबाद)

-: कार्यालय पत्ता :-

अध्यक्ष, मराठी समाजशास्त्र परिषद,

द्वारा : पदवी व पदव्युत्तर समाजशास्त्र विभाग, स्वामी विवेकानंद महाविद्यालय,

शिरूर ताजबंद, ता. अहमदपूर, जि. लातूर - ४१३५१४

-: कार्यकारी मंडळ :-

अध्यक्ष : डॉ. नारायण कांबळे, स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

सचिव : डॉ. वेदप्रकाश मलवाडे, स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

खजिनदार : डॉ. बळीराम पवार, स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

सदस्य : प्रा. शिवाजी उकरंडे, मुंबई विद्यापीठ, मुंबई.

सदस्य : डॉ. संजय कोळेकर, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.

सदस्य : डॉ. प्रदीप गजभिये, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर.

सदस्य : डॉ. नवनाथ शिंदे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.

सदस्य : डॉ. धन्यश्री पाटील, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

सदस्य : डॉ. श्रीराम खाडे, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती.

सदस्य : डॉ. प्रशांत सोनवणे, क. बहीणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव

सदस्य : डॉ. प्रवीण घोडेस्वार, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.

सदस्य : डॉ. स्निग्धा कांबळे, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

सदस्य : डॉ. मंगलमूर्ती धोकटे, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर.

सदस्य : डॉ. हिरालाल भोसले, एन. एन. डी. टी. विद्यापीठ, मुंबई.

Scanned with CamScanner

अनुक्रमणिका

अ.क्र.	लेखाचे शिर्षक	लेखक	पृ. क्र.
१.	जातीय हिंसाचार: एक समाजशास्त्रीय विश्लेषण	संजयकुमार कांबळे	...१
२.	आदिवासींची वर्तमान स्थिती: आव्हाने आणि उपाय	पद्माकर सहारे	...५
३.	सामाजिक क्रांतीचे अग्रदूत: पेरियार इ. वी. रामासामी	प्रियदर्शन भवरे	...११
४.	मराठवाडयातील अनुसुचित जातीच्या सामाजिक विकासात....	ना. स. गायकवाड	...१७
५.	डॉ. बाबाराव्हेव आंबेडकर यांचे शिक्षण विषयक विचार....	मधुकर धुतुरे	...१९
६.	मोबाईलचा वापर व स्त्रिया: एक स्त्रीवादी अभ्ययन	धनंजय सोनटक्के	...२१
७.	कुटुंब आणि कौटुंबिक हिंसाचार	दिपक पवार	...२४
८.	टी. व्ही. पाहण्याच्या सवयीमुळे लहान बालकांवर.....	मंजुषा नळगीरकर	...२७
९.	प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनामध्ये स्वयंसेवी संस्थेची भूमिका	हरिश पेटकर	...३०
१०.	अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यातील समाजशास्त्रीय चिंतन	हनुमंत मिसाळ	...३३
११.	महिलांवरील वाढते अन्याय–अत्याचार	ज्योती दिघाडे	...३७
१२.	नाथजोगी भटक्या जमातीचे .....वास्तव:	गणेश वहाडे	...३९
१३.	लॉकडाउन आणि कौटुंबिक हिंसाचाराची दाहकता	अंजली जोशी	...४४
१४.	लिंगभाव दृष्टिकोन व स्त्री पुरूष समानता	रमेश पाटील	...४७
१५.	भारतातील पदेशवाद: कारणमिमांसा व उपाययोजना	रामेश्वर मोरे	...५१
१६.	कोरोनाचा सामाजिक जिवनावर पडलेला प्रभाव:	रविंद्र विखार	...५४
१७.	खारवी समाजाची सांस्कृतिक स्थित्यंतरे	सचिन सनगरे	...५७
१८.	पश्चिम मुंबईतील महिला भिक्षेकरी समस्या	ज्योती पोटे	...६०
१९.	कचरा वेचक कामगारांच्या सामाजिक समस्या	कैलास अंबुलगेकर	...६३
२०.	नागरी कुटुंबाचे बदलते स्वरूप	किशोर राऊत	...६७
२१.	स्त्रीभ्रूण हत्या: एक ज्वलंत सामाजिक समस्या	रामराव चव्हाण	...६९
२२.	स्त्री कायद्यामागचं वास्तव:	अंजली वाठ	...७१
२३.	लैंगिक गुन्हयातील बळी स्त्रियांचा समाजशास्त्रीय.....	वायभासे एस. व्ही.	...७३
२४.	कोराना महामारीचा भारतीय समाजावरील परिणाम	विद्या खंडारे	...७५
२५.	इतर मागासवर्गातील नौकरी करणाऱ्या विवाहित स्त्रियांच्या....	गायंदे, खंदारे	...७७
२६.	लिंगभाव आणि तृतीयपंथी: एक आकलन	विलास चव्हाण	...७९
२७.	महिलांचे आरोग्य आणि पोषण आहार विषयक वास्तव:	विनोद शेंडे	...८२
२८.	स्त्री पुरूष समानता: काळाची गरज	सुरेखा दांडगे	...८४
२९.	कोरोनाचा उच्च शिक्षणावर झालेला परिणाम	सुनंदा भद्रशेट्टे	...८६

Scanned with CamScanner

३०.	भारतीय समाजातील बालकामगार	अशोक भोसले	...८७
३१.	छत्रपती शिवाजी राजे आणि महार जात.....	राजेंद्र कांबळे	...८८
३२.	महिला पोलीस कर्मचाऱ्यांची स्थिती.....	सुमेध राजुरकर	...९०
३३.	वॉटरकप स्पर्धेमूळे पाणीदार झालेल्या गावांचा	नवनाथ खेत्री	..९२
३४.	शेतकरी आत्महत्या: प्रश्न आणि आव्हाने	नलिनी वोरकर	...९६
३५.	नैसर्गिक आपत्तीमूळे आर्थिक हानीबाबत....	अभिजीत वेरूळकर	...९९
३६.	आदिवासी चळवळ आणि महिला	अमिता महातळे	...१००
३७.	नवीन कृषी विधेयक २०२०: स्वरूप व परिणाम..	भगवान गवाळ	...१०२
३८.	भारतीय समाजातील विविध धर्मातील विवाहाचे स्वरूप	चंद्रशेखर भेजे	...१०५
३९.	भ्रष्टाचार: एक सामाजिक समस्या	लीना गादेवार	...१०७
४०.	महात्मा ज्योतिबा फुले यांच्या कृषीविषयक विचारांचे.....	शिवाजी दहीकांबळे	...११०
४१.	महिला सबलीकरण: महिला सुरक्षितता.....	माधुरी गिरी	...११२
४२.	कुटूंब, विवाह आणि आप्तसंबधांवर सामाजिक माध्यमांचा.....	माधुरी झाडे	...११३
४३.	डॉ. एम. एन. श्रीनिवास यांची संस्कृतीकरणाची संकल्पना	मोहन नगराळे	...११६
४४.	लिंगभाव विषयक असमानता	मोनाली बहादूरे	...११८
४५.	भारतीय समाजातील स्त्रीभ्रूण हत्या	आर. आर. पाटील	..१२०
४६.	ग्रामविकास कार्यक्रमात स्थानिक नेतत्वाची भूमिका	साहेबराव हिवाळे	..१२१
४७.	बालकामगार समस्यांचे चिकित्सक अध्ययन	शेकोबा ढोले	...१२४
४८.	हुंडाप्रथा: कारणे व उपाययोजना	शोभा ताजणे	...१२७
४९.	महात्मा फुले यांचे शैक्षणिक विचार आणि बहुजनांची उन्नती	सतीश ससाणे	...१२९
५०.	कोरोना कालावधीतील समस्यांचा समाजशास्त्रीय अभ्यास	प्रमिला भुजाडे	...१३१
५१.	अनुसूचित जाती–जमातींच्या सामाजिक समस्या	सुधाकर माटे	...१३५
५२.	लॉकडाउनच्या काळात महिला बचत गटांची भूमिका	माया मसराम	...१३९
५३.	क्षेत्रीय अनुभवांची क्रियात्मकता:	सागीर गोहपात्र	...१४१
५४.	विदर्भातील शेतकरी आत्महत्या: कारणे आणि उपाय	संतोष मेंढेकर	...१४५
५५.	अत्याचारग्रस्त महिलांसाठीचे आश्रयस्थान:	सतिश धनवडे	...१४७
५६.	वाशिम जिल्हयातील दारिद्रय रेषेखालील.....	दयानंद राऊत	...१४९
५७.	समाजशास्त्रीय पध्दतीशास्त्रातील द्वंद	बाबुराव जाधव	...१५१
५८.	डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भारतीय शेतीविषयक विचार	भीमराव पुंडगे	...१५५
५९.	पुस्तक परिचय		...१५७

Scanned with CamScanner

28

24

राज्यातही महिला आयोग स्थापन झाला आहे. महिला कोणतीही तक्रार थेट महिला आयोगाकडे करू शकतात. आयोगाला सिव्हील कोर्टप्रमाणे चौकशी आणि तपासाचे अधिकार आहेत. हा आयोग बळावली सरकारला महिला कल्याणाच्या योजनाही सादर करतो.

निष्कर्ष :–सबलीकरणासाठी शासन पातळीवर अनेक उपाय करूनही स्त्री अत्याचार अन्यायामध्ये वाढ होत आहे कायदे करूनही योजना असूनही तळागाळातील महिलांपर्यंत फायदा पोहोचत नाही हे पोहोचवण्यासाठी शासकीय यंत्रणा व सेवाभावी संस्था व इच्छाशक्ती जनता यांच्या पुढाकाराची गरज आहे. सतत प्रयत्नांची विविध कार्यशाळा, प्रबोधन, संस्कार वर्ग, प्रशिक्षण शिबीर, एन. एस. एस. ने करून सबलीकरण आवश्यक आहे. त्याला पाठबळ केला तर महिलांचे सबलीकरण होईल व अमलबजावणीच्या कार्यपद्धती महिलांच्या हाती दिल्यास महिलांच्या कार्यात वेग येईल.

संदर्भ ग्रंथ

१. सामाजिक प्रश्नांकरण – डॉ. सुनंदा सकाळे, सरद पब्लिकेशन, औरंगाबाद.
२. महिला सक्षमीकरण – विजयी विजय सिंह
३. स्त्रीसशक्तता – दर्शनीकार आणि
४. स्त्री सशक्तीकरण जगी स्त्री – सविता पाटी
५. महिला सुरक्षा एक समाज – एन. पी. सरकार, सायकोलिजर्स एन्ड हिस्टॉरियन्स

कुटूंब,विवाह आणि आप्तसंबंधावर सामाजिक माध्यमांचा परिणाम

डॉ. माधुरी झाडे, सहाय्यक प्राध्यापक, समाजशास्त्र विभाग प्रमुख, डॉ. आंबेडकर कॉलेज ऑफ सोशलवर्क, वर्धा९८२३४८२०२६

प्रस्तावना:–समाजातील सर्वांत महत्त्वाचा घटक म्हणून आपण कुटुंबाकडे बघतो. व्यक्तिची सपूर्ण जडणघडण ही कुटुंबातच होत असते. व्यक्तिच्या जीवनाचा अनौपचारिक पाठशाळा म्हणजे कुटुंब होय. मानवाचा जन्म हा कुटुंबातच होतो आणि जीवनातील महत्तम कालावधी तो कुटुंबातच व्यतीत करतो.कुटुंब ही बहुआयामी संस्था आहे, कारण कुटुंबाच्या माध्यमातून जैविक कार्यांपासून, सामाजिक, आर्थिक, धार्मिक, शैक्षणिक व सांस्कृतिक आणि राजकीय कामे करण्यात कुटुंबामध्ये आई – वडिल, आजी – आजोबा, बहिण – भाउ तसेच अतिनिकटचे नातेवाईक याचा समावेश असतो. समाजाचे अध्ययन करीत असताना कुटुंबव्यवस्थेकडे लक्ष केंद्रित करणे आवश्यक असते.

कुटुंबाच्या व्याख्या –कुटुंबाचा अर्थ समजून घेण्याकरीता काही समाजशास्त्रज्ञांनी केलेल्या व्याख्यांचा आढावा घेणे आवश्यक आहे.

मॅक आयव्हर व पेज यांच्या मते "कुटुंब म्हणजे लैंगिक संबंधावर आधारलेला लहान व स्थायी समूह असून त्यामध्ये प्रजनन आणि मुलांचे संगोपन केले जाते."ऑगबर्न आणि निमकॉफ यांच्यामते, "ज्या समूहामध्ये पती पत्नी आपल्या अपत्यासह किंवा अपत्याशिवाय किंवा पती अथवा पत्नीचा फक्त अपत्यासह समावेश असतो त्याला कुटुंब असे म्हणतात."बर्जेस किंवा लॉक यांच्या मते, "कुटुंब व्यवस्थीत असा समूह असतो की, जे परस्परांशी विवाह, रक्तसंबंध किंवा दत्तकविधीने संबंधीत असतात त्यांचे एक सामान्य घर असते तसेच त्यातील सभासद परस्परांशी पती–पत्नी, माता–पिता, मुलगा–मुलगी, भाउ–बहिण अशा सामाजिक भुमिकेतून आंतरक्रिया करतात आणि संस्कृतीचे सृजन व संवर्धन करतात."

वरील व्याख्यान्या आधारे आपणास असे दिसून येते की,कुटुंब हा एक प्राथमिक व मुलभूत समूह आहे.कुटुंबामध्ये विवाह, रक्तसंबंध व दत्तकविधीच्या बंधनाने एकत्रीत आलेल्या सदस्यांचा समावेश असतो.हे सभासद पती–पत्नी, माता–पिता, मुलगा–मुलगी, भाउ–बहिण अशा भुमिका पार पाडतात.कुटुंबामध्ये कामवासना पुर्ती, प्रजनन, अपत्याचे संगोपन आर्थिक व भावनिक सहकार्य केले जाते. कुटुंबातील सर्व सदस्य हे एकाच गृहात वास्तव्य करतात.कुटुंबाद्वारे संस्कृतीचे सृजन, संक्रमन आणि संवर्धन केल्या जाते. अशारितीने आपणास कुटुंबाचे स्वरूप दिसून येते. कुटुंबाच्या प्रकारामध्ये आपणास प्रामुख्याने संयुक्त व विभक्त कुटुंब पहावयास मिळते. तसेच मातृसत्ताक कुटुंब सुध्दा दिसून येते परंतु आधुनिककाळामध्ये पितृसत्ताक कुटुंब मोठया प्रमाणात दिसून येतात.

विवाह:–मनुष्याला सामाजिक जीवन जगत असतांना विवाह संस्थेची गरज भासली कारण विवाहाद्वारेच स्त्री – पुरूषांच्या संबंधास मान्यता प्रदान करण्यात येते. विवाहामूळेच कुटुंबाची निर्मीती केली जाते. नविन नातेसंबंध निर्माण होतात म्हणून विवाहाद्वारेच कुटुंब व नात्यागोत्याचा एक साखळी तयार होत. विवाहाच्या माध्यमातूनच स्त्री – पुरूष, पती – पत्नी बनतात आणि त्यांच्या कामवासनांची पूर्ती होते. प्रजननाचा अधिकार प्राप्त होतो अर्थात यामोबतच येणाऱ्या कौटुंबिक व सामाजिक जबाबदाऱ्या त्यांना मिळून स्विकारायच्या असतात.

विवाहाचा अर्थ समजून घेण्याकरीता काही विचारवंतांनी केलेल्या व्याख्यांचा आढावा घेणे आवश्यक आहे.

जॉर्ज मरडॉक यांच्यामते, " विवाह म्हणजे परस्परांसमवेत राहून नियमित लैंगिक संबंध ठेवणे आणि आर्थिक सहकार्य करणे होय. "हॅरी जॉन्सन च्यामते, "विवाहाने पती पत्नीचे स्थायी संबंध निर्माण होतात तसेच लैंगिक संतुष्टीचा प्रस्थापने अधिकार मिळतात." तर एडवर्ड वेस्टरमार्क यांच्यामते, "विवाह म्हणजे एक किंवा अनेक पुरूषांचा एक किंवा अनेक स्त्रियांशी असलेला संबंध होय. ज्यास प्रथा किंवा कायदयाने मान्यता दिलेली असते तसेच त्यात समाजिष्ठ झालेल्या दोन्ही पार्श्वभियी तसेच त्यांच्यापासून जन्मास येणाऱ्या अपत्याबाबत काही अधिकार व कर्तव्याचा समावेश असतो."

वरील व्याख्यांवरून विवाहाचा अर्थ स्पष्ट होतो. त्यावरून आपणास असे मुद्दे लक्षात येतात ते पुढिलप्रमाणे.विवाहाद्वारे कुटुंबाची निर्मीती होते.विवाहाला समाज, धर्म तसेच कायदयाची मान्यता असते विवाहातूनच एक किंवा अनेक पुरूषांचा एक किंवा अनेक स्त्रियांशी संबंध प्रस्थापीत होतो. विवाहाने एकत्रीत आलेल्या स्त्री पुरूषाना कामवासनापुर्ती व प्रजननाचा अधिकार प्राप्त होतो. विवाहाद्वारे स्थापीत पति – पत्नीचे काही अधिकार व कर्तव्य असतात. पती पत्नी हे दोघेही अपत्याचे संगोपन व आर्थिक सहकार्यात सहभागी असतात. अशा रितीने आपणास विवाहाचे स्वरूप दिसून येते. या विवाहाच्या वैशिष्ट्यांमध्ये प्रामुख्याने समाजमान्यता, कायदयाची मान्यता, समारंभ, विधी, अधिकार व कर्तव्य तसेच स्थायीभाव दिसून येतो. विवाहाच्या प्रकारामध्ये आपणास एकविवाह, बहुविवाह, बहुविवाहामध्ये बहुपत्नी, बहुपत्नी विवाह दिसून येतात. परंतु आधुनिक काळामध्ये एक विवाह मोठया प्रमाणात दिसून येते.

आप्तसंबंध:–सामाजिक जीवन जगत असतांना आप्तसंबंधी व्यवस्थेला अनन्यसाधारण महत्व प्राप्त झाले असते. ही व्यवस्था कुटुंब व विवाहाद्वारे अधिक व्यापक बनलेली असते. आप्तसंबंधी व्यवस्था आदिवासी व ग्रामिण समाजात विशेष महत्वाची असते. भारतातील नागरी समुदायामध्ये आप्तसंबंधी व्यवस्थेचे महत्व थोडे

Scanned with CamScanner

कमी झालेले आहे. आप्तसंबंधी व्यक्तींमध्ये कुटुंबाला महत्त्वपूर्ण स्थान प्राप्त झालेले आहे. या समूहात विवाह आणि कौटुंबिक प्रसंगी दूरवरचे नातेवाईक एकत्र येतात. सर्व सदस्य परस्परांचे नातेवाईक असतात. आप्तसंबंधामध्ये विभिन्न नातेवाईकांना एकान संज्ञा निर्देश करण्यात येत असे. मामा ही संज्ञा पतीच्या आणि पत्नीच्या पित्यासाठी उपयोगात आणतात. एक सोपे उदाहरण याते दर्शविले जाते उदा. माता, पिता, सामाजिक मानवशास्त्रज्ञ रेडक्लिफ ब्राउनच्या मते, "आप्तसंबंधाने प्रकार्यात्मक महत्व आहे. यामधून व्यक्तीने मुख्य प्रधान होते समाज संघटित राहतो आणि सहजीवनाचा लाभ होतो."दर्खेम्च्या मते, "आप्तसंबंधामुळे सामाजिक संबंधाचे जाळे निर्माण होते." तर रिव्हर्सच्या मते, "नातेवाचक संज्ञा संबंधीत व्यक्तींच्या अधिकार व कर्तव्याना निर्देश करतात."

वरील सर्व विश्लेषणावरून आपणास असे दिसून येते की,आप्तसंबंधामुळे व्यक्ती–व्यक्तीमध्ये आपलेपणाची भावना निर्माण होते व त्यातून संघटन दृढ होते.आप्तसंबंधामुळे मानसीक सुरक्षा प्राप्त होते. आप्तसंबंधामुळे नातेवाईक एक दुसऱ्यांना वेळोवेळी मदत करीत असतात.दैनंदिन सामाजिक जीवनामध्ये (उदा. सण,समारंभ) नातेवाईकांचा सहभाग असतो व त्यांच्याकडे सोपविलेली जबाबदारी ते पार पाडतात विवाह निश्चीत करताना आप्तसंबंधीयाची भूमिका ही महत्वपुर्ण असते. कौणत्याही व्यवस्थेमध्ये नात्यातील लोकांना प्राधाण्यकम देणे, त्याची निवड करणे त्याना सहकार्य करणे यासारख्या घटनांवर आप्तसंबंधाचा प्रभाव दिसून येतो. आधुनिक सामाजिक व्यवस्थेमध्ये विविध कारणांमुळे आप्तसंबंधातील परिवर्तन दिसून येते. आप्तसबधाची व्याप्ती कमी होत आहे. सर्वधामधिल घनिष्ठता सकुचित होत आहे, परंतु अद्यापही ग्रामिण क्षेत्रात नातवाइकाच्या गटामध्ये घनिष्ठता दिसून येते.

संशोधन पध्दती:–प्रस्तुत अध्ययन करीत असताना विविध ग्रंथ, विविध मासिकामधील लख, दैनिक वृत्तपत्रातील लेख, इंटरनेट वरील माहिती व समाजातील अवलोकनामधून हा संशोधन पेपर लिहीला आहे.

संशोधनाची उदिष्टे –१.सामाजिक माध्यमांचा कुटुंबावर होणारा परिणाम जाणून घेणे. २. सामाजिक माध्यमांचा विवाहावर होणाग परिणाम जाणून घेणे. ३. सामाजिक माध्यमांचा आप्तसंबंधावर होणाग परिणाम जाणून घेणे.

गृहितकृत्ये :–१. सामाजिक माध्यमांमुळे कुटुंबातिल परस्पर संवाद कमी झाला. २. सामाजिक माध्यमांमुळे मुलामुलींना विवाह जुळविणे सोपे झाले. ३. सामाजिक माध्यमांमुळे नातेवाईकांमधील संबंधाची घनिष्ठाता कमी झाली.

सामाजिक माध्यमे:–आज संपुर्ण समाजजीवन हे प्रचार प्रसार माध्यमानी प्रभावीत झाले आहे. व्यक्तीच्या प्रत्येक कृतीवर, वागण्यावर , बोलण्यावर, गहण्यावर प्रचार प्रसार माध्यमांचा प्रभाव दिसून येतो. संपुर्ण समाजाला प्रचार प्रसार माध्यमांनी गेरले आहे. आज परिवर्तनाची गतीही वाढली आहे. परिवर्तन हे झपाटयाने होतांना दिसत आहे. प्रत्यक्ष क्षेत्रात, प्रत्येक व्यवस्थेमध्ये परिवर्तन होतांना दिसत आहे. मानवी समाजाची गुणी परंपरावादी मुल्य, परंपरा बदलत जावून आधुनिक गुल्यांचा स्विकार व्यक्ती करताना दिसत आहे. आज समाजव्यवस्थेमध्ये प्रसार, प्रचार माध्यमासोबतच समाजमाध्यमे महत्वपुर्ण भुमिका बठवितांना दिसून येत आहे. वेषभुशा दिसून येतो, कारण व्यक्तींचे विचार बदलत आहे, कृती बदलत आहे, सवयी बदलत आहे. वेशभुषा–केशभुषा बदलत आहे. एकुणच संपुर्ण समाजजीवन समाजमाध्यमांनी कब्जा मिळविलेला दिसून येतो. आज एकविसाव्या शतकाच्या सुरूवातीलाच प्रसारमाध्यमांनी व्यक्तीने स्वतंत्र हिसकून घेतले आहे. त्यांना त्यांत अंतर्भुत होण्यासाठी केल जाती आहे. माध्यम तज्ञ देवेंद्र इस्सर म्हणतात की, आपल्याला हे विसरून चालणार नाही की, अनेक माध्यमा ही संवादाचे माध्यम नाही. माध्यम कोणतीही असो ती व्यक्ती व्यक्ती व व्यक्ती समुदायामधे संवादाची उणीव करून परिवर्तन, लोकशाही, कल्याणकारी समाज गृहद करू शकत नाही. त्याकरीता आवश्यकता आहे की माध्यमांचा विकास हा स्वतंत्र लोकसंवादातून प्रभावीत झाला पाहीजे. एका सर्वेक्षणानुसार असे दिसून आले की, संपुर्ण जगातील ६७ टक्के पेक्षा जास्त लोक समाजमाध्यमांना आपल्या जीवनाचा एक महत्वपूर्ण घटक मानतात व अधिकाअधिक वेळ ते समाजमाध्यमांवर घालवितात. आज सगळीकडे उपभोगवादी संस्कृतीचे प्रदर्शन माध्यमाद्वारे करण्यात येते त्यामुळे सामाजिक मुल्यांचा ऱ्हास होताना दिसत आहे. त्यामुळे समाजातील अनेक सामाजिक संस्थांना त्याचा विपरीत परीणाम होत आहे. व्यक्तीच्या व्यक्तीगती संकल्पनांना वाव मिळत आहे व व्यक्ती स्वकेंद्री होतांना दिसून येत आहे. या बदलत्या परिस्थितीमध्ये मिडीया तज्ज्ञ डी पाईपर यांच्या मते, आधुनिक सामाजिक परिस्थितीमध्ये सामाजिक माध्यमांची भुमिका ही नांत्रीक व महत्वपूर्ण तसेच भावात्मक असल्याने दिसून येते ज्याना मानसिकतेशी संबंध असून त्याचा परिणाम २१ व्या शतकामध्य अधिक क्रांतीकारी स्वरूपात प्रकट होईल. सामाजिक संदर्भामध्ये डॉ. जेम्स एस. मुर्तिचेमत महत्वपूर्ण आहे. ज्यामध्ये त्यांनी भारतीय दृष्टिकोनातून चर्चीतले तर, भारतामध्ये गरीबी, निरक्षरता, अंधश्रध्दा इत्यादी महत्वपुर्ण समस्या आहेत. सामाजिक माध्यमांनी केलेल्या क्रांतीची माहीती तर आपली जगापर्यंत सांगु शकतो परंतु वास्तविकतेमध्ये आपची सामाजिक संरचना इतकी जटील आहे की कितीही अत्याधुनिक सामाजिक माध्यमे आमच्या पर्यंत पोहचली तरी त्यामध्ये अडथळे निर्माण होताना दिसतात. यावरून आपणास असे दिसून येते की, भारतामध्ये अनेक जाती, धर्म, पंथ, भाषचे लोक रहात असल्यामुळे प्रत्यकांच्या चालीरीती, प्रथा व परंपरा हया वेगवेगळ्या आहे त्यामुळे सामाजिक माध्यमातून प्रसारीत घेणारी माहिती ही नेमकी कुणासाठी, कुणाकरीता व कुणाच्या विरोधात आहे हे ठरविताना वेगवेगळे समूह वेगवेगळ्या पध्दतीने प्रतिक्रीया नोंदवित असतात व यामधून सामाजिक स्वास्थ वैयक्तिक संबंध धोक्यात येण्याची शक्यता अधिक असते.

समाजिक माध्यमे आणि कुटुंबव्यवस्था:–२० व्या शतकापर्यंत संचार क्रांतीमुळे संपुर्ण समाजजीवन ढवळून निघाले होते. २१ व्या शतकाच्या सुरूवातीलाच संचार क्रांतीसोबतच प्रचार आणि प्रसारकरीता वेगवेगळ्या माध्यमांना उपयोग करण्यात येवू लागला आज समाजामध्ये प्रत्येक घराघरात मोबाईल आला आहे व त्यामुळे [illegible] हा एक महत्वपूर्ण घटक झाला आहे. कैसर फॅमिली फाउंडेशन नी केलेल्या एका सर्वेक्षणानुसार ८ ते १८ या वयोगटातील व्यक्ती साधारणत: ७ तास मोबाईलवर घालवितात. अनेक कुमारावस्थेतील मुले व तरूणाना मोबाईलवर वरिल वयातील मुले हे वॉट्सप, फेसबुक, इन्स्टाग्राम , ट्विटर, युटयुब, डेटिंग, गेमिंग साईट्स याचा वापर करताना दिसताना. या समाजमाध्यमाद्वारे गेमिंग साईटवर वेगवेगळ्या प्रकारचे गेम्स आहेत. ते गेम्स खेळून किशोरवयीन मुलांना, तरूणांना तसेच प्रौढांना सुध्दा काही प्रमाणात व्यसन असते याचा परिणाम त्याच्या मानसिकतेवर होतो. व घरचे वातावरण स्वस्थ राहत नाही. घरातील संवाद हरवित चाललेला दिसून येतो. नौकरदार घरामध्ये जर चार व्यक्ती असेल तर त्यापैकी वडिल हॉलमध्ये, आई किचनमध्ये, मुलं आपापल्या बेडरूममध्ये मोबाईलवर असतात. घरातील संवाद हरवित चाललेला दिसून येतो.

Scanned with CamScanner

माध्यमाद्वारे नातेसंबंधांना दिशा देण्याचा प्रयत्न केला जातो. वेगवेगळ्या माध्यमांतून वेगवेगळ्या स्पर्धा निर्माण होतात. वेगवेगळ्या अपेक्षांची पूर्तता होत नसल्याने जोडीदारांमध्ये तणाव निर्माण होतो. या तणावाचे रूपांतर कधी कधी घटस्फोटात होते. घटस्फोटाचे प्रमाण देखील वाढलेले आहे. पती पत्नी आपले प्रेम हे समाजमाध्यमांद्वारेच व्यक्त करायला लागले उदा. व्हॅलेंटाईन डे, वाढदिवस इत्यादी हे प्रेम व्यक्त करताना काही गटातमध्ये मात्रही स्पर्धा निर्माण झालेला असते की तो कोणता फोटो अपलोड करू किंवा कोणत्या हॉटेलमध्ये वाढदिवस साजरा केला त्याची माहिती समाजमाध्यमाद्वारे लोकापर्यंत याची स्पर्धा निर्माण झालेली असते. समाजमाध्यमातून निर्माण झालेली स्पर्धा ही जीवघेणी ठरत आहे. पती पत्नीमध्ये तणाव निर्माण करीत आहे. पती पत्नी च्या संबंधामध्ये अडथळा निर्माण करीत आहे. अशा रितीने समाजमाध्यमाचा विवाहव्यवस्थेवर परिणाम झालेला दिसून येतो.

समाजिक माध्यमे आणि आप्तसंबंध:—सामाजिक माध्यमाचा नातेसंबंधावर/आप्तसंबंधावर देखील परिणाम झालेला आहे. यामध्ये विशेषत्वाने समूह करावयाचे झाल्यास व्यक्ती नातेसंबंधावर/आप्तस्वकीयांना फार कमी वेळ देता व अधिकाश वेळ सामाजिक माध्यमावर घालवितो. पूर्वी लग्नप्रसंगी अथवा कार्यप्रसंगी आप्तस्वकीय एकत्रीत व्हायचे चार पाच दिवस एकत्रीतच राहायचे परंतु आता यामध्ये परिवर्तन झालेले आहे. लग्न अथवा कार्य आटोपले की लगेच अथवा दुसऱ्या दिवशी आपआपले परिवार प्रवासाला निघतात. त्यामुळे एकत्रीतपणा किंवा आपलेपणा कमी झाला असे न म्हणता वेगवेगळ्या माध्यमाचा प्रभाव व्यक्तीवर पडल्यामुळे तो कामामध्ये, त्यांच्या कार्यामध्ये फार व्यस्त झाला असतो म्हणून तो नातेवाईकांना अधिक वेळ देवू शकत नाही. आज स्वकियांमध्ये /नातेवाईकामध्ये सामाजिक माध्यमातून सातत्याने कोणत्याही घटनेविषयी वस्तुविषयी सतत तुलना चालत असते ही तुलना निराशाकडे जाणारी सुद्धा असू शकते. अनेक वेळा सामाजिक माध्यमातून नातेवाईक एक दुसऱ्यावर टिपणी करताना सुद्धा दिसतात. त्यामुळे वादामध्ये व्यत्यय निर्माण होत असतो व नातेसंबंध विकोपाला दखिल जातात. नातेवाईक प्रत्यक्ष समारंभासोर असले तर त्यांच्यातील निर्माण होणारे गैरसमज दूर करणे सोप असते. परंतु सामाजिक माध्यमातून निर्माण होणारे गैरसमज दूर करणे कठिण असते. आज प्रत्येक व्यक्ती हा सामाजिक माध्यमांद्वारे इतका गुरफटून गेला आहे की त्याला नातेवाईकांना भेटण्याकरीता त्यांचे विचारपूस करण्याकरीता वेळच मिळत नाही व्यक्ती व्यक्ती केंद्रित झाला, भौतिकवादी झाला त्यामुळे अनेकांना नातेवाईकांची गरज सुद्धा भासत नाही. सामाजिक माध्यमांनी मानवांना सक्षम केलेले आहे. सामाजिक माध्यमे हेय अनेक व्यक्तीचे विश्व झाले आहे.

निष्कर्ष:—सामाजिक माध्यमाचा कुटुंबावर इतका प्रभाव पडला आहे की, कौटुंबीक संवाद कमी झाला. खाण्याणिण्याच्या वेळा अस्थिर झाल्या. मुलांना फेसबुक, वॉट्सअप, इन्स्टाग्राम, ट्विटर, युट्युब इत्यादी सामाजिक माध्यमाचे व्यसन लागले. पुर पुर्ती कौटुंबिक जबाबदारीपासून दूर जाउ लागली. कुटुंबातील खेळीमेळीचे वातावरणामध्ये वातावरणामध्ये वाद होवुन एकलकोंडी/एकाकी वातावरणामध्ये वाढझाली. सामाजिक माध्यमांचा विवाह व्यवस्थेवर फार मोठा प्रभाव पडला. आज शहरी समुदायातील, महानगरातील मुलं मुली स्वतःची लग्न ही समाजमाध्यमाचा वापर करून जुळवू लागली. स्वतःचा परीचय समाजमाध्यमावर अपलोड करून योग्य जोडी चा वधू शोधायला लागले याचा परीणाम घटस्फोटामध्ये होणारे वाढ घटल्याचे अतिशयोक्ती होणार नाही. समाजमाध्यमाद्वारे होणाऱ्या विवाहामुळे कौटुंबिक सदस्यांना मान सन्मानाचा प्रश्न निर्माण झाला. दोन कुटुंबातील संवादाचा प्रश्न निर्माण झाला. व व्यक्ती स्वयकेंद्री होत चालल्या. सामाजिक माध्यमांचा नातेसंबंधावर देखील परीणाम झाला. सामाजिक माध्यमाद्वारे अनेक वस्तू, घटना, कपडे यांची तुलना नातेसंबंधामध्ये होवू लागली. यामुळे स्वत्व व

Scanned with CamScanner

स्वतः मताद्वारे व्यक्त करणे सोपे झाल्याने सामाजिक माध्यमातून विचारांची तुलना होताना दिसत आहे परंतु नातेवाईक आले तरी पलीकडील व्यक्ती त्यांना कमी वेळ देवून समाजमाध्यमांमध्ये अधिक वेळ व्यस्त असतो अशा वेळी नातेवाईकांची निराशा होवून तो परत येत नाही व नातेसंबंधात व्यत्यय निर्माण होतो. अनेक कार्यक्रमाचे निमंत्रण हे समाजमाध्यमांद्वारे दिल्यामुळे नातेवाईकांच्या घरातील जेष्ठ व्यक्तीना सन्मान मिळत नाही असे वाटते व कार्यक्रमाला ते उपस्थित राहत नाही. एकंदरीतच समाजमाध्यमांमुळे नातेसंबंधातील मानसन्मान हरविला आहे.

संदर्भसूची

१. आगलावे प्रदिप, (२००३) 'समाजशास्त्र', नागपूर : साईनाथ प्रकाशन
२. खरपसे पा. वी., (२००३) 'समाजशास्त्राची मूलतत्वे', पुणे : विद्याभवन पब्लिशिंग हाउस, सकुल, डॉ. भालेराव मार्ग, विद्याभवन
३. सा. कृष्ण कुमार (१९९८) 'मनवर ज्ञानी और बदलता सामाजिक सौदर्य बोध' जयपुर : राईटर पब्लीशर्स
४. ब्रम्हर रेड्डी , (२००२) 'जनजातीय संस्कृति और विकास' जयपुर : साईनाथ प्रकाशन
५. गव्हर्न घु. एस – इन्डियन सिव्हीजा
६. दुर्गा शेल्ट – इन्ड्रा ऑफ सोशल ॲन्ड कल्चरल चेंज

डॉ. एम.एन. श्रीनिवास यांची संस्कृतीकरणाची संकल्पना

डॉ. मोहन नगराळे, उपप्राचार्य व विभाग प्रमुख, आर. एस. मुंडले धरमपेठ कला, वाणिज्य महाविद्यालय, नागपूर.

प्रस्तावना:–पारंपरिक भारतीय समाज रचनेतील सामाजिक गतिशीलतेला स्पष्ट करणारी संस्कृतीकरण ही संकल्पना सर्वप्रथम डा. एम.एन. श्रीनिवास यांना मांडली. पारंपारिक भारतीय समाजाचे एक व्यवच्छेदक लक्षण म्हणून जातिव्यवस्थेचा उल्लेख केला जातो. ही जातिव्यवस्था श्रेणीबद्ध असून ती अपरिवर्तनीय, सार्वत्रिक आहे असे मानले जाते. मात्र श्रीनिवास यांनी जातिव्यवस्थेतील सामाजिक गतिशीलता इतिहास काळापासून वैदिक काळाच्या अनुषंगाने कशाप्रकारे होत आली आहे ही बाब संस्कृतीकरणाच्या संकल्पनेत प्रकर्षाने मांडली आहे. जातिव्यवस्थेतील गतिशीलता हा संस्कृतीकरणाच्या संकल्पनेत एक खास विशेष आहे. त्यामुळे भारतीय सामाजिक संरचनेच्या स्वरूपाचे यथार्थ आकलन होण्यासाठी संस्कृतीकरण ही संकल्पना खरोखर महत्त्वाचे आहे. संस्कृतीकरण ही संकल्पना भारतीय समाजातील जाती/उप जातीसमूहाच्या स्थानात होणारे सामाजिक, सांस्कृतिक परिवर्तन असते हे परिवर्तन जातीच्या अंतर्गत स्वरूपातील असते. या परिवर्तनाला जातीतर्गत घटकच कारणीभूत असतात. त्यामुळे येथे असे मान्य करण्यासारखे आहे की, संस्कृतीकरण हे जातीमधील परिवर्तनशीलता, गतिशीलता असते. त्यामुळे समग्र जातिव्यवस्थेच्या सोपानक्रमात कोणताच बदल संभवत नाही. श्रीनिवास यांच्या शब्दात सांगावयाचे झाल्यास संस्कृतीकरण हे एकमूरक (Positional)परिवर्तन असते ते संरचनात्मक (Structural)नसते.

भारतीय समाजामध्ये स्त्रियांना अजूनही दुय्यम दर्जा आहे. त्या आर्थीक व सामाजिकदृष्ट्या दुर्बल तसेच निर्भर आहेत. पण वर्तमान स्थितीत स्त्रियांमध्ये शिक्षण व तत्सम कारणांमुळे जागरूकता वाढत चालली आहे. त्यामुळे स्त्री सक्षमीकरणाच्या संकल्पनेचा विचार गांभीर्याने होणे महत्वाचे आहे. स्त्री सक्षमीकरण हा आज स्वतंत्र विषय समजला जातो. समानता व सर्वांगीण विकासासाठी स्त्री सक्षमीकरण गरजेचे आहे. पंचायत राज व्यवस्थेत ३३% महीला आरक्षणामुळे राजकारणात हळूहळू स्त्रियांचा प्रवेश झाला. स्त्रियांसाठी शासनाच्या वतीने अनेक चांगले उपक्रम व योजना तयार करण्यात आल्या. देशाच्या एकूण लोकसंख्येत महीला आणि मुले यांचे प्रमाण ७०%असल्याने देशाच्या विकासावर प्रभाव पाडणारा हा मोठा घटक आहे हे स्पष्ट होते. थोडक्यात वर्तमानकाळात विकासाच्या पटलावर स्त्री हा घटक दुर्लक्षीत करून चालणार नाही.

भारतीय संविधानाने स्त्री–पुरूषांना समान हक्क व अधिकार प्रदान केलेले आहे. पंचायत राज व्यवस्थेत महीलांना ७३ व ७४ व्या घटना दुरूस्तीने ग्रामीण व शहरी स्थानिक स्वराज्य संस्थेत ३३%आरक्षण मिळाले आहे. परंतु अजुनही पंचायत राज व्यवस्थेत महीला समर्थनीय भूमीका पार पाडतांना दिसत नाही. याचे कारण म्हणजे कुटूंब, समाज व राजकीय पक्षीय व्यवस्था यांना एकत्रीतपणे होणारा विरोध होय.

पंचायत राज व्यवस्था महाराष्ट्र राज्यातून २३ एप्रिल १९९२ पासून सुरू करण्यात आली. व ७३ व्या घटनादुरुस्तीने पंचायत राज व्यवस्थेला घटनात्मक दर्जा प्राप्त झाला. संपूर्ण भारताचा विचार केला असता पंचायत राज पद्धती कार्यवाहीत आनणारे महाराष्ट्र हे अकरावे राज्य आहे.

पंचायत राजमध्ये स्त्रियांच्या संख्यात्मक वाढीने स्त्रियांचे प्रश्न आता राजकारणाच्या चौकटीत आल्याचे दिसून येते. पाणी स्वच्छता सुविधा, रस्ते, आरोग्य, शिक्षण, वीज, दारूबंदी यांची अग्रक्रमाने चर्चा होत आहे. पंचायतीमध्ये महीलांकरीता आरक्षीत जागा असल्यामुळे पंचायतीमध्ये महीलांचा प्रवेश निश्चित असतो. महीलांमध्ये पंचायत राज व स्थानिक स्वराज्य संस्थामधील पदावर राहून कामाच्या अनुभवातून नवा आत्मविश्वास निर्माण होत आहे ही एक जमेची बाजू आहे. पंचायत राज हे महीला सक्षमीकरणासाठी प्रभावी माध्यम आहे असे म्हणण्यास हरकत नसावी. ग्रामीण भागातील पंचायत राज व्यवस्थेतील सहभाग व त्याना झालेला विकास

PRINCIPAL I/c.
Dr. Ambedkar College of Social Work, Wardha

Dr. Ambedkar College of Social Work WARDHA
Scanned with CamScanner

सक्षमीकरण यांची वास्तविकता जाणून घेण्यासाठी सदर अध्ययन कार्य संशोधनकर्त्याने केलेले आहे.

अध्ययन पद्धती

सदर अध्ययन कार्य हे गुणात्मक संशोधन पद्धतीचे आहे. प्रस्तुत अध्ययन कार्य हे वर्धा जिल्ह्यातील वर्धा तालुक्यातील एकूर्ली, अलीपूर, तळेगाव, वायगाव, नेरी, मिरापूर, वाघोली, शिरूळ, ऐरणवाडी, पिंपळगांव या १० गावातील ग्रामपंचायत सदस्य, अंगणवाडीताई, आशा वर्कर व प्राथमिक शाळेच्या शिक्षिका यांना उत्तरदाते म्हणून संभाव्यता नमुना निवड पद्धतीने निवड करण्यात आली. या अध्ययन कार्याचे क्षेत्र वर्धा तालुका असून अध्ययन विश्व ७७ एककाचा आहे. नमुन्याचा आकार ३० एकाकांचा आहे.

अध्ययनाचे उद्देश

१)पंचायत राज व्यवस्थेतील महीलांच्या सहभागाचे अध्ययन करणे.
२)पंचायत राज व्यवस्थेमुळे महीलांच्या सक्षमीकरणावर झालेल्या प्रभावाने अध्ययन करणे.
३)महिलांच्या विकासाकरीता पंचायत राज व्यवस्थेतील विकासात्मक धोरण अध्ययन करणे.

महीलांची सामाजिक स्थिती

आधुनिक जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात पुरूषांच्या बरोबरो कार्यरत आहेत. तरीही आज त्या पूर्वीपेक्षाही अधिक असुरक्षित आहेत. संयुक्त राष्ट्राच्या अहवालानुसार भारतात २४.५ कोटी स्त्रिया निरक्षर आहेत. तर ९० टक्के स्त्रिया अशा आहेत की, ज्यांना आपल्या आरोग्यासंबंधीचे निर्णय घेण्याचाही अधिकार नाही. आपल्या देशात एकूण लोकसंख्येन्या सुमारे ५० टक्के स्त्रिया आहेत. भारताचे संविधान मुलभूत हक्कांच्या दृष्टिने स्त्रि–पूरूष समानता मान्य करते. परंतु आजही स्त्रियांच्या समस्या आजच्या आधुनिक जगात कमी होण्याऐवजीवाढत असल्याचे जाणवते. अशिक्षीत असो की सुशिक्षीत, अनेक स्त्रिया, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, सांस्कृतिकदृष्ट्या पीडीत असल्याचे त्यामुळेच जाणवते. मानवाधिकार असतांना या स्त्रियांच्या अधिकाराला दडपून टाकण्याचा जो प्रयत्न केला जातो. त्यासाठी सामाजिक स्तरावर उपाययोजना होणे महत्वाचे आहे. स्वातंत्र्योत्तर काळात योजनापूर्वक प्रगतीनंतर जवळ जवळ तीन दशकानी १९७४ मध्ये राष्ट्रीय स्तराला नियुक्त मंडळाने देशातील स्त्रीचा समाजातील दर्जा आणि स्थान याचा पहिला अहवाल सादर केला. या अहवालावरून स्त्रीचे स्थान डागाळलेले, विदारक धक्कादायक आढळले. मध्यम वर्गातल्या स्त्रियांचे शिक्षण आणि नोकरी व्यवसाय या संदर्भात थोडी जमेची बाजू वगळता एकूण सर्वसामान्य स्त्रीचे स्थान हे मागासलेले दिसून आले. भारतातील जवळ जवळ निम्म्या स्त्रियांच्या जीवनात बालमृत्यू, उपासमार, दारिद्र, व्यवसाय उपलब्धतेची संधी न मिळाल्यामुळे वाढलेली बेकारी, अति शारीरिक श्रम, निराधारपणा या सर्वांमुळे उतरती कळा लागलेली आढळने.

पंचायत राज व्यवस्थेमुळे महीलांना नेतृत्वाची संधी मिळत आहे. त्यामुळे त्यांच्या सामाजिक दर्जात वाढ होण्यास व सामाजिक प्रतिष्ठा वाढण्यास मदत होत आहे.

महीलांची आर्थिक स्थिती

आधुनिक युगात एकूण श्रमशक्तीत स्त्रियांचा वाटा फार मोठा आहे. अर्थार्जनासाठी जवळ जवळ सर्वच क्षेत्रात स्त्रिया कार्यरत असलेल्या दिसून येतात. आजही आर्थिक क्षेत्रात स्त्रिया मोठ्या प्रमाणात संख्येने कार्यरत आहेत. काही व्यवसाय तर स्त्रियांमुळेच कार्यरत चहाचे मळे, शेतीतील रोवणी, निंदण आणि कृषी क्षेत्र तसेच गालीचे तयार करणे, भरतकाम, नक्षीकाम इत्यादी जगप्रसिद्ध पारंपारिक कार्ये कमी मजूरीवर काम करण्यास स्त्रीश्रमीक सदैव तयार असतात. एकंदरीत शारीरिक श्रमाच्या कार्यात स्त्रियांचे प्रमाण अधिक आहे. स्त्रियांचे प्रमाण वाढविण्यासाठी आर्थिक स्वातंत्र्य व सक्षमता तिला बहाल करणे अधिक महत्वाचे आहे. ज्यामुळे कुप्रथा व अपत्य जन्माला घालण्याचे स्वातंत्र्य तिला मिळेल. पंचाय राज व्यवस्थेमुळे स्त्रियांना सत्तेत सहभागी होण्याची व स्त्रियांकरीता स्त्री विकास चळवळ सुरू करण्याची संधी मिळाली आहे. पंचायत राज अंतर्गत सुरू केलेल्या स्वर्णग्रामजयंती योजना, महाराष्ट्र ग्रामीण जिवनोन्नती अभियानातून स्त्रियांना आर्थिक विकास झाल्याचे दिसून येते.

PRINCIPAL I/c.
Dr Ambedkar College of
Social Work, Wardha

Scanned with CamScanner

महिलांची आरक्षणाची स्थिती

२१ व्या शतकात ग्रामपंचायत, पंचायत समिती किंवा जिल्हा परिषदेच्या राजकारणत स्त्रिया थोड्याशा, रूळलेल्या स्थिरावलेल्या दिसतात. परंतु त्यांच्या समस्या कमी झाल्या आहेत असे मुळीच नाही. काळाबरोबर समस्यांची तीव्रता कमी वाटू लागली असेल, पण स्त्रियांनी तक्रारीचा सूर न लावता परिस्थितीशी जुळवून घेत काम करण्यास प्राधान्य दिले. तरीही स्त्रियांना रोज अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. मात्र स्त्रिया स्थानिक सत्तेतील विविध पदांवर आल्यामुळे त्यांना सन्मान मिळू लागला.

पंचायत राज व्यवस्थेत महीलांचा राजकीय सहभाग राजकीय क्षेत्रात प्रवेश करण्यासाठी खुले द्वार भारतीय घटनेच्या ७३ व्या व ७४ व्या घटना दुरुस्तीने महीलांना मोठी संधी मिळाली. विशेषत: इतर मागास प्रवर्ग, अनुसूचीत जाती व जमाती मधील स्त्रियांना स्वतंत्र आरक्षण मिळाले. म्हणजेच महीलांसाठी राखीव जागा झाल्या व महीला आरक्षणात स्त्रियांना आरक्षणाची सुविधा दिली. महीला आरक्षणाची तरतूद झाल्याने गावखेड्यातील सर्वात उपेक्षीत शोषीत महीलांना प्रथमच राजकारणाचे अवकाश मोकळे झाले. पण त्याचे राजकीय प्रवेश हे कुटूंबाच्या पुरुषांच्या निर्णयावर निर्भर झाले आहे.

पंचायत राज संस्था, नगरपालिका यामध्ये महीलांना पूर्वी ३३ टक्के व आता ५० टक्के आरक्षण देण्यात आला. या आरक्षणाचा अनुभव उत्साहजनक आहे. राजकारणात चंचू प्रवेश झाल्यानंतर अनेक महीलांनी आपले कर्तृत्व सिद्ध करुन दाखविले. (देशमुख–१९९३)

महाराष्ट्राच्या विधानमंडळाचा मागील पाच वर्षातील प्रतिनिधीत्व

अ. क्र.	वर्ष	एकूण संख्या	महीला सदस्य
१	१९९९	९२८८	१२
२	२००४	२८८	१२
३	२००९	२८८	११
४	२०१४	२८८	२१
५	२०१९	२८८	२३

स्थानिक स्वशासन व संसदेमध्ये महिलांचा सहभाग वाढविण्याकरीता आरक्षण एक मुख्य मार्ग आहे. यासाठी सर्वच राजकिय पक्षांनी महीलांना प्रतिनिधीत्व देणे महत्त्वाचे आहे. परंतु राखीव जागा वगळता इतर जागांवर महिलांचे उमेदवारांचे प्रमाण अत्यल्प आहे.

राजकिय सहभाग

पंचायत राजमधील व्यवस्थेतील सहभागाविषयी असे दिसून येते की, १९५७ ते २००१ च्या काळात १५० उमेदवारांत केवळ ४ स्त्रिया होत्या. १७ एप्रिल २०१४ च्या काळात लोकसभा निवडणूकीत महाराष्ट्रातील १९ मतदारसंघात ३५८ उमेदवारांपैकी केवळ २४ महीला उमेदवार होत्या. महीला आरक्षणामुळे ग्रामीण क्षेत्रात महिला उमेदवारांचे प्रमाण वाढले आहे. बऱ्याच प्रमाणात विशेषत: आरक्षीत जागांवर स्त्रिया निवडून देखील आल्या आहेत. परंतु विशिष्ट पदावर जरी महीला उमेदवार निवडून आल्या असल्या तरी या पदाचा कारभार तिचा पती चालवित असल्यामुळे राजकिय क्षेत्रात आपल्या कार्याचा स्वतंत्र ठसा उमटविता आला नाही.

१५ व्या लोकसभेत (२०१४) एकूण ५५६ म्हणजे सर्वाधिक महीलांनी लढविली. त्यापैकी ५९ महीला खासदार पदावर निवडून आल्या. अर्थात लोकसभेच्या एकूण सदस्यसंख्येचा विचार करता महीला सदस्यांचे प्रमाण केवळ १०.६१% एवढेच आहे.

PRINCIPAL I/c.
Dr. Ambedkar College of Social Work, Wardha

Scanned with CamScanner

310

महीलांचा निर्णय प्रक्रियेतील सहभाग

वर्तमान काळात राजकीय क्षेत्रात येणाऱ्या महीलांचा टक्का वाढता आहे ही अत्यंत स्वागतार्ह बाब आहे. पण सत्तेवर आल्यानंतर त्यांना त्यांच्या मनासारखे निर्णय स्वतंत्रपणे घेता येतात का? हा प्रश्न तेवढाच महत्वाचा आहे. शहरी क्षेत्रात स्त्रियांच्या राजकिय नेतृत्वाचे प्रमाण अधिक आहे. तर ग्रामीण क्षेत्रात तुलनात्मकदृष्ट्या ते कमी आहे. महीलांना नेतृत्व जरी पंचायत राज व्यवस्थेत मिळाले असले तरी निर्णय प्रक्रियेचे स्वातंत्र्य मिळाले नाही. पती शासकीय अधिकारी, राजकिय वरीष्ठ नेते अशा विविध लोकांच्या दडपणाखाली त्यांना निर्णय घ्यावा लागतो. राजकारणात कार्यरत असणाऱ्या स्त्रियांना कौटूंबिक व सामाजिक आघाड्यांवर अनेक अडचणींना तोंड द्यावे लागते. त्यामुळे त्या राजकारणात येण्यास घाबरतात. राजकिय क्षेत्रात कार्य करतांना देखील त्या विशिष्ठ दडपणाखाली वावरतात हे एक वास्तव होय. ज्या दिवशी स्त्रिया राजकीय निर्णय स्वतंत्रपणे घेतील त्या दिवशी महीलांच्या हिताचे नियम व कायदे तयार होऊन त्यांची अंमलबजावणीकेली जाईल. महीलांच्या हातातील अधिकार महीलांना न्याय मिळवून देतील व समानता निर्माण होण्यास हातभार लागेल.

शासकीय धोरण व महिला सक्षमीकरण

भारतीय राज्यघटनेचा सरनामा, मुलभूत हक्क, मुलभूत कर्तव्ये व मार्गदर्शक तत्वे यामध्ये 'स्त्री–पुरुष समता' हे तत्व व्यक्त होते. राज्यघटना केवळ महीलांना समतेची शाश्वती देत नाही. तर राज्यसंस्थेने प्रसंगी किंमत मोजूनही महिलांच्या सार्वजनिक हिताचा विचार केला पाहिजे, अशी भूमिका घेते. यासाठी राज्यसंस्थेला अधिकार राज्यघटना देते. महीला सबलीकरण धोरण निश्चिती करण्यावर भारतामध्ये नव्वदीच्या दशकात राज्यसंस्थेने भर दिला. त्या अगोदर सबलीकरण धोरण नव्हते. केवळ महीलांच्या संदर्भात कायदे केले गेले. प्रारंभीच्या काळात भारत सरकारने महीलांसाठी कल्याणकारी धोरण निश्चित केले. यामध्ये सरकारचा भर कायदे करण्यावर होता. याशिवाय शिक्षण, आरोग्य व कल्याण अशा सामाजिक सेवांच्या लाभार्थी म्हणून महीला धोरण समजले गेले. कल्याणकारी धोरणाची जागा १९७५ नंतर विकासलक्षी कायद्यांनी घेतला. यानंतर १९९० नंतरर कल्याणकारी व विकासलक्षी हे दोन दृष्टिकोन मागे पडले आणि त्या जागी 'महीला सक्षमीकरण' हे नवे धोरण भारत सरकारने स्विकारले. महीला सक्षमीकरण धोरणाअंतर्गत महीलांना सत्तेमध्ये समान वाटा निर्णय प्रक्रियेत सक्रीय सहभाग, समान संधी, सर्वच पातळ्यांवर दर्जेदार शिक्षण, समान वेतन, सामाजिक सुरक्षा, व्यावसायिक सुरक्षा, राजकीय, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक व नागरी क्षेत्रात महीलांना समान हक्क व स्वातंत्र्य दिले पाहीजे. महीलांचा शोषण करणाऱ्या अनिष्ठ प्रथा–परंपरांचे उच्चाटन, कायद्याची निर्मिती व प्रभावी अंमलबजावणी, सुलभ न्यायदान प्रक्रिया या सर्व बाबींचा सक्षमीकरण प्रक्रियेत समावेश असला पाहीजे. व त्या दृष्टिने कृतीकार्यक्रमांची अंमलबजावणी झाली पाहीजे.

महीला सक्षमीकरणातील अडथळे

स्त्री सक्षमीकरण हा विषय बराच व्यापक व बहुआयामी आहे. स्त्री सक्षमीकरणाचे अनेक पैलू लक्षात घेता, स्त्री सक्षमीकरण होणे ही देशासाठी अत्यंत गौरवाची बाब आहे. स्त्री सक्षमीकरणामुळे स्त्रियांशी संबंधीत अनेक चांगले मुद्दे, विकासाची भक्कम बाजू नजरेच्या टप्प्यात येत असेल तर निचा दर्जा, सन्मान तसेच स्थितीत सुधारणा होत आहे असे म्हणता येईल. पण स्त्री सक्षमीकरणाचे प्रयत्न जेवढे वाढत आहेत तेवढीच मागे खेचण्याची जणू स्पर्धाच लागली आहे. स्त्रियांचे स्वातंत्र्यावर बंदी, लैंगिक शोषण, स्त्री अपराधांचे वाढते प्रमाण, स्त्री–पुरुष भेदाभेद, संधीचा अभाव, मातामृत्यूदर, हिंसा व मारहाण, अंधश्रद्धा, अनिष्ठ प्रथा–परंपरांचा पगडा, बालविवाह, शिक्षणाच्या अधिकारांचा अभाव, कार्यालयीन कामकाजातील स्त्रियांचे दुय्यम स्थान, राजकारणातील अत्यल्प सहभाग, कौटूंबिक व सामाजिक असहकार्य, सुशिक्षीत वर्गातील लोकांची स्त्रीबद्दलची संकुचित मानसिकता, शासनाचा चालढकलपणा या सर्व बाबी महीला सक्षमीकरणाच्या कार्यात अडथळा ठरतात असे म्हणण्यात हरकत नाही.

निष्कर्ष

सदर विषयावरील संशोधन कार्याअंतर्गत खालीलप्रमाणे निष्कर्ष निश्चित केले आहे.

१)पंचायत राज व्यवस्थेमुळे महीलांच्या सामाजिक व राजकिय विकासाची संधी मिळाली.

Scanned with CamScanner

२)पंचायत राज व्यवस्थेच्या प्रक्रियेत महीलाचा सहभाग अत्यल्प आहे.
३)पंचायत राज व्यवस्थेमुळे महीलांना सनेत सहभाग मिळाला पण निर्णय प्रक्रियेत त्या दुर्लक्षीत आहेत.
४)पंचायत राज व्यवस्थेमुळे 'महीला विकासाची चळवळ' उभी राहण्यास व कल्याणकारी योजनांची अंमलबजावणी करण्यास सुरुवात झाली.

उपाययोजनात्मक शिफारशी

१)महिलाने सनेवर येण्याचे प्रमाण वाढता राजकिय पक्षांनी महीला उमेदवारांना सनेवर येण्यासाठी कृतीशील प्रयत्न करावे.
२)सनेवर असणाऱ्या महीलांना कामकाजात व त्यांच्या कुटूंबाचा, राजकिय सदस्यांचा, शासकीय अधिपत्यांचा हस्तक्षेप नसावा या दृष्टिने कार्यवाही करण्यात यावी.
३)दारिद्र रेषेखाली जीवन जगणाऱ्या महीलांच्या समस्या निवारण्यासाठी अग्रक्रमाने प्राधान्य देण्यात आले पाहीजे. त्यासाठी त्यांना निवास, रोजगार व आरोग्याच्या सेवा सुलभ मिळणे आवश्यक आहे.

संदर्भ सूची

१)दशमुख अल्का (२०११) 'विविधांगी आयामातून स्त्री' साईनाथ प्रकाशन, नागपूर.
२)बोधनकर सुधीर (१९९९), अलोनी विवेक 'सामाजिक संशोधन पद्धती' साईनाथ प्रकाशन, नगपूर.
३)गगने वर्षा (२०१८), 'स्त्री सक्षमीकरण दशा आणि दिशा' साईज्योती पब्लिकेशन, नागपूर.
४)जोसेफ एम. (१९९८), 'कामकरी महीलांच्या समस्या' केन्द्रीय श्रमिक बोर्ड, उत्तर अंबाझरी रोड, नागपूर.
५)खडसे भा. की. 'भारतीय सामाजिक समस्या' श्री मंगेश प्रकाशन, शांतादुर्गा निवास, नागपूर.
६)कुलश्रेष्ठ नितीश (२०१२), 'पंचायती राज एवं ग्रामीण विकास योजनाएँ' रितु पब्लिकेशन, अजमेर रोड, जयपूर.
७)मिना हनुमान प्रसाद 'पचायत राज और महीला सशक्तिकरण' बाबा पब्लिकेशन, जयपूर.
८)मेहरे स्मिता (२०११), 'भारतीय स्त्री मानवाधिकार' श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर.
९)शर्मा श्रीनाथ, सिह मनोजकुमार 'पंचायत राज एवं ग्रामीण विकास' अर्जुन पब्लिशींग हाऊस, दरीयागज, नवी दिल्ली.
१०)साळुखे आ. ह. (१९९८), 'हिंदू संस्कृती आणि स्त्री' लोकवाङ्मयगृह, प्रभादेवी, मुंबई.
११)पवार वैशाली (२०१२), 'महीलाच्या सत्तासंघर्षाचा आलेख' डायमंड पब्लिकेशन्स, पुणे.
१२)तुळपुळे मालती (१९९१), 'स्त्री माणसशास्त्र' महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळ, गांधी मार्ग, नागपूर.

PRINCIPAL I/c.
Dr. Ambedkar College of Social Work, Wardha

Scanned with CamScanner

Swami Vivekanand Bahuuddeshiya Vikas Shikshan Sanstha, Rohana

Late Vasantrao Kolhatkar Arts College, Rohana

Tq. Arvi, Dist. Wardha

NAAC Accredited with 'B' Grade (CGPA-2.19)

One Day Interdisciplinary International Conference on

IMPACT OF RACE,CASTE,CLASS & RELIGION ON INDIAN & INTERNATIONAL SOCIETY

In collaboration with Aadhar Research Publication,Amravati & Eleven Colleges in Indian University

CERTIFICATE

This is to certify that Dr./Mr./Mrs. **Parmanand Bhaudas Ukey (Assistant Professor)**

of **Dr. Ambedkar College of Social work Wardha**

Has participated in One Day Interdisciplinary International Conference on Impact of Race,Caste,Class & Religion on Indian and International Society on Dated 23rd July 2021.He/She online presented paper organised by Late.Vasantrao Kolhatkar Arts College,Rohana & Collaboration with Eleven Colleges in Indian University & B.Aadhar Multidisciplinary International Peer Reviewed & Index Research Journal with Impact Factor 7.675(SJIF) with ISSN-2278-9308 In Recognition of the publication of paper entitled with

Women empowerment and Panchayat Raj

Editor
Dr.Nitin A.Mathankar
Principal
Late Vasantrao Kolhatkar Arts College,Rohana

Chief Editor
Prof.Virag S.Gawande
Director,Aadhar Social Research & Development Training Institute,Amravati

Guest Editor & Co-ordinator
Prof.Dr.Deoman S.Umbarkar
Organizing Secretary
Head,Deptt.of Sociology

Made for free with Certify'em

Scanned with CamScanner

B.Aadhar International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) -7.675, Issue NO, 318 (CCCXVIII) A
ISSN : 2278-9308
September, 2021

19	बाबासाहेबांने धर्मांतर — डॉ. गजानन लोंढे	90
20	डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कामगार विषयक विचार व कार्ये. — गोकुळ भटू अहिरे	96
21	अर्थ शास्त्रज्ञ डॉ.बाबासाहेब आंबेडकर — जयश्री भदर्गे	101
22	डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे राजकीय विचार व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शेती विषयक विचार — डॉ. ज्योती परब	105
23	राष्ट्रभक्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर — डॉ. कैलास महाले	112
24	डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांना दलित कवितेवरील प्रभाव — डॉ. कैलास बुधा वाघ	115
25	डॉ. बबासाहेब आंबेडकर यांचे स्त्री विषयक विचार प्रा.डॉ कार्तिक पोळ	122
26	ग्रंथकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर — प्रा. डॉ. किशोर शेषराव चौरे	126
27	२१व्या शतकातील महानायक : डॉ. बाबासाहेब आंबेडकर — प्रा.डॉ. लखपती वा. गायकवाड	135
28	डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे धर्मनिरपेक्षतेसंबधी विचार — प्रा. लक्ष्मण नागोराव कुमारे/प्रा. डॉ. सुनील दिनकर पवार	139
29	डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे विचार अॅणि कार्य — मधुरा मकरंद पाटिल	142
30	डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा शैक्षणिक दृष्टीकोन — प्रा.डॉ. कदम मोतीराम विठ्ठलराव	148
31	डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कृषिक्षेत्रातील योगदान आणि कृषिविशयक विचारांचे अध्ययन — प्रा. डॉ. एन. एन. गाढे	151
32	पत्रकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर — नवाजी गेंदलाल घरत	155
33	डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे 'मूकनायका'तील अग्रलेख — प्रा. नील नागभिडे	159
34	डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी घडवून आणलेले सत्याग्रह — प्र.डॉ.पंजाब लक्ष्मण शेरे	164
35	डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची पत्रकारिता एक विचारमंथन — प्रा.डॉ. मोकळ प्रभाकर रामजी	167
36	डॉ.बाबासाहेब आंबेडकर व बौध्दधर्म विषयक विचार कार्य — प्रा.डॉ.प्रदीप पांडुरंग तलवारे	170
37	पत्रकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर — डॉ. प्राजक्ता रामदास शित्रे	175
38	डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शेती विषयक विचार — प्रा प्रमोद केशवराव मुळे	185
39	डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शेतीविषयक विचार — प्रा. डॉ. देविदास विक्रम हारगिले	188
40	डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक विचार — सहा. प्रा. परमानंद उके	193

PRINCIPAL I/c.
Dr. Ambedkar College of Social Work, Wardha

Scanned with CamScanner

B.Aadhar International Peer-Reviewed Indexed Research Journal | ISSN : 2278-9308
Impact Factor -(SJIF) -7.675, Issue NO, 318 (CCCXVIII) A | September, 2021

"डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक विचार"

सहा. प्रा. परमानंद उके
डॉ. आंबेडकर कॉलेज ऑफ सोशल वर्क, वर्धा
मो. नं. ८६००८१७५५६,E-Mail ID : pbukey10@gmail.com

गोषवारा

डॉ. आंबेडकरांच्या समृद्ध आणि विविधांगी व्यक्तीमत्वाचा एक पैलू म्हणजे ते एक प्रशिक्षीत आणि व्यासंगी अर्थतज्ञ होते. त्यांच्या आर्थिक तत्त्वज्ञानाची चर्चा करतांना महत्वाची बाब म्हणजे त्यांनी बहुसंख्य आर्थिक समस्या भिडतांना जातिव्यवस्थेला केंद्रस्थानी ठेवून विचार केला. भारतातील कनिष्ठ जातियांवर आणि अस्पृश्यांवर होणाऱ्या भयावह परिणामांचा आणि न्याय आणि समानाधिष्ठीत समाज रचना स्थापन करण्याच्या त्यांच्या बांधिलकीचा विचार करता त्यांचा दृष्टीकोन पूर्णत: समर्थनीय ठरतो. भारत ही एक अल्पविकसीत अर्थव्यवस्था आहे. अद्यापही भारतातील लोकसंख्येचा मोठा भाग दारिद्रयावस्थेत आहे. भारतातील दारिद्रय तीव्र स्वरूपाचे आहे. तसेच ते चिरस्थायी सुद्धा आहे. याबरोबर भारतात अजुनही अप्रयुक्त नैसर्गिक संसाधने अस्तित्वात आहेत. म्हणजेच काही नैसर्गिक संसाधनांचा पुरेपुर उपयोग होत नाही. तर काहींचा अजुनही वापर झालेला नाही. या शोधपेपरमध्ये डॉ. आंबेडकरांच्या आर्थिक बाबतीत दृष्टीकोनाचा अध्ययन केला आहे. ज्यामध्ये आंबेडकराचे शेतीविषयी, भारतीय चलनाविषयी, दलितांच्या आर्थिक स्थिती व औद्योगिकरणाचा विचार केला आहे. त्यांचे नियोजनसुद्धा आर्थिक धोरणांच्या काळाच्या ओघात दुर्दैने ग्रासले आहे. आर्थिक विषमता दिसून येते.

अध्ययनाचे उद्देश

१)डॉ. आंबेडकरांचे शेतीविषयक आर्थिक विचारांचे अध्ययन करणे.
२)डॉ. आंबेडकरांचे औद्योगिकरणाविषयी आर्थिक विचारांचे अध्ययन करणे.
३)डॉ. आंबेडकरांना अपेक्षीत आर्थिक संरचनेचे अध्ययन करणे.
४)आर्थिक विषमता संदर्भात डॉ. आंबेडकरांच्या विचारप्रवाहाचे अध्ययन करणे.

अध्ययनाची गरज

डॉ. आंबेडकरांनी व्यक्तिस्वातंत्र्य, मुलभूत अधिकार आणि आर्थिक विवेचन यांचे समर्पक विवेचन केले आहे. त्यांच्या मते मुलभूत अधिकार ही संकल्पना मुलत: खुप व्यापक आहे. मुलभूत अधिकारांना संविधानात स्थान देण्याचा उद्देश नागरिकांच्या व्यक्तिस्वातंत्र्याला मान्यता देणे व ते सुरक्षित करणे हा असतो आणि घटनात्मक कायद्याने आर्थिक संरचना निश्चित करण्याचा उद्देशही व्यक्तिच्या स्वातंत्र्यावर इतरांनी आक्रमण करू नये किंवा शोषण करू नये हाच असतो. म्हणूनच राज्य समाजवादाची रचना घटनात्मक कायद्याने प्रस्थापीत करायला हवी. जेणेकरून पुढील काळात समाजामध्ये कोणीही ढवळाढवळ करू शकणार नाही. परंतु सद्या स्थितीचा विचार करता, जमीनदार, सावकारदार, उद्योगपती यांना विकासाच्या नावाखाली मोकळीक दिल्याचे लक्षात येते. अर्थात सर्वसामान्यांसाठी मृगजळ असते. अर्थरचनेतील शक्तीशाली गटांद्वारे शक्तिहिन सामान्य जनतेच्या शोषणाचे हनन होत असल्याचे दिसून येते. म्हणून डॉ. आंबेडकरांचा आग्रह होता की, त्यांनी सांगितलेली आर्थिक संरचना घटनात्मक कायद्यानेच रूढ व्हावी. त्याचे उलटे चित्र आज दिसून येते. म्हणूनच यावाबतीत आंबेडकरांची आर्थिक संरचना पूर्ववत अंमलबजावणीसाठी आणन्यासाठी आर्थिक क्षेत्रातील दमन किंवा शोषण टाळण्यासाठी अशा अध्ययनाची गरज आहे. सुशिक्षीत नागरिकांमध्ये या माध्यमातून जाणीव निर्माण करणे आवश्यक आहे.

संशोधन पद्धती

सदरील अध्ययन कार्य हे पूर्णत: वर्णनात्मक व विश्लेषणात्मक आहे. तथ्य संकलनाच्या प्राथमिक व दुय्यम पद्धतीपैकी दुय्यम पद्धतीचा उपयोग करण्यात आला. या अध्ययनासाठी ग्रंथालयीन, जुने शोधप्रबंध, नियतकालिके, मासिके, प्रकाशित लेख, विषयासंदर्भातील ग्रंथसाहित्य, इंटरनेटवरील संकेतस्थळ इ. यांचा वापर करण्यात आला.

PRINCIPAL Vc.
Dr. Ambedkar College of Social Work, Wardha

Scanned with CamScanner

विषय विश्लेषण

१)शेतीविषयक आर्थिक विचार

शेतीतील सिंचन, खते, यंत्रसामुग्री इ. भांडवलाची शेतीच्या प्रत्येक तुकड्याला अपुरी उपलब्धता हे भारतातील कमी कृषी उत्पादकतेचे मुख्य कारण आहे असे डॉ. आंबेडकरांचे प्रतिपादन होते. त्यांना शेतीमध्ये अधिक गुंतवणूक हवी होती. जेणेकरून शेतीचे औद्योगिकीकरण होऊ शकेल. अतिरिक्त लोकसंख्या असलेल्या भारतीय शेतीच्या विकासासाठी त्यांच्या मते ही प्रबळ गुरूकिल्ली होती. त्यांच्या सामुदायिक शेतीच्या योजनेमागील गृहितक समजण्यासारखे आहे. जमीन धारणेतील जमीनदार, कुळ आणि शेतमजूर ही विषमता कायमची नष्ट करण्याचा तो खात्रीशीर उपाय होता. शेती विषयक विकासाचे सार असे होते की, राज्याने जमीनीचे अधिग्रह करून किफायतशीर आकाराची धारणक्षेत्र तयार करून कुळाकडे सोपवावी. राज्याने भांडवल व संसाधने पुरवावी. जात, धर्म, सामाजिक किंवा आर्थिक दर्जा अशा कोणत्याही गोष्टींचा विचार न करता लागवडीकरीता जमीन देणे अभिप्रेम आहे. अशा रचनेत भूमीहीन मजुरांना आधार व न्याय मिळाला असता. परंतु स्वातंत्र्योत्तर घटनाक्रमाकडे नजर टाकली तर धारणक्षेत्राचे एकत्रीकरण किंवा सहकारी शेती या मार्गांना फारसा प्रतिसाद कधीच मिळाला नाही. परिणामत: दहा पंचवार्षिक योजना पूर्ण होऊनही शेतीमधील वाढीचा दर चार टक्के चा 'उच्च पातळीला कसा न्यावा' यावर गंभीर विचार होऊन वेळ व पैसा खर्च होत आहे.

२)औद्योगिकरणाविषयी आर्थिक विचार

कोणत्याही देशाच्या आर्थिक विकासाकरीता त्या देशात उद्योगधंद्यांची वाढ होणे आवश्यक आहे. अल्प विकसीत देशांच्या आर्थिक विकास प्रक्रियेत औद्योगिकीकरणाला महत्वाची भूमिका निभवायची असते. १९५६ च्या औद्योगिक धोरणामुळे सार्वजनिक क्षेत्राला भारतीय अर्थव्यवस्थेत एक महत्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. याचे मुख्य कारण स्वातंत्र्यप्राप्तीच्या समयी भारत हा एक मागासलेला व अल्पविकसीत असा देश होता. भारत प्रामुख्याने कृषीप्रधान देश असून त्याचा औद्योगिक आधार अत्यंत कमकुवत होता. बेकारीचे प्रमाण बरेच जास्त होते. बचतीची व गुंतवणूकीची पातळी अत्यंत खालावलेली होती.आधार संरचना, सोयी नावापुरत्याच होत्या. अशा या अर्थव्यवस्थेच्या विकासाकरीता एका बड्या धक्क्याची गरज होती. खाजगी क्षेत्राजवळील भांडवलाच्या कमतरतेमुळे अर्थव्यवस्थेच्या विकासाकरीता असा बडा धक्का देण्यास खाजगी क्षेत्र असमर्थ होते. तसेच ज्याचे फळ दिर्घकाळाने मिळणार आहे. अशा औद्योगिक क्षेत्रात भांडवल गुंतविण्याची जोखीम घेण्याची तयारी व सामर्थ्य नव्हते. देशाच्या जलद औद्योगिकीकरणासाठी राज्य–समाजवादाची रचनाच सर्वाधिक योग्य असल्याचे मत डॉ. आंबेडकरांनी नोंदविले आहे. आपल्या प्रस्तावित योजनेमध्ये त्यांनी औद्योगिकीकरणाच्या संदर्भात अत्यंत महत्वपूर्ण ठरणाऱ्या आधारभूत उद्योगांचा आणि मुलभूत उद्योगांचा विशेष उल्लेख केला. यापैकी आधारभूत उद्योगांची मालकी आणि संचालन यांची संपूर्ण जबाबदारी शासनाने घ्यायला हवी. जे उद्योग आधारभूत नसले तरी मुलभूत स्वरूपाचे असतात. त्यांची मालकीही शासनाकडेच राहील. पण त्यांचे संचालन एकतर शासन स्वत: करेल किंवा शासनाने स्थापन केलेल्या महामंडळाकडे सोपविले जाईल. औद्योगिकीकरणाच्या क्षेत्रात शासनाकडे मोठी जबाबदारी असली तरी खाजगी प्रेरणांसाठी काही मार्ग खुले ठेवायला हवेत. संपत्तीची होणारी विषम वाटणी होण्याची शक्यता, खाजगी क्षेत्रात श्रमीकांच्या अधिकारांचे होणारे हनन ही धोक्याची बाब सुद्धा निदर्शनास आणून दिली.

डॉ. आंबेडकरांना अपेक्षीत आर्थिक संरचना

डॉ. आंबेडकरांनी 'स्टेट्स अँड मायनॉरिटीज' मध्ये त्यांना अपेक्षीत आर्थिक संरचनेच्या संदर्भात 'राज्यसमाजवाद' असा स्पष्ट शब्दप्रयोग केला आहे. आधी स्पष्ट केल्यानुसार त्यांना सांसदीय लोकशाहीच्या चौकटीतच हे उद्दिष्टे साध्य होणे अपेक्षीत होते. या राजकिय प्रणालीच्या काही व्यावहारिक मर्यादा त्यांना जाणवत होत्या, म्हणूनच घटनात्मक कायद्याद्वारे राज्य–समाजवादाला स्थायी करण्याचा त्यांचा आग्रह होता.

डॉ. आंबेडकरांना भारताच्या आर्थिक संरचनेमध्ये शासनाची प्रभावी भूमिका अपेक्षीत होती. आर्थिक शोषणापासून रक्षण हा जर नागरिकांचा मुलभूत अधिकार मानला गेला. तर या अधिकारावर आक्रमण न होऊ देणे हे शासनाचे कर्तव्य ठरते. हे बजावता यावे. म्हणून शासनाची भूमिका

Dr. Ambedkar College of Social Work, Wardha
Dr. Ambedkar College of Social Work, Wardha

Scanned with CamScanner

प्रभावी असणे आवश्यक राहील. डॉ. आंबेडकरांनी आर्थिक संरचनेच्या संदर्भात असे सुचविले की, समाजाचे आर्थिक जीवन सुनियोजित करणे हे शासनाचे दायित्व असावे. हे दायित्व निभवितांना अर्थव्यवस्थेची वाटचाल उत्पादकतेच्या चरम बिंदूकडे व्हायला हवी, त्याचबरोबर समाजात संपत्तीचे समन्यायी वितरण होण्याची तरतूद केली जावी; या आर्थिक संरचनेत शासनाची भूमिका महत्वपूर्ण असली तरी खाजी प्रेरणांचे दमण होऊ नये; त्यांच्यासाठी काही मार्ग खुले ठेवले जावेत.

विमा

विम्यासारख्या महत्वपूर्ण क्षेत्रात शासनाचा एकाधिकार असायला हवा असे डॉ. आंबेडकरांचे मत होते. देशाच्या आर्थिक विकासासाठी जर शासनाने पुढाकार घ्यायचा असेल तर अवाढव्य संसाधनेही उभारावी लागणार. कर्जरूपाने संसाधन उभारणी केल्यास प्रचंड व्याज द्यावे लागते. म्हणून शासनाने अनिवार्य विम्याची योजना राबविली तर हप्त्यांच्या रूपाने मिळणारी संसाधने विकासकार्याकडे वळविणे शक्य होईल.

जल संसाधन, विद्युत, खनिज विकास

सन १९३७ पासूनच केन्द्र सरकारमध्ये स्वतंत्र श्रम विभाग निर्माण करण्यात आला होता. व त्यामध्ये श्रम, सिंचन, विद्युत वगैरे विभाग सामाविष्ठ होते. या विभागाचे प्रमुख या नात्याने डॉ. आंबेडकरांनी जलसंपदा विकास, बहुउद्देशीय नदी खोरे योजना, विद्युत निर्मितीचे धोरण, खनिज संपनीचे धोरण यावर महत्वपूर्ण कार्य केले. शेतीच्या विकासाकरीता औद्योगिकीकरण महत्वाचे होते. सिंचन व विद्युत या दोन्ही गोष्टी शेतीच्या तसेच उद्योगाच्या विकासासाठी आधारभूत होत्या. परंतु १९३५ च्या कायद्यान्वये प्रांताच्या, राज्याच्या सहमतीशिवाय या संसाधनाचे सक्रिय धोरण अंमलात आणणे शक्य नव्हते. देशाच्या आर्थिक विकासासाठी जलसंपत्ती व विद्युत यांच्या विकासाची धोरणात्मक चौकट निश्चित करण्याचे महत्वपूर्ण कार्य बाबासाहेबांनी केले.

आर्थिक विषमता विषयी विचार

डॉ. आंबेडकर हे बांधिलकीने एक सामाजिक लोकशाहीवादी होते. लोकशाही ही जीवनपद्धती आहे. यावर त्यांची अविचल निष्ठा होती. मात्र त्याचबरोबर त्यांचा हा देखील विश्वास होता की, समाजवादाखेरीज म्हणजे आर्थिक समतेखेरीज केवळ राजकीय मुलभूत हक्कांना अर्थ उरणार नाही. कारण सुरक्षा व संरक्षणाची हमी देणारे आर्थिक स्वातंत्र्य तेथे नसेल. दारिद्र्य, निरक्षरता, बेकारी आणि विषमता यासारख्या भारताच्या समस्या सोडविण्यातील भांडवलशाही एक आर्थिक व्यवस्था म्हणून असलेली असमर्थतेची डॉ. आंबेडकरांना पूर्ण जाणीव होईल. त्यांच्या मते, उत्पादनसाधनांच्या खाजगी प्रलोभनांवर आधारीत असलेल्या भांडवलशाहीद्वारे आर्थिक वाढ होऊ शकेल. परंतु अंतिमत: अटळपणे त्याचे पर्यवसान या विकासाच्या लाभाच्या विषम वाटपात होईल.

निष्कर्ष

भारताच्या आर्थिक प्रश्नांचा एक प्रज्ञावंत भाष्यकार या नात्याने आपण डॉ. आंबेडकरांच्या आर्थिक विचारांचा आढावा घेतला तर असे स्पष्ट होते की, त्यांनी आपल्या अर्थशास्त्रीय ग्रंथांमधून केवळ तत्कालीन परिस्थितीचे विश्लेषण केले नव्हते. तर ते करतांना व्यावहारिक तत्वांची मांडणी केली होती. जी आजही मार्गदर्शक ठरते.

त्यांच्या आर्थिक विचारांच्या संदर्भात केलेल्या विवेचनावरून खालीलप्रमाणे निष्कर्ष काढण्यात आले.

विकासासाठी त्यांना औद्योगिकरण व सामुदायिक शेती पद्धती अपेक्षीत होती.

करण्यासाठी जलसंपदा, खनिज, विद्युत यांची राष्ट्रीय धोरणात्मक चौकट असावी व त्यांचे प्रभावी मालकी असावी अशी डॉ. आंबेडकरांची योजना होती.

विशेषत: उपेक्षित वर्गाना आर्थिक शोषणापासून संरक्षण देण्याची तरतूद अंमलात डॉ आंबेडकरांचा मूळ हेतू होता.

विकासाचा प्रतिक्षिप्त परिणाम शेतीवर होण्यासाठी ग्रामीण संसाधनांवर आधारित आणि वाढणारे उद्योग आवश्यक होते.

PRINCIPAL I/c.
Dr. Ambedkar College of
Social Work, Wardha

Scanned with CamScanner

संदर्भ सूची

१)भांडारकर, पु. ल.(१९९९),'सामाजिक संशोधन पद्धती' साईनाथ प्रकाशन, नागपूर.
२)भागे, डॉ. विजय (२०१२), 'पंचायतराज ग्रामीण विकास आणि परिवर्तन' यश प्रकाशन, [illegible]
३)घाटोळे, रा. ना.(२०००), 'समाजशास्त्रीय संशोधन तत्वे व पद्धती' मंगेशप्रकाशन, नागपूर.
४)जाधव, डॉ. नरेन्द्र (१९९२), 'डॉ. आंबेडकर आर्थिक विचार आणि तत्वज्ञान' [illegible] प्रकाशन,पूणे.
५)कुवेर, डॉ. वा. ना. (१९९८), 'डॉ. आंबेडकर — विचारमंथन' सुगावा प्रकाशन, पूणे.
६)कविमंडन, डॉ. विजय (२०१२), 'डॉ. आंबेडकरांचे आर्थिक चिंतन' श्री मंगेश प्रकाशन पूणे
७)मुणगेकर, डॉ. भालचंद्र (२०१२), 'भारतातील आर्थिक सुधारणा आणि दलित एक आंबेडकरी दृष्टीकोन' सुगावा प्रकाशन, पूणे.
८)झामरे, डॉ. जी. एम.(२०१५), 'भारतीय अर्थव्यवस्था विकास व पर्यावरणात्मक अर्थशास्त्र' पिंपळापूरे ॲन्ड कंपनी पब्लिशर्स, नागपूर.

PRINCIPAL I/c.
Dr. Ambedkar College of Social Work, Wardha

Dr. Ambedkar College of Social Work

Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

318

।।विद्या अमृतम् अश्नुते।।

Sahyadri Parisar Shikshan Prasarak Mandal, Pachal

SHRI. MANOHAR HARI KHAPANE COLLEGE OF ARTS & COMMERCE, PACHAL-RAYPATAN

At Post – Raypatan, Tal. – Rajapur, Dist. – Ratnagiri, 416 704

First Time Affiliation No. AFF/Recog./5323 of 1994 Dated 18th October 1994
Permanent Affiliation No. Aff-II./ICD/2015-16/1121 dated 16.09.2015, ISO 9001:2015 Certified
♦Re-Accredited by NAAC with 'B' Grade ♦ Recognised under Section 2(f) & 12(b) of the UGC Act, 1956

Organized

One Day National Online Conference on

Thoughts and Works of Dr. Babasaheb Ambedkar



CERTIFICATE

This is to certify that,

Dr./Prof./Mr./Miss. Asstt. Prof. Parmanand Bhaudas Ukey of Dr. Ambedkar College of Social work Wardha actively presented a paper entitled Economical thought of Dr. Ambedkar in National Level Online Conference held on 29/09/2021 at Shri. Manohar Hari Khapane College of Arts & Commerce, Pachal-Raypatan.

Asst. Prof. Dr. Ashok D. Patil
Conference Coordinator

PRINCIPAL I/c.
Dr. Ambedkar College of Social Work, Wardha

Asst. Prof. Sanjay V. Nimbalkar
IQAC Coordinato

Dr. Pramod. S. Meshram
I/c Principal

Date : 29 Sep. 2021

Made for free with Certify'em

ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

AJANTA

Volume - XI Issue - II April - June - 2022

MARATHI PART - I

Peer Reviewed Refereed
and UGC Listed Journal

Journal No. 40776

ज्ञान-विज्ञान विमुक्तये


IMPACT FACTOR / INDEXING
2020 - 6.306
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖
Asst. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Maths), M.B.A. (Mktg.), M.B.A. (H.R.),
M.Drama (Acting), M.Drama (Prod. & Dir.), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖
Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

PRINCIPAL Vc.
Dr. Ambedkar College of
Social Work, Wardha

Scanned with CamScanner



Scanned with CamScanner

The information and views expressed and the research content published in this journal, the sole responsibility lies entirely with the author(s) and does not reflect the official opinion of th Editorial Board, Advisory Committee and the Editor in Chief of the Journal **"AJANTA"**. Owner, printer & publisher Vinay S. Hatole has printed this journal at Ajanta Computer and Printers, Jaisingpura, University Gate, Aurangabad, also Published the same at Aurangabad.

Printed by

Ajanta Computer, Near University Gate, Jaisingpura, Aurangabad. (M.S.)

Printed by

Ajanta Computer, Near University Gate, Jaisingpura, Aurangabad. (M.S.)

Cell No. : 9579260877, 9822620877, Ph. No. : (0240) 2400877

E-mail : ajanta6060@gmail.com, www.ajantaprakashan.com

AJANTA - ISSN 2277 - 5730 - Impact Factor - 6.306 (www.sjifactor.com)

PRINCIPAL I/c.
Dr Ambedkar College of
Social Work, Warora

Scanned with CamScanner

EDITORIAL BOARD

Professor Kaiser Haq
Dept. of English, University of Dhaka,
Dhaka 1000, Bangladesh.

Roderick McCulloch
University of the Sunshine Coast,
Locked Bag 4, Maroochydore DC,
Queensland, 4558 Australia.

Dr. Ashaf Fetoh Eata
College of Art's and Science
Salmau Bin Adbul Aziz University. KAS

Dr. Nicholas Loannides
Senior Lecturer & Cisco Networking Academy Instructor,
Faculty of Computing, North Campus.
London Metropolitan University, 166-220 Holloway Road,
London, N7 8DB, UK.

Muhammad Mezbah-ul-Islam
Ph.D. (NEHU, India) Assot. Prof. Dept. of
Information Science and Library Management
University of Dhaka, Dhaka - 1000, Bangladesh.

Dr. Meenu Maheshwari
Assit. Prof. & Former Head Dept.
of Commerce & Management
University of Kota, Kota.

Dr. S. Sampath
Prof. of Statistics University of Madras
Chennari 600005.

Dr. D. H. Malini Srinivasa Rao
M.B.A., Ph.D., FDP (IIMA)
Assit. Prof. Dept. of Management
Pondicherry University
Karaikal - 609605.

Dr. S. K. Omanwar
Professor and Head, Physics,
Sat Gadge Baba Amravati
University, Amravati.

Dr. Rana Pratap Singh
Professor & Dean, School for Environmental
Sciences, Dr. Babasaheb Bhimrao Ambedkar
University Raebareily Road, Lucknow.

Dr. Shekhar Gungurwar
Hindi Dept. Vasantrao Naik
Mahavidyalaya Vasarni, Nanded.

Memon Sohel Md Yusuf
Dept. of Commerece, Nirzwa College
of Technology, Nizwa Oman.

Dr. S. Karunanidhi
Professor & Head,
Dept. of Psychology,
University of Madras.

Prof. Joyanta Borbora
Head Dept. of Sociology,
University, Dibrugarh.

Dr. Walmik Sarwade
HOD Dept. of Commerce
Dr. Babasaheb Ambedkar Marathwada
University, Aurangabad.

Dr. Manoj Dixit
Professor and Head,
Department of Public Administration Director,
Institute of Tourism Studies,
Lucknow University, Lucknow.

Prof. P. T. Srinivasan
Professor and Head,
Dept. of Management Studies,
University of Madras, Chennai.

Dr. P. Vitthal
School of Language and Literature
Marathi Dept. Swami Ramanand
Teerth Marathwada University, Nanded.

PRINCIPAL I/c.
Dr. Ambedkar College of
Social Work, Wardha

Scanned with CamScanner

EDITORIAL BOARD

Dr. Jagdish R. Baheti
H.O.D. S. N. J. B. College of Pharmacy,
Meminagar, A/P. Tal Chandwad, Dist. Nashik.

Dr. Sadique Razaque
Univ. Department of Psychology,
Vinoba Bhave University,
Hazaribagh, Jharkhand.

Prof. Ram Nandan Singh
Dept. of Buddhist Studies University of Jammu.

Dr. Safiqur Rahman
Assistant Professor, Dept. of Geography,
Guwahati College Bamunimaidam, Guwahati,
Assam.

Dr. Sou. Sulbha D. Deshmukh
Smt. Sushiladevi Salunkhe College of
Education, Osmanabad.

Dr. Ratnakar B. Mhaske
IQAC CoordinatorSmt. Sushiladevi Salunkhe
College of Education, Osmanabad.

Dr. Nishant C. Nirmale
Assistant Professor,
Smt. Sushiladevi Salunkhe College of
Education, Osmanabad.

Dr. Prakash A. Kambale
Associate Professor,
Smt. Sushiladevi Salunkhe College of
Education, Osmanabad

Dr. Devdatt T. Khajurkar
Associate Professor, Smt. Sushiladevi Salunkhe
College of Education, Osmanabad.

Dr. Chetan M. Gaikwad
Assistant Professor, Smt. Sushiladevi Salunkhe
College of Education, Osmanabad.

Smt. Sonali S. Rangole
Librarian, Smt. Sushiladevi Salunkhe
College of Education, Osmanabad.

PUBLISHED BY

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

PRINCIPAL I/c
Dr. Ambedkar College of
Social Work, Wardha

Scanned with CamScanner

MESSAGE



Prin. Abhaykumar Salunkhe
Executive Chairman,
Shri. Swami Vivekanand Shiskshan Sanstha, Kolhapur.

It is honor to welcome and introduce you to shri swami vivekanand shikshan sanstha Kolhapur's shrimati sushiladevi salunkhe College Of Education, Osmanabad. The college dedicated to shaping to students in to future competitive, committed and capable teachers and teacher educators.

The initiative "Bharat Ki Azadi Ka Amrit Mahotsav" was announced on the 12th of March 2021 by the Prime Minister of India (Narendra Modi).

This initiative will continue tiX the 75th anniversary of India's Independence Day.

The idea behind starting this initiative (Azadi Ka Amrit Mahotsav) is to aware the young generation of the sacrifices of the freedom fighters and to pay tribute to them.

This initiative will make them realize the dreams of those legends who not only fought for Independence but also sacrificed their precious lives for the Independence of India.

I would like to congratulate to college for organizing Online National conference on "Azadi ka Amrit Mahotsav- Achivments in various Fields of India in 75 Years."

PRINCIPAL I/c.
Dr. Ambedkar College of
Social Work, Warora

Dr. Ambedkar College of Social Work
WARORA

Scanned with CamScanner

VOLUME - XI, ISSUE - II - APRIL - JUNE - 2022
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.306 (www.sjifactor.com)

CONTENTS OF MARATHI PART - I

अ.क्र.	लेख आणि लेखकाचे नाव	पृष्ठ क्र.
१	भारतातील शिक्षण पद्धतीचा विकास **डॉ. आनंद ज्ञानेश्वर शिंदे**	१-४
२	आदिवासी विद्यार्थ्यांच्या श्रवण कौशल्य संपादन पातळीचा अभ्यास **आशिष गुलाबसिंग वसावे** **प्राचार्य डॉ. संजय एस. शिंदे**	५-९
३	संमिश्र शिक्षण हीच भविष्याची दिशा **इंगळे हरिचंद्र आदिनाथ**	१०-१४
४	माध्यमिक स्तरावरील विज्ञान विषयाच्या अध्यापनात स्मृती प्रतिमानाच्या परिणामकारकतेचा अभ्यास **श्रीमती कामिनी रामदास पवार**	१५-१९
५	भारतातील अनुसूचित जातीतील दारिद्र्य आणि असमानता : एक आर्थिक अवलोकन **कु. मनिषा मधुकर ढोके** **प्रा. डॉ. दयाळू किसन राठोड**	२०-२५
६	भारतीय राजकारणातील महिलांचा सहभाग **डॉ. मीनाक्षी कुबडे**	२६-२९
७	महाराष्ट्र विधानसभा लोकशाहीचे महामंदीर **श्री. डॉ. श्रीराम येरणकर** **श्री. पी. एन. कपले**	३०-३५
८	स्वातंत्र्याची ७५ वर्ष : आर्थिक विकासातील दारिद्र्य आणि बेकारीची समस्या एक आव्हान **डॉ. राहुल एम. स्वानकर**	३६-४२
९	नवीन शैक्षणिक धोरण आणि शिक्षक **प्रा. डॉ. शिंदे शाम भागवत**	४३-४६
१०	भारतातील शिक्षण प्रणालीचा विकास **श्रीमती सोनाली रांगोळे**	४७-५२

PRINCIPAL I/c.
Dr. Ambedkar College of
Social Work, Warora

Scanned with CamScanner

VOLUME - XI, ISSUE - II - APRIL - JUNE - 2022
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.306 (www.sjifactor.com)

६. भारतीय राजकारणातील महिलांचा सहभाग

डॉ. मीनाक्षी कुबडे
डॉ. आंबेडकर कॉलेज ऑफ सोशल वर्क, वर्धा.

परिचय

प्रत्येक माणसाला जीवन जगण्याचा सामाजिक प्रतिष्ठेचा आणि सुरक्षिततेचा अधिकार आहे. मानव स्वाभाविक प्रतिष्ठेचा आणि गुणवत्तेचा आदर करणे हा मानवी अधिकाराचा आधार आहे. ते एक मूल्य आहे. या दृ विचार करता, स्त्रियांच्या मानवी हक्कांची व मानवी प्रतिष्ठेची जपणूक करण्यासाठी त्यांना स्वातंत्र्य आणि सम पुरूषांच्या बरोबरीने मिळणे गरजेचे आहे आणि हे जर साध्य करायचे असेल तर स्त्रियांचा सामाजिक, आर्थिक राजकीय विकास साधेल अशी धोरणे आखली पाहीजेत. ही धोरणेही अशी आखावीत की, ज्यामुळे स्त्रियांना त्य सुप्त शक्तींची जाणीव होईल आणि सर्व क्षेत्रात समानता, स्वातंत्र्य अनुभवण्यासारखी परिस्थिती निर्माण होऊ शक याबरोबरच समाजाची अभिवृत्ती बदलण्याची आणि समुदाय विकासात स्त्रिया व पुरूष दोघांचाही क्रियाशील सह मिळण्याची आवश्यकता आहे. विषमता नाहीशी करणे, अत्याचाराला प्रतिबंध घालणे, स्त्रियांचा विविध क्षेत्रातील सह वाढविणे व तो मजबूत करणे या गोष्टीही जरूरीच्या आहेत. राष्ट्राच्या सामाजिक, राजकीय आणि आर्थिक जीव सहभागी होण्याची संधी, निर्णय घेण्याची संधी, आरोग्य जपणूक इत्यादी सर्व गोष्टी मानवी अधिकारातच अंत आहेत. हे अध्ययन कार्य प्रामुख्याने महिलांच्या राजकीय सहभागाच्या स्थितीचा कल दर्शविते. यामध्ये महिला राजव प्रवेश, राजकारणातील महिलांना असलेली संधी व राजकारणातील निर्णयक्षमता व पुरूषी मानसिकतेचा होणारा वि व राजकीय व्यासपीठाचा स्त्री सक्षमिकरणात होणारा फ़ायदा यावर भर देणे.

या अध्ययन कार्यातून असे स्पष्ट होते की, ग्रामीण पातळीपासून ते राजकीय पातळीवर महिलांचा राजक सहभाग वाढत असला तरी तो अत्यल्प आहे. राजकीय पटलावर महिलांना निर्णयप्रक्रियेत सामावून घेतले जात नाह महिलांच्या राजकीय अस्तित्वाला कुटूंबापासूनच विरोध होतो. निर्णायक व प्रमुख पदावर कार्य करणाऱ्या राजक महिला नेतृत्वाची संख्या कमीच आहे. समाजातील महिलांचे सक्षमिकरण घडवून आणण्यासाठी व महिलांच्या समस्यां तत्परतेने कार्य करण्यासाठी महिलांचा राजकीय सहभाग वाढविणे गरजेचे आहे.

विषय विश्लेषण

कोणत्याही देशाच्या विकासाचा विचार करतांना स्त्री–पुरूष असे वेगळे घटक विचारात घेण्याची गरज व नये. कारण स्त्री देखील एकूण लोकसंख्येचाच एक भाग आहे. पण दुर्दैवाने जवळजवळ सगळ्याच देशात स विकासाचा आणि तिला मिळणाऱ्या विकासाच्या संधीचा आलेख पाहिल्यास त्याच्या वाढीचा वेग अतिषय मंद असल्य दिसून येईल. विकसित म्हणविणाऱ्या काही देशात तिचे स्थान व भूमिका थोडी सुधारीत असली तरी अनेक प्रसंग अ आहेत. ज्यात तिला आजही हक्कांसाठी व न्यायासाठी झगडावे लागते. देशातील स्त्रियांची संख्या, तिच्या विकासा

Scanned with CamScanner

संधी, तिच्यासाठी असणारी सामाजिक चौकट, तिचे कुटूंबातील व कार्यक्षेत्रातील स्थान, आर्थिक स्वातंत्र्य व स्वावलंबन तिचे अस्तित्व इ. बाबत पुन्हा गांभीर्याने विचार करण्याची आजही गरज आहे.

संविधानानुसार मुली व महिलांना शिक्षणासोबतच समाजात समानतेने जगण्याचा अधिकार प्राप्त झाला आहे. त्यामुळेच स्त्रिया आज विविध क्षेत्रांत यशाची शिखरे पादाक्रांत करीत आहेत. एकेकाळी चूल अन् मूल इतकंच विश्व मर्यादित असणाऱ्या स्त्रीचा आज एखाद्या देशाची सत्ता सांभाळण्यापर्यंतचा प्रवास थक्क करणारा आहे. मिळालेल्या संधीचा पुरेपूर उपयोग करत प्रत्येक क्षेत्रात आपल्या कार्याचा ठसा उमटवत आहेत. विज्ञानयुगात स्त्री सक्षम होत आहे खरी; परंतु आज एकविसाव्या शतकातही स्त्रियांसमोर अनेक आव्हानेही आहेत. स्त्रीभ्रूणहत्या, ॲसीड हल्ला, शिक्षणाचा अभाव, हुंडाबळी, कौटूंबिक हिंसा, बलात्कार, लिंगभेद, महिलांवरील अन्याय-अत्याचार, सामाजिक बंधने इ. अनेक समस्यांशी सामना करावा लागतो आहे. घराघरांत स्त्री ही देवी म्हणूनही पूजली जात असली तरी तिचा त्याग, वैचारिक स्वातंत्र्य, सेवाभाव, कणभराचा मात्र सहज स्विकारला जात नाही हेही तितकेच खरे आहे.

राजकारणातील स्त्रियांचा सहभाग व स्वातंत्र्य या विषयावर बोलायचे झाल्यास तो बरोबर मोजल्या इतकाच असे ठामपणे म्हणता येईल. 1957 ते 2009 च्या काळात 150 उपदेशांत केवळ 4 स्त्रिया होत्या. 17 एप्रिल 2014 च्या लोकसभा निवडणूकीत महाराष्ट्रातील 19 मतदार संघात 358 उमेदवारांपैकी केवळ 24 महिला उमेदवारावर होत्या. महिला आरक्षणामुळे ग्रामीण क्षेत्रात महला उमेदवारांचे प्रमाण वाढल आहे. बऱ्याच प्रमाणात विशेषतः आरक्षीत जागांवर स्त्रिया निवडून देखील आल्या आहेत. पण त्या रबरस्टॅम्प म्हणून ओळखल्या जाऊ लागल्या. कारण विशिष्ट पदावर जरी महिला उमेदवार निवडून आल्या असल्या तरी या पदाचा कारभार तिचा पती चालवित असल्यामुळे राजकीय क्षेत्रात आपल्या कार्याचा स्वतंत्र असा ठसा तिला उमटविता आला नाही. 15 व्या लोकसभेत (2014) एकूण 556 खासदारांपैकी महिलांनी निवडून लढविली. त्यापैकी 59 महिला खासदार पदावर निवडून आल्या अर्थात लोकसभेच्या एकूण सदस्य संख्येचा विचार करता महिला सदस्यांचे प्रमाण केवळ 10.61 टक्के आहे. यावरून स्पष्ट होते की, निवडणूकीत सहभागी होणाऱ्या स्त्रियांचे प्रमाण अधिक असले तरी त्यांचे सत्तेवर येण्याचे प्रमाण अत्यल्प आहे.

महाराष्ट्रातील महिला आमदारांची स्थिती.

वर्ष	एकूण उमेदवार	महिला उमेदवार	निवडून आलेल्या महिला उमेदवार
1962	1161	36	13
1967	1242	19	09
1972	1197	56	00
1978	1817	51	08
1980	1174	47	19
1985	2230	83	16
1990	3772	144	06
1995	4714	247	11
1999	2006	86	12
2004	2678	137	12
2009	3559	211	11
2014	4119	277	20
2019	3237	235	24

Scanned with CamScanner

महाराष्ट्रामध्ये विधानसंख्येच्या एकूण 288 जागा आहेत. महाराष्ट्रामध्ये एकूण मतदार संख्या 8 कोटी ९ लाख असून त्यात महिला मतदारांची संख्या 4 कोटी 38 लाख आहे. त्यामुळे महिलांच्या प्रतिनिधीची संख्या वाढवणे अनिवार्य आहे. परंतु महाराष्ट्र विधानसभेच्या महिलांच्या प्रतिनिधीत्वाच्या विश्लेषणावरून असे दिसून येते की, महिला उमेदवारांमध्ये वाढ होत आहे. परंतु प्रतिनिधीत्व करणाऱ्या महिलांची संख्या अत्यल्प आहे. महिला खासदार व आमदारांची संख्या बघितली तर महिला खासदारांची संख्या ही 10 टक्के व महिला आमदारांची संख्या 9 टक्के आहे. लोकसभेच्या सदस्यांमध्ये महिला सदस्यांचे प्रमाण स्वातंत्र्यानंतरच्या 75 वर्षानंतरही 10 टक्केपेक्षा वाढू नये ही शोकांतिका आहे. यावरून महिलांच्या राजकीय सहभागाची मर्यादा लक्षात येते.

वर्तमान काळात राजकीय क्षेत्रात येणाऱ्या महिलांचा टक्का वाढतो आहे ही अत्यंत स्वागतार्ह बाब आहे. पण सत्तेवर आल्यानंतर त्यांना त्यांच्या मनासारखे निर्णय स्वतंत्रपणे घेता येतात काय? हा तेवढाच महत्वाचा व विचार करण्यासारखा प्रश्न आहे. त्यामुळे केवळ महिलासाठी राजकारणात राखीव जागा आहेत. म्हणून महिला समोर येत आहेत काय? की मनापासून येऊन काम करायचं असते याचा विचार होणे महत्वाचे आहे. शहरी क्षेत्रात स्त्रियांच्या राजकीय स्वातंत्र्याच्या बाबतीतही ग्रामीण क्षेत्र मागे आहे असे ठामपणे म्हणता येईल. पश्चिम महाराष्ट्रासारख्या क्षेत्रात मागील 70 वर्षांपासून कॉंग्रेस पक्षासारख्या मोठ्या पक्षातील केवळ चारच महिला खासदार झाल्या. हे उदाहरण याबाबत पुरेसे बोलके आहे. पक्षस्तरावर सुद्धा महिलांना उमेदवारी देण्यात विशेष रस नसतो ही बाब सुद्धा गंभीर आहे.

राजकारणात कार्यरत असणाऱ्या स्त्रियांना कौटूंबिक व सामाजिक आघाड्यांवर अनेक अडचणींना तोंड द्यावे लागते. त्यामुळे त्या राजकारणात येण्यास घाबरतात. राजकीय क्षेत्रात कार्य करतांना देखील त्या विशिष्ट दडपणाखाली वावरतात हे एक वास्तव होय. ज्यादिवशी स्त्रिया राजकीय निर्णय स्वतंत्रपणे घेतील त्यादिवशी महिलांच्या हितांचे नियम व कायदे तयार होऊन त्यांची अंमलबजावणी केली जाईल.महिलांच्या हातातील अधिकार महिलांना न्याय मिळवून देतील व समानता निर्माण होण्यास हातभार लागेल.

ग्रामीण क्षेत्रातील महिलांच्या राजकीय सहभागाचा विचार केला तर ग्रामपंचायत सदस्य पदांसाठी निवडणूक लढविण्याचा निर्णय सुद्धा महिलेचा पती किंवा कुटूंबिय घेतात. निवडणूक लढविण्यापासून ते ग्रामपंचायतीचे कार्य चालविण्यापर्यंत महिलेच्या पतीची मक्तेदारी असते. यामध्ये कुठेही महिलेचा राजकीय अस्तित्व दिसून येत नाही. दुसरी बाजू अशी की, ज्या महिलेला या बाबतीत कुटूंबाकडून सहकार्य मिळाले तरी ग्रामपंचायतीमधील पुरूष सदस्य एका महिला सरपंचाच्या नेतृत्वात काम करणे हे संकोच मानतात व सहकार्य करीत नाही. त्या ठिकाणी सुद्धा पद व सत्ता असून सुद्धा स्वतंत्र निर्णय घेता येत नाही.

निष्कर्ष

1. महिलांचा राजकीय सहभाग हा राखीव जागांपूरता मर्यादित असल्याचे दिसून येते.
2. राजकारणात महत्वाच्या व निर्णयाच्या प्रक्रियेत महिलांचा सहभाग अत्यल्प आहे.
3. राजकीय सहभागाबद्दल महिलांमध्ये उत्सुकता किंवा आवड दिसून येत नाही.

उपाययोजना

1. महिलांना त्यांच्या मतदार संख्येच्या तुलनेत उमेदवारी देण्यात यावी.
2. आरक्षणाच्या जागा वगळता प्रत्येक पक्षाने 50 टक्के जागेवर महिलांना उमेदवारी देण्यात यावी.

Scanned with CamScanner

3. विविध संघटना, सामाजिक कार्यकर्ते, शिक्षक संघटना यांनी महिलांच्या खंबीर नेतृत्व विकासासाठी व राजकीय सहभाग वाढविण्यासाठी जागीव जागृतीचे कार्य करावे.
4. महिलांना उमेदवारीच्या संदर्भात महिला संघटनांनी दबावगट तयार करावा.

संदर्भ सूची

1. बोधनकर सुधीर, अलोनी विवेक, 'सामाजिक संशोधन पद्धती', श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर
2. मेहेत्रे स्मिता, 'भारतीय स्त्री आणि मानवाधिकार', श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर
3. वैशाली पवार, 'महिलांच्या सत्ता संघर्षाचा आलेख', डायमंड पब्लिकेशन, पूणे
4. गंगने वर्षा, 'स्त्री सक्षमिकरण दशा आणि दिशा', साईज्योती पब्लिकेशन, नागपूर
5. सारस्वत रदम्मिल, सिंह निशांत, 'समाज, राजनिती और महिलाऐं दशा और दिशा', राधा पब्लिकेशन, नई दिल्ली.
6. अंधश्रद्धा निर्मुलन पत्रिका अंक पहिला जानेवारी 202
7. www.hindustantimes.com
8. Timesofindia.indiatimes.com
9. Maharashtratimes.com

PRINCIPAL I/c.
Dr. Ambedkar College of
Social Work, Wardha

Dr. Ambedkar College of Social Work

Scanned with CamScanner

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - (SJIF) -7.675, Issue NO, 304 (CCCIV)
ISSN : 2278-9308
July, 2021

Impact Factor – 7.675 ISSN – 2278-9308

B.Aadhar

Peer-Reviewed & Refreed Indexed

Multidisciplinary International Research Journal

July -2021

ISSUE No- 304 (CCCIV)

Impact of Race, Caste, Class and Religion on Indian and International Society

Prof. Virag.S.Gawande
Chief Editor :
Director
Aadhar Social Research &, Development Training Institute, Amravati.

Dr Nitin A. Mathankar
Executive-Editor
Principal,
Late Vasantrao Kolhatkar Arts College, Rohana

Dr. Deoman S. Umbarkar
Editor
Organizing Secretary ,Department of Sociology
Late Vasantrao Kolhatkar Arts College, Rohana

PRINCIPAL I/c.
Dr. Ambedkar College of
Social Work, Wardha

Aadhar International Publication
For Details Visit To : www.aadharsocial.com

© All rights reserved with the authors & publisher

Scanned with CamScanner

20	कौटुंबिक हिंसाचार : हुंडाप्रथा एक सामाजिक समस्या प्रा.डॉ.बी.टी. लावणी/पवळ रंजना भिमराव	92
21	जात, वर्ग आणि धर्म यांचा ग्रामीण समुदायावरील प्रभाव राहुल सुखदेव पोखरकर	96
22	झाडीपट्टीतील रंडारी लावणी डॉ. आर. आर. दिपटे	100
23	आदिवासी समाजाच्या शैक्षणिक समस्या : एक अध्ययन प्रा.डॉ.नंदा पंढरीनाथ कंधारे	106
24	धर्माचा राष्ट्रीय एकात्मतेवरील प्रभाव प्रा. मनोहर आनंदराव गुडधे	113
25	स्त्री जीवनावरील धर्माचा प्रभाव एक विश्लेषनात्मक अध्ययन डॉ. मंगेश अशोकराव रणदिवे	117
26	पर्यावरण संवर्धन व व्यवस्थापन डॉ. मदन जी. प्रधान	122
27	आंतरराष्ट्रीय राजकारण :वांशिक व धार्मिक संघर्ष डॉ. किशोर वी. वासनिक	126
28	भारतीय लोकशाही समोरील जात व धर्म या घटकांचे आव्हान प्रा. जगदीश रामभाऊजी वाटमोडे	129
29	डॉ.आंबेडकरांची राष्ट्र संकल्पना व काश्मीर प्रश्नाचे परिणाम आणि उपाय योजना प्रा. डॉ. कांबळे गोविंद्राव शंकरराव	134
30	जाति, वर्ग व धर्म का भारतीय संगीत पर प्रभाव डॉ०दीपशिखा सिंह	142
31	महिलांवर जात आणि वर्ग याचा होणारा परिणाम प्रा. दिपाली अशोक पाठराबे	145
32	सामाजिक समस्येच्या संदर्भात जातीयतेचे स्वरूप प्रा. धर्मदास वि. घोडेस्वार	148
33	भारतीय समाजातील जातीव्यवस्थेचा प्रभाव डॉ. चंदु के. पांपटकर	153
34	महिला सक्षमीकरणात बचतगटाची भूमिका प्रा. बाळासाहेब विठ्ठलराव तौर	158
35	भारतीय राजनीति में जातिवाद, वर्गवाद व धर्म का प्रभाव Dr. Mrs. Alpana Vaidya	164
36	राजकारणावर जात, धर्म व वर्ग यांचा प्रभाव प्रा. आशिष व. पेठे	168
37	कोविड–१९ महामारीका ऊच्च शिक्षापर परिणाम विनोद एम. वडवाईक	173
38	आभासी ग्रंथालय श्री. विनायक दशरथ नाकतोडे	176
39	ऐतिहासिक सिंहावलोकन प्रा.डॉ.निर्मलनंदन रामचंद्र वन्नगरे	178
40	ग्राहकांचे भारतीय अर्थव्यवस्थेतील स्थान : एक अभ्यास प्रा.डॉ.सुरेश वन्सपाल	183
41	नालेबंदी काळात कौटुंबिक कलहामुळे [illegible] महिलांच्या मानसिक स्थितीवर झालेल्या परिणामाचे अध्ययन डॉ. सुनिता भोईकर	188

PRINCIPAL I/c.
Dr. Ambedkar College of Social Work, Nagpur

Scanned with CamScanner

B.Aadhar International Peer-Reviewed Indexed Research Journal | ISSN : 2278-9308
Impact Factor - (SJIF) -7.675, Issue NO, 304 (CCCIV) | July 2021

टाळेबंदी काळात कौटुंबिक कलहामुळे विवाहित महिलांच्या मानसिक स्थितीवर झालेल्या परिणामाचे अध्ययन

डॉ. सुनिता भोईकर
(सहाय्यक प्राध्यापक) डॉ. आंबेडकर कॉलेज ऑफ सोशल वर्क,वर्धा.
Email : bhoikarsunita@gmail.com,मो. न. ९८८११७२८५८

सारांश: (Abstract)

गृहकाम करणाऱ्या महिलांवर संपूर्ण कुटुंबाची जबाबदारी असते. कुटुंबियांची सुश्रूष व आलेगेलेल्यांचे आदरातिथ्य करण्यातच त्यांचा वेळ निघून जातो. कुटुंबातील सर्व कामे करूनही प्रसंगी सासू–सासरे, नवरा यांचे बोलणेही ऐकावे लागते. स्वत: साठी सवड, स्वत: च्या आवडी–निवडी याचा तर विचारही त्यांच्या डोक्यात नसतो. कोवीड–१९ मुळे दिनांक २३ मार्च २०२० पासून भारताच्या पंतप्रधानमंत्र्यांनी टाळेबंदी घोषित केली. सर्व गतीचक्र एका निर्णयाने थांबले. सर्व लोक घरातच, बाहेर पडण्याची भिती त्यामुळे कुटुंबातील वादविवाद वाढू लागले. अशा कौटुंबिक कलहग्रस्त कुटूंबातील ४० विवाहित गृहीणीच्या मानसिक स्थितीवर झालेल्या परिणामाचे अध्ययन केले असता अनेक गृहीणींना मानसिक विकृती, चिंताविकृती यासारखे आजार झाल्याचे सिद्ध झालेले आहे.

विषयाची ओळख :(Introduction)

अतिप्राचीन काळापासून स्त्री जन्मापासून ते मृत्यूपर्यंत विविध पातळयावर संघर्ष करत असलेली दिसुन येते. मुलीचा जन्म वर्षो वाटून तर मुलांचा पेढा वाटून साजरा केला जाणे इथपासून भेदभावाची गुहूर्तमेढ रोवली जाते. जो आजन्म या ना त्या स्वरूपात आपले अस्तित्व दर्शवित राहते. एकेकाळी सुवर्णयुगात वावरणारी स्त्री हळूहळू परावलंबी व गुलामगीरीच्या बंधनात अडकत गेली. स्वातंत्र्यांच्या मुल्यांना तुडवित जावून सामाजिक चौकटित ती बंदिस्त झाली. आकाश भरारी घेऊ इच्छिणाऱ्यांचे पंख छाटण्यात आले. तर असह्य अगतिक असणाऱ्या अनन्वित अत्याचार अन्याय व हिंसेच्या बळी ठरल्या. अगदी बालपणापासून तू मुलगी आहे, तुझे वागणे असे असावे, असे बोलू नये, मोठयाने हसू नये असे संस्कार व शिकवण यातून ती घडविली जाते हे बाल मनावरील संस्कार इतके अमिट व पक्के असतात की, जन्मभर तिची सोबत करतात. याचा एकूण परिणाम म्हणजे यात शिकवण व वागणूकीतुन ती पुढची पिढी घडवित जाते. या प्रक्रियेत तिचे दु:ख वेदना, भय, भोग, यातना, अनुभव, वातावरण यांची सर मिसळ होवून त्याने स्वरूप अधिक किचकट व नकारात्मक होत जाते. स्त्री ही जन्मत: दुर्बल आहे हे तिच्या मनावरील ठसे तिच्या संपर्कात येणाऱ्या समस्त स्त्री मनावर उमटविण्याचा प्रयत्न सहजपणे करत जाते.

कोवीड–१९ या आजाराच्या प्रादुर्भावामुळे २३ मार्च २०२० पासून भारताच्या प्रधानमंत्र्यांनी टाळेबंदीची घोषणा केली. या घोषणेमुळे संपूर्ण देशाचे गतिचक्र क्षणात थांबले. सर्व शासकिय, निमशासकिय, खाजगी कार्यालये, कंपनी, कारखाने, आस्थापना, बँका सर्व बंद पडल्याने सर्व लोक आपापल्या गावी परतुन घरीच राहू लागले. टाळेबंदी काळातील आपत्ती व्यवस्थापनाच्या बंधनामुळे घराबाहेर पडणेही कठीण झाले. कुटुंबातील सर्व सदस्य घरीच थांबल्याने घरातील स्त्रियांवर मात्र याचा प्रचंड ताण निर्माण झाला. सर्वांच्या खाण्या–पिण्याच्या इच्छा, देखभाल घरातील कामाचा

Scanned with CamScanner

भार स्त्रियांवर पडला. या काळातील नोकरनाकर असणाऱ्या मगमध्ये सुद्धा कोवीड–१९ आजारान्या भीतीने मगगडी कामावर येणं बंद झाले. त्यामुळे गरीब, श्रीमंत अशा सर्व कुटुंबामध्ये कामाचा ताण कुटुंबातील स्त्रियांवर पडला. टाळेबंदीचा कालावधी वाढतच गेल्याने स्त्रियांची दमछाक होवू लागली. संपूर्ण वेळ कामात व्यस्त असल्याने कोणत्या ना कोणत्या कारणावरून कौटुंबिक मतभेद व वादविवाद वाढू लागले. त्यामुळे अनेक कुटुंबांमध्ये कौटुंबिक कलहाचे प्रमाण वाढले. यात कौटुंबिक कलहातुन स्त्रियांवर अत्याचारांचे प्रमाणही वाढले. तसे पाहता महिलांवर होणाऱ्या अत्याचाराच्या प्रकरणात नेहमीच भर पडत आहे.

तक्ता क्र. १,अत्याचार झालेल्या महिलांबाबत नोंदविलेल्या गुन्हयांची संख्या

जिल्हा	बलात्कार	अपहरण व पळवून	हुंडाबळी	लैंगिक अत्याचार	अनैतिक व्यापार	इतर
वर्धा	१७	२९	०१	७०	०	२०

(स्त्रोत – जिल्हा पोलिस अधिक्षक, वर्धा सन २०१८–१९)

वर्धा जिल्हामध्ये महिलांसाठी कार्यरत असणाऱ्या विविध मदत व सहाय्यक केंद्रातून कौटुंबिक कलहाच्या प्रकरणाची आकडेवारीवरून तर टाळेबंदी काळातील महिलांवर झालेल्या अत्याचाराची स्थिती जास्त स्पष्ट होते.

तक्ता क्र. २

जिल्हा	कालावधी	मदत केंद्राचे नाव	कौटुंबिक कलह व अत्याचार संबंधित नोंद झालेल्या केसची संख्या
वर्धा	जानेवारी २०२० ते डिसेंबर २०२०	वनस्टॉप सेंटर	६०
		अभय केंद्र	२२२
		समुपदेशन केंद्र	११६२
		भरोसा सेल, पोलिस अधिक्षक कार्यालय, वर्धा.	७५२
		एकूण	२१९६

स्त्रोत – १. पोलिस अधिक्षक, कार्यालय वर्धा, वर्ष २०२०
२. जिल्हा महिला व बालविकास अधिकारी कार्यालय, वर्धा, (वर्ष २०२०)

वरील तक्त्यावरून स्पष्ट होते कि, वर्धा जिल्हयामध्ये जानेवारी ते डिसेंबर २०२० या कालावधीमध्ये सुमारे २१९६ कौटुंबिक कलहाची प्रकरणे दाखल झाली. संशोधनकर्तीने यापैकीच कौटुंबिक कलहग्रस्त कुटुंबातील स्त्रियांच्या मानसिक स्थितीवर कोणता परिणाम झाला याचे अध्ययन केले आहे.

Scanned with CamScanner

अध्ययनाचे उद्देश :

१. कौटुंबिक कलहग्रस्त महिलांच्या मानसिक स्थितीचे अध्ययन करणे.

२. कौटुंबिक कलहांच्या कारणांचा शोध घेणे.

३. मानसिक स्थितीवर झालेल्या परिणामाचा शोध घेणे.

गृहितकृत्य :

१. कुटुंबातील सदस्याकडून असहकार्य व अवास्तव इच्छापूर्तीच्या मागणीमुळे स्त्रीयांवर मानसिक दडपण वाढले.

२. कोवीड परिस्थितीची भीती व सततची दगदग यामुळे चिंताग्रस्तेचे प्रमाण वाढले.

अध्ययन पद्धती :

अध्ययनाचे क्षेत्र वर्धा शहर आहे. कौटुंबिक कलहग्रस्त ४० महिलांची संभाव्यता नमुना निवड पद्धतीच्या नियमित अंकण तंत्राचा वापर करून एकक म्हणून निवड करण्यात आली. सदर अध्ययनात वर्णनात्मक आराखड्याचा उपयोग करण्यात आला.

तक्ता क्र. ३

अ. क्र	माहिती	विवरण					एकूण
१	कौटुंबिक कलहाचे कारण	कामात असहकार्य	लैंगिक त्रास	नेहमी रागावून बोलणे	सततच्या कामाचा ताण	नवऱ्याची व्यसनाधिनता	
		०६ (१५.००%)	०९ (२२.०५%)	०७ (१७.०५%)	११ (२७.०५%)	०७ (१७.०५%)	४० (१०० %)
२	नवऱ्यासोबत व कुटुंबातील इतर सदस्यासोबत संबंध	मतभेदाचे	ताणतणाचे	कामापुरते	जिव्हाळ्याचे	नवऱ्यासोबत चांगले परंतु सासू–सासऱ्या सोबत वाईट	
		१३ (३२.०५%)	०७ (१७.०५%)	०५ (१२.०५%)	१० (२५.००%)	०५ (१२.०५%)	४० (१०० %)
३	टाळेबंदीमुळे कौटुंबिक व वैवाहिक जिवनावर झालेला परिणाम	आर्थिक उत्पन्नाचा अभाव	उपजिकेचा समस्या	घरकामाचा दगदग व ताण	एकांत व विश्रांतीचा अभाव	सततची भिती व चिंता	
		०७ (१७.	१२ (३०.	०६ (१५	०६	०९	४० (१००

Scanned with CamScanner

		०१.%)	००%)	००%)	(२५.००%)	(२२.०५%)	%)
४	कौटुंबिक कलहामुळे मानसिक स्थितीवर झालेला परिणाम	चिंताग्रस्तपणा व भिती	चिडचिड पणा	नैराश्यात वाढ	झोपेची समस्या	शुल्लक कारणांसाठी राग	
		१४ (३५.००%)	०६ (१५.००%)	०७ (१७.०५%)	०८ (२०.००%)	०५ (१२.०५%)	४०(१०० %)

वरील प्राप्त तक्त्यांच्या विश्लेषणावरून असे स्पष्ट होते कि, कौटुंबिक कामात महिलांना सहकार्य मिळत नाही, सततच्या कामाचा ताण, पतिकडून लैंगिक संबंधाचा त्रास, कुटुंबियांकडून समजून घेण्याचा अभाव यामुळे कौटुंबिक कलह निर्माण होण्यास चालना मिळते. यामुळे नवऱ्यासोबत व इतर सदस्यासोबत मतभेदाचे वातावरण तयार होते.

टाळेबंदीमुळे कामधंदे बंद पडल्याने आर्थिक उत्पन्नावर परिणाम होवून उपजिवीकेची समस्या निर्माण झाल्या. जिवन जगण्याची समस्या, कोवीड आजाराविशयी सततची भीती व चिंता यामुळे कौटुंबिक जिवन विस्कळीत होण्यास कारणीभुत ठरले.

कुटुंबातील कलहग्रस्त वातावरण, सततच्या कामाची दगदग, कुटुंबाचे असहकार्य, उपजिविकेचा प्रश्न, कोवीड आजाराची भीती, प्रेमळ व्यवहाराचा अभाव यामुळे महिलांच्या मानसिक आरोग्यावर परिणाम झाला. या परिस्थितीमुळे त्यांच्यात चिंताग्रस्तपणा व भविष्याची भिती निर्माण झाली. आरोग्याच्या समस्या निर्माण झाल्या व नैराश्यात वाढझाली.

प्रमुख शोध :

१.टाळेबंदीकाळात घरकामाचा वाढलेला ताण, कुटुंबियांचे असहकार्य व प्रेमळ व्यवहाराच्या अभावाने कौटुंबिक कलहाविषयाची परिस्थिती निर्माण झाली.

२.कौटुंबिक कलहामुळे कुटुंबीयासोबत मतभेद, उपजिवेकीचे समस्या, कामाचा ताण व कोवीड आजाराची भिती यामुळे शारिरीक व मानसिक आरोग्यावर परिणाम झाला.

३.कौटुंबक कलह, टाळेबंदी, कोवीड आजाराची भिती यामुळे महिलामध्ये चिंताग्रस्त पणा, नैराश्य व भितीचे प्रमाण वाढले.

४.कोवीड आजारामुळे झालेल्या टाळेबंदीवर महिलांच्या कौटुंबिक व वैवाहिक जिवनावर नकारात्मक परिणाम झाला.

शिफारसी :

१.जिल्हयामध्ये कार्यरत सर्व महिला मदत केंद्रामध्ये कौटुंबिक कलहाची समस्या हाताळताना महिलांच्या मानसिक स्थितीचा अध्ययन करून त्यानंतर उपाययोजना करावी.

२.कौटुंबिक कलहग्रस्त असलेल्या कुटुंबातील सर्व सदस्यांशी संवाद साधावा व कुटुंबामध्ये मतभेदाने वातावरण निर्माण होईल यासंदर्भात उपाययोजना करण्यात याव्यात.

३.जिल्हयात महिलांसाठी कार्यरत असलेल्या वनस्टॉप सेंटर सारख्या सेवांची माहिती महिलांना होण्यासाठी प्रचार व प्रसिद्धी कार्यक्रम शासकीय स्तरावर व स्वयंसेवी सेवा मार्फत राबविण्यात यावे

Scanned with CamScanner

		०१.%)	००%)	००%)	(१५.००%)	(२२.०५%)	%)
४	कौटुंबिक कलहामुळे मानसिक स्थितीवर झालेला परिणाम	चिंताग्रस्तपणा व भिती	चिडचिड पणा	नैराश्यात वाढ	झोपेची समस्या	शुल्लक कारणांसाठी राग	
		१४ (३५. ००%)	०६ (१५. ००%)	०७ (१७. ०५%)	०८ (२०.००%)	०५ (१२.०५%)	४०(१०० %)

वरील प्राप्त तक्त्यांच्या विश्लेषणावरून असे स्पष्ट होते कि, कौटुंबिक कामात महिलांना सहकार्य मिळत नाही, सततच्या कामाचा ताण, पतिकडून लैंगिक संबंधाचा त्रास, कुटुंबियांकडून समजून घेण्याचा अभाव यामुळे कौटुंबिक कलह निर्माण होण्यास चालना मिळते. यामुळे नवऱ्यासोबत व इतर सदस्यासोबत मतभेदाचे वातावरण तयार होते.

टाळेबंदीमुळे कामधंदे बंद पडल्याने आर्थिक उत्पन्नावर परिणाम होवून उपजिवीकेची समस्या निर्माण झाल्या. जिवन जगण्याची समस्या, कोवीड आजाराविशयी सततची भीती व चिंता यामुळे कौटुंबिक जिवन विस्कळीत होण्यास कारणीभूत ठरले.

कुटुंबातील कलहग्रस्त वातावरण, सततच्या कामाची दगदग, कुटुंबाचे असहकार्य, उपजिविकेचा प्रश्न, कोवीड आजाराची भीती, प्रेमळ व्यवहाराचा अभाव यामुळे महिलांच्या मानसिक आरोग्यावर परिणाम झाला. या परिस्थितीमुळे त्यांच्यात चिंताग्रस्तपणा व भविष्याची भिती निर्माण झाली. आरोग्याच्या समस्या निर्माण झाल्या व नैराश्यात वाढझाली.

प्रमुख शोध :

१. टाळेबंदीकाळात घरकामाचा वाढलेला ताण, कुटुंबियांचे असहकार्य व प्रेमळ व्यवहाराच्या अभावाने कौटुंबिक कलहाविषयाची परिस्थिती निर्माण झाली.

२. कौटुंबिक कलहामुळे कुटुंबीयासोबत मतभेद, उपजिवेकीचे समस्या, कामाचा ताण व कोवीड आजाराची भिती यामुळे शारिरीक व मानसिक आरोग्यावर परिणाम झाला.

३. कौटुंबक कलह, टाळेबंदी, कोवीड आजाराची भिती यामुळे महिलामध्ये चिंताग्रस्त पणा, नैराश्य व भितीचे प्रमाण वाढले.

४. कोवीड आजारामुळे झालेल्या टाळेबंदीवर महिलांच्या कौटुंबिक व वैवाहिक जिवनावर नकारात्मक परिणाम झाला.

शिफारसी :

१. जिल्हयामध्ये कार्यरत सर्व महिला मदत केंद्रामध्ये कौटुंबिक कलहाची समस्या हाताळताना महिलांच्या मानसिक स्थितीचा अध्ययन करून त्यानंतर उपाययोजना करावी.

२. कौटुंबिक कलहग्रस्त असलेल्या कुटुंबातील सर्व सदस्यांशी संवाद साधावा व कुटुंबामध्ये मतभेदाने वातावरण निर्माण होईल यासंदर्भात उपाययोजना करण्यात याव्यात.

३. जिल्हयात महिलांसाठी कार्यरत असलेल्या वनस्टॉप सेंटर सारख्या सेवांची माहिती महिलांना होण्यासाठी प्रचार व प्रसिद्धी कार्यक्रम ग्रामस्तरीय स्तरावर व स्वयंसेवी सेवा मार्फत राबविण्यात यावे

Scanned with CamScanner

४. मानसिक आरोग्याच्या संदर्भातील समस्या सोडविण्यासाठी मार्गदर्शनाच्या सोफत सुविधा उपलब्ध करण्यात याव्या

५. प्रत्येक तालुक्यामध्ये कौटुंबिक मार्गदर्शन केंद्र सुरु करावे त्यामध्ये अल्प मुदतीच्या निवासाची व्यवस्था करावी

संदर्भसूची :

१ सेडाम सुरेश(2000)प्रायोगीक सामाजिक संशोधन– कृष्णचंद्र एजन्सीज नागपूर

२. कलाडे मालू (2000)सामाजिक संशोधन पद्धती – पिंपळापुरे अॅन्ड पब्लीशर्स कंपनी.

३. मालती बेलसरे (1991)स्त्री मानसशास्त्र –महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ, शिवाजी सार्वजनिक पुस्तकालय परिसर गोखले गोखले मार्ग, नागपूर

४. गगने वर्षा(2018)''स्त्री सक्षमीकरण दशा आणि दिशा'', साई ज्योती पब्लीकेशन, नागपूर.

५. गारे गोविंद – 'भारतीय स्त्री', शिरणे स्त्री शिक्षण संस्था पुणे.

६. कवी माधवी सो (2006)– 'महिला कल्याण आणि विकास' विद्या प्रकाशन नागपूर

७. कवे स्वाती 'स्त्री विकासाच्या पाऊलखुणा'

८. देशमुख अलका (2010)'विविध आयामातून स्त्री' श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर

९. पाटील लिला –'भारतीय स्त्री जीवन', मेहता पब्लिसिंग हाउस, पुणे.

१० शर्मा रमा –'महिला सशक्तीकरण', अर्जुन पब्लिशिंग हाउस, न्यू दिल्ली.

११ सोळंके लिलम– 'समाज आणि महिला' चुर्ले २००१, गदगांधी प्रकाशन एजेंटवाला, पुणे.

१२.भागवत विद्युत (2004)'स्त्री प्रश्नाची वाटचाल', प्रनिता प्रकाशन पुणे.

PRINCIPAL I/c.
Dr. Ambedkar College of Social Work, Wardha

Scanned with CamScanner

Impact Factor-7.675 (SJIF) ISSN-2278-9308

B.Aadhar

Peer-Reviewed & Refereed Indexed

Multidisciplinary International Research Journal

ISSUE No- (CCCIII)303

July -2021

Impact of Race, Caste, Class and Religion on Indian and International Society



Prof. Virag S. Gawande
Chief Editor
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

Dr Nitin A. Mathankar
Executive-Editor
Principal,
Late Vasantrao Kolhatkar
Arts College, Rohana

Dr. Deoman S. Umbarkar
Editor
Organizing Secretary
,Department of Sociology
Late Vasantrao Kolhatkar
Arts College, Rohana

This Journal is Indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

Aadhar Publication

For Details Visit To : www.aadharsocial.com

Dr. Ambedkar College of Social Work WARDHA

PRINCIPAL I/c.
Dr. Ambedkar College of
Social Work, Wardha

Scanned with CamScanner

Impact Factor - 7.675 ISSN - 2278-9308

B.Aadhar

Peer-Reviewed & Refreed Indexed

Multidisciplinary International Research Journal

July -2021

ISSUE No- 303 (CCCIII)

Impact of Race, Caste, Class and Religion on Indian and International Society

Prof. Virag.S.Gawande
Chief Editor :
Director
Aadhar Social Research &, Development Training Institute, Amravati.

Dr Nitin A. Mathankar
Executive-Editor
Principal,
Late Vasantrao Kolhatkar Arts College, Rohana

Dr. Deoman S. Umbarkar
Editor
Organizing Secretary ,Department of Sociology
Late Vasantrao Kolhatkar Arts College, Rohana

Aadhar International Publication

For Details Visit To : www.aadharsocial.com

© All rights reserved with the authors & publisher

Scanned with CamScanner

Aadhar International Peer-Reviewed Indexed Research Journal

Impact Factor - (SJIF) -7.675, Issue NO, 303 (CCCIII)

ISSN : 2278-9308

July, 2021

Editorial Board

Chief Editor -

Prof.Virag S.Gawande,
Director,
Aadhar Social Research &,
Development Training Institute, Amravati. **[M.S.] INDIA**

Executive-Editors -

- **Dr.Dinesh W.Nichit** - Principal, Sant Gadge Maharaj Art's Comm,Sci Collage, Walgaon.Dist. Amravati.
- **Dr.Sanjay J. Kothari** - Head, Deptt. of Economics. G.S.Tompe Arts Comm.Sci Collage Chandur Bazar Dist. Amravati

Advisory Board -

- **Dr. Dnyaneshwar Yawale** - Principal, Saraswati Kala Mahavidyalaya , Dahihanda, Tq-Akola
- **Prof.Dr. Shabab Rizvi** ,Pillai's College of Arts, Comm. & Sci., New Panvel, Navi Mumbai
- **Dr. Udaysinh R. Manepatil** ,Smt. A. R. Patil Kanya Mahavidyalaya, Ichalkaranji,
- **Dr. Sou. Parvati Bhagwan Patil** , Principal, C.S. Shindure College Hupri, Dist Kolhapur
- **Dr.Usha Sinha** , Principal ,G.D.M. Mahavidyalay,Patna Magadh University.Bodhgay Bihar

Review Committee -

- **Dr. D. R. Panzade,** Assistant Pro. Yeshwantrao Chavan College, Sillod. Dist. Aurangabad (MS)
- **Dr.Suhas R.Patil** ,Principal ,Government College Of Education, Bhandara, Maharashtra
- **Dr. Kundan Ajabrao Ahire** ,Ramkrushna Mahavidyalaya, Darapur Tal-Daryapur, Dist-Amravati.
- **DR. Gajanan P. Wader** Principal , Pillai College of Arts, Commerce & Science, Panvel
- **Dr. Bhagyashree A. Deshpande,** Professor Dr. P. D. College of Law, Amravati]
- **Dr. Sandip B. Kale,** Head, Dept. of Pol. Sci., Yeshwant Mahavidyalaya, Seloo, Dist. Wardha.
- **Dr. Hmachhuah Dalal** , Asstt. Professor K.K. Sanskrit University, Ramtek

Our Editors have reviewed paper with experts' committee, and they have checked the papers on their level best to stop furtive literature. Except it, the respective authors of the papers are responicible for originality of the papers and intensive thoughts in the papers.

- Executive Editor

Published by

Prof.Virag Gawande

Aadhar Publication ,Aadhar Social Research & Development Training Institute, New Hanuman Nagar, In Front Of Pathyapustak Mandal, Behind V.M.V. College.Amravati
(M.S) India Pin- 444604 **Email : aadharpublication@gmail.com**
Website : www.aadharsocial.com Mobile : 9595560278 /

PRINCIPAL I/c.
Dr. Ambedkar College of Social Work

Scanned with CamScanner

INDEX

No.	Title of the Paper — Authors' Name	Page No.
1	भारतीय समाजातील सामाजिक संस्थांचे बदलते स्वरूप — डॉ.विनोदकुमार मोतीराम कुंभार	1
2	जाती, वर्गाचा व धर्माचा गरीब लोकांवर होणारा परिणाम — प्रा. एस. के. इंगळे	4
3	भारतीय समाजावर जातीचा परिणाम — डॉ. हनुमंत हि. मिसाळ	8
4	अनुसूचित जाति की बालिकाओं पर शिक्षा के निजीकरण का प्रभाव — डॉ. भारती सागर	15
5	डॉ. आंबेडकरांचे जाती उच्छेदा विषयक विचार — प्रा. बाळकृष्ण कारू रामटेके	20
6	आदिवासी महिलांच्या दर्जावर आदिवासी जाती—जमातींचा होणारा परिणाम : एक अध्ययन — प्रा.डॉ.योगेश प्रल्हाद महाजन	22
7	भारतीय उद्योग व कामगार — डॉ.विनोदकुमार सुकराम चोपकर	26
8	आदिवासी समोरील आव्हाने व सामाजिक विकास :एक अध्ययन — डॉ.सिमना सिध्दार्थ मलाडे	30
9	दलित आत्मकथनाची वाटचाल — प्रा.डॉ.सुरेश व्यंकटराव कदम	36
10	प्रोफेसर रमणलाल मेहता द्वारा आगरा घराने की संकलित एवं स्वरांकित राग केदार की बंदिश का सांगितिक समिक्षण — Santosh Kisanrao Khandare	38
11	आधुनिक काळात निर्माण झालेल्या वृध्दांच्या समस्या एक अभ्यास — सहा.प्रा संदिप आर. उप्पोड	43
12	महात्मा ज्योतिबा फुले– महाराष्ट्रातील थोर समाज सुधारक — Mr Rajesh Sharadrao Chavhan	47
13	भारतातील बालकांची परिस्थिती — सहा.प्रा राहुल आर. लव्हाळे	50
14	सावित्रीबाई फुले आणि स्त्री शिक्षण — प्रा.राहुल जोंधळे	53
15	जाती, वर्ण आणी वर्ग (एस,एस टी, ओबीसी) व्यवस्थेतील गोंधळ! — डॉ. पुरोषत्तम गुणवतराव पखाले	57
16	वेदों की द्रष्ट्रा ऋषिकाएँ — प्रा.डॉ.प्रिती मंगेश कुलकर्णी	60
17	१९०९ च्या मोर्ले – मिंटो कायद्याचे परीक्षण — प्रा.डॉ.प्रमिला डी. भोयर	67
18	महिला सक्षमीकरण आणि पंचायत राज — परमानंद उके	71

Scanned with CamScanner

19	माता बाल मृत्युदर निवारणात जननी सुरक्षा योजनेचे योगदान प्रा. डॉ. पल्लवी माधवराव देशमुख	76
20	महात्मा ज्योतिबा फुले– महाराष्ट्रातील थोर समाज सुधारक"लिंग, धर्म व जातींचा राजकारणावरील प्रभाव व परिणाम – एक अध्ययन" निलेश माधव घोरपडे /प्रा.डॉ. आर.पी. निकम सर	79
21	सामाजिक परिवर्तन की प्रक्रिया में महिला आंदोलन की भूमिका मनविंदर की भामरा	82
22	भारतीय आदिवासी समाजाच्या आर्थिक समस्या प्रा. मनिषा नि. अवगान	85
23	आदिवासी स्त्रियांच्या जीवनावर सामाजिक परिवर्तनाचा प्रभाव डॉ.नगरे ज.कडपे	90
25	गरीब जनतेवर जात,वर्ग आणि धर्म यांचा परिणाम प्रा. डॉ.एम.एफ.राऊतराहे	93
26	ऐतिहासिक जीवनावर जाती, वर्ग आणि धर्म यांचा प्रभाव प्रा.डॉ. शिवाजीराव रोपणराव चौरे	96
27	आदिवासी समुदायावर जाती, वर्ग आणि धर्म यांचा प्रभाव कु.गोदावरी विठ्ठलबन बन	99
28	भारतीय संस्कृती मध्ये देवळांचे महत्व.... हिंदु संस्कृतीच्या अनुशंगाने डॉ. दिलीप चव्हाण	105
29	उत्तर भारतीय समान स्वर वाले रागों में स्वर–लगाव की तकनीक : एक अध्ययन दयाशंकर	109
30	महिला सक्षमीकरणात बचतगटाची भूमिका प्रा बाळासाहेब विठ्ठलराव तौर	112
31	मनोरंजन माध्यमे आणि महिलांची स्थिती सहा. प्रा. डॉ. अतुल पुंजाजी राठत	117
32	अंधश्रद्धेवर स्वसंकल्पनेचा होणारा परिणाम : एक मानसशास्त्रीय अध्ययन प्रा. डॉ. अनिल आय. थूल	121
33	अश्विनी भिड़े देशपांडे द्वारा रचित राग छायानट के बंदिश का सांगीतिक अध्ययन Amol Wasudeorao Gawande	124
34	आदिवासी जगातीवर जाती धर्माचा प्रभाव प्रा.यादवराव आर. गहाणे	130
35	वैश्वीकरण और भारतीय कलाओं में संगीत प्रा.वर्षा आगरकर	133
36	डॉ. आंबेडकर आणि पत्रकारिता प्रा. वंदना ह. तागडे	135
37	स्त्रियांच्या कार्यक्षेत्रा विस्तार व स्त्री सक्षमीकरण डॉ.उज्वला तेजराम कापगते	138

PRINCIPAL I/c.
Dr. Ambedkar College of Social Work

Scanned with CamScanner

38	संस्कृति, शिक्षा एवं धर्म के संदर्भ में स्वामी विवेकानंद का दर्शन एक दर्शन शास्त्रीय विवेचन प्रा.शिवचरण नामदेव धांडे	142
39	जातीचा भारतीय राजकारणावर प्रभाव प्रा.डॉ. सरला वसंतराव मेश्राम	149
40	सामाजिक एवं धार्मिक परिपेक्ष में संगीत की भूमिका डॉ. शारिका विवेक गावणे	153
41	मराठी लोकसाहित्य संशोधनाच्या नव्या दिशा प्रा.डॉ संतोष चंपती हंकारे	157
42	कोविड १९ च्या काळातील कामगारांचे स्थलांतर आणि उलट स्थलांतर प्रा डॉ. साधना डी. वाघाडे	161
43	रूपक–संख्या : एक अध्ययन डॉ. रोशन खंडू भगत	167
44	स्वतंत्र भारतातील तरुणांवर जातीव्यवस्थेचा झालेला परिणाम प्रा. रिता पी. खोब्रागडे	171
45	डॉ. आंबेडकर आणि शेड्युल्ड कास्ट फेडरेशन प्रा.डॉ. रमेश के. शेंडे	175
46	भारतीय लोकशाहीसमोरील एक आव्हान : भ्रष्टाचार डॉ. राजेंद्र ओ. बेलोकार / सहा. प्राध्या. मनोज के.सरोदे	178
47	जातीय व धर्म सलोखा राखण्यात ग्रामगीतेचे योगदान प्रा.डॉ. प्रशांत ग. देशमुख	182
48	कौटुंबिक हिंसा – एक सामाजीक समस्या प्रमोद चं. वानखेडे	187
49	भारतीय राजकारण आणि जातिचा प्रभाव : एक चिंतन डॉ.प्रकाश घ. कांबळे	191
50	जाती व धर्मव्यवस्थेचा भारतीय समाजावर झालेला परिणाम प्रा. डॉ. नागोराव के. सोरे	194
51	नगरपरिषद मधिल निर्वाचित महिला प्रतिनिधीची नगरविकासात भुमिका डॉ. मनोज श्रीकृष्णराव पवार	197
52	आदिवासींच्या जीवनावर सामुदायिक विकास योजनेचा झालेला परिणाम प्रो. मनोहर रामचंद्र चौधरी	201
53	भारतातील दारिद्र्य : कारणे, परिणाम व उपाय डॉ. महेन्द्र गावंडे	207
54	आधुनिक धर्मव्यवस्थेचा आदिवासींच्या जीवनावर झालेला परिणाम डॉ.मधुरी डाहे	212
55	भारतीय फिल्म संगीत की उत्पत्ति, विकास एवं नाट्य संगीत का विकसित स्वरूप किशोर चंद राठौड़	217
56	भारतीय राजकारणावर जाती धर्माचा प्रभाव डॉ. किशोर बी. कुडे	221
57	समाजकल्याणका रिती रिवाज : अन महत्व का थटक प्रा. डॉ. काशीनाथ मानमोडे/प्रा.डॉ. तिर्थनंदन बन्सगरे	227

Scanned with CamScanner

B.Aadhar International Peer-Reviewed Indexed Research Journal | ISSN : 2278-9308
Impact Factor - (SJIF) -7.675, Issue NO. 303 (CCCIII) | July 2021

आधुनिक धर्मव्यवस्थेचा आदिवासींच्या जीवनावर झालेला परिणाम

डॉ.माधुरी झाडे
डॉ.आंबेडकर कॉलेज ऑफ सोशल वर्क वर्धा
मो. ९४२३४२०२६३,मेल—madhurizade@gmail.com

मानवी समाजाच्या संदर्भात अनेक विचारवंतांनी वेगवेगळे कालखंड मांडलेले आहे. सैतीव शोध लागल्यानंतर मानव एका ठिकाणी स्थिरावला व दिर्घकाळपर्यंत एकाच ठिकाणी अनेक लोक वास्तव्यास राहु लागलो त्याचवेळेस समाज नावाची संकल्पनांना जन्म मिळाला तेव्हा शास्त्रीय आधार नसला तरी कालांतराने जेव्हा समाजाचा अभ्यास करण्याची सुरुवात झाली तेव्हा वरिल समाजाची परिस्थीती समजुन घेणे गरजेचे वाटले. समाजाच्या उत्पत्तीच्या कालखंडापासूनच धर्म सुद्धा तितकाच जुना असलेला दिसुन येतो पण पण एवढाच मोठा जो धर्माचे अस्तीत्व अगदीच प्राथमीक स्वरुपाचे होते.

सुरुवातीच्या कालखंडामध्ये धर्माच्या नावावर कोणत्याही प्रकारचे स्त्री—पुरुष किंवा इतर, मानवा—मानवांमध्ये भेद केल्या जात नव्हते. धर्म अगदी जीवन जगण्याचा सुंदर आधार होता. अलौकिक, अध्यात्मिक, समाधान नैसर्गिक संरक्षण इत्यादी दृष्टिकोनातून धर्माची गरज आदिवासींना वाटायला लागली व त्यातुन कर्मकांडी स्वरुपी समाजव्यवस्था निर्माण झाली. आदिवासी लोक आपले सामाजिक जिवनाचा भाग म्हणुन धार्मिक प्रतिकांना महत्व देउ लागलो प्रत्येक सन, उत्सव, विधी, पुजा अर्चा मध्ये धार्मिक प्रतिकांचे महत्व वाढत गेले व त्यामधुनच धर्म संकल्पना विस्तारत गेली.

हिंदु धर्म, ख्रिश्चन धर्म,मुस्लिम धर्म, बौध्द धर्म इत्यादि धर्माप्रमाणेच 'आदिवासी धर्म' अशी नोंद १९३१ आदिच्या जनगणना अहवालात होत असे परंतु १९३२ पासुन जनगणना करतांना आदिवासी धर्म असे स्वतंत्रचे नोंद घेण्या येणे बंद झाले. जनगणना करताना वेगळे आदिवासींनी आपला धर्म आदिवासी आहे असे सांगीतले तरी त्यांची नोंद अन्य धर्म या प्रकारामध्ये करायची असा निर्णय त्याळातील शासनाने घेतला. भारतीय आदिवासींचा धर्म कोणता ?या बाबतीत अनेक विचारवंत, अभ्यासकांमध्ये बरिच मतेमतांतर होती. जीवात्मवाद अशी धर्मश्रध्दा असणाऱ्या आदिवासींचा धर्म हा हिंदु धर्मपिक्षा वेगळा आहे त्याला आदिवासी धर्म संबोधने योग्य ठरते असे काही अभ्यासकांना आग्रह आहे. आदिवासींच्या धर्मासंदर्भात आजही अनेक मतेमतांतरे कमी, अधिक प्रमाणात दिसुन येतात म्हणुन आदिवासींच्या धर्मश्रध्दा आणि धार्मीक प्रथांचे अध्ययन करणे गरजेचे आहे. तत्पुर्वी आपण धर्माचा अर्थ लक्षात घेउयात.

धर्माचा अर्थ :—

धर्म हा मानवी समाजाएवढाच प्राचीन आहे. धर्माचा अभ्यास विविध दृष्टीकोनातुन केला गेला आहे. जसे तत्वज्ञान, इतिहास, धर्मशास्त्र समाजशास्त्र इत्यादी शास्त्राचा तो अभ्यासविषय आहे. अन्य शास्त्राप्रमाणेच सामाजिक मानवशास्त्रात आदिवासी धर्माचा अभ्यास केला जातो. आदिवासी धर्माच्या अभ्यास करण्याच्या संदर्भात टायलर, फ्रेजर, मॅलीनोव्हस्की, या सामाजिक मानवशास्त्रज्ञांचे योगदान महत्वाचे आहे.

किंग्जले डेव्हिस यांच्या मते :—

'धर्म ही मानवी जीवनात एवढा सार्वत्रीक, शाश्वत व व्यापक आहे कि, धर्माचे स्वरुप लक्षात घेतल्याशिवाय समाजाच्या स्वरुपाचे यथार्थ आकलन होउ शकत नाही.

एडवर्ड टायलर :—

यांनी अगदी सोपी व सुटसुटीत व्याख्या केली आहे. त्यांच्या मते "दैवी विभूतीच्या अस्तीत्वावरिल श्रध्दा म्हणजे धर्म होय."

सर जेम्स फ्रेजर यांच्या मते :—

"मानवापेक्षा श्रेष्ठ असलेल्या आणि ज्या मानवी जीवनाचे नियंत्रण करतात त्या शक्तींना अनिष्ठ टळावे म्हणून प्रसन्न करुन घेण्यासाठी केलेले प्रयत्न म्हणजे धर्म होय."

PRINCIPAL I/c.
Dr. Ambedkar College of
Social Work, Wardha

Scanned with CamScanner

मॅलीनोव्हस्की :—

यांनी व्याख्या करतांना समाजशास्त्रीय व मानवशास्त्रीय अशा दोन्ही बाजुचा आढावा घेतला. त्यांचा मते "धर्म हा श्रध्दा व विधी यांचा व्यवस्था आहे तसेच धर्म ही एक सामाजिक घटना व वैयक्तिक अनुभूती आहे."

प्रा.बॅलर्ड यांच्या मते :—

सामाजिक परिस्थीतीत आढळुन येणारे, अमुर्त, अदृश्य, अनोळखी व अप्रतिबध्द अशा शक्तीशी मिळते जुळते घेण्याची प्रक्रिया म्हणजे धर्म होय.

वरील सर्व व्याख्यावरुन आपल्याला असे निष्कर्षाला येता येते, मानवापेक्षा सुपरनॉर्मल अलौकिक शक्तीवर ठेवलेला विश्वास यावर आधारित सामाजिक जीवनाची रचना व कार्य यांचा मिलाप धर्म या संकल्पनेच्या माध्यमातुन दिसून येतो.

धर्माच्या उत्पत्तीचे सिध्दांत :—

धर्माच्या उत्पत्तीच्या सिध्दांतासंदर्भात अनेक विचारवंतांनी अभ्यासकांनी वेगवगळे सिध्दांत मांडले या सिध्दांताचा थोडक्यात विचार करने महत्वाचे आहे. तेव्हाच आपण धर्माची संकल्पना अधिक चांगल्यानी समजुन घेउ शकु.

१.सर्वात्मिवाद किंवा आत्मवादाचा सिध्दांत :—

या सिध्दांताची मांडणी एडवर्ड टायलर यांनी केली व त्यामध्ये स्पेन्सर यांनी देखील भर घातली. टायलर यांच्या मते आत्म्याच्या अस्तीत्वावरिल विश्वाच हाच सर्व मानव समाजातील धर्माचा प्रारंभबिंदु आहे. अगदी सुरुवातीपासुन तर आधुनिक व्यवस्थेचा धर्माचा आधार हा आत्म्याची संकल्पना आहे. टायलरणी स्वप्न आणि मृत्यू यांचा आदिवासींच्या जीवनावर झालेला परिणाम विषद करुन धर्म संकल्पनेचा उदय झाला असे स्पष्ट केले. आत्म्याच्या ठीकानी मानवी जीवनाचे संचलन असते.

म्हणुनच त्याला प्रसन्न करण्याकरिता वेगवेगळया पुजा, अर्चा करणे विधी, कर्मकांड करणे यातुन आपले जीवन सुकर होईल ही त्यामगची धारणा आहे.

२.चेतनावाद किंवा मानावाद सिध्दांत :—

यांनी चेतनावाद/मानावादाचा सिध्दांत मांडला, त्यानी या जगामध्ये प्रत्येक सजीव आणि निर्जीव वस्तु मध्ये एक अलौकिक शक्ती असते व ही अलौकिक शक्ती संपुर्ण सृष्टिचे नियत्रिंत करित असते म्हणुन स्वत: व समाजाचे हित लक्षात घेउन वेगवेगळया प्रकारच्या पुजा, अर्चा, विधी, कर्मकांड यांच्या माध्यमातुन या अलौकिक शक्तीला प्रसन्न केले जाते. या अलौकिक शक्तीलाच माना.बोंगा असे म्हटले जाते.या संदर्भातील वेगवेगळे अतार्किक संदर्भ मांडुन धर्माची उत्पत्ती या शक्तीच्या माध्यमातुन झाली असल्याचे अनेकांनी स्पष्ट केले.

३. निसर्गवादाचा सिध्दांत :—

हा सिध्दांत सुध्दा जर्मन विचारवंत मॅक्समुलर यांनी मांडला नैसर्गिक शक्तीच्या ठिकाणी अलौकिक शक्ती आहे अशा संकल्पनेतुन कर्मकांड, पुजा, अर्चा, विधी यांचा प्रारंभ झाला व तिथूनच धर्म नावाच्या संकल्पनेची सुरुवात झाली मॅक्समुलरने सांगीतले की आदिवासी मानवांवर निसर्गाचा चार नेहा प्रभाव होता. निसर्गामध्ये घडणाऱ्या घटनामागे काहीतरी दैवी शक्ती असल्या उदा. ऋतूचक्र, सुर्य उगवणे व मावळणे, ढगांचा कळकळाट, विजांचा आवाज मुसळधार पाउस परिणामी त्यांच्या मनात भिती निमाण होत होती व या भितीपोटीच तो वेगवेगळे कर्मकांड करून धर्म संकल्पना रूढ करत गेला.

४. प्रकार्यवादाचा सिध्दांत :—

या सिध्दांताचे समर्थन रॉबर्ट मिशन मॅलिनोव्हस्की, मॅक्स वेबर, पारसन्स या विचारवंतांनी केले. या विचारवंतांनी कुटूंब व विवाह या संस्थेप्रमाणेच धर्मसंस्था ही सुध्दा महत्वपुर्ण मानली त्यांनी धर्माच्या उदयापेक्षा कार्याला जास्त अधोरेखीत केले त्यांच्या मते.

१) धर्म व्यक्तीला समुहाशी एकरूप करतो.

२) असुरक्षित व्यक्तीस मानसीक सुरक्षितता प्राप्त करतो.

३) निराशा दु:ख संकट या काळात व्यक्तीचे सांत्वत करतो व व तिची नितीमत्ता वाढवतो.

Scanned with CamScanner

४) समाजातील प्रस्थापीत मुल्य व उद्दिष्ट यांचे महत्व वाढवुन समाजाचे संगठन व नियंत्रण घडवून आणतो.

५) सामाजिक सिध्दात :—

या सिध्दांताची मांडणी दुर्खीम यांनी केली गाल्हान धर्माना समाजशास्त्रीय सिध्दांत असेही म्हणतात. त्यांनी या सिध्दांताची मांडणी पवित्र आणि अपवित्र संकल्पणांच्या आधारावर केली. दुर्खीम यांनी आपल्या सिध्दांताची मांडणी आस्ट्रेलीयन अरूंटा या आदिवासींचा अभ्यास करून माडली दुर्खीमच्या मते कुलप्रतिकवाद हा धर्माचा सर्वात प्राथमिक प्रकार होय. अरूंटा जमात विविध कुलात विभागली आहे. एका कुलातील सर्व सभासदांचे पूर्वज समान असतात कुलात संघर्ष विवाह होत नाही. सभासदाना न्याय मिळवुन देण्यात येतो. एखाद्या प्राणी किंवा वनस्पती कुलाचे प्रतिक असते हे कुलचिन्ह पवित्र मानन्यात येते यांची शुध्दता टिकवुन ठेवण्यासाठी विधी निषेध, नियम, पुजा अर्चा समारंभ याचा जन्म होतो व्यक्ती श्रध्दा व भितीपोटी यांच्या पुढे नतमस्तक होतो आणि यातूनच तो धार्मिक अनुभूती घेतो.

संशोधन पध्दती —

संशोधनकर्ती मागील बारा वर्षापासुन डॉ. आंबेडकर कॉलेज ऑफ सोशल वर्क वर्धा येथे सहायक प्राध्यापक म्हणुन कार्यरत आहेत त्यापुर्वी त्या अनेक वर्ष मेळघाटमध्ये आदिवासींकरिता काम करित होत्या. संशोनधनकर्ती समाजकार्य महाविद्यालयात समाजशास्त्राच्या प्राध्यापीका असल्याने विद्यार्थ्यांना धार्मव्यवस्था शिकवीत असतांना तसेच दुसऱ्या वर्गातील विद्यार्थ्यांना आदिवासी समुदायातील परिवर्तन शिकवत असतांना त्यांच्या लक्षात आले की आदिवासींच्या जीवनावर धर्माचा फार मोठा प्रभाव होता परंतु आता त्यांच्यात आधुनिक धर्म उदा. हिंदु, ख्रिश्चन, मुस्लिम यांचा प्रभाव पडावयास मिळतो म्हणुन त्यांनी अध्ययनकरिता आधुनिक धर्मव्यवस्थेचा आदिवासींच्या जीवनावर झालेला परिणाम या विषयाची निवड केली.

अध्ययनाची उद्दिष्टये :—

१. आदिवासींच्या पुजा, अर्चा व आधुनिक धर्माचा प्रभाव जाणुन घेणे.

२. आदिवासींच्या सांस्कृतीक जीवनावर धर्माचा झालेला परिणाम अभ्यासने

३. आदिवासींच्या विवाह पध्दतीवर आधुनिक धर्मव्यवस्थेचा झालेला परिणाम जाणुन घेणे.

४. आदिवासींच्या सामाजीक जीवनावर धर्माचा झालेला परिणाम अभ्यासने.

गृहितकृत्ये :—

१) आधुनिक धर्माच्या प्रभावामुळे आदिवासींच्या पारंपारिक पुजा, अर्चा मध्ये बदल झाला.

२) आधुनिक धर्माच्या प्रभावामुळे आदिवासींच्या सांस्कृतीक जीवनामध्ये बदल झाला.

३) आधुनिक धर्माच्या प्रभावामुळे आदिवासींच्या विवाह पध्दतीत बदल झाला.

४) आधुनिक धर्माच्या प्रभावामुळे आदिवासींच्या सामाजिक जीवनात परिवर्तन झाले

संशोधनकर्ती जरी डॉ. आंबेडकर कॉलेज ऑफ सोशल वर्क वर्धा येथे सहायक प्राध्यापक पदावर कार्यरत असली तरी अभ्यासदौऱ्याच्या माध्यमातुन तिचा अनेक आदिवासी विभागासोबत संपर्क असतो. उदा. मेळघाट, गडचिरोली, यवतमाळ इत्यादि अभ्यास दौऱ्याच्या निमीत्याने ती अनेक स्वयसेवी संस्था सामाजीक कार्यकर्ते आदिवासी गावातील ग्रामपंचायत, सरपंच, सदस्य, नेहरू, वृध्द व्यक्ती, आदिवासी युवक, युवती, अंगणवाडी सेविका तसेच महाविद्यालयातील आदिवासी युवक, युवती, वनकर्मचारी तसेच मेळघाट मध्ये वास्तव्यास असताना त्यांचे सुक्ष्म निरीक्षण यातुनच या विषयाची त्यांनी मांडणी केली आहे.

१) आदिवासी पुजा, अर्चा व आधुनिक धर्म :—

आदिवासींच्या जीवनात पुजा, अर्चेला फार महत्वाने स्थान आहे. आदिवासी लोक आपल्या कोणत्याही नवीन कार्याची सुरुवात ते पुजा अर्चा करुन करतात उदा. शेतीची पेरणी, विवाह, पीक काढणी इत्यादी. त्यांच्या पुजा अर्चेमध्ये प्रामुख्याने त्यांच्या पारंपारिक देवाना समावेश असतो तसेच गंडे दोरे, धागे, नविन कपडे बांगडया इत्यादींचा समावेश असतो परंतु आधुनिक धर्माच्या प्रभावामुळे जे आदिवासी ज्या ज्या धर्माच्या संपर्कात आले आहे त्या त्या धर्माच्या देवतानुसार/धर्मानुसार पुजा करायला लागले उदा. हिंदु धर्माच्या संपर्कात आलेले आदिवासी हिंदु धर्माच्या देव देवतांची पुजा करायला लागले. ख्रिश्चन धर्मांच्या सपर्कात आलेले [illegible] ख्रिश्चन धर्मांच्या रिती नियमानुसार

PRINCIPAL I/c.
Dr. Ambedkar College of Social Work, Wardha

Scanned with CamScanner

पुजा करायला लागले तर मुस्लिम धर्माच्या संपर्कात आलेले आदिवासी हे मुस्लिम धर्माच्या रितीनीयमानुसार पुजा करायला लागले आज अनेक आदिवासी विभागातील वेगवेगळया धर्माची मंदिर, चर्च बघावयास मिळते यावरुन असे लक्षात येते की आदिवासी पारंपारिक धर्मामध्ये आधुनिक धर्माचा हस्तक्षेप होउन त्यांच्यामध्ये परिवर्तन होत आहे.

२) आदिवासींच्या सांस्कृतिक जीवनावर धर्माचा प्रभाव:—

आदिवासींच्या सांस्कृतिक जीवनावर देखील धर्माचा फार मोठा प्रभाव पडलेला आपणास दिसुन येतो आदिवासी समुदायामध्ये सांस्कृतिक जीवन हे पारंपारिक स्वरुपाचे होते. अनेक समुदायांमध्ये गुलामगिरी/गोदुल सारखी संकल्पना अस्तीत्वात होती या गोदुल गुलामगिरीमध्ये ७ वर्षापासुन तर लग्न होईपर्यंत मुल, मुली सकाळी सायंकाळी एकत्र यायची गाणी नाच यामध्ये मग्न व्हायचो आपले पारंपारिक नृत्य गाणी शिकायचे तसेच गावामध्ये कोणत्याही कार्यक्रम प्रसंगी ते सादर करायचे लग्न समारंभ, उत्सव इत्यादी प्रसंगी पारंपारिक नृत्य यांना महत्वाचे स्थान असायचे परंतु आज आधुनिक धर्मव्यवस्थेचा प्रभाव आदिवासींच्या जीवन पध्दतीवर झालेला आहे आज अनेक उत्सव कार्यक्रम प्रसंगी सिनेमाचे गाणे लावतात मुले मुली सिनेमांच्या गाण्यांवर नृत्य करतात. अनेक धार्मीक कार्यक्रमामध्ये सुध्दा परिवर्तन झाले उदा. आज मोठया प्रमाणात आदिवासी समुदायामध्ये गणेशउत्सव, दुर्गोत्सव, ख्रिसमस, गुडफ्रायडे इत्यादी उत्सव साजरे केले जातात.

३) आदिवासींच्या विवाह पध्दतीवर धर्माचा प्रभाव.

आदिवासींच्या विवाहपध्दती हया वेगवेगळया स्वरुपाच्या आपणास दिसुन येतात. वेगवेगळया जमातीमध्ये जोडीदार निवडण्याच्या वेगवेगळया पध्दती आहेत. आदिवासींची विवाह पध्दती ही फार साधी आणि आगडी वेगडी आहे. अनेक आदिवासींमध्ये आजही विवाहाच्या वेळेस वधुमूल्याची प्रथा अस्तीत्वात असलेली दिसुन येते. अगदी साध्या पध्दतीने विवाह व्हायचे कोणत्याही प्रकारच्या लग्नांमध्ये मोठेपणा नसायचा आपआपल्या एपतीप्रमाणे पाहूण्यांना बोलावून त्यांचे आगत स्वागत करून आदिवासी त्यांच्या विवाह विधीप्रमाणे विवाह पार पाडायचे परंतू आज विविध धर्माचा शिरकाव आदिवासी समुहामध्ये झाल्याने त्यांच्या विवाह पध्दतीत बदल झालेला दिसुन येतो.उदा. मेळघाटमध्ये जे आदिवासी हिंदू धर्मियांच्या संपर्कात आले त्यांच्या विवाह प्रथातीवर हिंदू धर्मीय विवाह पध्दतीचा प्रभाव पडलेला दिसुन येतो जसे मंगल अष्टके, मंडप, बँड इत्यादि. ख्रिश्चन धर्मियांच्या जे आदिवासी समूदाय संपर्कात आले त्यांच्या विवाहपध्दतीवर ख्रिश्चन धर्मीयांचा प्रभाव पडलेला दिसून येतो. उदा. अनेक आदिवासी चर्चमध्ये विवाह करतात तर जे आदिवासी समुदाय मुस्लिम धर्माच्या संपर्कात आले त्यांच्या वैवाहीक पध्दतीवर मुस्लिम धर्मीयांचा प्रभव पडलेलो दिसुन येतो अशा रितीने ज्या ज्या आदिवासी समुदायचा वेगवेगळया धर्मिय लोकांच्या अधिक संपर्कात आले त्या त्या धार्मिक विवाह पध्दतींचा प्रभाव आदिवासी विवाह पध्दतीवर झालेला दिसुन येतो.

५) आदिवासींच्या आर्थिक जीवनावर धर्माचा प्रभाव:—

अनेक वर्षापर्यंत आदिवासींचे आर्थिक जीवन एकप्रकारे स्वयंपूर्ण स्वरूपाने होते. त्यांच्या मर्यादित गरजांची पुर्तता ते त्यांच्या समुहाच्या माध्यमातुन करित होते. परंतू जेव्हा आदिवासी समुदाय वेगवेगळया धर्मांच्या संपर्कात आल्यामुळे त्यांच्या खानपानाच्या सवयी बदलल्या अनेक निषेध नियम लागु करण्यात आले. त्यांचे जंगलावर आधारित असलेले जीवन उदा. मासेमारी, पशु पक्षांचा शिकार यावर निर्बंध यावयास लागली त्यामुळे त्यांना वेगवेगळया ठिकाणी मोलमजुरी करून जीवनाचा उदरनिर्वाह करण्याची पाळी आली. अर्थव्यवस्थेला वेगवेगळे स्वरूप प्राप्त झाले त्यांच्या पारंपारिक व्यवसायाच्या जागी नवनवीन कार्य व व्यवसायाची भर पडत गेली. अनेक धर्म विधी करिता त्यांना पैशाच्या स्वरुपात खर्च लागला लागला धर्म उत्सव साजरे करित असतांना त्यांच्याकडुन पैसे गोळा केल्या जाउ लागले त्यामुळे धर्माच्या नावावर त्यांच्या आर्थिक परिस्थीतीमध्ये एकप्रकारे हस्तक्षेप होउ लागला.

६) आदिवासींच्या सामाजीक जीवनावर धर्माचा प्रभाव :—

एकंदरित आदिवासींचे संपुर्ण जीवन हे वेगवेगळया धर्मने प्रभावीत केले. आदिवासींच्या पारंपारिक प्रथा, परंपरा रूढी प्रमाणके यामध्ये बदल होउन नवधर्माच्या रूढी, प्रथा, परंपरा ते आत्मसाम करावयास लागले. आज आदिवासांमधील अनेक पारपारिक विधी आजच्या तरूण

Scanned with CamScanner

नीटीना नाहित नाही. कोरकू मधील शिदोली नावाना प्रकार आदिवासीमधुन युवागृह, गोटुल अशा वेगवेगळया नावांनी जे आदिवासीचे सांस्कृतीक सामाजिक भवन होते त्यांच्या मोठया प्रमाणात लोप होतांना दिसत आहे. आदिवासींचे पारंपारिक खेळ, नृत्य यांचीही हळूहळू लोपाकडे वाटचाल सुरू आहे.कारण अनेक तरूण मुला मुलींना पारंपारिक नृत्य, गाणी येत नाही तर वेगवेगळ्या धर्मीयांची गाणी ते आपल्या घरी कार्यक्रमामध्ये वाजवताना दिसतात एवढेच नव्हे तर अनेक आदिवासी तरूण तरूणींची मोबाईल रिंगटोन सुध्दा धार्मीक गाण्याची, स्टेटस धार्मीक देवदेवतांची पहावयास मिळतात. त्यांच्या वेशभुषा, केशभुषा पुर्णपणे बदलल्या आहेत एवढेच काय ते एकमेकांसोबत सुध्दा कधी कधी आपली मातृभाषा सोडून मराठी, हिंदी मायनर्स बोलतात यामुळे त्यांच्या सामाजिक जीवनात मोठया प्रमाणात बदल झालेला दिसुन येतो.

निष्कर्ष :–

आज आदिवासींच्या परंपरागत जीवनपध्दतीमध्ये मोठया प्रमाणात बदल होताना दिसत आहे. आदिवासी संस्कृतीचा लोप होतांना दिसत आहे. पुर्वी ख्रिश्चन मिशनऱ्यांनी या समुदायामध्ये मोठया प्रमाणात स्वतःच्या धर्माचा प्रचार आणि प्रसार मोठया प्रमाणात केला त्यानंतर हिंदु धर्मिय समुदाय देखील आदिवासींना आपल्या धर्माकडे वळविण्याचा प्रयत्न करित आहे त्याचा परिणाम म्हणुन आज अनेक तरूण तरूणांना स्वतःचे देवत माहीत नाही. पारंपारिक पुजा अर्चा करता येत नाही त्यांची सांस्कृतीक साधने व माध्यमे बदलली आहे. विवाह विधी सन उत्सव यामध्ये देखील बदल झालेला दिसतो त्यांची युवागृहे, गोटुल इत्यादी पध्दतीचा लोप होत आहे. पारंपारिक गाणी नृत्य विसरत चालली आहे. एकंदरितच संपूर्ण आदिवासी जीवन आज वेगवेगळया धर्माने प्रभावीत झालेल दिसुन येत गावामध्य गल्यानतर वगवगळया धर्माचा मादर, वच बघावयास मिळतात, वेगवेगळ्या धर्मानी प्रतिके वसावयास सिध्दात, त्यांना स्वतंत्र असलेला आदिवासी धर्माने आपलील आज गावांमधुन नामशेश होत आहे. व नवधर्म रचना गावांमध्ये प्रवेश करताना दिसत आहे.

संदर्भग्रथसूची:–

१) लोटे रा.ज (२०१०). 'आदिवासी समाजाचे समाजशास्त्र', पिंपळापुरे अँड क पब्लिशर्स नागपूर ४४४००२२.

२) खडसे भा.की (१९९९). 'सामाजिक मानवशास्त्र', श्री मंगेश प्रकाशन श्री शांतादुर्गा निवास २३, नवि रामदासपेठ नागपूर ४४४००१०.

३) नेहरू पंडित जवाहरलाल (१९९७). 'भारत कि खोज' (मराठी आवृत्ती माने गुरूजी व करंदीकर) कॉन्टीनेटल प्रकाशन पुणे.

४) आंबेडकर डॉ.बाबासाहेब(अनुवाद मोडेमवार देविदास). 'बुध्द आणि त्यांचा धम्म' डॉ. बाबासाहेब आंबेडकर नॅशनल असोशीएशन नागपूर.

५) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भाषणे भाग–३ खंड–१८. प्रकाशन उच्च व तंत्रशिक्षण विभाग महाराष्ट्र शासन २००२.

६) [illegible]

सस्कारन.

PRINCIPAL I/c.
Dr. Ambedkar College of Social Work, Nagpur

Scanned with CamScanner


४७

ISSN 0976-2957

समकालीन भारत : विकास आणि विषमता

साहित्य, कला, संशोधन व परिवर्तनवादी
पुरोगामी विचारसरणी चालिवणारे त्रैमासिक

वर्ष : बारावे । अंक : चौथा
जानेवारी-फेब्रुवारी-मार्च २०२२



Scanned with CamScanner

४७

साहित्य, कला, संशोधन व परिवर्तनवादी पुरोगामी
विचाराशी बांधिलकी ठेवणारे त्रैमासिक

अक्षरगाथा

वर्ष : बारावे । अंक : चौथा । जानेवारी-फेब्रुवारी-मार्च २०२२, नांदेड

संपादक : मा. मा. जाधव

संपादक मंडळ : बजरंग बिहारी, अनिल जायभाये, विवेक घोटाळे, संतोष सुरडकर, कमलाकर चव्हाण

कार्यकारी संपादक : दिलीप चव्हाण, भगवान फाळके

प्रकाशक : अर्चना माधवराव जाधव
बळीवंश प्रकाशन, 'बळीवंश', नृसिंह पॅलेसच्या मागे, नरहरनगर, नांदेड -५.

मुद्रितपासणी : राजेश मुखेडकर
प्र. ९८९०१५३७००

मुद्रक
मुद्रा ऑफसेट प्रिंटर्स अँड प्रोसेसर्स
शारदा टॉकीजजवळ,
एम. जी. रोड, नांदेड-०३.

मुखपृष्ठ व अक्षरसांडणी
विजयकुमार चित्तरवाड

अक्षरजुळणी
गिरीश कहाळेकर
प्र. ९८९०५९७७१४

साहित्य व वर्गणी पाठविण्याचा पत्ता
मा. मा. जाधव
'बळीवंश', नृसिंह पॅलेसच्या मागे, नरहरनगर, नांदेड - ४३१ ६०५. प्र. ९४२२८७४३३६, ९८८१९९१५४३.
e-mail : akshargatha@gmail.com

वार्षिक वर्गणी : व्यक्ती : ₹ ३००/- संस्था : ₹ ४००/- त्रैवार्षिक वर्गणी : व्यक्ती : ₹ ८००/- संस्था : ₹ १०००/-
१० वर्षासाठी : व्यक्ती : ₹ २५००/- संस्था : ₹ ३०००/- अंकाचे मूल्य : ₹ १००/-

मनीऑर्डर/चेकाने/घनादेश/धनाकर्ष/Phone Pay/Google Pay 9422874336/बँक खाते : भारतीय स्टेट बँक (State Bank of India) यशवंतनगर, नांदेड 'अक्षरगाथा' खाते नं. 32204333102 या IFSC Code : SBIN0001922

वर्गणी रक्कम + ₹ ३० (शाखा विनिमय फीस) भरून पत्ता कळवावा.

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने या नियतकालिकाच्या प्रकाशनार्थ अनुदान दिले असले तरी, या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ वा शासन सहमत असेलच असे नाही.

* या अंकातील लेखांतून व्यक्त झालेल्या लेखकांच्या मतांशी संपादक, मुद्रक आणि प्रकाशक सहमत असतीलच असे नाही.
मुखपृष्ठ व अक्षरसांडणी विजयकुमार चित्तरवाड (यांचे हे काम आहे)

पृष्ठ क्र.३

PRINCIPAL
Social Work, Wardha

Scanned with CamScanner

UGC CARE listed and Peer Reviewed Journal

४७

अक्षरगाथा

जानेवारी-फेब्रुवारी-मार्च २०२२

| अ नु क्र म |

विभाग : एक

■	जबरदस्तीचा 'विकास'	व्हर्जिनिअस सासा	७
■	उच्च जातींचे बंड	जीन ड्रेझ	११
■	'नव-उदारमतवादी युगा'चा अंत होऊ घातलाय...	रुटगर ब्रेगमन	१७
■	फॅसिझम	जयदेव डोळे	२८

विभाग : दोन

■	कविता : माया जेलो, बर्टोल्ड ब्रेख्त, पाऊल लॉरेन्स डनबर, जून जार्डन		३१

विभाग : तीन

■	भा. ल. भोळे यांचे स्वातंत्र्योत्तर भारतातील विकास...	भगवान फाळके	३७
■	एका नव्या लढाईसाठी...	डॉ. अजय देशपांडे	४६

विभाग : चार

■	नवीन शैक्षणिक धोरण: विविधरंगी...	अविजित पाठक	५९
■	समकालीन शिक्षण वास्तव आणि शिक्षण धोरण	डॉ. डी. एन. मोरे	६५
■	जोतीराव फुल्यांचा शिक्षणविषयक क्रांतिकारी...	रेणुकादास उबाळे	७४
■	शिक्षणाचे 'झूम बराबर...'	भवानी शंकर नायक	८२


विभाग : पाच

■	लिंगभाव विषमता : समकालीन संदर्भ	मयूरी सामंत	८५
■	अंधश्रद्धा आणि विषमता - बदलते संदर्भ	डॉ. माधुरी झाडे	९३

Scanned with CamScanner

अंधश्रद्धा आणि विषमता – बदलते संदर्भ

डॉ. माधुरी झाडे
डॉ. आंबेडकर कॉलेज ऑफ सोशल वर्क, वर्धा.
भ्र. ९४२३४२०२६३ madhurizade@gmail.com



भारतीय समाजव्यवस्था ही विषमतेवर आधारित असणारी समाजव्यवस्था आहे. या संदर्भात आपण सर्व परिचित आहोतच विषमता ही लिंगाधिष्टीत, जातीधिष्टीत, धर्माधिष्ठित,तसेच आर्थिकतेवर आधारित असलेली दिसून येते. याच सोबत पुरुषप्रधान व्यवस्थेमध्ये स्त्री-पुरुषांमधील विषमता ही अंधश्रद्धांमुळेदेखील समाजव्यवस्थेमध्ये आपले पाय वर्षानुवर्ष घट्ट रोवुन बसलेली आहे, असेही दिसून येते. समाजमनात असलेल्या शिक्षित, अशिक्षित, स्वतःला सुशिक्षित, शहाणं, हुशार अशी विविध विशेषण असणाऱ्या नव्हे तर ती लावून घेणाऱ्या समाज घटकांमध्येदेखील मोठ्या प्रमाणात अंधश्रद्धा आहेत. या अंधश्रद्धामुळे महिलांवर वर्षानुवर्षे काही गोष्टी समाजव्यवस्थेने लादल्या आहेत. तर, काही वेळेस आपलं जीवन सुकर व्हावं, चाकोरीबद्ध व्हावं तसेच व्यवस्थेने आपल्याला नाकारू नये याकरिता महिला स्वतःहून काही गोष्टी स्वतःवर लादून घेतात. समाजमनाची इतक्या मोठ्या प्रमाणात असलेली धार्मिक नियंत्रणेही अंधश्रद्धांना खतपाणी घालणारी आहेत. यातूनच स्त्रीच्या वाट्याला सातत्याने दुय्यमत्व येऊन विषम वागणूक तिच्या वाट्याला आलेली आहे.

अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीमध्ये काम करीत असताना अनेक घटना अगदी जवळून बघावयास मिळाल्या. यासोबतच या विषयावरील वाचन, चिंतन, मनन, विविध कार्यक्रम, यातून एक प्रामुख्याने लक्षात आले की, अंधश्रद्धा ही मुळातच शोषणाची व्यवस्था आहे. तसेच, ती विषमतेवरदेखील आधारलेली आहे. भारतीय संस्कृतीचा विचार करीत असताना आढळून येते की, सामान्यपणे आम्ही आपल्या संस्कृतीचे खूप गोडवे गात असतो. याचे प्रमुख कारण धर्मव्यवस्थेत दडलेले आहे. आमच्या संस्कृतीने स्त्रीला देवीचे स्थान बहाल केले. आमच्या देशाला मातेचे स्थान बहाल केले. जिच्या हाती पाळण्याची दोरी ती जगाला उद्धारी, अशा स्वरूपाच्या म्हणी तयार करून तिचा गौरव केला आहे. परंतु, प्रत्यक्षात तिच्या वाट्याला अनेक दुःखे आणि यातना आल्या आहेत. या दुःख आणि यातनेचे ती जेव्हा जेव्हा परीक्षण करावयास पुढे येते, तेव्हा मात्र तिला खूप मोठ्या प्रमाणात कुटुंबातूनच विरोधाला सामोरे जावे लागते. कारण, अजूनही आपली समाजव्यवस्था ही पुरुषप्रधान आहे. त्यामुळे या व्यवस्थेने स्त्रियांवर असंख्य बंधने लादून तिच्या विकासाच्या मार्गात अडथळे निर्माण केले आहे. आज समाजामध्ये बोलले जाते

PRINCIPAL I/c.
Dr. Ambedkar College of
Social Work, Warora

Scanned with CamScanner

ISSN : 0976-2957

की, आता महिला कुठे मागे राहिल्या. प्रत्येक क्षेत्रात तिने प्रगती केली आहे. परीक्षेमध्ये उत्तीर्ण होणाऱ्या व गुणवत्ता यादीमध्ये स्थान मिळवणाऱ्या मुलींची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. हे जरी खरे असले तरी गावातील, आदिवासी वस्त्यांमधील, वाड्यांमधील, जत्रायात्रांमध्ये अंगात येणाऱ्या, भुताने झपाटलेल्या, देवी अंगात संचारणाऱ्या महिलांची संख्यादेखील दिवसागणिक कमी होण्याऐवजी वाढतच आहे. तसेच आपल्या आधुनिक समाजात हुंड्याकरिता महिलांचा छळ होणे, या नैराश्यातून तिचे मानसिक खच्चीकरण होणे, जाळले जाणे या घटना नित्याच्याच झाल्या आहेत.

शुभ - अशुभ तसेच पवित्र-अपवित्र या संकल्पना स्त्री- पुरुष विषमतेला, अंधश्रद्धेला फार मोठ्या प्रमाणात खतपाणी घालतात. शुभ- अशुभ या संकल्पनेचा स्त्रियांच्या शारीरिक व कौटुंबिक घटनांवर मोठ्या प्रमाणात प्रभाव पडलेला दिसतो. शुभ - अशुभ या समजातून महिलांची फार मोठी वर्गवारी केली जाते. याच महिलांना अनेक संधी नाकारल्या जातात. प्रसंगी एखाद्या व्यक्तीचं जगणं असह्य होऊन जातं. याचं कारण म्हणजे केवळ ती व्यक्ती अपशकुनी आहे, असा समज होय. घरात पाय ठेवताच घरामध्ये वाईट घटना घडायला सुरुवात झाली, घराची शांतता भंग झाली, अशा प्रकारचे अनेक आरोप तिच्यावर करण्यात येतात.

पूर्वी राजे-महाराजे घराबाहेर पडताना त्यांच्यासमोरून जाणीवपूर्वक सुवासिनींना पाठविले जायचे. कारण, या राजा-महाराजांना शुभशकुन घडावा, असा त्यामागील उद्देश होता. परंतु, आजही सुवासिनी आणि विधवा यामधील शुभ-अशुभ संकल्पना कार्यरत असलेली दिसते. ही संकल्पना प्रामुख्याने अंधश्रद्धेवर आधारलेली आहे. उदाहरणार्थ, एखाद्या स्त्रीच्या नवऱ्याचा मृत्यू झाला तर तिला अनेक धार्मिक व कौटुंबिक कार्यक्रमांना जाण्यास बंदी असते. उदाहरणार्थ, हळदीकुंकूवाचा कार्यक्रम, नामकरण सोहळा. स्त्रीला जोडीदार असणं-नसणं हे सर्व तिच्या पावित्र्य - अपावित्र्यावर व शुभ - अशुभतेवर अवलंबून आहे. हे जसे स्त्रीच्या बाबतीत आहे, तसेच ते पुरुषाच्याबाबतदेखील असावयास पाहिजे. परंतु, इथेदेखील लिंगभेदाचे तत्त्व काम करीत असताना दिसून येते.

स्त्रियांच्या संदर्भात 'अखंड सौभाग्यवती' हा आशीर्वाद आहे की, तो भविष्यातील दिशादर्शक आहे, असा प्रश्न पडतो. याचा अर्थ असा की, तिने मरेपर्यंत सौभाग्यवती राहावं. म्हणजेच आधी तिचा मृत्यू व्हावा. यामध्ये नवऱ्याच्या दीर्घायुष्याची अपेक्षा असेल, पण तिचं काय? अखंड सौभाग्यवती' असा आशीर्वाद स्त्रियांना फार छान वाटतो. परंतु, त्यांनी याचा अर्थ नीट समजून घेतला, तर त्यातील लबाडी लक्षात येते. तिचं सौभाग्य हे सर्वोत्तम आहे. अगदी तिच्या प्राणापलीकडे! सौभाग्य या शब्दाची फोड वेगळी असली तरी हे सौभाग्य म्हणजे पती असंच समजण्यात येते. म्हणजे, हे सर्व त्याच्या दीर्घायुष्यासाठी करायचं असतं. त्यात तिचा विचार कुठेच दिसत नाही.

लिंगभाव विषमतेच्या अनेक परिणामांपैकी माणसांना नाकारणं, हा एक परिणाम आहे. यामधून महिला समुदायातील व्यक्तींना लिंगाच्या आधारावर दुय्यमत्व प्रदान करायचं, त्यांना काही विशिष्ट भूमिका देऊन त्यांचे आयुष्य बंदिस्त करायचं. त्यांच्या चारित्र्यावर संशय निर्माण करायचे, त्यांची बदनामी करायची; अथवा शुभ-अशुभ पवित्र - अपवित्र या संकल्पनांच्या माध्यमातून त्यांच्यावर नियंत्रण मिळवायचे व यामधून त्यांचे शोषण करायचे, त्यांच्यावर मालकी प्रस्थापित करायची. हे सर्व अंधश्रद्धेतून घडत असते. त्याकरिता पुरुषसत्ताक व्यवस्था कार्य करीत असते व विषमतेचे बीज सातत्याने पेरत असते. अनेक व्रतवैकल्ये, उपासतापासही स्त्रीच्या वाट्याला आले आहेत. अनेक स्त्रिया उपवास करीत असताना 'एक दिवस पोटाला आराम मिळावा म्हणून उपवास करतो', असे सांगतात. त्यामुळे तब्येत ठणठणीत राहते, असेही कारण सांगत असतात. खरंच हे सत्य आहे ? यामध्ये वैज्ञानिक कारण असतं, तर डॉक्टरांनी पुरुषांनादेखील आठवड्यातून एक दिवस उपवास करायचे सांगितले असते. परंतु, प्रत्यक्षात असे आपणास दिसून येत नाही. यावरून उपवास हे स्त्रियांच्या शोषणाचे एक भयंकर षड्यंत्र आहे, असे

Scanned with CamScanner

लक्षात येते. यामधून स्त्रीच्या आरोग्याचे असंख्य प्रश्न निर्माण होतात आणि त्यामधून अंधश्रद्धांना मोठ्या प्रमाणात खतपाणी मिळते. यामधून उपासना, आराधना, उपवास यांचा जन्म होतो. व्रतवैकल्य करीत असताना सातत्याने एक युक्तिवाद केला जातो तो असा की, या निमित्ताने स्त्रियांना नटायला, घराबाहेर पडायला मिळते. त्या काही वेळेला नटण्यासाठी दिवसभराचं शोषण सहन करतात आणि करायचं काय, तर वडाच्या झाडाला फेऱ्या मारा, होळीची पूजा करा. वाण घ्यायला फिरा इत्यादी. हेही का करावं याकरिता विज्ञान असतंच! वडाच्या झाडाची ऑक्सिजन थेरी, अनवाणी चालन्यातील ॲक्युप्रेशर, तुळशीची पूजा आणि शुद्ध ऑक्सिजन अशा प्रकारचे प्रतिवाद ऐकायला मिळतात. आणि हो, हे जर खरंच आहे, तर मग हे फक्त स्त्रियांसाठीच का? पुरुषांसाठीसुद्धा याची गरज असायला हवी. परंतु, असे दिसून येत नाही. यावरून विषमतावादी अंधश्रद्धा या बहुसंख्येने स्त्रियांच्याच वाट्याला आलेल्या दिसून येतात व त्यांची रचना अगदी समर्थपणे, समर्पकपणे मांडलेली दिसून येते.

काही वेळेला असाही युक्तिवाद केला जातो की, ही व्रतवैकल्ये स्त्रियांनाच करायला आवडतात. काही प्रमाणात हे खरंही आहे. परंतु, सर्वसामान्यपणे आपण वरील विधान खरे आहे, असे मानू शकत नाही. कारण, महिलांवर हजारो वर्षांचा या संदर्भातील पगडा असतो. काही स्त्रियांना हे सगळं करण्याची आवड असते आणि काहींवर परंपरांच्या नावाखाली सक्ती केली जाते. याचा अर्थ, त्यांच्यावर प्रत्यक्ष सक्तीच केली जाते, असे नाही; परंतु त्या अप्रत्यक्षरीत्या त्या सक्तीच्या दडपणाखाली सातत्याने असतात किंवा त्यांनी ती सक्ती स्वतःवर लादून घेतलेली असते. कारण, बहुतेक व्रते, उपवास नवऱ्यासाठी, मुलं होण्यासाठी किंवा मुलांचे चांगले होण्यासाठी केले जातात. जर हे केले नाही तर कुटुंबावर प्रेम नाही, नवरा व मुलांवर प्रेम नाही, असे अर्थ काढले जातात आणि म्हणूनच, कुटुंबावर प्रेम, नवऱ्यावर प्रेम, मुलांवरचं प्रेम सिद्ध करायचं तर परत उपास करायलाच हवा, असं तिला सातत्याने वाटते. तिच्या प्रेमाच्या भावनांवर शंका उपस्थित केलेली तिला परवडणारी नसते. म्हणून लोकांच्या अविश्वासात राहण्यापेक्षा ही व्रतवैकल्ये, उपवास केलेले काय वाईट आहे, असे तिला वाटते व त्यामुळे सर्व अंधश्रद्धांना ती स्वीकारत जाते. याउलट विचार करीत असताना पुरुषांनी मात्र मुलाचे, बायकोचे चांगले व्हावे याकरिता कुठल्याही स्वरूपाचे व्रतवैकल्य केल्याचे दिसून येत नाही. (अपवाद वगळता) म्हणजे कुटुंबाची संपूर्ण जबाबदारी स्त्रियांवर सोपवून पुरुष मात्र मोकळा झालेला दिसून येतो. या सर्व अंधश्रद्धांमधून लिंगभाव विषमता दिसून येते.

आपण जेव्हा परंपरेने चालत आलेल्या व्रतवैकल्यांच्या आख्यायिकांचा विचार केला, तर आपणास असे दिसून येईल की, व्रतवैकल्ये स्त्रीला समर्पणाची भावना शिकवितात. स्त्रीने स्वतःपेक्षा कुटुंबाच्या सुखाच्या अधिक विचार करायचा, (विशेषतः पतीचा), हे या आख्यायिकांमधून बिंबविले जाते. तिचा त्याग, यातना, उपवास व काही उपासना हाच जणू पुरुषांच्या व कुटुंबीयांच्या सुखाचा, त्यांच्या आरोग्याचा व प्रगतीचा मार्ग आहे. यामध्ये कुठल्याही प्रकारची वैज्ञानिकता दिसून येत नाही. तर, सरळसरळ यामध्ये लिंगाधिष्ठित विषमतावादी अंधश्रद्धा दिसून येतात. पितृसत्तेचे अस्तित्व टिकून ठेवण्यासाठी सत्यवानाच्या सावित्रीच्या काय मागण्या होत्या ? एक-नवऱ्याचे राज्य, दोन-सासऱ्याची दृष्टी आणि तीन - १०० पुत्ररत्नं (मुलगी नाही). याचा विचार केला, तर तिथं तिचं स्वतःचं अस्तित्व कुठेच दिसत नाही. एवढेच नाही, तर स्त्री वर्गाचं अस्तित्व दिसत नाही. १०० पुत्ररत्नं मागणारी स्त्री ही संपूर्ण महिला वर्गाकरिता खरंच आदर्श असू शकते का? तरीदेखील तिला आदर्श म्हणून इतर स्त्रियांसमोर ठेवले जाते . दुसरीकडे आपणास दुसरी सावित्री दिसून येते. तिने असली परंपरावादी अंधश्रद्धेवर आधारलेली व्रतवैकल्ये झुगारून स्त्रीशिक्षणाचा गाडा ओढला. तिच्याही वाट्याला असंख्य अवहेलना आल्या. तिला मूल होत नाही म्हणून ज्योतिबाने दुसरे लग्न करावे, असा सल्ला अनेकांनी ज्योतिबांना दिला. त्यानंतर जोतिबांनी दिलेले उत्तर हे

Scanned with CamScanner

ISSN : 0976-2957

खरंच कृतिशील स्त्री-पुरुष समतेचे प्रतीक आहे. त्यांनी सांगितले, 'सावित्रीला मुलं होत नाही, याबद्दल दोष तिचा असेल हे कशावरून? मुलं होत नाही तर दोष माझ्यातही असू शकतो आणि तसे असल्यास तिने दुसरे लग्न केलेले आपणास चालेल का?' असे ठामपणे दीडशे वर्षांपूर्वी उत्तर देणारे एकच फुले असू शकतात. अन्यथा आजही वास्तव हेच आहे की, विज्ञानाने कितीही प्रगती केली असली तरी मुलगा झाला नाही, तर त्याचं खापर स्त्रियांवर फोडले जाते. त्याकरिता तिला अवैज्ञानिक, अंधश्रद्धेवर आधारलेले व्रत, उपवास करावे लागतात.

